लेखक: दिलीप ठाकूर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

"शोले"...

आणि बरंच काही

लेखक

दिलीप ठाकूर

(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)

(9870616216)

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

For all 'E-Sahity' E-Books.. Visit/Log on

https://www.esahity.com

(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

© esahity Pratishthan® 2025

www.esahity.com **esahity@gmail.com**

Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- **विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.**
- **आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.**
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कॉपी राईट मालकाची लिखित परवानगीची जरुरी आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

लक्षात घ्या.. हे बोलकं ‘ई-बुक’ आहे. या ‘ई-बुक’ मधील प्रत्येक ‘फोटो’वर ‘लिंक्स्’ दिल्या आहेत, तसेच प्रत्येक निळया रंगातील मजकुर, यावर सुद्धा संबंधित ‘लिंक्स्’ दिलेल्या आहेत. फक्त ‘क्लिक’ करा, आणि त्यावरील ‘ऑडिओ/व्हीडिओ’चा मनसोक्त आनंद घ्या.

<u>दिलीप ठाकूर</u> (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)

(9870616216)

जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी विविध

नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी

त्यांची वाटचाल आहे. ऐंशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात

"स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन (ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र

लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची

तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स ॲवाॅर्ड,

शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर ' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.

#संजीव_वेलणकर पुणे.
९४२२३०१७३३

लक्षात घ्या.. हे बोलकं 'ई-बुक' आहे. या 'ई-बुक' मधील प्रत्येक 'फोटो'वर 'लिंक्स्' दिल्या आहेत, तसेच प्रत्येक निळया रंगातील मजकुर, यावर सुद्धा संबंधित 'लिंक्स्' दिलेल्या आहेत. फक्त 'क्लिक' करा, आणि त्यावरील 'ऑडिओ/व्हीडिओ'चा मनसोक्त आनंद घ्या.

"मनोगत"

शोले.... शोले... शोले....!!

कितने आदमी थे....!

"शोले" हा माझ्या आवडत्या चित्रपटातील एक. गिरगावातील खोताची वाडीतील मी एक "चित्रपट व क्रिकेट प्रेमी"! गल्ली चित्रपट व गल्ली क्रिकेट यातून मी रमलो, वाढलो, घडलो. त्यात मिनर्व्हात "शोले" पाहिलेला मी एक चित्रपट चाहता. सामान्य प्रेक्षक!

ऐशीच्या दशकात मी मिडियात आलो. आणि "शोले" सोबतचे माझे नाते बदलत बदलत गेले. पत्रकार म्हणून "शोले" वर अनेकदा खूप लेख लिहिलेत! मुद्रित माध्यम, उपग्रह वाहिनी, यू ट्यूब असा मी बदलत्या माध्यमासोबत प्रवास करत असताना "शोले" वर काहीना काही कारणास्तव लिहीत आलो, बोलत आलो, सांगत आलो, ऐकत आलो, वाचत आलो.

असे करत करत गतवर्षी म्हणजेच १५ ऑगस्ट २०२४ रोजी "शोले" च्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत असल्याचा प्रवास सुरु झाला. आणि मला अधिकाधिक प्रमाणात "शोले" वर लिहावे, बोलावे असे वाटू लागले. त्यात कमालीचे सातत्य राहिले. अशातच माझ्यासारखा चित्रपट प्रेमी आणि माझा समवयस्क बालमित्र डॉ. अनंत पावसकर याने मला म्हटले, "मित्रा, तुझी आतापर्यंत तुझी बरीच पुस्तके

प्रकाशित झाली आहेत. यापुढे देखील होतील. शोले वर तू बरेच काही लिहिले आहेस, जे "मराठी वाचक आणि चित्रपटप्रेमींसाठी एक अनमोल खजिना आहे! कोणत्याही वर्तमानपत्रांमधून छापून आलेले व तुझ्यासारख्या अभ्यासू लेखकाने लिहिलेले लेख..हे खरोखरच लोकांनी कायम स्वतःच्या संग्रहात ठेवावेत असे नक्कीच आहेत! वर्तमान पत्रातील लेख हे दुर्दैवाने दुसऱ्याच दिवशी जुने होऊन जातात. नंतर ते चक्क रद्दीत टाकले जातात. परंतु तुझे हे सर्व लेख.. ज्यांचा अभ्यास करावा व ते लेख कायम जतन करावे असे वाचनीय आहेत! हे "लेख" आकाशात "सूर्य चंद्र" असेपर्यंत कायम संग्रहात राहावेत असे तुला वाटत असेल तर या सर्व "लेखांचं".. एक छान "संकलन" करणे गरजेचं आहे! म्हणून याविषयावर त्याचे "ई-बुक" यायलाच हवे. कारण "ई-साहित्य प्रतिष्ठान" तर्फे प्रकाशित होणारी सर्व "ई-बुक्स" ही

जगभरातील सर्वच "मराठी वाचक व चित्रपटप्रेमी" नक्कीच वाचत असतात. आज त्यांचे "लाखो फॉलोवर्स" आहेत, ही वस्तुस्थिती आहे..!" मला हे पटले. यात "अर्थकारण" नाही, हे सुद्धा आवडलं! पण हे आकाराला आणणे सोपे काम नाहीय, हे मला ठाऊक होतं! परंतु या "ई-बुक" चं "संपादन, सादरीकरण" करण्याची जबाबदारी बालमित्र "डॉ. अनंत पावसकर" याने आपलेपणाने स्वीकारल्याने मी निश्चित झालो!

त्याने असे सांगताच मी लगोलग कामाला लागलोही. आणि "शोले" वरील काही निवडक लेख, व्हिडिओ यांचे हे "ई बुक" आपल्या समोर सादर होत आहे, हा माझ्यासाठी खरोखरच एक आनंदसोहळा आहे.

मित्रांनो "शोले" वर इतके लिहीले गेले आहे की मी आणखीन वेगळे काय लिहिणार असा प्रश्न

मलातरीच नक्कीच पडला आहे. तरीही मी काही सांगायचा केलेला प्रयत्न तुम्हाला नक्कीच आवडेल असा विश्वास आहेच...

डॉ. अनंत पावसकर, श्री. सुनील सामंत सर आणि "ई-साहित्य प्रतिष्ठानचे" मनापासून आभार!

दिलीप ठाकूर (9870616216)
(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)



लेख क्रमांक : १

शोले म्हणजेच मिनर्व्हा.. मिनर्व्हा म्हणजेच शोले

इटलीतील बलोनियामधील "शोले" चा अतिशय भव्य दिमाखदार प्रीमियरला जवळपास अडीच हजार प्रेक्षक. त्यात साठ टक्के इटालियन, वीस टक्के युरोपियन व वीस टक्के भारतीय. आता टोरॅन्टो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात १८०० आसन क्षमता असलेल्या "रॉय थॉमसन हॉल" मध्ये प्रीमियर. आणखीन काही देशांत असाच हाऊसफुल्ल गर्दीत प्रीमियर.....

"शोले" पन्नास वर्ष पूर्ण निमित्ताने जगभरातील अनेक देशांत त्याचे प्रीमियर रंगत असतानाच आपले मिनर्व्हा चित्रपटगृहदेखिल डोळ्यासमोर येतेय.

मी नेहमीच म्हणतो, आज मिनर्व्हाची इमारत पाडण्यात आली आहे, तरी आजही तेथून जाताना मला रहिमचाचा (ए. के. हनगल) यांचा कापरं भरलेल्या आवाजातील "इतना सन्नाटा क्यू है भाई.."

हा संवाद ऐकायला येतो. तर कधी गब्बरसिंगची दहशत जाणवते, "कितने आदमी थे...!"

आपल्या क्रिकेट व सिनेमावेड्या देशात आवडत्या स्टेडियमवर व चित्रपटगृहावरही भरभरुन प्रेम करणारे क्रिकेट फिल्म दीवाने खूप आहेत. चित्रपट गृहाबाबत तर अनेकांची जागाही ठरलेली असे अथवा असते. त्याचीही एक वेगळी परंपरा आणि खासियत आहे. विशेषतः "एकपडदा थिएटर" अर्थात "सिंगल स्क्रीन" थिएटर्स जेव्हा अनेक आठवडे हाऊसफुल्लचा फलक दिमाखात लावत त्या काळात तर 'आवडता स्टार, आवडते थिएटर' ही तर वेगळी संस्कृती होती आणि अशातच आपल्या अशाच एका आवडत्या पाडलेल्या चित्रपटगृहाच्या जागेच्या व्यवहाराची चक्क "जाहिरात" येते तेव्हा एकाद्या चित्रपटप्रेमीच्या डोळ्यात चटकन पाणी आल्यास आश्चर्य ते काय?

दक्षिण मध्य मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील (जुना लॅमिंग्टन रोड) "मिनर्व्हा" थिएटरबाबत अगदी असेच झाले आहे. काही वर्षांपूर्वीच त्याच्या विक्रीचा विषय ही व्यावहारिक बाजू झाली, पण या वास्तूचे हिंदी तर झालेच पण अगदी एकूणच भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत आपले एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. मूळचे जुने मिनर्व्हा थिएटर पाडून त्या जागी नवीन भव्य इमारत उभी राहिली आणि त्याच्या उदघाटनाच्या वेळेसच त्याला 'महाराष्ट्राचे गौरवस्थान' म्हटले गेले. तीच त्याची कायमस्वरूपी ओळख झाली. जुन्या मिनर्व्हातील शेवटचा चित्रपट होता नरेन्द्र बेदी दिग्दर्शित आणि राजेश खन्ना, मुमताज आणि संजीवकुमार अभिनित 'बंधन' (१९७०) तर नवीन मिनर्व्हाचा पहिला चित्रपट होता, एफ. सी. मेहरा निर्मित आणि सुशील मुझुमदार दिग्दर्शित 'लाल

पत्थर' (३१ मार्च १९७२). राजकुमार, हेमा मालिनी, राखी आणि विनोद मेहरा यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. या थिएटरची मालकीच इगल फिल्मचे निर्माते एफ. सी. मेहरा आणि अभिनेता शम्मी कपूरची असल्याने मेहरांच्याच चित्रपटाने याचे उदघाटन होणे स्वाभाविक होतेच. शम्मी कपूरचे थिएटर ? एका हीरोचे सिनेमा थिएटर ? याचं त्या काळात, त्या वयात केवढं कुतूहल आणि कौतुक होते. आपल्या देशातील चित्रपटवेडं व कुतूहल अशा अनेक गोष्टींसह सामावलेय.

तो मेन थिएटर संस्कृतीचा काळ होता. दक्षिण मुंबईतील थिएटरमध्ये नवीन चित्रपट यशस्वी ठरला तर पंचवीस/पन्नास (कधी त्याहीपेक्षा जास्त) आठवडे सहज मुक्काम करे आणि समजा नवीन चित्रपट रसिकांनी नाकारला तर तीन आठवड्यात त्याची प्रिन्ट गोडावूनमध्ये जाई. या यशापयशात मिनर्व्हाचे

स्थान खूपच मोठे आणि महत्वाचे होते. ते वाढवले रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (रिलीज १५ ऑगस्ट १९७५) ने! 'शोले आणि मिनर्व्हा' एकाच नाण्याच्या दोन भक्कम बाजू आहेत. संपूर्ण मुंबईत फक्त मिनर्व्हा, न्यू एक्सलसियर (यात पहिले मोजून काही आठवडे) आणि बसंत (चेंबूर) येथेच 'शोले' सत्तर एमएम आणि स्टीरिओफोनिक साऊंड अशा स्वरुपात होता (इतरत्र ३५ एमएमचा होता). मिनर्व्हात 'शोले' पाहण्याचा रोमांचक अनुभव घेतलेल्या नशीबवान पिढीतील 'मी एक आहे. आजही मला आठवतेय, 'शोले 'पासून मिनर्व्हाचे तिकीट दर वाढवताना "अप्पर स्टॉल" चार रुपये चाळीस पैसे तर "बाल्कनी" तिकीट दर पाच रुपये पन्नास पैसे असे होते. पण ते वसूल होत. (आता तुम्हाला "स्टॉल्स".. अशी तिकिटे नव्हती का? असा प्रश्न नक्कीच पडला असेल. तर..."मिनर्व्हा" चा नव्याने बनविलेला

"स्क्रीन" वेगळाच होता. काहीसा "अर्धवर्तुळाकार"! आधी "स्टॉलसाठी" पुढच्या काही रांगा ठेवायचे ठरलेले, परंतु तिथून म्हणजे पहिल्या चार रांगांतून हा चित्रपट पाहणे एकंदर कठीणच होते. तिथून उजवीकडच्या किंवा डावीकडच्या सीटवरून तो सिनेमा पाहताना... तो "भव्य पडदा.. कॉर्नर टू कॉर्नर" आपल्या नजरेच्या आवाक्यात येणे जवळजवळ अशक्यच होते. पात्रांचे खांदे तर चक्क

वाकडे दिसत. म्हणून पहिल्या चारच दिवसात "पहिले चार रोज" बंद करण्यात आले. म्हणून "अप्पर स्टॉल" व "बाल्कनी" अशी दोनच "ऑप्शन्स" होती.) "स्टिरीओफोनिक" साऊंडची मजा तर औरच होती. त्यामुळेच संवाद अंगावर यायचे. जय आणि वीरु यांच्यातील नाणेफेकीत नाणे जणू आपल्या आसपास पडलयं असा फिल येई. संपूर्ण चित्रपटभर असेच साऊंड सिस्टीमचे अनुभव येत आणि शोलेसाठी मिनर्व्हाची पुन्हा पुन्हा वारी करताना एकदा फक्त या साऊंडसाठी तर एकदा डायलॉग बाजीसाठी पाहणारे फिल्म दीवाने खूप होते. मिनर्व्हात शोलेने दिवसा दीड, साडेपाच आणि साडेनऊ अशा तीन शोमध्ये ३१ ऑगस्ट १९७८ पर्यंत मुक्काम केला आणि मग तेथेच तो मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आणखीन दोन वर्षे असा एकूण पाच वर्षे खणखणीत चालताना त्याने सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम वातावरण ढवळून

काढले. 'शोले'चा मिनर्व्हातील प्रीमियर आजही चर्चेत असतो. सत्तर एमएमची प्रिन्ट इंग्लंडवरुन आली तरी ती विमानतळावर अडवल्याने पस्तीस एमएमच्या प्रिन्टवर प्रीमियर रंगला, तर ती प्रिन्ट उशीरा पोहचल्याने रात्री उशिरा रमेश सिप्पीने आपलाच 'शोले' मोजक्याच जणांसह पहाटेपर्यंत पाहिला. 'शोले' च्या ॲडव्हान्स तिकीटासाठी या मिनर्व्हावर कायमच किमान मैलभर रांग असे आणि अजिबात न कंटाळता फिल्म दीवाने त्यात उभे राहत. मीदेखील त्यात असे. त्यातही एक थ्रील होते. विजू खोटे अनेकदा तरी गप्पात रमल्यावर आपला येथील पब्लिकसोबत 'शोले' पाह्यल्याचा अनुभव रंगवून सांगे.

मिनर्व्हाच्या आणखीन काही महत्वाच्या गोष्टी सांगायच्या तर यश चोप्रा यांनी आपल्या यशराज फिल्मचा 'दाग' (१९७३) याच मिनर्व्हात रिलीज केला.

गुलशन रॉय या चित्रपटाचे वितरक होते. विशेष म्हणजे, बीबीसीच्या राजेश खन्नावरच्या डॉक्युमेंट्रीत मिनर्व्हातील 'दाग' च्या प्रीमियरचे काही क्षण आहेत. तेव्हाच मिनर्व्हा जगभरात पोहचले. मिनर्व्हात अनेक चित्रपटांनी रौप्यमहोत्सवी यश संपादले, महत्वाचे चित्रपट असे, यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान' आणि 'शक्ती', प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'आझाद', मनमोहन देसाई दिग्दर्शित 'नसिब', राज कपूर दिग्दर्शित 'राम तेरी गंगा मैली', अनिल शर्मा दिग्दर्शित 'हुकुमत', राकेश रोशन दिग्दर्शित 'करण अर्जुन', उमेश मेहरा दिग्दर्शित 'सोहनी महिवाल', बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'तवायफ', एन. चंद्रा दिग्दर्शित 'नरसिंह' वगैरे तर येथे शंभर दिवसाचे यश मिळवलेले चित्रपटही बरेच! काही नावे सांगायची तर, राजा नवाथे दिग्दर्शित 'मनचली', रवि टंडन दिग्दर्शित

'झूठा कही का', राज सिप्पी दिग्दर्शित 'सत्ते पे सत्ता', उमेश मेहरा दिग्दर्शित 'अशांती', ऋषि कपूर दिग्दर्शित 'आ अब लौट चले', राजीव मेहरा दिग्दर्शित 'एक जान है हम' वगैरे! अर्थात, मिनर्व्हात अनेक चित्रपटांना प्रेक्षकांनी नाकारलेही. त्यातील काही नावे सांगायला हवीतच, 'दिल दौलत दुनिया', 'मनोरंजन', 'प्रेम शास्त्र', 'महान', 'पुकार' , 'शरारा', 'बारुद' (अक्षयकुमार व रविना टंडन), 'कोयला', 'रुप की रानी चोरो का राजा', 'चमत्कार', 'जीवन एक संघर्ष', 'कसम', 'किला' वगैरे वगैरे! काही चित्रपट रसिकांना आवडणार, अनेक चित्रपट ते नाकारणार यावर त्यांचा थिएटरमधील मुक्काम ठरतो. हे झाले दिवसा तीन खेळ याप्रमाणेचे प्रगती पुस्तक! याच मिनर्व्हातील मॅटीनी शोची गोष्ट आणखी वेगळी. अशोककुमार आणि प्राण यांनी 'दो बेचारे बिना सहारे देखो पुछ पुछ कर हारे..' गात धमाल उडवलेला

'व्हिक्टोरिया नंबर २०३' ने येथे मॅटीनी शोला तब्बल साठ आठवडे मुक्काम केला. 'कागज की नाव', 'अमानुष', 'डिस्को डान्सर' अशा काही फिल्मनी मॅटीनीला ज्युबिली हिट मुक्काम केला.

मिनर्व्हाच्या वाटचालीत सर्वाधिक 'फ्लॉप' चित्रपट, मनमोहन देसाई निर्मित 'अनमोल' (ऋषि कपूर व मनिषा कोईराला). हा मॅटीनीलाच रिलीज झाला पण पहिल्याच दिवशी खुर्च्या रिकाम्या राहिल्याचे खुद्द मनजीना आश्चर्य वाटले. तर राज कपूरने आपला 'राम तेरी गंगा मैली ' (१९८५) आम्हा समिक्षकांना याच मिनर्व्हात पब्लिकसोबतच दाखवला (अन्यथा आर. के. फिल्मचा सिनेमा त्यांच्या स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये दाखवत.) विशेष म्हणजे, तत्कालिक समिक्षकांना हा चित्रपट राज कपूरच्या क्लासचा वाटला नाही तरी १४९९ सीटसचे हाऊसफुल्ल थिएटर या फिल्मला झक्कास दाद देत

होते आणि मग येथेच या फिल्मने 'सुवर्ण महोत्सवी' यश संपादले. ऋषि कपूर दिग्दर्शित 'आ अब लौट चले' आम्हा चित्रपट समीक्षकांना याच मिनर्व्हात 'फर्स्ट डे फर्स्ट शो' दाखवला तेव्हा आमच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास चक्क शशी कपूर आला होता..आपल्या पुतण्याच्या दिग्दर्शनाचे केवढं तरी कौतुक होत होते हो त्याला ...आणि का होऊ नये?

मिनर्व्हाचे थिएटर डेकोरेशन कायमच पाहण्यासारखे असे. मी गिरगावात राहिल्याने हे डेकोरेशन पाह्यला मिनर्व्हावर जाऊन येई यात आश्चर्य नको, त्या काळात असे डेकोरेशन पाहण्याचीही प्रथा होती. 'शोले' च्या डेकोरेशचाही प्रभाव पडला. 'दाग'च्या डेकोरेशनमधील शर्मिला टागोर आणि राखी यांच्या खांद्यावर हात ठेवलेला राजेश खन्ना असो अथवा राम तेरी गंगा... च्या डेकोरेशनमधील धबधब्याखालील मंदाकिनी असो, अतिशय भव्य

कटआऊट होता. 'सत्ते पे सत्ता' च्या मिनर्व्हावरच्या डेकोरेशनचा फोटो आजही सोशल मिडियात लाईक्स मिळवतोय. मिनर्व्हाच्या तळमजल्यावरील शोकेस मधील भरपूर शो कार्टस पाह्यची कायमच चंगळ असे. विशेषतः आगामी चित्रपटाची कार्ड्स पाहून 'पिक्चरमध्ये दम असेल वा नसेल' असेही ठामपणे सांगणारे असत. मिनर्व्हाकडून ग्रॅन्ड रोड स्टेशनकडे ये जा करण्याच्या मार्गावर हॉरर चित्रपटाचे जणू पेटंट घेतलेल्या 'रामसे ब्रदर्स'चे कार्यालय लक्ष वेधून घेई. याचं कारण तेथील त्यांच्या चित्रपटांची शो कार्ड व भव्य होर्डिंग्ज. मिनर्व्हात चित्रपट पाह्यला गेल्यावर त्याच तिकीटावर हेदेखील. बाहेरचा ज्युसवालाही परिचित झालेला. कलिंगडाच्या मौसमात त्याचा ज्यूस तर सफरचंदाच्या मौसमात त्याचा ज्यूस ही त्याची खासियत. आणि तेथेच कानावर पडणारे मिनर्व्हातील पिक्चरचे बरे वाईट रिपोर्टस!

कालांतराने 'मल्टीप्लेक्स' युगात हे मेन थिएटर चे वैशिष्ट्य कालबाह्य होत गेले. २००६ साली मिनर्व्हाची विक्री झाली आणि काही दिवसातच थिएटरच पाडले गेले. सुरुवातीला वाटले, चार स्क्रीनचे मल्टीप्लेक्स उभारले जाईल, पण बातमी आली की, येथे भव्य आर्टस कॉम्प्लेक्स उभारले जाईल. पण तसे काहीही न होता पुन्हा पुन्हा याच जागेच्या विक्रीच्या जाहिराती येऊ लागल्या आणि त्या जुन्या आठवणी देऊ लागल्या. आताही तेच झाले आहे. चित्रपटगृह म्हणजे चार भिंती, एक पडदा, प्रोजेक्शन, पब्लिक, त्यांच्या टाळ्या शिट्ट्या यासह बरेच काही ना काही असते. अनेकांचे भावविश्व या वास्तूशी जोडले गेलेले असते. आणि मग कधी गप्पांचा फड रंगला की जुन्या चित्रपटाच्या आठवणीसह थिएटरचा फ्लॅशबॅकही डोळ्यासमोर येतोच. आता तर ही वास्तूच नाहीशी झाल्याने फक्त आठवणीची रिळे आहेत.

एका पिढीकडे ज्युन्या काळातील मिनर्व्हाचा अनुभव. अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक सोहराब मोदी यांच्या मिनर्व्हा मुव्हीटोन या चित्रपट निर्मिती संस्थेच्या मालकीचे ते होते. १९३०\ ३२ च्या सुमारास ते सुरु झाले. म्हणजेच मूकपट ते बोलपट असा तो प्रवास होता. प्रभातचा "चंद्रसेना" (१९३५) येथेच प्रदर्शित झाला. मिनर्व्हा मुव्हीटोन निर्मित "पुकार" (१९३९), "सिकंदर" (१९४१), "पृथ्वीवल्लभ" (१९४३), "एक दिन का सुल्तान" (१९४५), "झांशी की रानी" (१९४३) येथेच प्रदर्शित झाले. बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "कानून", "धुल का फूल" यांचे प्रीमियर येथेच रंगले व चित्रपट प्रदर्शित झाले. त्यानंतरच्या काळात "राजकुमार", "जहां प्यार मिले", "मिलन" इत्यादी! गुरुदत्त यांचा बहुचर्चित "साहिब बीवी और गुलाम" हा चित्रपट लिबर्टीसह जुन्या मिनर्व्हातही प्रदर्शित झाला. म्हणजेच जुने मिनर्व्हा देखिल तितकेच वैशिष्ट्यपूर्ण!

आज कधीही मिनर्व्हा थिएटरच्या फूटपाथ वरुन जाताना प्रत्यक्षात रिकामी जागा दिसते, पत्रे लावलेले दिसतात. पण डोळ्यासमोर मिनर्व्हाच्या भव्य पडद्यावरील 'शोले'च्या गब्बरसिंगची दहशत आठवते. भारी भारी डायलॉग आठवतात. महत्वाचे म्हणजे, एकदा खुद्द अमजद खान १३० व्या आठवड्यात येथे 'शोले ' पाह्यला आला त्याची बातमी झाली होती....सिंगल स्क्रीन थिएटर्स अशी बहुरंगी, बहुढंगी. एकेक करत 'पडद्याआड' गेली तरी चित्रपट रसिकांच्या मनात/मेंदूत/ ह्रदयात त्यांना कायमचे 'शो' आहेत. तेथील आठवणींचा खेळ संपणारा नाही. पिढी बदलत राहिली तरी त्या आठवणींची साठवण भारीच. शहरापासून ग्रामीण भागापर्यंत सिंगल स्क्रीन थिएटर्सशी प्रेक्षकांचे नाते असे कमालीचे घट्टच...

शोले पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मिनर्व्हा चित्रपटगृहदेखिल चर्चेत आले आहे, पण आज

मिनर्व्हाकडे पहावे तर ती उंच, शानदार, डौलदार इमारतीच्या जागी केवळ बाहेरुन पत्रे लावलेली ओसाड जागा दिसतेय, इमारत तर केव्हाच पाडली आहे.... चित्रपटगृहाच्या माध्यमातून चित्रपट प्रेक्षकां पर्यंत पोहचतो म्हणूनच जगभरातील प्रत्येक चित्रपटगृहाचा इतिहास अतिशय महत्त्वाचा.

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडियावरुन साभार १४ ऑगस्ट २०२५)
♥

लेख क्रमांक : २

"शोले" समीक्षकांनी नाकारला मात्र, प्रेक्षकांनी उचलला....

समीक्षकांना आवडलेला चित्रपट रसिक प्रेक्षकांनीही आवडायला हवा, आवडेल असे कसे हो होईल? समीक्षक आपल्या एक "चिकित्सक चष्म्यातून" चित्रपटाकडे पाहत असतो. समीक्षकांना दासरी नारायण राव दिग्दर्शित "आज का एमएलए रामअवतार" (१९८५) भारी आवडला होता, राजेश खन्नाच्या काही अप्रतिम भूमिकांपैकी एक विशेष उल्लेखनीय भूमिका असेही या राजकीय चित्रपटा बद्दल म्हटलं गेले. पण "फर्स्ट शो"लाच या चित्रपटाचे डिपॉझिट गुल्ल झाले!

समीक्षकांना राज कपूर निर्मित, दिग्दर्शित व संकलित "राम तेरी गंगा मैली" (१९८५) अजिबात आवडला नाही! मला आठवतय! मुंबईतील मिनर्व्हा

चित्रपटगृहातील पहिल्याच दिवसाचे पहिल्याच खेळाचे बाल्कनीचे तिकीट आम्हा समीक्षकांना दिले होते. मिनर्व्हाची आसन क्षमता स्टॉल, अप्पर स्टॉल व बाल्कनी मिळून १४९९ अशी. त्यात आम्ही मराठी, हिंदी, इंग्रजी मिळून तीस सिनेपत्रकार! प्रेक्षक चित्रपट एन्जॉय करीत होते. जुन्या पिढीतील समीक्षकांना या चित्रपटात "मेरा नाम जोकर" (१९७०) पूर्वीचा राज कपूर दिग्दर्शनीय टच दिसणे शक्यच नव्हते. प्रेक्षकांनी मात्र "राम तेरी गंगा मैली" असा काही डोक्यावर घेतला की व्हिडिओ कॅसेटच्या युगातही चित्रपटाने मिनर्व्हात पन्नास आठवड्याचा मुक्काम केला. चित्रपट प्रदर्शित होण्याची तारीख आहे, १५ ऑगस्ट १९८५! म्हणजेच "शोले" प्रदर्शित होण्यास बरोबर दहा वर्ष पूर्ण झाली त्याच दिवशी राम तेरी...आला आणि प्रेक्षकांनी तो प्रचंड डोक्यावर घेतला!

'शोले" चे युग म्हणजेच मुद्रित माध्यमाचे दिवस.

नवीन चित्रपटाचा समीक्षकांसाठीचा खेळ दोन तीन दिवस अगोदर आयोजित करण्यात येवून चित्रपट प्रदर्शित व्हायच्या दिवशी मुंबईतील सर्वच मराठी, हिंदी व इंग्लिश व गुजराती वृत्तपत्रात शुक्रवारी एकाच वेळेस परीक्षण प्रसिद्ध होई. त्या काळात अनेक चित्रपट समीक्षकांचा स्वतःचा हुकमी वाचकवर्ग होता, समीक्षेची विश्वासार्हता जास्त होती. नवीन चित्रपट पहावा की नाही, पाह्यचा तर कशासाठी याचे

थोडेफार मार्गदर्शन म्हणजे चित्रपट समीक्षा होती. चित्रपटाच्या जन्मापासूनचा चित्रपट समीक्षेचा प्रवास व प्रभाव हा एक वेगळाच विषय.

"शोले" ची समीक्षा हा चित्रपट सर्वसाधारण दर्जाचा आहे असे भाष्य करणारी होती. तत्कालिक समीक्षकांच्या मते शोलेमधील कथासूत्र हे फार दर्जेदार नव्हते (चित्रपटाला कसदार कथा असावी, अशी पहिली अपेक्षा असणारा हा काळ होता!), ठाकूर चार विरुध्द गब्बरसिंग यांच्यातील सूडाचा सामना या चित्रपटात आहे, तो साकारताना चित्रपट प्रचंड हिंसाचाराने भरलाय, त्याची लांबीदेखिल फार आहे (एकवीस रिळ!). त्यामुळे काहिसा कंटाळा येतो असा.. त्या समीक्षेत सूर होता! चित्रपट "अकिरा कुरोसावा" दिग्दर्शित "सेव्हन समुराई" (१९५४) व जॉन स्टर्जेस दिग्दर्शित "मॅग्निफिशियंट सेव्हन" (१९६०), "वन्स अपॉन अ टाईम इन वेस्ट" या

चित्रपटावर आधारित आहे! "शोले" हा "चित्रपट" तर राज खोसला दिग्दर्शित "मेरा गाव मेरा देश" (१९७१) याची तर चक्क "कॉपी" आहे आणि तो चक्क "रिमेक" आहे.. असा काही समीक्षकांचा सूर होता....

तात्पर्य, शोलेवरची "समीक्षा" ही एक मसालेदार मनोरंजक चित्रपट प्रदर्शित होतोय अशाच स्वरुपाची आहे. हा चित्रपट सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा आहे याची या समिक्षेत फारशी दखल घेतली गेली नव्हती. तांत्रिक प्रभाव ही गोष्ट तशी तेव्हा नवीनच होती.

चित्रपट रसिक अशा समीक्षेने काहीसे गोंधळात पडले. माझे ते शालेय वय होते. आणि वृत्तपत्रीय समीक्षेचा मी हुकमी वाचक होतो. शोले प्रदर्शित झाला आणि सुरुवातीस पब्लिक रिपोर्टही पिक्चर कुछ खास नहीं है, ॲक्शन बहुत है, जय और वीरु के हेड या टेल यह सिक्के का दृश्य अच्छा है

अशीच सर्वसाधारण प्रतिक्रिया होती. अमजद खानच्या क्रूरकर्मा, हिंसक, विकृत खलनायकाचे काहींना आकर्षण होते. हळूहळू त्याचीच चर्चा वाढत वाढत गेली.

"शोले"च्या स्पर्धेत त्याच शुक्रवारी प्रदर्शित झालेल्या "गरीबी हटाव " या चित्रपटाची समीक्षकांनी एका रितसर बातमीपलिकडे फारशी दखल घेतली नव्हती. असे पडद्यावर येताच गायब झालेले चित्रपट अगणित. ते फक्त चित्रपटगृहात काही दिवसांचा मुक्काम करीत असतात. असे सामान्य चित्रपट निर्माण करुच नका असे आपण कसे म्हणणार? चित्रपट निर्मितीत भिन्न क्षमतेचे पटकथाकार, निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ असणारच!

पहिले दोन आठवडे "शोले" हिट की "फ्लॉप" अशी चर्चा चित्रपट व्यावसायिकांत होती! चित्रपट व्यवसायिकांची मक्का वा बिझनेस मार्केट म्हणून

ओळखल्या जात असलेल्या "नाझ" चित्रपटगृह इमारतीमधील वितरकांच्या कार्यालयातही शोलेबद्दल मिक्स रिपोर्ट होता. चित्रपटाचे वितरक सिम्सन फिल्म हेदेखील परिस्थितीचा अंदाज घेत होते. काळा बाजारातही तिकीटांचा दर स्थिर होता. तो चढा असेल तर चित्रपट हिट आणि उतरला तर चित्रपट "फ्लॉप" अशी एक अलिखित व्याख्या असे. पण त्यात तथ्य असे. पण अजून त्यावरुनही काहीच अंदाज येईना.

....आणि तिसरा आठवडा सुरु झाला आणि "माऊथ पब्लिसिटी"वर शोलेची लोकप्रियता वाढू लागली. आता रसिक प्रेक्षकांचा फोकस स्पष्ट होत गेला. सिनेमा भारी मनोरंजक आहे. खुर्चीला खिळवून ठेवतो. संवाद जबरदस्त आहेत. अशा सकारात्मक प्रतिक्रिया येवू लागल्या. खास करुन मिनर्व्हात शोले पाहणे हा अद्भूत अनुभव वाटू लागला. जय व वीरु यांच्यातील नाणेफेक असो, वेगवान रेल्वेची दृश्य

असोत, तुफान घोडेस्वारी असो. एकेक जोरदार संवाद असो. पडद्यावरच्या अशा जगात रसिक प्रेक्षक गुंतत गेले. मध्यंतर वगळता एकही प्रेक्षक चहा पिण्यास, सिगारेट ओढण्यास वा लघुशंकेसाठी बाहेर पडत नव्हते. चित्रपट लोकप्रिय होतोय, काही रसिक प्रेक्षक पुन्हा पुन्हा येवू लागलेत, पडद्यावर संवाद येताच अनेक प्रेक्षकही त्यासह बोलू लागलेत. आता शोले फक्त पडद्यावरच राहत नव्हता तर रसिक प्रेक्षकांनी डोक्यावर व डोक्यात घ्यायला सुरुवात केली होती. मिनर्व्हावरचा आगाऊ तिकीट विक्रीचा तक्ता आठवडाभरचे सगळेच खेळ हाऊसफुल्ल असा कायम दिसू लागला. काळाबाजारातही तिकीटाचे दर वाढीला लागले. ते वाढतच राहिले.

समीक्षकांनी "शोले"वर काय लिहिलंय हे आता खूपच मागे मागे पडत गेले. आणि शोलेच्या खणखणीत यशाचा कधीच न संपणारा असा प्रवास

सुरु झाला. आज त्याला पन्नास वर्ष पूर्ण होवूनदेखिल तो सुरुच आहे. आणि आता तर त्याचे जास्तच अस्तित्व जाणवू लागलयं.

एकादा चित्रपट समीक्षकांना भावतो (बासू भट्टाचार्य दिग्दर्शित "आविष्कार" वगैरे वगैरे अनेक) पण रसिकांना तो आपलासा वाटत नाही. तर कधी समीक्षकांना एकादा चित्रपट अजिबात आवडत नाही, पण तो प्रचंड लोकप्रिय ठरतो (मनमोहन देसाई दिग्दर्शित "कुली" वगैरे अनेक) असे होतच असते. जास्त लक्षात राहते ते यश! आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीच्या हातातील मोबाईलवर चित्रपट पाहता पाहता त्यावर चित्रपटावरची बरी वाईट मते व्यक्त होताहेत. जणू प्रत्येक चित्रपट रसिक समीक्षक झाला आहे. आज "शोले" पडद्यावर आला असता तर....!!!

© दिलीप ठाकूर
(नवशक्ती १५ ऑगस्ट २०२५)

<u>लेख क्रमांक : ३</u>

<u>पाण्याची टाकी...</u>
<u>" शोले" तील, गावागावांतील व बातमीतील..</u>

कधी कधी सहज प्रश्न पडतो, "शोले" प्रदर्शित (मुंबईतील तारीख सर्वज्ञात आहेच, १५ ऑगस्ट १९७५) होण्यापूर्वी गावागावांत, खेड्यापाड्यातून पाण्याच्या टाक्या किती होत्या आणि त्यानंतर पन्नास वर्षांत त्यांची संख्या किती वाढली असावी याचा कोणी सर्वे केलाच तर काय उत्तर असेल?

जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" हा कधीच न संपणारा विषय. चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत तरीही सतत तो कशावरुन तरी बातमीत असतोच. जगभरातील कोणत्याही भाषेतील चित्रपटापेक्षा "शोले" वर सातत्याने झालेच पण सर्वाधिक वेळा लिहिले, वाचले, बोलले, ऐकले,

सांगितले गेले आहे. त्यात सोशल मीडियावर रिल्सही आणि मिम्सदेखिल. इतकं त्याच कौतुक करण्या इतका काही हा चित्रपट दर्जेदार (क्लासिक या अर्थाने) वा भारी ("सॉलिड" या अर्थाने) नाही असे सांगणारेही "शोले" प्रदर्शित झाल्याच्या दिवसापासूनच आहेत. अहो! मिनर्व्हा चित्रपटगृहातील "शोले"चा फर्स्ट डे फर्स्ट शोलाचा पब्लिक (तेव्हा असंच म्हणत, यह पब्लिक है पब्लिक!) रिपोर्ट मिश्रच होता. लंबी है, बोअर करती है, सिर्फ खून खराबा है, इतका काही खास नाही, त्यापेक्षा... वगैरे वगैरे. पिक्चर पडला असाच सूर होता. दोनच आठवड्यात वारं असे काही फिरले की आजही त्याच अस्तित्व कायमच.

याच "शोले"तील रामगढ गावातील उंचावरील टाकीची भूमिका! कला दिग्दर्शक राम येडेकर यांनी बंगळूरजवळ रामगढ गावाचा खरेखुरे गाव वाटावे असा (आणि चित्रीकरणानंतर ते खरे गाव म्हणूनच

वसले) सेट लावला त्यात डोंगराळ भागात देऊळ, मशिद, दुकाने वगैरेसह ही टाकी. खरं तर सेट म्हणून निर्जीव पण काळाच्या ओघात अविस्मरणीय ठरली. मौसीने (लीला मिश्रा) आपल्याला बसंतीशी (हेमा मालिनी) लग्न करण्यासाठी होकार द्यावा म्हणून वीरु (धर्मेंद्र) दारु ढोसून या टाकीवर चढतो आणि हो म्हटलं नाही तर आपण याच टाकीवरुन उडी मारुन जीव देवू असे धमकावतो. त्याचा मित्र जय (अमिताभ बच्चन) ही सगळीच मजा एन्जॉय करतो असा हा मजेशीर प्रसंग! २०४ मिनिटाच्या चित्रपटात हे अवघे दहा बारा मिनिटांचे दृश्य. चित्रपटात या दृश्याचे स्थान वीरु आणि बसंती यांच्या प्रेमावर शिक्कामोर्तब करण्यापुरते.....

वीरु दारु ढोसून या टाकीवर चढलाय आणि खाली जमलेल्या गावकऱ्यांना उद्देशून म्हणतो, कूद जावूंगा... फंस जावूंगा... वो कर रहा हू... जो मजनूने

लैला के लिए किया था, रांझा ने हीर के लिए किया था, रोमिओ ने ज्युलियेट के लिये किया था|... सुस्साईट... सुस्साईट!!

त्याचं हे बोलणे ऐकून खाली उभा असलेला शंकर भाबडेपणाने म्हणतो, "अरे भाई ये सुस्साईट क्या होता है?.. " यावर एक गांवकरी म्हणतो, "अंग्रेज लोग जब मरते है उसे सुस्साईट कहते है.."

शंकर म्हणतो, यह अंग्रेज लोग मरते क्यू है?

तो गावकरी वीरुला मोठ्या आवाजात विचारतो, अरे बात क्या है? तुम सुस्साईट क्यों करना चाहते हो? यावर वीरु दारुची बाटली हलवत म्हणतो, "ये मत पुछो चाचा, तुम्हारे आंसू निकल आयेंगे, यह बडी दुख भरी कहानी है, इस स्टोरी मे इमोशन है, ड्रामा है, ट्रॅजेडी है, यह बसंती है ना इसे लगन होने वाला था.. " वीरु दारुच्या नशेत बरेच काही बोलत सुटतो, देख लेना गाववालो व्हेन आय डेथ पुलीस कमिंग... पुलीस

कमिंग बुढीया गोईंग जेल... इन जेल बुढीया चक्की पिसिंग अॅण्ड पिसिंग अॅण्ड पिसिंग

"शोले" पुन्हा पुन्हा पाहणाऱ्यांनाही हा प्रसंग डायलॉगसह पाठ झाला, तरी तो पुन्हा पुन्हा एन्जॉय केला गेला.

पटकथेत या प्रसंगाला फार जागाही नव्हती आणि तो लिहिलाही गेला नव्हता असा किस्सा प्रसिद्ध आहे. यथावकाश लिहू असे म्हणतच जागा सोडली होती असे जावेद अख्तरनी एका मुलाखतीत म्हटले. हा प्रसंग लिहायचाय ही गोष्ट लक्षात होती. पण लिहायची राहून जात होती. एकदा विमानतळावर असताना एका गाडीच्या बोनेटवर एका कागदावर जावेदनी हा प्रसंग लिहिला आणि आपल्या सहाय्यकाकडे सोपवला. तोपर्यंत विमानाचा दरवाजा बंद होतोय अशी सारखी सुचना होत होती. एकाद्या मसालेदार मनोरंजक चित्रपटात घडेल असाच हा

प्रसंग! " शोले" निर्मितीत अशा गोष्टी, कथा, किस्से, दंतकथा अनेक. हा टाकीवरचा प्रसंग म्हणजे या सूडकथेत उपकथानकातील एक छोटासा भाग!

काही चित्रपट पडद्यावरुन उतरले तरी त्यांचे समाजात आपले अस्तित्व कायम असते. या पन्नास वर्षात चित्रपट रसिकांच्या किमान चार पिढ्या मागे सरल्या. अनेक तालुक्यांनी निमशहरीपणापर्यंत प्रगती केली. खेड्यापाड्यातून रस्ते, वीज व शिक्षण यांची प्रगती झाली. अतिशय दूरवरच्या गावात आजही मोबाईल रेंज मिळत नसेलही कदाचित पण तंत्रज्ञान विकसित होत गेले. या काळात म्हणजेच पन्नास वर्षांत चित्रपट बदलला. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपट एव्हाना खूपच मागे पडलाय. एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स संस्कृतीला सर्वप्रथम दूरदर्शन, मग रंगीत दूरदर्शन, त्यानंतर चित्रफित (अर्थात व्हिडिओ आणि त्याची पन्नास प्रेक्षक

संख्या असलेली छोटी चित्रपटगृह), उपग्रह वाहिन्या, संगणक, मोबाईल स्क्रीन, मल्टीप्लेक्स, ओटीटी असे पर्याय आले. "शोले" च्या प्रवासात "ये दोस्ती हम नही तोडेंगे.." हे गाणे प्रत्येक मैत्रीच्या दिवशी पहिल्या क्रमांकावर, अनेक जाहिरातीत शोलेचा कुठला तरी संदर्भ, राजकारणातही एकाद्या प्रसंगाचा, संवादाचा चपखल वापर हे होत आलेय. एव्हाना गब्बरसिंगची अजिबात भीती वाटू नये असे क्रूरकर्मा खलनायक आपल्याकडील चित्रपटात आले. या सगळ्याच्या वर राहिलीय ती गावातील उंचावरील पाण्याची टाकी.

उपग्रह वृत्तवाहिन्यांच्या आजच्या युगात वरचेवर येत असलेली बातमी म्हणजे, कशाना कशा कारणास्तव, मागणीसाठी, एकाद्या आंदोलनासाठी गावातील टाकीवर चढून आंदोलन. आणि त्याला हुकमी शीर्षक, "शोले" स्टाईल आंदोलन. उडी

मारण्याची हुकमी धमकी. गावात पाण्याची टाकी यासाठी बांधत नाहीत हो!

एका सर्वकालीन सुपरहिट चित्रपटातील पाण्याची टाकी अशी कायमच बातमीत. "शोले"पासून समाजाने सर्वात जास्त गोष्ट कोणती घेतली? तर टाकीवर चढून उडी मारण्याची धमकी देणारे आंदोलन करणे. गावातील प्रेमप्रकरणाला प्रेयसीच्या घरुन विरोध होतोय, प्रियकर पाण्याच्या टाकीवर चढला!, गावातील ग्रामपंचायत काम करत नाही, पाण्याच्या टाकीवर चढा! रस्त्याचे काम

खोळंबलय पाण्याच्या टाकीवर चढा! कोणताही सामाजिक कौटुंबिक प्रश्न सोडवून घ्यायचाय चढा पाण्याच्या टाकीवर! त्यात वृत्त वाहिनीवर हमखास बातमीची संधी. पन्नास वर्षांत "गावातील टाकीवरच्या बातम्या"नी एक उच्चांक प्रस्थापित केलाय. कदाचित "शोले" च्या यशाचा विक्रम याच बातमीने मोडला असावा. आपल्या देशातील हिंदीसह मराठी व अन्य प्रादेशिक भाषेतील कोणत्याही चित्रपटातील दृश्याने असा कायमचा ठसा उमटवला नसावा.

सलिम जावेद यांनी "शोले"ची पटकथा व संवाद लिहितानाही हाच टाकीवरचा प्रसंग इतकं प्रभावी ठरेल आणि गावागावातून त्याचा असा परिणाम दिसेल असा चुकूनही विचार केला नसेल. जर या गोष्टीचा त्यांना जरादेखील अंदाज असता तर काय सांगावे त्यांनी तोच प्रसंग आणखीन खुलवला, रंगवला, वाढवला असता, पण सिनेमातील कोणती

गोष्ट लोकप्रिय ठरेल हे कधीच सांगता येत नाही. ते सांगण्याची फूटपट्टी, थर्मामिटर, तराजू, कॅल्क्युलेटर नाही. इतकी छोटी गोष्ट वर्षानुवर्ष काहीना काही कारणास्तव "बातमी"त राहिल असे सांगता येणेच अवघड. आता या यशाचे श्रेय सलिम जावेद यांना द्यायचे की नाही हा मात्र प्रश्नच आहे. हा प्रसंग जनसामान्यांनी कधी या गावात तर कधी त्या गावात पाण्याच्या टाकीवर चढून घडवला त्यामुळे सगळे श्रेय त्यांनाच!

दिग्दर्शक रमेश सिप्पीने तरी कुठे हो विचार केला असेल की आपल्या या प्रसंगाचा गावागावातून असा प्रवास सुरु राहिल. "अंदाज", "सीता और गीता" यानंतरचा रमेश सिप्पीचा हा बहुचर्चित चित्रपट! त्यानंतर त्याच्या "शान" पासून प्रत्येक चित्रपटाची "शोले" शी काहीही संबंध नसताना तुलना होत राहिली. त्यातील कोणताच चित्रपट

"दुसरा शोले " बनणे शक्यच नव्हते. प्रत्येक चित्रपटाचे आपले एक व्यक्तिमत्व असते, जातकुळी असते. एक चित्रपट दुसऱ्यापेक्षा वेगळा हवाच. (तसे असेलच असे नाही.) ते काही असो. गावागावातील पाण्याच्या टाकीवर "शोले" पोहचेल अशी त्यानेही कल्पना केली नसेल. अन्यथा याच दृश्याला त्याने एकादा दिग्दर्शनीय टच दिला असता. केवळ मनोरंजनाच्या पातळीवर ठेवला नसता. छायाचित्रणकार व्दारका दिवेचा यांनीही कशाला हो क्रेनचा वापर करताना याच टाकीचा क्लोजअप घेवूया असा विचार केला असेल? संकलक एम. एस. शिंदे यांना "शोले" साठी उत्तम संकलनाचा पुरस्कार प्राप्त झाला. त्यांनी या दृश्याची गती छान राखलीय. (गंमत म्हणून ही "लिंक" पहा!)

मिनर्व्हावरील "शोले" च्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या भव्य डेकोरेशनमध्ये हाच

टाकीचा प्रसंग फारसा महत्वाचा मानला नव्हता. अन्यथा क्रूरकर्मा गब्बरसिंगपेक्षा पाण्याची टाकीच दाखवली नसती का? कधी कधी असे म्हणावेसे वाटते, रिपीट रनला अगणित वेळा "शोले" प्रदर्शित होत जाताना अनेकदा तरी त्याची पोस्टर नव्याने छापली गेली. त्यात "पोस्टरभर हीच पाण्याची टाकी " दाखवली तरी समजले असते, हे "शोले" चे पोस्टर आहे. यालाच कल्पकता म्हणतात का हो? सुपरहिट चित्रपट काही वर्षांनी पुन्हा प्रदर्शित करताना (यालाच "रिपीट रन" म्हणतात) नव्याने पोस्टर छापताना "बदलत्या परिस्थितीनुसार" ती असल्याचे नेहमीच चांगले असते ना? ज्योती स्वरुप दिग्दर्शित "परवाना" (१९७१) असाच काही वर्षांनी मॅटीनी शोला प्रदर्शित करताना पिक्चरचा हीरो नवीन निश्चल एका कोपऱ्यात गेला आणि चोख/चाणाक्ष व्हीलनगिरी साकारणारा अमिताभ बच्चन आता पोस्टरभर आला...

"शोले" आपल्या देशाची जणू एक लोककथा मानली जाते. एकाद्या गावात गेल्यावर पाण्याची टाकी दिसली रे दिसली "शोले" हमखास आठवतोच हेदेखील एक यशच. यशाची अशी एकच व्याख्या नसतेच म्हणा...

© दिलीप ठाकूर
(रविवार सकाळ, सप्तरंग पुरवणीवरुन साभार)
♥

लेख क्रमांक : ४

"शोले" एकदाच पडद्यावर येतो, एकदाच यावा....

चार रिळे गाणी, गाण्यात दोन प्रेमगीते, एक सणाचे, एक मैत्रीचे गाणे! तीन रिळे ढिश्यूम ढिश्यूम ढिश्यूम, दोन रिळे डायलॉगबाजी, दोन रिळे घोडेस्वारी, पाठलाग, दोन रिळे विनोद, दीड रिळ भावपूर्ण प्रसंग वगैरे वगैरे मिळून/ घुसळून/ ढवळून/ शिजवून सुपर हिट पिक्चर बनवता येत नसते. चित्रपट घडवणे/बनवणे ही एक प्रकारची "टेस्टी पदार्थ" बनवण्याची रेसिपी नाही. आणि "यू ट्यूब"वर

रेसिपी पाहून पदार्थ बनवण्यापेक्षा खरी सुगरण आपल्या मेंदूच्या सूचना ऐकून पदार्थ बनवते ते जास्त चवदार असतात....

"शोले" ठरवून बनलेला यशस्वी चित्रपट नाही. जगातील कोणत्याच भाषेतील चित्रपट तराजू/ फूटपट्टी/ मेजरमेंट लावून चांगला बनवता येत नाही. चांगला चित्रपट बनवायचा प्रयत्न करता येतो. तेही अनेक घटक जुळून आले तर.

"शोले"त ते जमून आले. आणि प्रेक्षकांना ते इतके व असे आवडले की "शोले" भारतीय चित्रपटसृष्टीतील एक "माईलस्टोन" चित्रपट ठरला.

निर्माते जी. पी. सिप्पी पन्नासच्या दशका पासूनच चित्रपटसृष्टीत कार्यरत. त्यांचा पुत्र रमेश सिप्पीने "अंदाज" (१९७०) पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले. याचे लेखन सलिम जावेद यांचे. त्यांनीच 'राम और श्याम" (१९६७) ला नायिकाप्रधान

करुन "सीता और गीता" (१९७२) आला तोही सुपरहिट! आता यशाची हॅटट्रिक हवी! सलिम-जावेद हुशार पटकथाकार. देश विदेशातील एकाद्या चित्रपटातील जर्म हिंदी चित्रपट शैलीत बसवण्यात ते वाकबगार (याची अनेक उदाहरणे सापडतील.) पण सामर्थ्य आहे मांडणीत. नक्कल अस्सल वाटायला हवी. त्यात बदलता काळ, नवे तंत्र व नवीन पिढीतील चित्रपट रसिक यांचे भान ठेवून पटकथालेखन व संवाद लेखन हवे. अकिरा कुरोसावा दिग्दर्शित "सेव्हन समुराई" या विदेशी चित्रपटातील मध्यवर्ती कल्पना, राज खोसला दिग्दर्शित "मेरा गाव मेरा देश" (१९७१) चा चेहरामोहरा आणि पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपटात हवे असलेले असे प्रेम, दोस्ती, मां, सूड असे सगळेच घटक मिसळवून "शोले" लिहिला. पटकथालेखन एकटाकी म्हणजे एकदा लिहिले आणि शूटिंगला लागलो असे अजिबात

नसते. ते अनेकदा करावे लागते. तोपर्यंत दिग्दर्शक रमेश सिप्पीने आपल्याच "सीता और गीता"चे धर्मेंद्र, हेमा मालिनी, संजीवकुमार आणि जोडीला अमिताभ बच्चन यांची निवड नक्की केली. जोडीला डॅनी डेन्झोपा याने गब्बरसिंग स्वीकारला (आपण याच पठडीतील जब्बारसिंग "मेरा गाव मेरा देश" मध्ये साकारला म्हणून "व्हीके" अर्थात विनोद खन्नाने नकार दिल्याची चर्चा रंगली) पहिलं "स्टोरी सिटींग" झाले. फोटो काढला गेला. तोपर्यंत बंगलोरजवळील रामनगर येथे कला दिग्दर्शक राम येडेकर "रामगढ" नावाचे गांव उभारले. रणजीतने मला एका मुलाखतीत म्हणाला... "फिरोज खान डॅनीला म्हणाला, "शोले"त तीन नायक असताना तुझ्या भूमिकेला वाव भाव तो किती? माझ्या "धर्मात्मा"त महत्वाची भूमिका व एका गाण्यात हेमा नमस्कार सहभाग असेल, आणि अफगाणिस्तानातील काबूल

येथे पहिल्यांदाच भारतीय चित्रपटाचे "शूटिंग" होतेय तेही आपल्या... डॅनीला पटवण्यात फिरोज खान यशस्वी ठरल्यावर गब्बरसिंग कोण साकारणार असा प्रश्न निर्माण झाला. रणजीतलाही विचारले गेले, पण आपण हा चित्रपट करत नाही असे डॅनीने लेखी सांगू देत. अशी रणजीतची अट पूर्ण झाली नाही. हा शोध अमजद खानशी पूर्ण झाला. जुहूच्या "पृथ्वी थिएटर"मध्ये "ये मेरे वतन के लोगो" या नाटकात अमजद खानने साकारलेली भूमिका जावेद अख्तर यांनी पाहिली व अमजद खानच्या नावाचा विचार झाला. अमजदच्या पत्नीने त्याला तरुणकुमार भादुरी (जया बच्चन यांचे पिता) यांचे चंबळच्या डाकूच्या जीवनावरील "अभिशाप्त चंबल " हे पुस्तक वाचायला दिले. ते त्याने इतक्यांदा वाचले की त्याच्यात गब्बर मुरत मुरत गेला.

रामगढला ३ ऑक्टोबर १९७३ रोजी मुहूर्त करुन शोलेच्या चित्रीकरणास सुरुवात झाली तेव्हा तरी कुठे कोणाला माहित होते की हा चित्रपट न भूतो न भविष्यती असा विक्रम करणार आहे? ते तर कोणीच सांगू शकत नाहीत. ठाकूरची विधवा सून राधा (जया बच्चन) जयला (अमिताभ बच्चन) ठाकूर बलदेवसिंग याच्या तिजोरीची चावी देते हे दृश्य चित्रीत करुन "शोले" चे चित्रीकरण सुरु झाले. रामगढला चित्रीकरण असतानाच मुंबईत यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" चेही चित्रीकरण सुरु होतेच. निर्माता व वितरक गुलशन रॉय यांना "दीवार" वेगाने पूर्ण करायचा होता. आणि त्यासाठी अमिताभ बंगलोर वरुन संध्याकाळी विमान पकडून मुंबईत येवून परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत रात्री दीवारचे चित्रीकरण करुन सकाळीच निघून विमानाने पुन्हा बेंगलोरला जात असे. झोप व आराम विमानात झोपत

असे. "कौन बनेगा करोडपती" या खेळात त्यानेच ही आठवण सांगितली.

जगदीप याने साकारलेली "सुरमा भोपाली"ची व्यक्तिरेखा मूळ चित्रपटात नव्हतीच. ती नंतर जोडण्यात आली. ती भोपाळमधील एका वनाधिकारीवर बेतली होती. सलिम जावेद यांचा त्याच्याशी परिचय होता. गंमत म्हणजे काही वर्षांनी तोच माणूस मुंबईत येवून जगदीपला भेटला तेव्हा सलिम जावेदवर फार रागावला होता. हा किस्सा खूपच गाजला!

चित्रपटातील रेल्वेचे व घोडेस्वारीचे प्रसंग तेव्हाच्या पनवेल रेल्वेस्थानक ते उरण या मार्गावरील जासई गावात चित्रीत झाले. सुरुवातीस रेल्वेच्या विशेष हॉर्स-व्हॅनमधून पंचवीस तीस घोडे आणले. (एक खास आठवण सांगायची तर... हेमामालिनी यांच्यासोबतचा जो "सीन" आहे ना! तो अतिशय

"खास" आहे.. जिनियस पंचमदा यांनी तो खास सजविला आहे. यात "पार्श्वसंगीत" म्हणून चक्क "तबला" या वाद्याचा उपयोग केला आहे... हे सादरीकरण केलेय "ज्येष्ठ जिनियस तबलावादक पं. सामता प्रसाद यांनी" GREAT!) "बाय द वे!" या अभिनेत्री "हेमा मालिनी" च्या या "सीनसाठी" डमी वापरण्यात आला होता, याची नोंद घ्यावी!

त्यासह सगळ्याच प्रमुख पात्रांचे डमीज तसेच अनेक ज्युनिअर कलाकार आले. रेल्वेचे मोठे स्टीम इंजिनही आणले. जासईला भराव टाकून घोड्यांना धावण्या साठी जागा करण्यात आली.

शोलेच्या साऊंड मिक्सिंगचे व पार्श्वसंगीताचे काम परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत तीन महिने चालले. "ज्येष्ठ आणि सन्मा. रेकॉर्डिंग इंजिनियर" मंगेश देसाई व कुलदीप सूद यांनी केले. लंडनमधील एका रेकॉर्डिस्टनी रमेश सिप्पींशी बोलताना मंगेश देसाई यांचे विशेष कौतुक केले.

शोलेसाठी "जर्मन मेड ॲरो" कंपनीचा पूर्वीच्या मिचेल आणि डार्बीच्या तुलनेत खूपच छोटा आणि हलका असा "टू सी कॅमेरा" वापरला.

शोलेसोबत १५ ऑगस्ट ७५ रोजी "गरीबी हटाव" या प्रदर्शित झालेल्या छोट्या चित्रपटाची इतकीच नोंद की तो १९७३ साली सेन्सॉर संमत झाला

होता. शोलेच्या स्पर्धेत टिकून राहीला जय संतोषी मा (तो ३० मे ७५ रोजी झळकला) आजही या दोन चित्रपटांच्या यशाची तुलना होते. मुंबईत मिनर्व्हा, न्यू एक्सलसियर व बसंत (चेंबूर) येथे सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीममध्ये तर इतरत्र पस्तीस एमएममध्ये शोले होता.

मिनर्व्हात हाऊसफुल्ल गर्दीत शोले सुरु असतानाच एकदा रमेश सिप्पी यांनी भेट दिली असता त्यांच्या लक्षात आले की पडद्यावर दृश्य चक्क काहीशी काळवंडलेली दिसताहेत. प्रेक्षक तरीही विनातक्रार चित्रपट एन्जॉय करताहेत. तेव्हा रमेश सिप्पी यांनी निर्णय घेतला, दररोज मिनर्व्हात कार्बन पुरवायचा आणि चित्रपट अतिशय स्पष्ट दाखवायचा. शोलेच्या डायलॉगचीही ध्वनिमुद्रिका प्रकाशित होत त्याचीही विक्रमी विक्री झाली. गल्लोगल्लीत,

नाक्यावर लाऊडस्पीकर लावलेले शोलेचे संवाद ऐकायला गर्दी होई. "कितने आदमी थे.... "

"फिल्मफेअर" पुरस्कारांमध्ये "शोले" ला एकमेव असा एम. एस. शिंदे यांना सर्वोत्कृष्ट



संकलनासाठीचा पुरस्कार प्राप्त झाला. शिंदे यांनी आपल्या एका मुलाखतीत आवर्जून सांगितले होते, रमेश सिप्पी यांनी त्यांचा कामात कधीही हस्तक्षेप केला नाही. चित्रपटाच्या मूळ शेवटचा प्रसंग मिनर्व्हातील प्रोजेक्शन ऑपरेटरकडे होता, विशेष म्हणजे, इतरांना पाह्यला न मिळालेला हा प्रसंग तो

अधूनमधून पाह्यचा. या चित्रपटात स्टंट दृश्यात सहभागी असलेला जिम ॲलन संकलनाच्या वेळी शिंदेंसोबत असे. दोघांत कामावरुन वाद होत!

ग्रामीण भागातील टूरिंग "टॉकीज" मधील शोलेचे प्रदर्शन हा आणखीन एक भन्नाट विषय. सातारा जिल्ह्य़ातील वडूज येथे एकवीस फूटांचे मोटारसायकलवरचे जय वीरु असा भव्य दिमाखदार कटआऊटस होते. आणि तिकीट दर होते, पंचाहत्तर पैसे ते एक रुपया!

शोलेला आता नवीन रुप दिले आहे. फिल्म फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवेंद्रसिंग डुंगरपूर यांनी त्यासाठी अथक प्रयत्न केले. शोलेचे चित्रीकरण पस्तीस एमएममध्ये करुन सत्तर एमएममध्ये ब्लो अपसाठी करण्यासाठी लंडनमधील टेक्निकलर कंपनी लॅबमध्ये पाठवला होता. लंडनमध्ये ब्रिटिश फिल्म इन्स्टिटयूट या संस्थेत चांगल्या चित्रपटांची

साठवणूक आहे. डुंगरपूर यांनी या संस्थेला विनंती करुन रमेश सिप्पी यांचे पुतणे शहजाद सिप्पी यांच्या स्टोअरेज हाऊसला भेट देऊन शोले संदर्भातील काय काय मटेरियल आहे हे पाहिले. ते मटेरियल इटलीतील बलोनिया येथे पाठवले. तेथे फिल्म रिस्टोररेशन लॅब आहे. तेथे शोले समाविष्ट नसलेली काही दृश्येदेखिल सापडली. आता पुन्हा शोले प्रदर्शित होत असतानाच ती दृश्य पाह्यला मिळतील. विशेष उल्लेखनीय गोष्ट. यावेळी चित्रपटाचा शेवट (क्लायमॅक्स) वेगळा आहे. आणि आणखीन काही दृश्य आहेत. त्यामुळेच तीन तास अठरा मिनिटांचा असलेला शोले आता तीन तास चोवीस मिनिटांचा असेल.

बलोनियामधील शोलेच्या प्रीमियरला जवळपास अडीच हजार प्रेक्षक होते आणि त्यात साठ टक्के इटालियन, वीस टक्के युरोपियन व वीस टक्के

भारतीय होते. जयपूर येथेही शोलेची पन्नाशी दणक्यात साजरी झाली.

चित्रपट हे टीमवर्क. दिग्दर्शक, संगीतकार, छायाचित्रणकार अशांच्या सहाय्यकांचाही त्यात वाटा. चित्रपटाच्या श्रेयनामावलीनुसार सांगायचे तर, रमेश सिप्पींचे सहाय्यक होते, खालीश लखनवी, शरद पालेकर, बालन, किशन, पिशन तर छायाचित्रणकार व्दारका दिवेचा यांचे सहाय्यक होते, पी. आर. एल. रमण, एस. वसंत. तर राहुल देव बर्मन यांचे सहाय्यक होते, बासू, मनोहारी, मारुती राव. तर त्यावेळी संगीतात वादकांचा प्रचंड मोठा ताफा होता. त्यात असलेल्या नागेश सुर्वे यांजकडे ध्वनिमुद्रणाच्या वेळच्या अतिशय चांगल्या आठवणी आहेत.

शोलेच्या यशानंतर दो शोले, रामगढ के शोले, मालेगाव के शोले, कानपूर के शोले असे करता करता हजार वेळा शोले पाहणारा माणूस असे नावतच शोले

असणारे चित्रपट आले तसेच शोलेच्याच कथासूत्रावर आंधी तुफान, रामगोपाल वर्मा की आग तर झालेच चोखंदळ म्हणून ओळखल्या जात असलेल्या आमिर खानने शोले व नासिर हुसेन दिग्दर्शित कांरवा यांचे मिश्रण असलेल्या "मेला " चित्रपटात काम करत हंसे करुन घेतले.

शोले पन्नास वर्ष निमित्त धर्मेंद्रची त्याच्या जुहू येथील सनी व्हिला या प्रशस्त बंगल्यावर भेट घेऊन माझ्या कलेक्शनमधील शोलेचे मिनर्व्हातील बाल्कनीचे पाच रुपये पन्नास पैशाचे तिकीट,

चित्रपटाचे बुकलेट, वृत्तपत्रातील जाहिरात, फोटो अशा एक्स्युझिव्हज गोष्टी दाखवताच धर्मेंद्र म्हणाला, तस्वीरे बोलती है. त्याच्या मते चित्रीकरणाच्या वेळेस कोणीच कल्पना केली नव्हती हा चित्रपट असा इतिहास घडवेल. पन्नास शंभर वेळा शोले पाहणारे अनेक रसिक आहेत. मी चार पाच वेळा तरी पाहिलाय. धर्मेंद्र आज वयाच्या नव्वदीजवळ आहे त्यामुळे अतिशय आस्ते कदम बोलणे आहे. असो, पुन्हा एकदा १५ ऑगस्ट रोजी मुंबईसह देश

विदेशातील मल्टीप्लेक्समध्ये पुन्हा प्रदर्शित होत असलेल्या शोले'तील गब्बर असो वा ठाकूर पडद्यावर येताच प्रेक्षकही त्यांच्यासह डायलॉग बोलतील. आपल्या देशात चित्रपट पाहणे हे एक प्रकारचे सेलिब्रेशन असते हे शोले कायमच अधोरेखित करतो...

"शोले" च्या न संपणाऱ्या गोष्टी अनेक. तूर्तास इतक्याच....

© दिलीप ठाकूर
(सामना १० ऑगस्ट २०२५ साभार)
♥



<u>लेख क्रमांक : ५</u>

<u>*पाहवे तर जुन्या चित्रपटांना गर्दीच गर्दी...*</u>

वर्षभरापूर्वीची गोष्ट! निमित्त- पटकथाकार व संवाद लेखक "सलिम जावेद" यांच्यावरील माहिती पट. स्थळ : दक्षिण मुंबईतील रिगल चित्रपटगृह -

"शोले" चा सायंकाळी सहा वाजता खास खेळ! मला पुन्हा एकदा शोले एन्जॉय करायचा म्हणून मी साधारण पाचच्या सुमारास रिगलला पोहचतोय तोच मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. रिगलपासून सुरु झालेली रांग जवळपास "गेट वे ऑफ इंडिया"पर्यंत पोहचलेली. रांगेतील सुरुवातीच्या एका दोघांना विचारले, कुठून आलात? किती वाजता आलात? ते दोघेही म्हणाले, ठाण्यावरुन आलोय, दोन अडीचपासून आहोत... एकाचे नाव अमोल पिटकरी, तर एकाचे राहुल भालेराव!

याच रांगेत संगीतकार कौशल्य इमानदार भेटले. म्हणाले, त्या काळात चित्रपटगृहात एकवीस वेळा शोले पाहिला. त्यानंतर उपग्रह वाहिनीवर, यू ट्यूबवर किती वेळा तो पाहिला याची गणतीच नाही. आज खास मुलाला घेऊन आलोय.

मीदेखील रांगेत उभा राहून रिगलमध्ये प्रवेश केला. आणि शोलेच्या प्रत्येक डायलॉगच्या वेळेस पडद्यावरील ठाकूर चार असो वा गब्बरसिंग, त्यांचा डायलॉग सुरु होण्यापूर्वीच पब्लिकमधून आवाज येई, कितने आदमी थे...

रिगलमध्येच यश चोप्रा दिग्दर्शित दीवार, राज खोसला दिग्दर्शित सी. आय. डी, बम्बई का बाबू व मेरा गाव मेरा देश, ऑल्फ्रेड हिचकॉकचे अनेक रहस्यरंजक चित्रपट अशा प्रत्येक खेळास दुपारपासूनच रांग आणि हाऊसफुल्ल प्रतिसाद!
पुणे शहरात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयता रामदास

फुटाणे निर्मित व डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित "सामना" चित्रपटाच्या पन्नास वर्षानिमित्त खेळास दुपारपासूनच रांग. दरवाजा उघडताच रसिक प्रेक्षक अतिशय उत्साहात आत शिरलेच पण सर्व खुर्च्या भरल्याने दरवाजा बंद करुन घ्यावा लागला. आणि त्याचीही बातमी झाली. गुरुदत्त जन्मशताब्दीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट महोत्सवात "प्यासा" पाह्यला गेल्यावर जेमतेम पहिल्या रांगेतील तिकीट मिळाले. चित्रपट हाऊसफुल्ल आणि प्रतिसाद अतिशय सकारात्मक.

जुन्या चित्रपटांना हा मिळत असलेला उत्फूर्त प्रतिसाद कौतुकास्पद. आणि यात कालच्या, मधल्या व आजच्या तीनही पिढीतील चित्रपट रसिक असतात. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर ओटीटीवर चित्रपट पाहण्याची उत्तम सवय झाली असली तरी त्यांनी प्रेक्षागृहात मागील पिढीसह

चित्रपट पहावेत. बरं या चित्रपटांना जुने म्हणणेही चूकच. त्यांच्याबद्दल आजही आकर्षण आहे म्हणजेच ते आजचेही.

चित्रपटाचे शौकिन तसे अनेक प्रकारचे. हादेखील एक रिॲलिटी शो. काही झालं तरी अधिकाधिक नवीन चित्रपट पाह्यचेच असा बाणा असणारे रसिक आहेत, तो प्रेक्षक खूपच महत्वाचा. फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्टला महत्व असते. त्याना आजपासून रिलीज झालेला चित्रपट कसा वाटला हे त्या चित्रपटाचे व्यावसायिक भवितव्य स्पष्ट करते. 'पिक्चर हिट आहे, त्याबद्दल बरेच काही ऐकतोय, हाऊसफुल्ल गर्दीत सुरु आहे', त्यावर लिहून येतेय, बोलले जातेय, ऐकायला मिळतेय म्हणजे आपण तो पाह्यला हवा असेही पाऊल टाकणारा रसिक आहे. अशीही एक मानसिकता आहे. तर कोणी आपल्या आवडत्या स्टारसाठी चित्रपट पाहतो,

तो "पिक्चर" कसाही असला तरी तो अगदी पुन्हा पुन्हा पाहतो हे अगदी पूर्वापार चालत आले आहे. कोणी आवडत्या गीत संगीत नृत्य यासाठी तर कोणी एकाद्या दृश्यासाठी पुन्हा पुन्हा थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहत. कोणी चक्क "एकपडदा" चित्रपटगृह अर्थात "सिंगल स्क्रीन" थिएटरमध्ये आवर्जून चित्रपट पाह्यला जाई, तर आज आवडत्या "मल्टीप्लेक्स"मध्ये आवर्जून चित्रपट पाह्यला जातो. संपूर्ण चित्रपट पाह्यचाय या केन्द्रस्थानी असलेल्या गोष्टीच्या अवतीभवतीचे हे असे छोटे छोटे अनेक घटक असतातच. असेच काही कायमच जुन्या चित्रपटात रमणारे, त्याच्या आठवणी काढणारे, त्यावर भरभरुन बोलणारे आहेत आणि त्या जोडीला आजच्या अनेक चित्रपट रसिकांना अशाच अनेक जुन्या चित्रपटांबाबत उत्सुकता असणारे आहेत.

हिंदी चित्रपटाच्या चौफेर वाटचालीचा विचार

करताना रमेश सिप्पी दिग्दर्शित सर्वकालीन सुपर हिट "शोले" (१९७५) च्या पूर्वीचा आणि नंतरचा अशी मांडणी केली जाते. ही फोड आणखीन अशीही केली जाते की, राज कपूर दिग्दर्शित 'संगम' (१९६४) पर्यंतचा सिनेमा हा कथा, आशय, अभिनय, संगीत व प्रभाव या सर्वच बाबतीत सरस. त्यानंतर हिंदी चित्रपटाच्या गुणवत्तेला उतरंड सुरु झाली असे मानणारा एक खूप मोठा वर्ग आहे. त्यात पुन्हा 'शोले' ते राजश्री प्रॉडक्शन्सचा सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन' (१९९४) यापर्यंतचा एक टप्पा आणि याच चित्रपटापासून नंतर पुढे असाही एक प्रवास अथवा प्रवाह सुरु आहे. या दीर्घकालीन प्रवासात चित्रपट संगीताचे संग्राहक आणि शौकिन तर हिंदी चित्रपटाचा सुवर्ण काळ म्हटलं की, ते सगळे श्रेय १९६०\६५ या कालखंडापर्यंतच श्रेय देतात. अशा पध्दतीने कायमच

जुन्या चित्रपटाच्या आठवणीत/गोष्टी/फोटो/ किस्से/ गीत/संगीत/कलाकार/त्यांचे किस्से/ माहिती/कथा/ दंतकथा/"गॉसिप्स" यातच भावनिकदृष्ट्या गुंतून राहणे त्याना खूप खूप आवडते. हा बराचसा "कृष्ण धवल" अर्थात "ब्लॅक ॲण्ड व्हाईट" चित्रपटाचा काळ आहे. तोच श्रेष्ठ आहे असे हा वर्ग मानतो. त्यात बरेचसे तत्थ आहेच असे कालांतराने अगदी ड्रग कनेक्शन पर्यन्त गाडी घसरली त्यावरुन नक्कीच वाटते.

या सगळ्यात महत्वाचे आहे ते जुन्या चित्रपटाचे वेड. ते असण्याची कारणे कोणती? प्रत्येक पिढीतील युवा वर्गाने आज पाहिलेले चित्रपट भविष्यात जुने होत जातात. म्हणजे, चाळीशी ओलांडली की आपणच विसाव्या वर्षी पाहिलेले चित्रपट जुने वाटू लागतात आणि त्या जुन्या चित्रपटासह विद्यार्थी वयातील आठवणी, मित्र मैत्रिणीसोबत चित्रपट पाहिल्याच्या आठवणी, प्रेम प्रकरण झाले असेल तर तेव्हा पाहिलेले

चित्रपट, कॉलेजचे लेक्चर बंक करुन पाहिलेले चित्रपट (खास करुन मॅटीनी शोला देव आनंद, शम्मी कपूरचे जुने म्युझिकल सुपरहिट. लोकप्रिय गीत संगीताने एका पिढीतील चित्रपट कायमच पुढील अनेक पिढीत जात असतात.) अशा अनेक जुन्या आठवणीना पंचेचाळीशीनंतर उजाळा मिळत जातो. प्रत्येक पिढीत हेच चक्र सुरु असते. राकेश रोशन दिग्दर्शित 'कहो ना प्यार है' (२०००) च्या वेळी ह्रतिक रोशनचे दीवाने झालेल्या युवकांनी आज चाळीशी/ पंचेचाळीशी ओलांडली आहे. प्रत्येक काळातील सिनेमा जसजसा जुना होत जातो तशीच एक पिढी पुढे जाते आणि मग ही पिढी नंतरच्या पिढीला आपल्या काळातील चित्रपटाच्या आठवणी सांगते. हे तर एक फार मोठे सत्य आहे.

या सगळ्यात एक महत्त्वाचा भाग म्हणजे, माणूस जस जसा मोठा होत जातो, शालेय वयात

असतो तेव्हा त्याला आपल्या आजूबाजूच्या जगात अथवा समाजात पूर्वी काय काय घडले, कसं होते जग, पूर्वीचे चित्रपट कसे होते, ते आपल्या पालकांनी कसे आणि कुठे पाहिले, त्यातील पाहण्यासारखे कोणते होते असे "मागचे बरेच काही जाणून घेता घेता" सिनेमाचा जन्म कसा झाला हेही जाणून घ्यावेसे वाटतेच आणि दादासाहेब फाळके यांचा "राजा हरिश्चंद्र"(३ मे १९१३) हा आपल्याकडचा पहिला चित्रपट आहे हे माहित पडल्यावर तर आपल्या चित्रपटाचा शंभरपेक्षा जास्त वर्षांचा प्रवास कसा झाला हेही जाणून घ्यावेसे वाटतेच. मग त्यासाठी 'सिनेमावरची पुस्तके' हे वर्षानुवर्षाचे महत्वाचे माध्यम आहे. आता "यू ट्यूब चॅनल"वर त्याचा शोध सुरु असतो. माध्यमे बदलली पण मूळ वृत्ती कायम आहे. चित्रपटविषयक माहिती व मनोरंजनाचा "डिजिटल" युगात अतिरेक झालाय हेही खरंच.

आता ही जुन्या चित्रपटाची गरज काळानुसार बदलली गेली हेही सांगायला हवे. दिलीपकुमार, राज कपूर आणि देव आनंद ही त्रिमूर्ती जबरदस्त फॉर्मात असताना त्यांचे पन्नास आणि साठच्या दशकातील चित्रपट "रिपीट रनला" (म्हणजे जुना चित्रपट एकाद्या आठवड्यासाठी पुन्हा एकदा प्रदर्शित होणे), मॅटीनी शोला रिलीज होत. मॅटीनी शो म्हणजे रोज सकाळी अकरा वाजताचा खेळ. १९७२ साली दूरदर्शनचे आगमन झाले आणि शनिवारी संध्याकाळी जुना मराठी तर रविवारी संध्याकाळी जुना हिंदी चित्रपट पाहता येऊ लागला. दशकभराने देशात रंगीत दूरदर्शन व व्हिडिओ आला आणि नवीन चित्रपटासह अगणित जुन्या चित्रपटाच्या "व्हिडिओ कॅसेट" त्यानंतर "डिव्हिडी" हाती आल्या. जुन्या चित्रपटाच्या शौकिनांची चंगळ होत गेली. त्या काळात दिवसा "दहा रुपये" असे व्हिडिओ कॅसेटचे भाडे होते.

याच काळात, VCR भाड्याने आणून रात्रभर जागत "तीन - तीन" सिनेमे सलगपणे पहायचं हे नवे "फॅड" आले होते. मिथुन चक्रवर्तीच्या मसालेदार चित्रपटाना भारी मागणी होती. १९९२ साली देशात उपग्रह वाहिनीचे आगमन झाले आणि दशकभरात चोवीस तास सिनेमा दाखवणारी चॅनल आली. आता जुने चित्रपट आणखीन जवळ जवळ येत गेले. आता तर यू ट्यूब चॅनलवर अबब... म्हणावा असा जुन्या चित्रपटांचा/गाण्यांचा प्रचंड मोठा खजिना आहे. आणि मग 'प्रेम पुजारी' (रिलीज ६ जानेवारी ७०), 'दुश्मन' (७ जानेवारी ७२), 'कटी पतंग' (२९ जानेवारी ७१) आणि 'अमर प्रेम' (२८ जानेवारी ७२) "आनंद" (१२ मार्च ७१), 'अंदाज' (३० एप्रिल ७१), 'शर्मिली' (३१ डिसेंबर ७१) , 'बावर्ची' (७ जुलै ७२), 'जवानी दीवानी' (१४ जुलै ७२), 'रामपूर का लक्ष्मण' (२८ जुलै ७२), 'पिंजरा' (३१ मार्च ७२), 'राजा जानी'

(२३ नोव्हेंबर ७२), 'दाग' (२७ एप्रिल ७३), 'जंजीर' (११ मे ७३), 'नमक हराम' (२३ नोव्हेंबर ७३), 'बॉबी' (२८ सप्टेंबर ७३), 'दीवार' (२४ जानेवारी ७५), 'धर्मात्मा' (९ मे ७५), 'आंधी' (१४ फेब्रुवारी ७५ पण दुर्दैवाने "आणीबाणीच्या काळात" त्यावर बंदी घालण्यात आली.), या पिक्चर्सना पन्नास वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने अनेकाना "यू ट्यूब" मोठाच आधार वाटतो. अनेकांनी 'आनंद'मधील काही भावूक प्रसंग पुन्हा एकदा पाहिले. आणि हळहळले.

"सोशल मिडियाच्या" आजच्या युगात जुन्या चित्रपटाला आपल्या जणू हाती आणले आहे. मी सत्तरच्या दशकात शालेय जीवनात विजय आनंद दिग्दर्शित 'तिसरी मंझिल' अथवा शक्ती सामंता दिग्दर्शित 'इव्हिनिंग इन पॅरीस' कधी बरे "मॅटीनी" शोला येतोय याची वाट पाह्यची सवय झाली होती. मेहबूब खान दिग्दर्शित 'मदर इंडिया' (१९५८), के.

असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम' (१९६०) या चित्रपटाच्या आठवणी मागील पिढीकडून ऐकत असू आणि हेही चित्रपट "रिपीट रनला" रिलीज व्हावे असे वाटे.

जुने चित्रपट पाहावेसे वाटणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. प्रत्येक पिढीत ती आहे. नव्वदच्या दशकातील युवकांना राजेश खन्नाच्या एकेकाळच्या आराधना, दो रास्ते, अमर प्रेम, कटी पतंग, मर्यादा, हाथी मेरे साथी, सच्चा झूठा, अपना देश, बंधन वगैरे अशा एकूण ओळीने सतरा आणि इतर सुपर हिट चित्रपटांबाबत विशेष कुतूहल होते. ते त्यांनी "व्हि.सी.आर." किंवा "डि.व्हि.डी"वर ते चित्रपट पाहून पूर्ण केले.

या सगळ्यात एक अतिशय महत्वाचा घटक आहे, तो म्हणजे, जुन्या अनेक चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. आणि याच सुपर हिट

गाण्यांमुळे एका पिढीतील अनेक चित्रपट पुढील अनेक पिढ्या ओलांडूनही हिट राहिले. आपले अस्तित्व आणि महत्व टिकवून ठेवले. चला, मला देखिल आता राज कपूर दिग्दर्शित "मेरा नाम जोकर" पुन्हा एकदा पाह्यचाय. पहिल्यांदा मी तो "रिपीट रन"ला पाह्यला होता, मग दूरदर्शनवर पाह्यला, त्यानंतर व्हिडिओवर पाह्यला, त्यानंतर चॅनलवर पाह्यला.... अगणित वेळा मी 'मेरा नाम जोकर' पाहूनही तो पुन्हा एकदा पाह्यचाय अशीच अगणित जुन्या चित्रपटांची मोहिनी अजून कायम आहे आणि अनेक चित्रपट रसिकांची हीच जुन्या चित्रपटांबाबत विलक्षण ओढ आहे.....जुना चित्रपट पुन्हा पुन्हा पाहताना तो वेगळाही दिसू लागतो. 'मेरा नाम जोकर 'मध्ये आता मला सर्कस फारशी दिसत नाही, तर प्रेम कथेची शोकांतिकाच दिसते. आणि अनेकांना पुन्हा पुन्हा " शोले" पाह्यचा असतोच!

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र १७ ऑगस्ट २०२५ वरुन साभार)



लेख क्रमांक : ६

सिनेमाच जेव्हा "वेळेचा खेळ" बदलवतो....

आजच्या "ग्लोबल युगातील" डिजिटल पिढीतील काही चित्रपट रसिकांनी मला "व्हॉट्सॲप" वर एक प्रश्न पाठवला होता., "शोले" तब्बल एकवीस रिळांचा, आजच्या भाषेत तीन तास अठरा मिनिटांचा होता, तर मग त्याच्या खेळाच्या वेळा काय होत्या?" प्रश्न खरंच महत्वाचा! त्यातही आजच्या "मल्टीप्लेक्स" युगात

सकाळी साडेआठ नऊ ते रात्री साडेअकराचा मिडनाईट मॅटीनी शो असे खेळ असतात नि काही मुव्हीज शंभर मिनिटांच्या असतात त्यात तर हा प्रश्न खूपच महत्वाचा! पूर्वी चित्रपटाच्या वेळेचे गणित पक्के असे. दक्षिण मुंबईतील चित्रपटगृहात सकाळी साडेअकरा वाजता "मॅटीनी" शो (जुने चित्रपट प्रदर्शित करण्याच्या या प्रथेत मग नवीन चित्रपट प्रदर्शित होऊ लागले. पण "मॅटीनी शो"ची इमेज व वैशिष्ट्य कायम राहिली) व दिवसा तीन, सहा व नऊ असे तीन खेळ. चित्रपट मोठा असेल तर वेळ मागेपुढे होई. श्याम बेनेगल, बासू भट्टाचार्य वा बासू चटर्जी दिग्दर्शित चित्रपट चौदा रिळांचे असत. आणि त्यांचे अनेक चित्रपट मॅटीनीलाच प्रदर्शित होत. दिवसा तीन खेळ असतील तर साडेतीन, साडेसहा व साडेनऊ अशी वेळ असे. दिग्दर्शक मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा यांना आपण पब्लिकला भरपेट, भरगच्च

मसालेदार मनोरंजक चित्रपट देण्याची हौस मौज, त्यांचे पिक्चर अठरा रिळांचे असत. सेन्सॉर "सर्टिफिकेट"वर ते वाचताच पब्लिकमधून हमखास टाळी येई. जणू नेहमीच्याच तिकीटावर जास्त पिक्चर पाह्यला मिळणार. त्या मनोरंजक चित्रपटाची वेळ दुपारी अडीच, सहा व नऊ अशी साधारण असे. उपनगरातील चित्रपटगृहात कायमच बारा, तीन, सहा, नऊ अशी हुकमी वेळ असे. याच नावाचे मराठीत पुस्तक देखील प्रकाशित झाले आहे.

"शोले" च्या वेळेस मिनर्व्हात मात्र चित्रपटाच्या प्रदर्शनाची वेळ चक्क दुपारी दीड, साडेपाच व रात्री नऊ वाजून वीस मिनिटे अशी होती. सुरुवातीस ती अडनीळी वाटे. मात्र पिक्चर हिट होताच ती माहितीची झाली. आपली 'सिनेमा प्रेक्षक संस्कृती' खूप जगावेगळी आहे असे मी कायमच अभिमानाने सांगतो. आपल्याला आपल्याकडे अनेक प्रादेशिक

भाषेत आणि हिंदीत निर्माण होत असलेल्या चित्रपटाचे विशेष कौतुक हवेच. कारण ते आपल्याकडील बहुसांस्कृतिक, सामाजिक, बदलत्या माध्यम व वातावरणातून वाटचाल करतेय.

आता हेच बघा ना, तुम्ही पूर्वी एकाद्या तालुक्याच्या ठिकाणच्या अथवा अगदी गावातल्या सिनेमा थेटरात रात्रीचा शो पाह्यला गेला असाल तर तुमची एक आठवण नक्कीच असेल, सिनेमाचा "क्लायमॅक्स" (अर्थात शेवट) जसजसा शेवट येत असतानाच एक लक्ष असे की, सिनेमा संपल्यावर घरी जायला टमटम (सहा सीटची रिक्षा) मिळेल काय? स्वतःची सायकल अथवा स्कूटर असेल तर असा प्रश्न पडत नसे. पण तसे नसेल तर? याच गोष्टीला 'दुसरी बाजू' ही आहेच. ती म्हणजे, प्रेक्षकांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामीण भागातील थेटरवाले रात्रीचा खेळ बारापूर्वीच संपेल याची काळजी घेत. आणि समजा,

चित्रपटच त्यापेक्षाही जास्त लांबीचा असेल तर? तर ते बिनदिक्कतपणे 'आपल्या अधिकारात' त्यातील काही भाग चक्क बिनधास्त कापत असत!.... ही त्यांची चित्रपट संकलन कला जगावेगळी, नाही का? पण चित्रपट वेळेवर संपवायला हवी अशी. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील हाही एक अजब फंडा.

"आमिर खान निर्मित आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' (२००१) ला आपण अशीच कात्री लावली आणि रात्री बारा वाजता 'शेवटचा खेळ' संपेल हे पाहिले. इतकेच नव्हे तर या पिक्चरच्या एकूणच लांबीमुळे माझ्या टॉकीजमध्ये दिवसा चार शो बसत नव्हते, पण आम्हीच काही दृश्ये कापल्याने ते शक्य झाले.." असे चक्क असाच एक ग्रामीण भागातील थेटरवाला त्या काळात "नाझ" चित्रपटगृहाच्या इमारतीतील एका वितरकाच्या कार्यालयात मला भेटला असता 'जणू काही यात

आश्चर्य वाटण्याजोगे' काहीच नाही अशा पध्दतीने माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्याकडे दुर्लक्ष करीत मला सांगत होता आणि आपल्याकडील 'थेयटर संस्कृती'चा आणखीन एक झक्कास प्रत्यय आला. गोष्ट छोटी वाटते, पण महत्त्वाची आहे!

असे काही ऐकले की, माझे कुतूहल वाढते. आणि मग काही गोष्टी जाणून घ्याव्याश्या वाटतात. मग समजले की ती दीर्घकालीन परंपराच आहे. नेहमीपेक्षा जास्त लांबीचे चित्रपट हे शहरातील थेयटर संस्कृतीत ठीक आहे, पण शहरापासून जेवढे दूर दूर जात राहू तर 'त्याच चित्रपटाची लांबी कमी कमी होत जाते'. कारण, शोची दिवसा चार खेळ आणि वेळ सांभाळायची असते. भले इकडे मोठमोठ्या परिसंवादात, इव्हेन्टसमध्ये चित्रपटाच्या आशय, बदलते तंत्रज्ञान, वितरण, मार्केटिंग, पूर्वप्रसिध्दी, बजेट यावर भली मोठी गंभीर चर्चा होत असेल.

दूरवरच्या प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचण्याचे जग वेगळे!

"मल्टीप्लेक्स" व "डिजिटल" युगापूर्वीची आपल्या देशातील चित्रपटाच्या खेळाची हुकमी वेळ काय होती हे मी सुरुवातीलाच सांगितले. मी तीनच्या शोला जातोय, मी लास्ट शो पाह्यला असे बोलण्याची सामाजिक सांस्कृतिक परंपराच होती. एकाद्या थिएटरमध्ये एकच चित्रपट चारही खेळासाठी असेल तर 'दिवसा चार खेळ' असे एवढेच दिले जाई. आणि समजा, हीच वेळेची चौकट जेव्हा मोडली जाई?

राज कपूर अभिनित, निर्मित व दिग्दर्शित 'संगम' (१९६४)ची लांबी फारच आहे आणि म्हणूनच त्याला दोन मध्यंतर आहेत असे 'संगम'च्या पूर्वप्रसिध्दीतच स्पष्ट दिसू लागताच त्याच्या शोच्या वेळा कशा बरे असतील, याबाबत कुतूहल निर्माण झाले होते आणि मग त्याच्या रिलीजच्या वेळी समजले

की, दक्षिण मुंबईतील "अप्सरा" थिएटरचे उदघाटन 'संगम'ने होत असून शोच्या वेळा आहेत, दहा, दुपारी साडेतीन आणि रात्री आठ वाजता. सिनेमा चार तासांचा असल्याने या वेळा अगदी स्वाभाविक होत्याच. भायखळ्याच्या जयहिंद टॉकीजमध्ये दिवसा चार खेळ अशी प्रथा असल्याने तेथे 'संगम'साठी वेळा होत्या, सकाळी पावणेआठ, दुपारी बारा वाजता, मग सव्वाचार वाजता आणि रात्री नऊ वाजता! आणि एकदा हे वेळेचे गणित समजले, पिक्चर पब्लिकला आवडला आणि मग 'संगम' पाह्यला जाण्याची वेळ पब्लिकच्या माईंडमध्ये सेट झाली. यश बरेच काही घडवते ते हे असेही. आणि यशाच्या गोष्टीत फार रंजकताही असते. ("संगम" जेव्हा "व्हि.एच. एस" प्रकारात आला, तो दोन भागात!)

अशा मोठ्या लांबीच्या चित्रपटाबाबत असे नेहमीच घडते. सहज उदाहरण म्हणून ही बघा,

'सूरज', मेन थिएटर "नॉव्हेल्टी"! इथे दुपारी दोन, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री साडेनऊ, बी. आर.

चोप्रा दिग्दर्शित 'दास्तान', "नॉव्हेल्टी"त पावणेदोन, साडेपाच आणि नऊ, तर रेक्स आणि लोटसमध्ये सकाळी साडेदहा, दुपारी दोन वाजता, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री नऊ वाजता. असे दिवसा चार खेळ. राज कपूर दिग्दर्शित 'बॉबी'. मेट्रोत दुपारी सव्वादोन, सायंकाळी पावणेसहा आणि रात्री सव्वानऊ! प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'मुक्कदर का सिकंदर' अलंकारला दोन, पावणेसहा आणि सव्वानऊ! रिचर्ड अटनबरो दिग्दर्शित 'गांधी' रिगल

मध्ये इंग्रजीत बारा, सव्वाचार आणि साडेआठ वाजता. तीनच खेळ. तर हिंदीत प्लाझा थिएटरमध्ये



सकाळी दहा, दुपारी पावणेदोन, संध्याकाळी साडे पाच आणि रात्री सव्वानऊ!

यावरुन तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेलच की, वीसपेक्षा जास्त रिळाच्या चित्रपटाच्या खेळाच्या वेळा या अशा नेहमीची चौकट मोडणाऱ्या असत. राज कपूर दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर ', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान', सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान', करण जोहर दिग्दर्शित 'कभी

खुशी कभी गम' या चित्रपटाच्या वेळीही शोची वेळेची खेळी अशीच होती. 'मेरा नाम जोकर' तर दोन मध्यंतरसह पडद्यावर आला (१८ डिसेंबर १९७०)

आणि त्याच्या वेळा त्यानुसार होत्या. पण फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच 'जोकर पडला पडला' अशी हाकाटी दिल्याने तो बराचसा कापून एका मध्यंतरचा करण्यात आला. आणि मॅटीनी शो, रिपीट रनला कायमच गर्दीत चालला.

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल पण त्या काळात अशा पध्दतीने 'सिनेमाच्या शोची वेळ' नेहमीपेक्षा वेगळी असेल तर आपल्याला जास्त मोठा

चित्रपट पाह्यचाय अशी एक प्रकारची मानसिकता तयार होई आणि अशी काय बरे थीम असेल, असे आपल्याला काय काय बरे पाह्यला मिळतेय याबाबत उत्सुकता वाढे! एक प्रकारे ते गरजेही असते. ते दिवसच वेगळे होते. शोची वेळ हा अनेक लहान मोठ्या गोष्टीना जन्म देणारी असे. त्यात पुन्हा दुपारचा खेळ दोन वाजता असेल तर आपोआपच मॅटीनी शोची वेळ अकराची करावी लागे. या सगळ्यात काय व्हायचे माहित्येय? मॅटीनी शो साडेअकराचा, पहिला खेळ तीनचा, दुसरा सहाचा आणि रात्रीचा साडेनऊचा असे सरावाचे टाईम टेबल पक्के असणारे रसिक प्रेक्षकांची अनेकदा तरी चित्रपटाची सुरुवातच चुकत असे अथवा त्याना हा चित्रपट नंतर बघू असा तात्काळ निर्णय घेत अन्य थिएटरवर जावे लागत असे. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चानी'च्या जाहिरातीत अगदी ठळकपणे दिले होते, 'वेळेपूर्वी या,

अगोदर आलेल्यांना डिस्टर्ब करु नका'. इरॉसमध्ये या चित्रपटासाठी शोची वेळ होती, साडेबारा, साडेतीन, साडेसहा आणि साडेनऊ!

अशा या चित्रपटाच्या खेळाची वेळ या संस्कृतीत 'मेरी आवाज सुनो'च्या वेळी नियमित शोमध्ये भर पडली. एका दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक असलेल्या या चित्रपटात प्रचंड हिंसा असल्याच्या कारणास्तव त्यावर बंदी येणार अशा बातमीने वादळ निर्माण केले आणि याचाच व्यावसायिक फायदा उठविण्यासाठी या चित्रपटाचे शो वाढवताना सकाळी नऊचा 'जादा खेळ' लावला गेला. मी स्वत: मिनर्व्हात असा सकाळी नऊ वाजताच्या शोला गेलो. बंदी आलीच तर पाह्यचा राहून जाईल याची भीती वाटत होती हो. आणि मग मी हा चित्रपट पाह्यलाय असा भाव खात गिरगावात फिरलो!

मध्य आणि उत्तर भारतातील अनेक छोट्या शहरात अनेक मोठ्या चित्रपटांचे 'राऊंड' शो होत. ते रुजलेच होते. विशेषत: 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चा पब्लिक रिपोर्ट भारी आला रे आला थिएटरवर गर्दी उसळे आणि कुठे जमलचं तर रात्री बाराचाही अथवा सकाळी सहा वाजल्यापासून शो सुरु! कधी एकदा हा सुपर हिट पिक्चर पाहतोय अशी जबरा वातावरण निर्मिती व्हायची. आपल्या देशात चित्रपट फक्त पडद्यावर राहत नाहीत याचाच हा सज्जड पुरावाच जणू. विजय कोंडके निर्मित व दिग्दर्शित 'माहेरची साडी'च्या बाबतीतही पश्चिम महाराष्ट्रातील काही ठिकाणी हेच घडले. एक शो संपतोय तोच पुढचा असा फंडा आणि अशा क्रेझच्या चौकटीतील बातम्या सिनेमाला आणखीन चर्चेत ठेवत. आणि ते योग्यच असते. पिक्चर रिलीज झाल्यावर त्याची जास्त जोरशोरसे प्रसिध्दी व्हायला हवी हे सर्वकालीन सत्य

आजची चित्रपटसृष्टी जवळपास विसरलीय. चित्रपट प्रदर्शित झाला एवढेच पुरेसे नसते., हे जुन्या काळातील फिल्मवाल्यांना चांगलेच समजलेले.

मल्टीप्लेक्स युगात सकाळपासूनच शो सुरु होतात आणि रात्री उशीरापर्यंत असतात. पण त्यातले फर्स्ट शो फर्स्ट शोचे वातावरण, त्यातले थ्रील आणि शोच्या वेळेतील धक्के हे सगळेच हरवलेय. कोणत्याही वेळेचा शो पाहिला तरी काय फरक पडतोय अशा गोष्टीपर्यंत येऊन पोहचलोय. मल्टीप्लेक्सबाहेर कायमच शुकशुकाट दिसतो. थेयटरभोवतीची गर्दी ही गोष्ट सोशल मिडियात तेव्हाचे फोटो पाहताना दिसतेय.

सिनेमाची वेळ काय होती आणि आता काय वेळ आली असे तर नव्हे ना? फिल्मवाल्यांच्या भाषेत सांगायचे तर पिक्चर हिट असेल तर बोलणार 'टाईम अच्छा चल रहा है' आणि पिक्चरला पब्लिकने

नाकारले तर त्यांचे ठरलेले असते, बुरा टाईम चल रहा है..... असे काहीही असले तरी कोणावर कशी वेळ आणायची हे पब्लिकच्या हातात असते.

"शोले" पब्लिकने असा व इतका डोक्यात व डोक्यावर घेतला की त्याची कायमच चलतीची वेळ राहिली. मनोरंजक उपग्रह वाहिनी, यू ट्यूब व ओटीटी यावर कोणत्याही वेळी चित्रपट रसिक शोले पुन्हा पुन्हा पाहण्यास उत्सुक आहेत हे यश तर कशातही मोजता न येणारे...

© दिलीप ठाकूर
(रविवार राम प्रहर, १७ ऑगस्ट २०२५ वरुन साभार)



लेख क्रमांक : ७

"भागो गब्बर आया गब्बर....."

निर्माता व्ही. के. सोबती व दिग्दर्शक ए. सलाम यांच्या "जमानत" (१९७७) या चित्रपटातील एक दृश्य! गुन्ह्याच्या आरोपाखाली रणवीर (अमजद खान) याला पोलीस पकडून जेलमध्ये घेऊन येत असतात आणि त्याचे क्रूर रुप पाहून जेलमधील आरोपी घाबरतात, अशातच एक आरोपी ओरडत धावत पळत म्हणतो, "अरे भागो, हमारे जेल मे गब्बरसिंग आया है, भागो...गब्बर आया गब्बर..!"

एव्हाना तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेलच रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (मुंबईत प्रदर्शित १५ ऑगस्ट १९७५) मधील क्रूरकर्मा, खौफनाक डाकू गब्बरसिंग (अमजद खान) याच्या दहशतीचा हा प्रत्यय (की परिणाम) होता!

"शोले" प्रदर्शित होईपर्यंत गब्बरसिंग व ती विकृत हास्याने, भेदक नजरेने व्यक्तीरेखा खुलवणारा अमजद खान यांच्याबद्दल चित्रपट रसिकांत उत्सुकता होती. पण तो इतका जालिम असेल अशी फार कोणी कल्पनाच केली नव्हती! चित्रपटात "संजीवकुमार" वगैरे मोठमोठे कलाकार असतानाच अशा नवीन खलनायकाकडे फार कोण कशाला लक्ष देईल? आणि त्या काळात चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीचा जास्त भर त्याच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका साधारण चार सहा महिने अगोदर प्रकाशित करणे ("शोले" ची "पॉलिडॉर" कंपनीने

प्रकाशित केली होती.), रस्त्यावरील विजेचे खांब, रेल्वेस्थानक येथील पोस्टर्स, मोक्याच्या ठिकाणची मोठ्ठाली होर्डिंग्ज, विविध भारतीवरील रेडिओ प्रोग्राम (अनेक शनिवार दुपारी पावणेतीन वाजताच्या "शोले" च्या पंधरा मिनिटाच्या रेडिओ प्रोग्राममध्ये गाण्याचे भाग व संवाद ऐकवले जात) आणि मुद्रित माध्यमातील बातम्या, लेख यातून "शोले" जन सामान्यांपर्यंत पोहचत होता पण त्यात गब्बरसिंग एक विलक्षण शक्तीशाली खलनायक असेल हे जाणवत नव्हते. सिनेमात एक खलनायक असतो तसा तो आहे हे फर्स्ट इम्प्रेशन!

मिनर्व्हातील फस्ट डे फर्स्ट शो सुरु झाला....

सलिम जावेदची बंदिस्त पटकथा आणि दमदार संवाद असलेला हा चित्रपट जस जसा पुढे सरकला तसतशी प्रेक्षकांना गब्बरसिंगची प्रचंड दहशत वाटू लागली. "सत्तर एमएमचा" विशाल

पडदा व "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" यामुळे ही प्रतिमा अक्राळविक्राळ ठरु लागली. पडद्यावरच्या खलनायकाला घाबरणे हीदेखील एक परंपरा होती. साठच्या दशकात प्राणकडे त्याचे श्रेय जाते. 'शोले' शर्ट पॅन्टमधला डाकू ही कल्पना नवीनच होती. तर त्याची ठाकूर बलदेवसिंगच्या (संजीवकुमार) कुटुंबाची निर्घृण हत्या करणे आणि ठाकूरचेही दोन्ही हात अतिशय रानटीपणाने तलवारीने कापणे हे तर अंगावर शहारे आणणारे होते.... हे श्रेय पटकथाकाराचेही आणि राहुल देव बर्मनच्या पार्श्वसंगीताचेही!

संपूर्ण पडदाभर गब्बरसिंगचे रानटी कौर्य पसरले होते. तात्कालिक समिक्षकांनी 'हा रक्तपाती सिनेमा आहे', खूप हिंसाचारी आहे, लांबलेली सूडकथा आहे असा कौल दिला! प्रेक्षकांतून फारशी काहीच प्रतिक्रिया नव्हती, त्यामुळे 'शोले' "फ्लॉप" झाला

अशीच कुजबुज सुरु झाली होती. पण ती एका मोठ्या वादळापूर्वीची शांतता पसरली आहे याची कोणालाही कल्पना आली नाही. ते वादळ आज या चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण झाली तरी आपलं अस्तित्व दाखवतयं.

साधारण दीड दोन आठवडे झाले आणि 'शोले'ची क्रेझ वाढू लागली. सत्तरच्या दशकात अशी सूडकथा नवीन नव्हतीच, पण या चित्रपटाचा कॅनव्हास थक्क करणारा होता. तत्पूर्वी, हिंदी चित्रपटात पांछी दिग्दर्शित 'अराऊंड द वर्ल्ड' (१९६७) हा पडद्यावर आलेला एकमेव ७० एमएमचा चित्रपट प्रेक्षकांनी नाकारला होता.



तर.... गब्बरसिंगचा टेरर अथवा भीती हे या चित्रपटाचे विशेष वैशिष्ट्य ठरत होते. रसिकांच्या किमान दोन पिढ्या विविध गेटअपने आणि कुटील डावपेच, छद्मी हास्य, जहरी नजर अशी व्हीलनगिरी करीत असलेल्या प्राणला घाबरत वाढली. त्यानंतर "शोले" पडद्यावर येईपर्यंत अजित, प्रेमनाथ, प्रेम चोप्रा, डॅनी डेन्झोपा, रणजित, मदन पुरी, अन्वर हुसेन, इम्तियाझ (हा अमजदचा भाऊ) अशा व्हीलनचे राज्य सुरु झाले होते आणि अशातच

अमजद खान अवतरला तोच हिंसेवर विश्वास ठेवणारा क्रूरकर्मा गब्बरसिंगच्या रुपात!

संजीवकुमारला गब्बर साकारायची इच्छा होती. त्याचा चेहरा या भूमिकेत फिट्ट बसणार नाही असे रमेश सिप्पीने समजावले हा किस्सा प्रसिद्ध आहे. गब्बरसिंगच्या भूमिकेसाठी डॅनी डेन्झोपाचे नाव निश्चित केलेले! या चित्रपटाच्या पहिल्या सिटींगला तो हजर असल्याचे छायाचित्र प्रसिद्धही झाले. पण आपल्या "धर्मात्मा"त हेमा मालिनीसोबत.. "मेरी गालियों से..." गाण्यात संधी आहे, 'शोले'तील तीन नायकांमध्ये तुला वाव तो किती असे फिरोज खानने डॅनीला व्यवस्थित समजावल्याचे रणजीत सांगतो. रणजीतलाही या भूमिकेसाठी विचारले. डॅनीने चित्रपट सोडलाय हे लेखी आणा ही त्याची अट होती.

अशी शोधाशोध सुरु असतानाच जावेद अख्तर यांच्या पाहण्यात 'ये मेरे वतन के लोगो' हे नाटक पाहण्यात आले आणि त्यांनी अमजद खानचे नाव सुचवले. तोपर्यंत अमजद खानची ओळख म्हणजे एकेकाळचा खलनायक जयंत यांच्या दोन मुलांपैकी एक अशीच! लहान वयात त्याने नाझनीन (१९५१), अब दिल्ली दूर नहीं (१९५७), माया (१९६१), लव्ह ॲण्ड गॉड अशा चित्रपटांतून भूमिका केलेल्या. आता अमजद हिंदी रंगभूमीवर कार्यरत होता आणि चेतन

आनंद दिग्दर्शित 'हिन्दुस्तान की कसम' (१९७४) या चित्रपटात त्याने छोटीशी भूमिका साकारलेली. गब्बरसिंगचा दबदबा वाढत गेला. गब्बरसिंगच्या भूमिकेसाठीचे कपडे अमजद खानने चोरबाजारातून विकत घेतले.... रामगढला जाण्यासाठी अमजद निघाला तेव्हा त्याच्या पत्नीची इच्छा होती आपण बाळंत झाल्यावर त्याने निघावे (शादाब खानच्या जन्मीच्या वेळची गोष्ट), मुंबई विमानतळावर आल्यावर समजले, खराब हवामानामुळे बंगलोरला जाणारे विमान पाच तास उशीरा आहे... पहिल्याच दिवशी अमजदने एकाच दृश्याचे तब्बल चाळीस टेक घेतले. अशाने त्याचे कसे होणार असा प्रश्न उपस्थित झाला. पण अमजद रंगभूमीवरुन आलेला कलाकार असल्याने दुसऱ्याच दिवसापासून त्याला भूमिका सापडली. त्याची पत्नी तरुणकुमार भादुरी यांचे "चंबल" पुस्तक वाचत असतानाच त्यात एक धोबी

आपल्या पत्नीला "अरे ओ शांती" अशी हाक मारत असल्याचे अमजदच्या वाचनात आले होते. यावरुन त्याने "अरे ओ सांबा.. " केले. या पुस्तकात वाचलेली डाकूंबद्दलची बरीच माहिती अमजदला उपयुक्त ठरली. हे गब्बर नाव का? गब्बर नावाचा एक डाकू चंबळच्या खोऱ्यात होता याची गोष्ट सलिम खान यांना त्यांच्या वडिलांनी एकदा सांगितली होती.

पिक्चर सुपर हिट होताच त्याच्या संवादाची प्रकाशित करण्यात आलेली ध्वनिमुद्रिका व ध्वनिफीत यांची विक्रमी विक्री झाली. शहरापासून ग्रामीण भागात नाक्यानाक्यावर ती लावली रे लावली संवाद ऐकायला गर्दी वाढत जाई. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती अशी चौफेर आहे.

गब्बरसिंगचेही अनेक डायलॉग गाजले,

"कितने आदमी थे..."

"यहासे पचास पचास कोस दूर गावमें जब बच्चा रात को रोता है तो माँ कहेती है बेटे सोजा... सोजा नही तो गब्बरसिंग आ जाएगा..."

"अब तेरा क्या होगा कालिया... "

"बहुत याराना लगता है... "

"यह हाथ हमे दे दो ठाकूर... "

असा क्रूरकर्मा खलनायक अधिकाधिक जहाल करणे हे तसे सोपे नसते. सगळी सहानुभूती नायक, सहनायक अर्थात सकारात्मक व्यक्तिरेखांकडे जाते आणि प्रेक्षकांच्या शिव्या अथवा व्देष या व्हीलनकडे जातो. तो पचवून अमजद खान 'स्टार' झाला आणि जणू गब्बरसिंग 'हीरो' झाला.

हे सगळे होतानाच गब्बरसिंगची आता भीती न वाटता, त्याचे हळूहळू का होईना पण आकर्षण वाढू लागले. अमजद खानने या भूमिकेसाठी घेतलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक होवू लागले. आता

'गब्बरसिंगच्या दृष्टिकोना'तून 'शोले' पाहिला जाऊ लागला..... खुद्द अमजद मिनर्व्हात १३० व्या आठवडय़ात आला आणि मॅनेजरच्या केबिनमध्ये बसून पब्लिकचा प्रतिसाद त्याने जाणून घेतला.

अमजद खान 'स्टार' झाला आणि अर्थातच त्याच्याकडे अक्षरशः चित्रपटांची रांग लागली. चित्रपटाच्या जगात यश हेच चलनी नाणे आहे म्हणा.

चरस, देस परदेस, नास्तिक, सत्ते पे सत्ता, चंबल की कसम, गंगा की सौगंध... अमजद खान सातत्याने हिंदी चित्रपटात दिसू लागला. 'शोले' नंतर आलेल्या

मल्टी स्टार कास्ट चित्रपट आणि हिंसक थीम यात अमजद खान फिट्ट बसला. काही काळाने काही सकारात्मक भूमिकाही केल्या. उदाहरणार्थ, याराना, लावारीस वगैरे वगैरे! अन्यथा एकसुरीपणा आला असता. पण मोठ्या प्रमाणावर चित्रपटातून भूमिका साकारण्याचा त्याचा झपाटा कायम होता. बरसात की रात, राम भरोसे, अपना खून, भूख, कस्मे वादे, मुकद्दर का सिकंदर, राम कसम, अहिंसा, रॉकी, सुहाग, ज्वालामुखी, प्यारा दुश्मन, चेहरे पे चेहरा, बगावत, देशप्रेमी, कालिया, हिम्मतवाला, जानी दोस्त, कुर्बानी, लव्ह स्टोरी, चमेली की शादी वगैरे वगैरे बरेच काही चित्रपट केले त्याने! कधी व्हीलन, कधी पॉझिटीव्ह भूमिका, तर कधी चरित्र भूमिका....

जुगल किशोर दिग्दर्शित 'दादा' या चित्रपटात त्याने शीर्षक भूमिका साकारलीय. एक प्रकारे तो या चित्रपटाचा 'हीरो'च. अमजदसाठीच तेव्हा प्रेक्षकांनी

हा चित्रपट पाहिला आणि मुंबईत इंपिरियल थिएटरमध्ये रौप्यमहोत्सवी यशस्वी ठरला.

राज एन. सिप्पी दिग्दर्शित 'इन्कार' मधील अमजदचा व्हीलन डेंजरस होता. एका लहान मुलाचे अपहरण करणारा हा अतिशय धोकादायक व्हीलन होता. दारुच्या गुत्त्यावर हेलन 'ओ... मुंगळा मुंगळा..' असे फक्कडबाज नृत्य करीत असतानाही हा क्रूरकर्मा राज सिंह अजिबात विचलित होत नाही....

सत्यजित रे यांनी दिग्दर्शित केलेल्या एकमेव हिंदी चित्रपट 'शतरंज के खिलाडी ' या चित्रपटात

अमजद खानने वाजीद अली शाह ही व्यक्तिरेखा साकारलीय. मुन्शी प्रेमचंद यांच्या साहित्यावर आधारित हा चित्रपट आहे. गुलजार दिग्दर्शित 'मीरा' चित्रपटात त्याने राजा अकबर साकारला तर 'उत्सव ' या चित्रपटात वात्सयान साकारला. 'द परफेक्ट मर्डर' या इंग्रजी चित्रपटाही त्याने भूमिका साकारली. अमजद खानने आपल्या कारकिर्दीत अशा काही वेगळ्या भूमिका साकारत आपल्या गब्बरसिंगच्या लोकप्रियतेच्या बाहेर येण्याचा खूप प्रयत्न केला. पण आपल्याकडे एक खणखणीत यशस्वी चित्रपट त्यातील कलाकाराला अनेकदा तरी कायमची 'इमेज' चिकटवतो. कधी दिग्दर्शकच त्या कलाकाराची इमेज पुन्हा पुन्हा पडद्यावर आणतो तर कधी प्रेक्षकांनाच त्या कलाकाराने तशाच भूमिकेत वावरावे असे वाटते. कधी कधी प्रचंड यश फसवे ठरते ते हे असे. अमजद खानने चक्क "कॉमेडी" भूमिकाही साकारल्या.

जितेंद्र आणि जयाप्रदा यांची भूमिका असलेल्या 'सिंहासन' (१९८६) (मराठी वेगळा) या चकचकीत पोशाखी चित्रपटात अमजद खानने चक्क स्त्री वेष धारण केला. ते फार विचित्र दिसले. पण त्यातूनच विनोद निर्मिती अपेक्षित असेल तर?

आपल्या दादा कोंडके यांनी 'अंधेरी रात मे दिया तेरे हाथ में' या चित्रपटात अमजद खानला मूळ 'तुमचं आमचं जमलं' मध्ये अशोक सराफने साकारलेली ममद्या खाटीक ही भूमिका दिली. दादानी आपल्या भोर येथील स्टुडिओत आपल्या या चित्रपटाचे शूटिंग असताना मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकाराना आवर्जून शूटिंग कव्हरेजसाठी आमंत्रित केले होते तेव्हा अमजद खानच्या भेटीचा आणि मुलाखतीचा योग आला. तेव्हा त्याने 'आपणास वारंवार गब्बरसिंगची आठवण करुन दिली जाते' असा खेद व्यक्त केला. आपली ती भूमिका पडद्यावर

आल्यावर आपले पुढचे आयुष्य सुरु झाले हे फारसे कोणी विचारात न घेता पुन्हा पुन्हा 'रामगढचे दिवस, शोलेचे यश, गब्बरसिंगची दहशत' यावरच बोलायला भाग पाडतात हे आपणास फारसे रुचत नाही म्हटलं.

गब्बरसिंगचा हा प्रवास एवढ्यावरच कसला हो थांबतोय,

राजू मावानी निर्मित आणि अजित देवानी दिग्दर्शित 'रामगढ के शोले 'मधील ड्युप्लीकेट देव आनंद, अमिताभ बच्चन, अनिल कपूर आणि गोविंदा यांच्यासोबत भूमिका म्हणूनच त्याने एन्जॉय केली. 'शोले'चा गब्बरसिंग आपली शिक्षा पूर्ण करुन जेलबाहेर येतो तोच त्याला हे चौघे ड्युप्लीकेट किडनॅप करतात आणि मग एकच धमाल उडते अशी या चित्रपटाची कन्सेप्ट!.

आपल्या अशा एकूणच बिझी कारकिर्दीत त्याने 'चोर पोलीस' (१९८३) आणि 'अमीर आदमी गरीब

आदमी '(१९८५) या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले. तो त्याचा प्रांत नव्हताच. चित्रपट अगदीच सामान्य ठरले. शक्ती सामंता दिग्दर्शित 'द ग्रेट गॅम्बलर'च्या गोव्यातील शूटिंगवरुन मुंबईत येत असताना त्याच्या गाडीला मोठा अपघात झाला होता.

अनेक प्रकारच्या व्यक्तिरेखा साकारलेला हा गुणी अभिनेता 'शोले 'चा क्रूरकर्मा गब्बरसिंग म्हणून आजही लोकप्रिय आहे. एका प्रचंड यशाने त्याला विलक्षण उंचीवर नेले आणि त्या स्थानावरही त्याने आपल्यातील अष्टपैलू अभिनेत्याला अधिकाधिक वाव देण्याचा नक्कीच प्रयत्न केला. अगदी गब्बरचा धाक आणि लोकप्रियता आपली सावली बनली आहे याची जाणीव ठेवून वावरला.

"शोले" च्या फसलेल्या अनेक रिमेकमधील "रामगोपाल वर्मा की आग" (२००७) मध्ये अमिताभने बब्बनसिंग साकारत आपली गब्बरसिंग होण्याची

हौस मौज पूर्ण केली. पण त्यात गब्बरचा धाक नव्हताच. अमजदचा ठसा अमिताभ पुसू शकला नाही हे अमिताभ चाहत्यांनी चक्क स्वीकारले.

हा गब्बरसिंग बिस्किटच्या जाहिरातीत आला. अमजदने ते का करावे? कालांतराने हरीश शंकर दिग्दर्शित 'सरदार गब्बरसिंग'(२०१२) नावाचा तेलगू चित्रपट आला, हिंदीत चक्क संजय लीला भन्साली निर्मित व क्रिश दिग्दर्शित "गब्बर इज बॅक " (२०१५) आला. ते गब्बरसिंगचा विसर पाडू शकले नाहीत.

"शोले" वर तांत्रिक सोपस्कार करुन तो त्रीमिती (अर्थात थ्री डी) केल्यावर गब्बरसिंग जास्तच भयावह वाटला. (२०१४) थ्रीडीच्या चष्म्याने त्याला आपल्या आणखीन जवळ आणले.

रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या ओलांडून आता देश विदेशात "शोले" चे पन्नासावे सुवर्ण महोत्सवी वर्ष दणक्यात साजरे होत असतानाच रिगल

चित्रपटगृहात "शोले"च्या हाऊसफुल्ल गर्दीतील खेळात गब्बरसिंगच्या एन्ट्री व संवादाला जास्त टाळ्या आणि शिट्ट्या पडल्या. तेदेखील पडद्यावर गब्बर बोलण्यापूर्वीच प्रेक्षकांमधून आवाज आला, ...जब तक तेरे पैर चलेंगे उसकी सांस चलेगी, तेरे पैर रुकेंगे यह बंदूक चलेगी!

© दिलीप ठाकूर
(सकाळ सप्तरंग पुरवणी, १७ ऑगस्ट २०२५)

<u>लेख क्रमांक : ८</u>

"शोले" चे यश ही काय मोजायची गोष्ट आहे?

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

मी अनेक वर्ष एक गोष्ट आवर्जून सांगतो, "मिनर्व्हा" चित्रपटगृहाची इमारत पूर्णपणे पाडलीय, पण आजही तेथून जाताना कधी गब्बरसिंगची दहशत जाणवते, कधी राहुल देव बर्मनचे "पार्श्वसंगीत" ऐकू येते तर कधी वीरु व जय यांच्यातील नाणेफेकीचे नाणे पडल्याचा भास होतो....

एकाद्या चित्रपटाचे खणखणीत यश म्हणतात ते हेच असते. ते चित्रपटगृहाची वास्तू पाडली असली तरी ते जाणवते.

"शोले" हा सर्वकालीन सुपरहिट चित्रपट आहेच आहे हे सतत अधोरेखित होत असतेच. एक पारंपारिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट आपले अस्तित्व तब्बल पन्नास वर्ष दाखवतोय तर त्याचा निर्मिती खर्च किती आणि त्याने गल्ला पेटीवर

कमावले किती याचा हिशेब वा गोळाबेरीज ती काय करायची? चिल्लर गोष्ट.

"शोले" पडद्यावर आला तो "एकपडदा" चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्सचा काळ होता. पिक्चर पाह्यला थेटरातच जावे लागे (ही तेव्हाची भाषा), त्या काळात चित्रपटाला फक्त दोन गोष्टींची म्हटलं तर स्पर्धा होती. "दूरदर्शन" वर शनिवारी संध्याकाळी दाखवला जाणारा मराठी चित्रपट व रविवारी दाखवला जाणारा हिंदी चित्रपट. "शोले" मुंबईत प्रदर्शित होईपर्यंत (अर्थात १५ ऑगस्ट १९७५) मुंबई व काही शहरात दूरचित्रवाणी संच येवून जेमतेम तीन वर्षही झाली नव्हती. २ ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबईत दूरचित्रवाणी हे माध्यम आले आणि ते राज्यातील अनेक भागांत पोहचायला बराच वेळ लागला. "शोले" च्या समांतर कोणत्या गोष्टी होत्या व घडल्या हेदेखील त्याच्या यशात महत्वाच्या आहेत.

मुंबईत प्रदर्शित झालेला "शोले" त्यानंतर दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद येथे २२ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला. त्यानंतर पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात वगैरे वगैरे ठिकाणी आणि ग्रामीण भागात टप्प्याटप्प्याने अथवा काही आठवड्यांच्या अंतराने प्रदर्शित होत होत गेला. त्या काळात चित्रपटाच्या प्रिन्ट असत आणि त्या शहरांतून ग्रामीण भागातील चित्रपटगृहात प्रदर्शित होत जात. मोठाच प्रवास होता तो. "शोले" ने अनेक शहरात पंचवीस वा पन्नास आठवड्यांचा मुक्काम केल्याने त्या प्रिन्ट जणू त्या चित्रपटगृहात वस्तीला होत्या. अशाच एकाद्या चित्रपटगृहातील प्रोजेक्शन ऑपरेटरच्याही "शोले" च्या काही आठवणी असतीलच.

आपल्या देशात १९८२ साली रंगीत दूरदर्शन व व्हिडिओचे आगमन झाले. "शोले"ची व्हिडिओ कॅसेट आली. मला आठवतय, मुंबईत एक दिवस दहा रुपये

भाडे असा त्या व्हिडिओ कॅसेटचा भाव होता. त्यात अन्य चित्रपटांपेक्षा "शोले" ला भारी मागणी. पण व्हीसीआरवर कॅसेट लावून छोट्या पडद्यावर "शोले" पाहणे म्हणजे रात्री उरलेला भात दुसऱ्या दिवशी कांदा भात करुन खाण्यासारखा होता. पोट भरतं इतकेच. मोठ्या पडद्यावरची सर नाही.

नव्वदच्या दशकात उपग्रह वाहिन्यांचे आगमन झाले. मनोरंजन उपग्रह वाहिनीवर "शोले"त रंगत येत असतानाच जाहिराती येत. अमजद खान गब्बरसिंगच्या रुपात बिस्कीटाची जाहिरात करताना दिसू लागला. बसंतीच्या रुपातील हेमा मालिनीही अशाच कोणत्या तरी जाहिरातीत दिसायची. "शोले" पाहताना अडथळा कसा सहन करायचा?

नवीन दशकाची सुरुवात झाली. तोपर्यंत उपग्रह वाहिनीवर कितीदा "शोले" पाह्यला मिळाला याची गणतीच नाही. मात्र एक गोष्ट झाली,

दूरचित्रवाणी संचाचा अनेक इंचांनी वाढत वाढत जाणारा आकार "शोले" आजही मोठाच चित्रपट आहे हे "दाखवत" होते. लॅपटॉपवर "शोले" पाह्यला मिळाला. माध्यमे बदलत राहिली त्यासह "शोले" चालत चालत राहिला हे यश मोजूच शकत नाही. मल्टीप्लेक्स युगात तो आला.

"शोले"वर आधुनिक तंत्रज्ञानाने संस्कार करुन तो त्रीमिती (अर्थात थ्री डी) करण्यात आला व ३ जानेवारी २०१४ या पहिल्याच शुक्रवारी प्रदर्शित करण्यात आला. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी जुहू येथील पीव्हीआर मल्टीप्लेक्स मध्ये दाखवला. त्रीमितीचा चष्म्यातून "शोले" पाहिला. "देमार घेमार" दृश्यात रंगत आली. एव्हाना चित्रपट रसिकांची बरीच पुढची पिढी आली होती. त्यांनी थ्री डी शोले ही पर्वणीच होती. थ्री डी शोले जगभरातील

अनेक देशांत प्रदर्शित झाला. हा प्रवास कौतुकास्पद. मोजता न येणारा. मोजूच नये असाच.

हाच प्रवास आता यू ट्यूबवर आलाय. त्यावर "शोले"ची शीर्षक पाहिली तरी थरारुन जायला होते. "शोले" कुठूनही पहावा, कधीही पहावा, कितीही पहावा, कितीही वेळा पहावा तोच थरारक अनुभव. अर्थात "शोले" न आवडलेले (हा चित्रपटच नाही असेही म्हणणारे) प्रेक्षक आहेत. "शोले"ची पाळेमुळे कोणत्या हिंदी (अर्थात राज खोसला दिग्दर्शित "मेरा

गाव मेरा देश") वा विदेशी ("सेव्हन समुराई") चित्रपटात सापडतात असे सांगून "शोले" चे महत्व कमी करु पाहणारेही अनेक आहेत. ते "शोले"चे खणखणीत यश थोपवू शकले नाहीत.

मिनर्व्हातच "शोले" ने कडक विक्रम केला.

मुंबई शहरात मिनर्व्हा व न्यू एक्सलसियर या दोन चित्रपटगृहात सत्तर एमएमचा भव्य दिमाखदार पडदा व नृत्य साऊंड असा प्रदर्शित झाला. तत्पूर्वी पांछी दिग्दर्शित "अराऊंड द वर्ल्ड" (१९६७) हा आपल्याकडचा पहिला "सत्तर एमएम"चा चित्रपट प्रदर्शित झाला होता. पण त्याला अजिबात यश प्राप्त झाले नाही. चित्रपटाच्या जगात अपयशाच्या कथा होत नाहीत. मुंबईत अन्य चित्रपटगृहात पस्तीस एमएम स्वरुपात "शोले" प्रदर्शित झाला. मिनर्व्हात "शोले" साठी "अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे" आणि "बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे" असे तिकीट

दर होते. तोपर्यंतचा हा चित्रपटगृहातील तिकीटांचा वाढलेला दर. याच मिनर्व्हात तोपर्यंत स्टॉल दोन रुपये वीस पैसे, अप्पर स्टॉल तीन रुपये तीस पैसे व बाल्कनी चार रुपये चाळीस पैसे असे तिकीट दर होते. अगदी जवळच्याच अप्सरा व नॉव्हेल्टी या चित्रपटगृहातही हेच दर होते. (आता तुम्हाला "मिनर्व्हा" मध्ये "स्टॉल्स"ची तिकिटे नव्हतीच का? असा प्रश्न पडला असेल. "येस!" इथे "स्टॉल" हा भाग नव्हताच. का? तर... "मिनर्व्हा"चा तो नव्याने बनविलेला "स्क्रीन" हा "अर्धवर्तुळाकार" असा भव्य होता! आधी "स्टॉलसाठी" पुढच्या काही रांगा ठेवायचे ठरलेले, परंतु पहिल्या पाच रांगांतून हा चित्रपट पाहणे एकंदर कठीणच होते. तिथून उजवीकडच्या किंवा डावीकडच्या सीटवरून तो सिनेमा पाहताना... पात्रांचे खांदे तर चक्क वाकडे दिसत. म्हणून पहिल्या चारच दिवसात पहिले पाच

"रो" बंद करण्यात आले. म्हणून इथे तिकिटासाठी "अप्पर स्टॉल" व "बाल्कनी" अशी दोनच "ऑप्शन्स" होती.) तात्पर्य स्टॉलची जागा भरली जात नसे. मिनर्व्हाची एकूण आसन क्षमता १४९९ खुर्च्या अशी भारी होती. हाऊसफुल्ल गर्दीत "शोले" पाहणे कमालीचे थ्रीलींगफुल्ल वा रोमांचक अनुभव असे. पन्नास व साठच्या दशकात जन्माला आलेल्या चित्रपट रसिकांना तो लाभ झाला. दक्षिण मुंबईतील चित्रपट रसिकांनी तर झालेच पण मुंबईतील चित्रपट रसिकांनीही काही आठवड्यानंतर (आणि आपल्या भागातील चित्रपटगृहात एक दोनदा पाहूनही पुन्हा एकदा) मिनर्व्हात "शोले" पाहिला. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागातील नातेवाईक सुट्टीत मुंबईत आल्यावर त्या पाहुण्यानाही मुंबई दर्शनात मिनर्व्हात "शोले" दाखवला जाई अशी त्या दिवसात सामाजिक सांस्कृतिक प्रथा होती. हे यश कसे मोजायचे? एकाद्या

चित्रपटाने किती कोटी कमावले ही झाली कार्पोरेट आकडेवारी. त्यातील आकडे किती खरे नि कसे खोटे हे सांगता येणे अवघड. त्यापेक्षा एकाद्या चित्रपटाने समाज कसा ढवळून काढला हे यश मोठेच. मिनर्व्हावर कधीही चक्कर मारावी तर आगाऊ तिकीट विक्रीला भली मोठी रांग असणार हे ठरलेलेच. मिनर्व्हावरचे "शोले" चे डेकोरेशनदेखिल पाहण्यासारखे होते. त्या काळातील दक्षिण मुंबईतील सिंगल स्क्रीन थिएटर्सवरची डेकोरेशन हा एक वेगळाच रंजक विषय.

"शोले" मिनर्व्हात दिवसा तीन खेळ याप्रमाणे १५ ऑगस्ट १९७५ ते ३१ ऑगस्ट १९७८ या काळात होता. मग मिनर्व्हातच तो मॅटीनी शोला प्रदर्शित झाला आणि आणखीन दोन वर्ष, असा एकूण पाच वर्ष मिनर्व्हात "शोले " होता. हा एकूणच प्रवास २८६ आठवडे असा आहे. (मिनर्व्हात १ सप्टेंबर १९७८ रोजी

प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित "आझाद " आणि त्यानंतर आणखीन काही चित्रपट प्रदर्शित होत राहिले.)

आठवड्याच्या हिशोबात यशराज फिल्म निर्मित व आदित्य चोप्रा दिग्दर्शित "दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे" (१९९५) या चित्रपटाने विक्रम मोडला आणि आजही दक्षिण मध्य मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात तो मॅटीनी शोला सुरु आहे ही गोष्ट वेगळी.



मुंबईत "शोले"ने दादर येथील शारदा चित्रपटगृह येथे सलग पंचवीस आठवडे तर चेंबूरच्या नेपच्यून चित्रपटगृहात सलग सव्वीस आठवडे असा रौप्य महोत्सवी आठवड्यांचा मुक्काम केला. देशातील अनेक शहरात "शोले" ने असेच घवघवीत यश संपादन केले. त्यातील काही नावे सांगायलाच हवीत. "शोले" च्या मूळ पस्तीस एमएमवरुन सत्तर एमएमच्या काही मोजक्याच प्रिन्टस या लंडनहून तयार करून आणल्या. त्यातील पुणे शहरातील नटराज चित्रपटगृह (मुक्काम ऐंशी आठवडे), बडोदा येथील अलंकार चित्रपटगृह (मुक्काम बावन्न आठवडे), अहमदाबादचे रुपाली चित्रपटगृह (मुक्काम बासष्ट आठवडे) येथे "शोले" सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा होता. "शोले" ने पस्तीस एमएम प्रिन्टवर मुंबईतील शारदा व नेपच्यून या चित्रपटगृहाप्रमाणे आणखीन अनेक

चित्रपटगृहात असेच यश प्राप्त केले. सदासुख (सांगली. तीस आठवडे), मीना (सोलापूर. पन्नास आठवडे), अपोलो (पुणे. बावन्न आठवडे), उषा (कोल्हापूर. पन्नास आठवडे), राधिका (सातारा. पंचवीस आठवडे), भाग्यरेखा (इचलकरंजी. पंचवीस आठवडे), मोहन (मालेगाव. पंचवीस आठवडे), अरुण (पंढरपूर. पंचवीस आठवडे), पॅलेस (भावनगर. एकतीस आठवडे), जयहिंद (भूज. पंचवीस आठवडे), रुपम (सुरत. बावन्न आठवडे), अंजंठा (हुबळी. पन्नास आठवडे), रेक्स (बेळगाव. चव्वेचाळीस आठवडे), गॅलॅक्सी (राजकोट. बावन्न आठवडे.), अलंकार (बिजापूर. पंचवीस आठवडे), गॅलॅक्सी (जामनगर. सत्तावीस आठवडे) .... ही हिट लिस्ट अशीच वाढत वाढत वाढत वाढत जातेय. कुठे पन्नास, कुठे पंचवीस तर कुठे पंधरा आठवडे असा "शोले" ने खणखणीत मुक्काम केला. अगदी विदेशातही "शोले" प्रदर्शित

झाला. कुठे स्थानिक भाषेत डब करुन तो प्रदर्शित झाला. इस्रायलला हिब्रू भाषेत डब करण्यात येवून प्रदर्शित झाला. हे यशच!

बरं, हाच " शोले" त्यानंतर रिपीट रनला म्हणजे पुन्हा पुन्हा प्रदर्शितही झाला. खुद्द मिनर्व्हात ऐंशीच्या दशकात पुन्हा थिएटर डेकोरेशन करीत "शोले" प्रदर्शित झाला आणि फर्स्ट शोपासूनच हाऊसफुल्ल.

सांगा हे यश कसे हो मोजणार? चित्रपटाचे यशापयश मोजायचेच नसते. त्याचा प्रभाव किती नि कसा जाणवतो यात त्याचे खरे यश असते. जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" चे तर आहेच आहे..."शोले"च्याच बरोबर मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी आर. के. मिधा दिग्दर्शित "गरीबी हटावो" हा छोटा चित्रपट प्रदर्शित झाला. मुंबईत मेन थिएटर शालिमारला मॅटीनी शोला तो होता. या चित्रपटात राजवंश नावाचा नवा हिरो होता. जोडीला

पद्मा खन्ना, मुराद वगैरे होते. हा खरं तर १९७३ साली सेन्सॉर संमत झालेला चित्रपट. पण रखडत रखडत आला प्रदर्शित झाला, त्याचं "शोले"समोर अस्तित्वही जाणवलं नाही. याउलट मुंबईत अलंकार (मॅटीनी शो), एडवर्ड इत्यादी अनेक चित्रपटगृहात ३० मे १९७५ रोजी प्रदर्शित झालेल्या सतराम रोहरा दिग्दर्शित "जय संतोषी मा " ची जबरदस्त वाटचाल "शोले" च्या यशाच्या वादळातही टिकून राहिली. या तीनही चित्रपटांच्या तारखेनुसार वृत्तपत्रीय जाहिराती माझ्या कलेक्शनमध्ये असून त्या पाहताना मन फ्लॅशबॅकमध्ये जाते...

"शोले" आणि बरेच काही म्हणतात ते हेच.

© दिलीप ठाकूर
(तारांगण, ऑगस्ट २०२५ वरुन साभार)

♥

लेख क्रमांक : ९

"शोले " @५० वर्ष
स्पर्धेत टिकले कोण? गळपटले कोण?

एकादं पिक्चर एकदम भारी सुपरहिट ठरते तेव्हा त्याच्या तडाख्यातून वाचणे अनेक चित्रपटांना अवघड जाते. चित्रपट रसिक त्याच हाऊसफुल्ल गर्दीतील पिक्चरकडे धावतात.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले"(१९७५) च्या जणू चक्रीवादळासारख्या यशात कोणते चित्रपट तगले आणि कोणते गळपटले यावर "फोकस" हवाच.

शोलेची देश विदेशात पन्नास वर्ष साजरी होत असताना तर ही गोष्ट जास्त महत्वाची.

१९७५ हे मराठी व हिंदी चित्रपटासाठीचे अतिशय महत्वाचे वर्ष. इतके की, हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीवर "फोकस" टाकताना "शोले" पूर्वीचा व नंतरचा चित्रपट अशी विभागणी होते. अभ्यास केला जातो. तपशील दिले जातात. तात्पर्य, "शोले" हा ट्रेण्ड सेटर चित्रपट. सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रावर विलक्षण प्रभाव टाकलेला चित्रपट आहे.

"शोले" मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला हे वेगळे सांगायलाच नको. ते नाते घट्ट आहे. (तर दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद येथे २२ ऑगस्ट १९७५ रोजी आणि मग त्यानंतर अन्य शहरात, राज्यात टप्प्याटप्प्याने म्हणजेच तेव्हाच्या पध्दतीनुसार प्रदर्शित झाला). मुंबईत शोलेच्या स्पर्धेत

म्हणजेच त्याच शुक्रवारी आर. के. मिथा दिग्दर्शित "गरीबी हटाव" हा अगदीच नगण्य चित्रपट प्रदर्शित झाला. मला आठवतय ग्रॅन्ड रोडच्या शालिमार चित्रपटगृहात मॅटीनी शोला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची तशी कोठेच नोंद नाही. आता "यू ट्यूब" मुळे तो सामोरा येतोय, इतकंच! १९७३ साली सेन्सॉर संमत झालेला हा चित्रपट प्रदर्शित झाला एवढेच मात्र मात्र विशेष! या चित्रपटात राजवंश नावाचा कोणी नवा चेहरा होता. अशा "फ्लॉप" चित्रपटांची कोणीच दखल घेत नाहीत. बरं घ्यायची तरी का?

शोले प्रदर्शित होईपर्यंत १९७५ साली गल्ला पेटीवर (अर्थात "बॉक्स ऑफिस"वर) अतिशय उत्तम जम बसवलेले चित्रपट असे, गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" (मुंबईत प्रदर्शित २४ जानेवारी) याचा मिनर्व्हात रौप्य महोत्सवी आठवडा झाल्यावर तो मेट्रो चित्रपटगृहात शिफ्ट करण्यात

आला. "दीवार" चा दबदबा आजही कायम आहेच म्हणा. (एक आठवण अधोरेखित करण्यासारखी नक्कीच आहे. तुम्हाला पूर्णतः माहितच आहे.. तसं पहायला गेलं तर.. "शोले" या चित्रपटात.. "अमिताभ" हा एक मुख्य अभिनेता नव्हे.. तर तो चक्क "सहनायक" होता! कारण "धर्मेंद्र आणि हेमा" हेच या चित्रपटात "नायक-नायिका" अशा भूमिकां मध्ये होते! त्या काळात.. (आमच्या पिढीतील कुणीही छातीठोकपणे सांगेल..) "राजेश खन्ना" हेच नाव "सुपरस्टार" म्हणून "वलयांकित" होते! पण "अमिताभचे" सुदैव पहा!.. १९७४-७५ या वर्षभरात.. अमिताभ याने 'दीवार', 'चुपके चुपके', 'फकीरा' आणि 'मिली' यांसारख्या अनेक हिट चित्रपटांमधून एकूणच अतिशय चांगला अभिनय करून.. त्याने त्याचे नाव वलयांकित केले होते! यामुळेच तेव्हा तो बॉलिवूडमधील एक प्रमुख स्टार बनला होता, हेच

सत्य! त्याचे हे चित्रपट त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचे ठरले आणि त्यांनी त्याला प्रेक्षकांच्या मनात



एक वेगळेच स्थान मिळवून दिले होते. यामुळे झालं काय? "शोले"च्या कलावंताची "श्रेयनामावली" बनविताना.. "अमिताभला" सहनायक म्हणून दुय्यम स्थान देणे निर्मात्यांना अयोग्य वाटले होते. मग त्यांनी यात एक "गेम" खेळला! हे नक्कीच! त्यांनी या चित्रपटातील कलावंतांची, थिएटर बाहेरच्या मुख्य "पोस्टरवर" नावं देताना.. ती चक्क "अल्फाबेटिकल" (म्हणजे "A To Z") या स्वरूपात सादर केली.. व्वा!

यामुळेच "अमिताभचे" नाव आपसुकच पहिले आले. त्यांची ही संकल्पना चांगलीच फळली. "मिनर्व्हा" वर लागलेल्या "पोस्टरवर" कलावंत म्हणून अभिनेता "अमिताभला" पहिले स्थान मिळाले.. ही गोष्ट.. आमच्या पिढीच्या चांगलेच लक्षात आले होते! "पब्लिसिटी फंडा" आणखी काय???)

(एक गंमत सांगायची तर.. (१९६० या साली जन्मलेली..) आमची "पिढी" १९७५ साली एस. एस. सी. (पहिली बॅच..) पास झाली! ओके! पण मित्रांनो.. आम्ही १९८० साली "स्नातक" पदवीधारक (Graduate) झालो तरीही "शोले" मात्र तिथेच होता.. "मिनर्व्हा" मध्ये!)

"दीवार"नंतर प्रदर्शित झालेल्या महत्वाच्या चित्रपटात गुलजार दिग्दर्शित "आंधी" व रामदास फुटाणे निर्मित डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित "सामना" (दोन्ही १४ फेब्रुवारी), शक्ती सामंता दिग्दर्शित

"अमानुष" व रवि चोप्रा दिग्दर्शित "जमीर" (दोन्ही २१ मार्च), हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "चुपके चुपके" (११ एप्रिल), के. एस. सेतूभमाधवन "ज्युली" (१८ एप्रिल), ब्रीज दिग्दर्शित "चोरी मेरा काम" (२ मे), फिरोज खान दिग्दर्शित "धर्मात्मा" व दादा कोंडके दिग्दर्शित "पांडू हवालदार" (दोन्ही ९ मे), रवि टंडन दिग्दर्शित "खेल खेल मे" (१६ मे), मनोहर नाथ दिग्दर्शित "जान हाजिर है" (२३ मे), सतराम रोहरा दिग्दर्शित "जय संतोषी मा" (३० मे), नरेशकुमार दिग्दर्शित "दो जासूस" (६ जून), गुलजार दिग्दर्शित "खुशबू" (२० जून), हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "मिली" (२० जून), प्रयाग राज दिग्दर्शित "पोंगा पंडित" व राजा ठाकूर दिग्दर्शित "जखमी" (दोन्ही १ ऑगस्ट), यांनी चांगलीच वाटचाल सुरु ठेवली. तर याच वेळेस ए. सुब्बा राव दिग्दर्शित "सुनहरा संसार" (२१ फेब्रुवारी), दिनेश रमणेश दिग्दर्शित "रफ्तार" (१४

फेब्रुवारी) , राज खोसला दिग्दर्शित "प्रेम कहानी" (७ मार्च), रवि टंडन दिग्दर्शित "अपने रंग हजार" (२५ एप्रिल), होमी वाडिया दिग्दर्शित "तुफान और बिजली" (१६ मे), एस. एस. बालन दिग्दर्शित "एक गाव की कहानी" (१३ जून), रामसे बंधु दिग्दर्शित "अंधेरा" (१ ऑगस्ट),

ए. सलाम दिग्दर्शित "आखरी डाव" (८ ऑगस्ट) अशा अनेक चित्रपटांना रसिकांनी नाकारले. सगळेच चित्रपट यशस्वी कसे हो ठरतील?

(मित्रांनो.. एकीकडे "मिनर्व्हा" मध्ये "शोले" दणक्यात चालत असताना आमच्या मते, कुणी पोळी भाजून घेतली असेल?

१. रणजीत बुधकर यांनी "भगवानदादांचा" मस्त "अलबेला!" (१९५१) या सिनेमाचे "हक्क" घेऊन तो सिनेमा "मराठा मंदिर" मध्ये नव्याने प्रदर्शित केला.. तो जबरदस्त गाजला!

२. "बेशरम" नावाचा "अमिताभ" अभिनित..

"देवेन वर्मा" दिग्दर्शित एक "अतिसामान्य" सिनेमा प्रदर्शित झाला होता..! (बाप रे!!!)

गंमत म्हणजे.. या दोन्ही सिनेमांनी मस्तच "गल्ला" जमवला? का? कारण ज्या चित्रपट रसिकांना "मिनर्व्हा" मधल्या "शोले"ची तिकिटे अनेक प्रयत्नाअंतीही मिळत नव्हती ना तेव्हा ते "सिनेमवेडे" या जवळपासच्या चित्रपटांकडे वळत असत! (खरंतर ही यादी खूपच मोठी आहे.) "मोठ्या अशा "वटवृक्षाखाली" कोणतीही वनस्पती तग धरत नसते.." ही "फिलॉसॉफी" इथे काहीच कामाची नसते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे.

शोले प्रदर्शित होत असताना वातावरण सर्वसाधारण असेच होते. देशात २५ जून रोजी आणीबाणी लागू झाली होती. सामना, आंधी या

चित्रपटांचे प्रदर्शन रोखले होते. शोले प्रदर्शित होत असताना रुपेरी पडद्यावर एक भारी वादळ येतेय असे वरकरणी वाटत तर नव्हते. अर्थात वादळ सांगून येत नाही. चित्रपटाच्या बाबतीत तर नवीन चित्रपटाचा शुक्रवारचा फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट त्या चित्रपटाचे व्यावसायिक यशापयश स्पष्ट करते (ही दीर्घकालीन हुकमी परंपरा. कार्पोरेट युगात प्रत्येक दिवशी किती कोटी कमावले यावर यशापयश कसे बरे ठरते? केवळ आकडेवारीनुसार? ते आकडे खरेच असतात का? पडद्यावर सिनेमा सुरु असताना समोर मोजकेच प्रेक्षक तर असतात. तरी सुपरहिट म्हणे! पडद्यावर पिक्चर सुरु असतानाच पब्लिकमधून मनसोक्त मनमुराद टाळ्या शिट्ट्या म्हणजे पिक्चर एकदम भन्नाट सुपरहिट.) शोले प्रदर्शित होतेय तोच पडला पडला अशीच हवा होती. पण पब्लिकच्या मनात

काही वेगळेच होते. त्यांना शोले असा व इतका आवडला, आणि मग असा व इतका डोक्यात व डोक्यावर घेतला की आजही त्याची भन्नाट क्रेझ कायम आहे. त्यावर अजून चर्चा होतेय.

"शोले" प्रदर्शित झाल्यावर पुढच्याच शुक्रवारी रवि नगाईच दिग्दर्शित "रानी और लालपरी" प्रदर्शित झाला. हा "फॅण्टसी" चित्रपट रसिकांना अजिबात आवडला नाही. त्यानंतर श्याम बेनेगल दिग्दर्शित "निशांत" (५ सप्टेंबर), फिरोज खान दिग्दर्शित "काला सोना" (१९ सप्टेंबर), हिरेन नाग दिग्दर्शित "गीत गाता चल" (१६ ऑक्टोबर), दुलाल गुहा दिग्दर्शित "प्रतिज्ञा" (३१ ऑक्टोबर), सोहनलाल कंवर दिग्दर्शित "संन्यासी" (५ डिसेंबर), रणधीर कपूर दिग्दर्शित "धरम करम" (१२ डिसेंबर), या चित्रपटांचा "शोले"च्या चक्रीवादळात बऱ्यापैकी निभाव लागला. टिकून राहिले. तर सी. व्ही. राजेंद्रन

दिग्दर्शित "दुल्हन" (१६ ऑक्टोबर), कुमार दिग्दर्शित "मजाक" (५ डिसेंबर) हे चित्रपट गळपटले. आणखीन काही

चित्रपटांचा शोलेमय वातावरणात निभाव लागला नाही. राजश्री प्रॉडक्शन्सच्या वितरण विभागाने "गीत गाता चल" मुंबईत एकमेव चित्रपटगृह मेट्रोत प्रदर्शित केला. आणि तेथे सुपरहिट ठरल्यावर दहा आठवड्या नंतर त्याची चित्रपटगृहे वाढवली...तर प्रत्येक सोमवारी मिनर्व्हा चित्रपटगृहावर आगाऊ तिकीट विक्रीसाठी हमखास लांबलचक रांग आणि कधीही पहावे तर आठवडाभरातील सगळेच्या सगळे चित्रपट हाऊसफुल्ल. या स्पर्धेत जे टिकले ते महत्वाचे.

शोलेच्या स्पर्धेत टिच्चून वाटचाल केली ती "जय संतोषी मा" या सामाजिक पौराणिक चित्रपटाने. शोले प्रदर्शित होईपर्यंत त्याचा चांगलाच जम बसला होता

आणि "शोले" च्या चक्रीवादळातही तो असा काही टिकून राहिला की आज पन्नास वर्षांनंतरही शोलेच्या यशाची तुलना "जय संतोषी मा" या चित्रपटाशी होते. एकिकडे प्रचंड हिंसक सूडकथा तर दुसरीकडे भाबडे कथानक. शोलेचे तरुणाईला विलक्षण आकर्षण होते तर "संतोषी माता" महिला वर्गात अफाट लोकप्रिय ठरली. "अलंकार" चित्रपटगृहात जाताना "महिला" आपली पादत्राणे बाहेर काढून चित्रपट बघायला आत जात असत. या महिलावर्गाने तर दर शुक्रवारी "संतोषी माता" व्रत करायला सुरुवात केली. (आंबट

खाणे वर्ज्य! "गुळ चण्यांचा" नैवेद्य..! वगैरे वगैरे!) अनेक ठिकाणी "संतोषी मातेचे मंदिर" उभारले गेले. इतके असूनही या दोन्ही चित्रपटांबाबत मोठ्याच प्रमाणावर कथा, दंतकथा, गोष्टी, अफवा केवढ्या तरी पसरल्या आणि आज पन्नास वर्षांनंतरही डिजिटल मिडियात रंगवून खुलवून मसालेदार मनोरंजक पध्दतीने सांगितल्या जातात.

"शोले"च्या स्पर्धेतील वेगळा व महत्वाचा चित्रपट श्याम बेनेगल दिग्दर्शित "निशांत". सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटात समांतर अथवा

नवप्रवाहातील चित्रपट चळवळ रुजण्यातील हा एक अतिशय महत्वाचा बुध्दीवादी चित्रपट! या चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग वेगळा होता. शोलेच्या स्पर्धेत हा चित्रपट अतिशय सावकाश पण निश्चित आपल्या संथगतीने वाटचाल करत करत मार्गक्रमण करत होता. ते मसालेदार मनोरंजक चित्रपटांचे हुकमी दिवस होते. प्रयोगशीलता अभावानेच होत होती. म्हणूनच निशांत महत्वाचा. तात्पर्य, शोलेच्या यशाच्या चक्रीवादळात "जय संतोषी मा" व "निशांत" हे दोन भिन्न स्वरुपातील चित्रपट विशेष उल्लेखनीय!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती १२ जुलै २०२५
♥



<u>लेख क्रमांक : १0</u>

<u>"शान" ला "शोले" चा फटका बसला? होय शंभर टक्के !</u>

प्रत्येक चित्रपटाचे आपले एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते हे बौद्धिक मास अपीलच्या गणितात चूक ठरते.

उत्तम उदाहरण, " शान" चित्रपट!

"शोले " च्या अफाट/ अचाट/ गडगडाटी/ चौफेर यशानंतरचा दिग्दर्शक रमेश सिप्पीचा पुढचा चित्रपट कोणता बरे असेल? याची केवढी तरी

विलक्षण उत्सुकता होती. (काही वर्षांपूर्वी.. बाहुबलीने "कटाप्पा" को क्यों मारा?.. यापेक्षाही ही जास्त उत्सुकता होती, असे म्हणायला हरकत नाही.) चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि त्या काळातील प्रसार माध्यमातून याच प्रश्नाचा जणू शोध घेतला जात होता. एक चित्रपट प्रचंड हिट ठरतो तेव्हा त्याच दिग्दर्शकाचा पुढचा चित्रपट कोणता याचे कुतूहल असण्याचे ते दिवस होते. १९७८ चे ते दिवस आणि अशातच एके दिवशी स्क्रीन साप्ताहिकात बातमी आली, जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित " शान " चित्रपटाची घोषणा. (त्या काळात आपल्या नवीन चित्रपटाची स्क्रीन साप्ताहिकात पहिली बातमी येणे प्रतिष्ठेचे मानले जात असे).

"शान " नावच भारी वाटलं.

चित्रपटाची पटकथा व संवाद सलिम जावेद यांचे! "शोले" मध्ये धर्मेंद्र, अमिताभ, हेमा मालिनी,



संजीवकुमार व अमिताभ बच्चन हे पुन्हा "शान" मध्ये. तसेच या चित्रपटात विनोद खन्ना, राखी, परवीन बाबी, जॉनी वॉकर व कुलभूषण खरबंदा! रमेश सिप्पीने एक वेगळाच सेटअप जुळवून आणलाय असे आम्हा चित्रपट रसिकांचे मत ठरले. माझे हे महाविद्यालयीन वय. गावदेवी गिरगावातील भवन्स कॉलेजमधील कॅन्टीनमध्ये आम्ही मित्र चकाट्या पिटत असताना वाद घालण्यासाठी आमचे हुकमी विषय असत.. राजेश खन्ना श्रेष्ठ की अमिताभ बच्चन, "शोले"ची भन्नाट क्रेझ कितपत योग्य, सुनील

गावसकरची शैलीदार फलंदाजी व कपिल देवची भेदक गोलंदाजी. आणि अशातच दोन कप चाय चार ग्लासात करुन येईपर्यंत "शान" वर आम्ही बोलत असतानाच समजले. चित्रपटाच्या पहिल्या गाण्याचेही रेकॉर्डिंग झाले. आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत. त्या काळात अशा लहान मोठ्या गोष्टींच्या बातम्या होत होत चित्रपट आपल्यापर्यंत पोहचत असे. (आजच्यासारखे चित्रपट पडद्यावर येण्यास सज्ज झाल्यावर पूर्वप्रसिध्दी सुरु होत नसे.) अशातच बातमी आली, काही कारणास्तव धर्मेंद्र "शान" मधून बाहेर आणि तो बाहेर म्हणून हेमा मालिनीनेही चित्रपट सोडला. का बरे? गॉसिप्स मॅगझिनमधून आले, रमेश सिप्पी आता अमिताभला महत्व देताहेत. "शोले" च्या मुहूर्तापर्यंत अमिताभच्या खात्यात फक्त "जंजीर" (११ मे १९७३) चे यश होते. "शान" ची कास्टिंग होत असताना अमिताभची

पब्लिकमध्ये जबरदस्त क्रेझ होती. सलिम जावेद अमिताभचं व्यक्तिमत्व, त्याची अभिनय क्षमता, अॅन्ग्री यंग मॅनची त्यांनीच दिलेली इमेज व लोकप्रियता हे डोव्यासमोर ठेवून काम करतात असा आरोप होत होताच. (तरी देश मुखर्जी दिग्दर्शित "इमान धरम" पडद्यावर आला तोच "फ्लॉप"!). तेवढ्यात बातमी आली, संजीवकुमारला "शान" मधला शाकाल रंगवण्यात रस आहे. रमेश सिप्पीचा त्यावर नकार असल्यानेच संजीवकुमार चित्रपटातून बाहेर पडला. विनोद खन्ना अन्य चित्रपटात बिझी होता. चित्रपट सेटवर जाण्यापूर्वी अशा गोष्टी अनेकदा होतात.

रमेश सिप्पीनी हे कलाकार निवडीचे कोडे सोडवायला सुरुवात केली. संजीवकुमारच्या जागी सुनील दत्त आला. धर्मेंद्र व हेमा मालिनी या जोडीची भूमिका अमिताभ व परवीन बाबी यांना दिली. आणि मूळ यांच्या असलेल्या भूमिका शशी कपूर व बिंदीया

गोस्वामी यांना दिल्या. विनोद खन्नाच्या जागी शत्रुघ्न सिन्हा आला. त्याचे सेटवर उशीरा येण्या जाण्यास रमेश सिप्पी कंटाळून गेल्याने त्याच्या जागी नसिरुद्दीन शाह येणार अशी एक आश्चर्यकारक बातमी होती. त्या काळात तो समांतर चित्रपटात जास्तच मुरला होता. एकदा अमिताभ बच्चनने कपिल शर्मा शोमध्ये शत्रुघ्न सिन्हाच्या समोरच सांगितले, आम्ही एकत्र काम करत असतानाच सकाळपासून दक्षिण मुंबईत एका चित्रपटाच्या सेटवर एकत्र काम करुन दुपारी आमच्याच आणखीन एका चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी उपनगरातील स्टुडिओत जायला निघाल्यावर मी पोहचलो तरी शत्रूजी दोन तास उशीरा येत. असे का होत असे हे समजायचे नाही. शत्रुघ्न सिन्हाने त्याला दादही दिली. १९८० साली अमिताभ व शत्रुघ्न सिन्हा जोडीचे शान व राज खोसला दिग्दर्शित "दोस्ताना" हे दोन चित्रपट पडद्यावर आले.

अन्य भूमिकेत हेलन, सुधीर, पद्मिनी कपिला, विजू खोटे आले. आणखीन एक नवीन नाव आले, मजहर खान. (तत्पूर्वी त्याने भूमिका साकारलेला "संपर्क" नावाचा चित्रपट कधी येवून गेला हे समजलेच नाही.) "शोले"त अमजद खान तसा "शान" मध्ये मझहर खान असा आम्ही सर्वसामान्य चित्रपट रसिकांनी संबंध जोडला. "शोले" चा पगडाच असा जबरदस्त होता. मिनर्व्हात शोले हाऊसफुल्ल गर्दीत विक्रमी वाटचाल करीत असतानाच "शान" ची निर्मिती आकार घेत होती.

"शान" च्या चित्रीकरण काळात चित्रपट विषयक साप्ताहिकात प्रसिद्ध होत असलेले फोटो पाहताना त्यात शहरीकरण जास्त दिसत होते ("शोले" रामगढ या गावात घडणारी गोष्ट याच्याशी कळत नकळत तुलना होत होती.)

"शान" पूर्ण होत असतानाच त्याच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाली. "प्यार करनेवाले प्यार करते है शानसे.. " हे खास आशा भोसले व आर. डी. बर्मन कॉम्बिनेशनचे पाश्चात्य ढंगाचे गाणे ऐकता ऐकताच लोकप्रिय झाले. शानची इतरही गाणी रेडिओपासून लाऊडस्पीकरपर्यंत व्हाया इराणी हॉटेलमधील "ज्युक बॉक्स" अशी सगळीकडेच ऐकू येवू लागली. "शोले"च्या टीमचा चित्रपट असल्यानेच सगळे कसे आपोआपच जोरदार शोरदार झाले. खणखणीत यशाची ही जबरा पुण्याई.

"शान" च्या दणकेबाज पूर्वप्रसिध्दीतील एक गोष्ट ठळकपणे आठवतेय. "सहा कोटीचा महा मनोरंजक चित्रपट" ही त्याची "टॅगलाईन". त्या काळात सहा कोटी ही प्रचंड मोठी रक्कम. एवढा खर्च करण्यासारखे या चित्रपटात काय बरे असेल अशीही उत्सुकता ताणली गेली होती! पोस्टरभर

मोठ्या स्टार्सचे चेहरे आणि उत्तम दर्जाचा कागद हे ठळक वैशिष्ट्य! शाकालचा अड्डा, मगरीसोबतची अमिताभची मारहाण, "प्यार करनेवाले प्यार..." गाण्याचा चकाचक सेट्स, पाश्चात्य ढंगाची जबरदस्त ॲक्शन दृश्य याची केवढी तरी चर्चा! यातून थोडा थोडा चित्रपट "दिसत" होता. पण "शोले"ची सर येईल का अशी शंकाही मनात होती. आणि "शोले" पेक्षा काहीतरी "सॉलिड" पाह्यला मिळावे अशी अपेक्षाही होती. आणि त्यात काही चुकही नव्हती.

अखेर "शान" प्रदर्शित व्हायची तारीख जाहीर झाली, १२ डिसेंबर १९८०! मुंबईत मेन थिएटर "मिनर्व्हा"! पाच वर्षांचा मुक्काम करुन एव्हाना "शोले" उतरला असला तरी त्याचा सामाजिक सांस्कृतिक प्रभाव विलक्षण होता. (आज पन्नास वर्षांनंतरही तो आहे. तर मग पाच वर्षांनंतर म्हणजेच १९८० साली किती जबरदस्त असेल, माझ्या पिढीने

तो अनुभवलाय! चित्रपट संस्कृतीतील विविधतेबाबत माझी व माझ्या मागची पिढी अधिकच नशीबवान. त्या दोन तीन दशकात बरेच काही घडले..)

"शोले" प्रमाणेच "शान"ची वृत्तपत्रीय समीक्षा चित्रपट फारसा जमलेला नाही. सलिम जावेद यांची पटकथा विस्कळीत आहे. "शोले" चा दर्जा गाठलेला नाही अशी होती. (दरम्यान त्या काळातील काही समीक्षकांना "शोले"च्या अफाट लोकप्रियतेने अचंबित केले होते. आणि आता "लोकप्रियतेच्या दृष्टिकोनातून शोले "सरस" चित्रपट वाटत होता. यश असा बदल घडवत असते. चित्रपटाचा खलनायक मझहर खान नसून कुलभूषण खरबंदा आहे हा म्हटलं तर धक्काच! मझहर खान अब्दुल्ला या व्यक्तिरेखेत होता.

"शाकाल"च्या "गॅन्ग"ची निवड मात्र भारी होती. रुपेरी पडद्यावरील बदमाश वा कटकारस्थान

करणारे असे सुजीतकुमार, मॅकमोहन, सुधीर पांडे, दलिप ताहिल, माणिक इराणी, गोगा कपूर व शरद सक्सेना असे सातजण होते. कुलभूषण खरबंदाचा शाकाल अजिबात डेंजरस नव्हता. गब्बरसिंगचा धाक आजही जाणवतो. शाकाल आपल्या इलेक्ट्रॉनिक अड्ड्यात बसून लाल, पिवळी, हिरवी, निळी बटणे दाबतो यात फार थ्रील नव्हते. आणि हीच गोष्ट चित्रपटाच्या विरोधात गेली. कुलभूषण खरबंदा समांतर चित्रपटाकडून व्यावसायिक चित्रपटाकडे आलेला गुणी अभिनेता. पण "शान" ने सेटबॅक दिला. "शोले" जेवढा व जसा भारतीय चित्रपट तितकाच शान पाश्चात्य रंगढंगातील चित्रपट, हा बदल चित्रपट रसिकांना अजिबात रुचला नाही. "शोले"चा दिग्दर्शक आता काय दाखवतोय यासाठीच माझ्यासारख्याने "शान" पाहिला. ("सीता और गीता" ते "जमाना दीवाना" अशा रमेश सिप्पी

दिग्दर्शित चित्रपटात माझे अतिशय आवडते चित्रपट "शोले" व "सागर". केवढी तरी भिन्नता. पण त्यावर दिग्दर्शकाची विलक्षण पकड दिसते.)



"शान"ला फिल्म फेअरचा उत्कृष्ट छायाचित्रणकाराचा पुरस्कार एस. एम. अन्वर यांना प्राप्त झाला. सुरुवातीस "व्दारका दिवेचा" हेच या चित्रपटाचे छायाचित्रणकार होते. त्यांचे अचानक निधन झाल्यानंतर त्यांचे सहाय्यक एस. एम. अन्वर यांच्याकडे आलेली जबाबदारी त्यांची चोख बजावली. शोलेचेच संकलक एम.एस शिंदे हेच "शान" चेही

संकलक होते. त्यांनीही चोख कामगिरी केली. पण पटकथाच ठिसूळ त्याला कोण काय करणार?

"शान" हिट की "फ्लॉप" याचं उत्तर शोधेपर्यंत चित्रपटाने गल्ला पेटीवर चांगलीच मांड बसवली. शोलेची पुण्याई होतीच, मल्टी स्टार कास्ट चित्रपट होता, गाणीदेखिल लोकप्रिय झाली! "जानू मेरी जान मै तुझपे कुर्बान..", "यम्मा यम्मा क्या खुबसुरत समा..", "नाम अब्दुल है मेरा.." अशी सगळीच गाणी लोकप्रिय! (अरे हो! एक सांगायचं राहिलच! "शोले" मध्ये गायक म्हणून "मोहम्मद रफी" नव्ह्ते, मात्र "शान" या चित्रपटात पार्श्र्वगायक "मोहम्मद रफी" होते. "शोले" मध्ये गायक म्हणून "मोहम्मद रफी" का नव्हते.. याबद्दल नक्की जाणून घेऊया!) चित्रपट पुन्हा पाहण्यासाठी ही मोठीच गोष्ट. आणि मुंबईत मिनर्व्हातच "शान" ने रौप्य महोत्सवी यश संपादले.

आणि आजही "शान" म्हटला की हमखास "शोले" आठवतोच...

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया, १९ ऑगस्ट २०२५ वरुन साभार)



"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

<u>लेख क्रमांक : ११</u>

<u>*"शोले" मधली गाणी*</u>

"शोले" सारखा एक भव्य चित्रपट, त्यातही तो ७०एम.एम. प्रकारात आणि त्यातही "स्टिरीओफोनिक" साऊंडमध्ये म्हणता आम्ही पंधरा वर्षे या वयोमानातील बच्चेकंपनी खूपच भारावून गेलो होतो. "शोले"च्या रिलीज आधी गेले कित्येक महिने "मिनर्व्हा" थिएटरमध्ये "नूतनीकरण" चाललंय हे आम्ही स्वतः डोळ्यांनी पाहिले होते. आगामी चित्रपट हा "शोले" असणार आहे.. याचं अप्रूप वाटत होतच! यथावकाश "पॉलिडॉर" कंपनीच्या रेकॉर्डस् प्रकाशित झाल्या.. गाणी "लाऊडस्पीकर" वाल्यांनी गाजवली.. परंतु यातल्या एकाही गाण्यात "मोहम्मद रफी" यांचा आवाज नसल्याने आमच्यासह त्यांचे फॅन्स काहीसे आश्चर्यात होते! यामागचं कारण कळताच मात्र थक्क झालो. यामागचं कारण असं की

१९६९ च्या उत्तरार्धात ते आपल्या आई व भावासोबत "हाज यात्रेला" गेले होते. "हज यात्रे" दरम्यान त्यांनी मक्का येथे "अजान" देण्याची इच्छा प्रगट केली होती. बाहेरच्या कुणी "अजान" द्यावी हे त्यांच्या नियमांमध्ये बसत नव्हती. परवानगी सुद्धा नव्हती. शेवटी तिथल्या समितीने त्यावर खास बैठक घेत विचार करून.. तिथल्या एका मस्जिदमध्ये "अजान" देण्याची परवानगी दिली असल्याचे समजते. (आज "ई पी" रेकॉर्डस् आणि आता "यूट्यूब" वर उपलब्ध असलेली त्यांनी गायलेली "अजान" आणि "या नबी सलाम अलैका.." हे रेकॉर्डिंग नंतर करण्यात आले असावे! असाही मतप्रवाह आहे!) यामुळेच ते "शोले" मधील गाण्यांसाठी पार्श्र्वगायक म्हणून उपलब्ध नव्हते, हे नक्की! ते उपलब्ध न झाल्यानेच की काय.. त्यांच्या आवाजात "शोले" मध्ये एकही गाणे नाहीय. मात्र

"रमेश सिप्पी" यांच्या "शान" मध्ये त्यांनी गायलेली गाणी आहेत!

या यात्रेनंतर, त्यांनी युरोप टूर केली असल्याचे ज्येष्ठ पत्रकार व संगीतज्ञ सांगतात. या युरोप टूरमध्ये त्यांनी दोन "इंग्लिश गाणी" गायली होती, असे वाचनात आले होते. "हम काले है तो.." आणि "बहारो फुल बरसावो.." या चालीवर ही गाणी गायली होती. (परंतु ती गाणी "युरोपमध्ये" रेकॉर्ड झालीत का? हा तपशील उपलब्ध नाहीय.) ही दोन्ही गाणी छानच जमून आली आहेत. ("लिंक" पहा!)

१९७१ मध्ये भारतात परत आल्यावर ते काहीसे संभ्रमात होते.. कारण काही मौलवींनी त्यांना.. "आता तुम्ही 'हाजी' झाल्यामुळे चित्रपटसृष्टीत गाणे थांबवा!" असा सल्ला दिला होता. रफींनी हा सल्ला ऐकला आणि देशात परतल्यावर त्यांनी गाणे सोडत असल्याचे जाहीर केले, परंतु ते लोकाग्रहास्तव नंतर पुन्हा गाऊ लागले! हजच्या धार्मिक कर्तव्यामुळे रफी यांच्या मनात संगीताविषयी, संगीताच्या नियमांविषयी काही प्रश्न निर्माण झाले होते, ज्यामुळे त्यांना आपले
संगीताचे करिअर पूर्णपणे सोडण्याचा विचारही केला होता, असे काही ठिकाणी नमूद केले आहे.

© दिलीप ठाकूर

♥

<u>**लेख क्रमांक : १२ ("वाचनीय" असे काही)**</u>

<u>(आमचे परममित्र "श्री. धनंजय कुलकर्णी" (ज्येष्ठ लेखक आणि चित्रपट अभ्यासक) यांचा एक अतिशय उल्लेखनीय लेख, इथे "शेअर" करतोय! धन्यवाद!)</u>

🙏

<u>'शोले' सिनेमात "कव्वाली" का समाविष्ट होऊ शकली नाही? हा सर्वसामान्यांचा "प्रश्न,"!</u>

जी पी सिप्पी निर्मित आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' हा चित्रपट १५ ऑगस्ट १९७५ ला प्रदर्शित झाला. आज हा सिनेमा पन्नास वर्षे पूर्ण करत आहे. त्या मुळे देशातील अनेक थिएटर मध्ये पुन्हा

नव्याने प्रदर्शित होतो आहे. या निमित्ताने नवीन पिढीला हा सिनेमा मोठ्या पडद्यावर भव्य रुपात पाहायला मिळत आहे. या सिनेमाचे गारुड अजून प्रेक्षकांच्या मनावर कायम आहे. गेल्या पन्नास वर्षात 'शोले' या नावाशिवाय कोणतीही चित्रपटाची चर्चा पूर्ण होऊ शकत नाही इतकं अढळ स्थान 'शोले' ने रसिकांच्या मनात आणि समाज माध्यमात मिळवलेलं आहे.

या कव्वालीचे बोल होते 'चांदसा कोई चेहरा जो पहलू में हो, तो चांदनी का मजा नही आता...' या चित्रपटाचे 'स्क्रीन प्ले डायलॉग रायटर' सलीम-जावेद यांनी खास ही 'कव्वाली' चित्रपटात यावी यासाठी प्रयत्न केले. त्या करीता गीतकार आनंद बक्षी यांना कव्वाली लिहायला सांगितली. त्यांनी देखील भन्नाट कव्वाली लिहिली. ही गायली किशोर कुमार, मन्नाडे, भूपेंद्र सिंग आणि स्वतः आनंद बक्षी यांनी. चित्रपटात

ही कव्वाली जेल मधील एका प्रसंगात चित्रित करायचे ठरले होते. अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, केस्टो मुखर्जी, आणि असरानी यांच्यावर चित्रित होणार होती असे म्हणतात! तर काहींचे मते गब्बरच्या अड्ड्यावर चित्रित होणार होती असेही म्हणतात. पण चित्रपटाची लांबी वाढल्यामुळे ही कव्वाली काही पिक्चराईजच झाली नाही. आता या कव्वालीवर अनेकजण व्हिडिओ बनवत आहेत पण त्यात ती मजा नाही! कव्वाली खरोखरच सुंदर झाली होती आणि गीतकार आनंद बक्षी यांना गायक म्हणून या कव्वालीत समावेश झाला होता त्यामुळे जेव्हा ही कव्वाली चित्रपटात घेतली जाणार नाही असं म्हटल्यानंतर ते खूप नाराज झाले होते. त्यांच्या आत्मचरित्रात देखील त्यांनी याचा उल्लेख केला आहे. आनंद बक्षी यांनी ‘बागो मी बहार आयी..‘ (मोम कि गुडीया) हे त्या पूर्वी गायले होते. "शोले" या चित्रपटातील संगीत हा एक वेगळा

लेखाचा विषय आहे. "शोले" सिनेमाच्या राक्षसी यशाने संगीतमय चित्रपटाच्या नरडीला नख लावले असे देखील काही जण म्हणतात. कारण त्यानंतर ॲक्शन पॅक सिनेमाचा "डायलॉगबाजीने" भरपूर असा जमाना सुरू झाला! खरं तर ऍक्शन पॅक "शोले" सिनेमांमध्ये म्युझिकला फारसं महत्त्व नव्हतंच. पण यातील जिप्सी साँग "मेहबूबा मेहबूबा.." हे गाणे जबरदस्त गाजले. तसेच मन्नाडे आणि किशोर कुमार यांच्या स्वरातील "ये दोस्ती हम नही तोडेंगे.." या गाण्याला तुफान लोकप्रियता लाभली.

‘होली के दिन दिल खिल जाते है..’ हे गाणे आजही "टॉप टेन" होळी गीतातील आहे. ‘कोई हसीना जाब रूठ जाती है तो..’ या गाण्यावर पब्लिक खूष होती. लताचे ‘जब तक है..’ वर प्रेक्षकांनी पसंतीची दाद दिली. ही गाणी चित्रपट चालला म्हणून खूप चालली असेच म्हणावे लागेल! अर्थात

"कव्वाली" असती तर हा चित्रपट आणखी रंगतदार झाला असता असे "एल. पी. रेकॉर्डवर" ऐकलेल्या अनेक रसिकांचे ठाम मत होते. असे म्हणावे लागेल! खरंतर रमेश सिप्पी काय किंवा राहुल देव बर्मन काय यांनी ही कव्वाली पुढे कुठल्यातरी चित्रपटात नक्की वापरू शकले असते. पण त्यांनी का वापरली नाही हा प्रश्नच आहे! या कव्वालीची "लिंक" मी देत आहे तुम्ही सवडीने नक्की ऐका! आज शोले या चित्रपटाला पन्नास वर्ष होत असताना त्यात समाविष्ट न झालेल्या कव्वालीच्या काही आठवणी!

© श्री. धनंजय कुलकर्णी
("कलाकृती" मीडिया : "बात पुरानी, बडी सुहानी")
♥

<u>लेख क्रमांक : १३</u>

आता "शोले" मधल्या आणखी एका "महत्वाच्या" गाण्याविषयी...

व्हिनस कंपनीच्या "ब्ल्यू डायमंड" स्टुडिओत सहज गेलो असताना, तिथे पंचमदा यांचे जुने सहकारी, "सुप्रसिद्ध सॅक्सोफोन वादक" आणि संगीत संयोजक "मनोहारी सिंह" साहेब भेटले. (मला भेटले. त्या काळात ते "संगीतकार जतिन-ललित" यांच्याकडे संगीत संयोजकांचे काम पाहत असत!) आणि "शोले" चा विषय निघाला! "मेहबूबा मेहबूबा.."

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

या गाण्यातील संगीत संरचना वगैरे ते बरंच काही सांगत होते! "शोले" विषयी गप्पा मारताना, "मनोहारी दादा" यांनी सांगितल्याप्रमाणे या फोटोतली परदेशी व्यक्ती "शोले" मधील "मेहबूबा मेहबूबा.." या गाण्याशी संबंधित आहे. त्यांचे नाव "जीना लोलोब्रिजीड"!

रात्री/मध्यरात्री एकांतात त्यांना "रेडिओ" ऐकायचा शौक होता, हे तर सर्वश्रुतच आहे. त्यामुळेच पंचमदा यांच्या कानावर 'टा रिआलिया' आणि 'से यु लव्ह मी' ही गाणी पडली होतीच. गब्बरच्या अड्ड्यावर जेव्हा "जय आणि वीरू" हल्ला करायला येतात, तेव्हा एका नर्तकीवर चित्रित केलेलं गाणे हवे असल्याचे "रमेश सिप्पिनी आग्रहपूर्वक सांगितलं होतं म्हणता... दादांना ती गाणी आठवली! वाद्यसंयोजन वेगळं होतं, ठेका तर टिपीकल होता अर्थात गाणी "जिप्सी" नृत्य प्रकारातली होती! पंचमदा यांची "फॅन" असलेल्या,

तसेच संपर्कात असलेल्या "जीना लोलोब्रिजीड" मॅडमना त्यांनी फोन केला. तिने त्यांना तो "रशियन जिप्सी डान्स" समजावून सांगितला, असे वाचनात आलेय. पंचमदानी ते स्वतः गायचं ठरवलं.

त्या फोटोतली "जिना मॅडम" ही व्यक्ती नेमकी कोण? याच कुतुहलामुळे गुगलवर शोध घेतल्यावर वर दिलेला तिचा फोटो सापडला एकदाचा! या "जिना मॅडम तर ग्रेटच! पण "टा रिअलिया" वाला मायकालिस आणि डेमिस रुसेस यांचीही कारकिर्द थक्कच करणारी आहे! "डेमिस रुसेस" नावाच्या संगीतकाराने मेहनत घेऊन.. या गाण्यावर 'टा रिआलिया'वर बेतलेलं 'से यु लव्ह मी' हे गाणं गायलं

होतं. मग काय.. पंचमदा यांनी मस्त "संगीत संयोजन" करून ते आकाराला आणलं... आणि रसिकांच्या खात्यात एक भन्नाट गाणं सामिल झालं..!

© दिलीप ठाकूर

<u>लेख क्रमांक : १४</u>

<u>शोले.... पण रामगढ के..!!</u>

सिनेमाच्या जगात काहीही म्हणजे काहीही घडू, बिघडू, शिजू शकते. यशस्वी ठरु शकते. चर्चेत येवू शकते.

एकदा अशीच एक भारी गोष्ट घडली. "खरा नकली" राजेश खन्ना आपणच यावरुन "दोन नकली राजेश खन्नात" झालेला वाद चक्क पोलीस ठाण्यात पोहचला आणि त्याची बातमी झाली. म्हणजेच राजेश खन्नाची नक्कल करण्याचा अधिकार आपलाच हे या वादाच्या मुळाशी! म्हटलं ना, सिनेमाच्या जगात जे जे घडते ते अनेकदा अद्‌भूत असते. चमत्कारिक असते. कधी अनाकलनीय असते. तर कधी अनावश्यक असते!

हे "असली नकली" प्रकरण भन्नाट आहे. इतके की त्यावरुन अनेक चित्रपट निर्माण झाले. ते रुजवले

अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आय. एस. जोहरने "फाईव्ह रायफल्स" (१९७५) या चित्रपटात! आणि उगवले राजू मावानी निर्मित व अजित देवानी लिखित व दिग्दर्शित "रामगढ के शोले" (१९९१) च्या वेळेस! हा अजित देवानी मनिषा कोईराला इत्यादी काही कलाकारांचा सेक्रेटरी होता. तोही दिग्दर्शक बनला. म्हटलं ना... जावू देत!

राजेश खन्नाच्या विलक्षण चलतीच्या काळात गिरगावात तरी प्रत्येकी तिसऱ्या चौथ्या गल्लीत एक "सही रे सही " (अथवा डिट्टो) राजेश खन्ना असे आणि हमखास दिसे. दिसण्यापासून डोळे मिचकावणे, हातवारे करणे यात "पुरेपूर" राजेश खन्ना भिनलेला. असाच एक "नकली" राजेश खन्ना "राकेश खन्ना" नावाने व असाच एक नकली शशी कपूर "शाही कपूर" नावाने यांना हिरो करीत "फाईव्ह रायफल्स" या चित्रपटाने चक्क राज खोसला दिग्दर्शित "प्रेम

कहानी" (१९७५) पेक्षा जास्त यश मिळवले. (या चित्रपटात "झूम बराबर झूम.." ही "कव्वाल अजिझ नाझा" यांची मूळ "कव्वाली" घुसडलेली तर "तेरा हुस्न अल्ला अल्ला.." आणि "जब से सरकार ने.." ही किशोरकुमारची गाणी होती. जी चांगलीच "हिट" झाली. संगीतकार : कल्याणजी आनंदजी होते.)

प्रेक्षकांना काय आवडेल हे कोणीच सांगू शकत नाहीत हे असे अनेकदा अधोरेखित होणारे! आता तुम्हाला सांगायलाच नको, "प्रेम कहानी" त असली नाणी शशी कपूर, राजेश खन्ना व मुमताज होते. सिनेमाच्या जगात कधीही काहीही घडू शकते या अलिखित नियमानुसार "फाईव्ह रायफल्स" ला चांगली गर्दी झाली. या यशाने आय. एस. जोहरचा आत्मविश्वास आणखीन वाढला आणि "नसबंदी" (१९७८) नावाच्या चित्रपटात "नकली" देव आनंद, राजेश खन्ना, शशी कपूर, अमिताभ बच्चन व शत्रुघ्न

सिन्हा असा "मल्टी स्टार कास्ट" मामला केला. नावेही अनिताव बच्चन, सेव आनंद, शॉटगन सिन्हा आणि... आणि "फाईव्ह रायफल्स" फेम राकेश खन्ना व शाही कपूर!

चित्रपटाच्या जगाला चलनी नाण्याचा कायमच मोह! पूर्वी कधी काळी चाललेली गोष्ट, गाणे, नाव, एकादी कल्पना, कधी पोस्टर, एकादी चाल त्यांना नवीन रुपात हवी असते. "नकली नटांची गोष्ट" पब्लिकला पूर्वी आवडली होती हा संदर्भ नवनिर्मितीसाठी उत्साह वाढवायला पुरेशी असते. आणि त्यातूनच पडद्यावर आला, रामगढ के शोले.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५)चे हे पन्नासावे वर्ष सुरु आहे. विविध शहरांतून साजरेही होतेय. "शोले"च्या रिमेक अधूनमधून येतात, जातात. अर्थात, मूळ चित्रपटाच्या ट्रेलरच्या आसपासही हे चित्रपट पोहचत नाही. ते शक्यही नाही! (शेवटी

"नकली" ते "नकलीच"! या "नक्कलखोरी!"चं साधं उदाहरण देत सांगायचं तर "लतादीदींची" गाणी आपल्या "आवाजात" रेकॉर्ड करून कुणी हौशी गायिका.. ती "अल्बम" स्वरूपात गाजावाजा करत मार्केटला प्रदर्शित करते, असंच आहे हे! होय ना? पण. "नक्कल ती नक्कलच!) तरी हट्टाने प्रयत्न होत असतोच! एकदा चक्क मराठीत "शोले" निर्माण करण्याची घोषणा झाली आणि एकाच दिवसात विरली. यात आश्चर्य काय? अशी घोषणा झाली की ओसरली? कोणी म्हणाले, घोड्याच्या मानधनाचा आकडा ऐकून चित्रपट थंड झाला. कोणी म्हणाले, टांग्याचे घोडे वापरणे बरे दिसणार नाही म्हणून घोषणेवरच चित्रपटाचा "शेवट" झाला.

"रामगढ के शोले" च्या मुहूर्तासाठी जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील मोठा हॉल असणे, फिल्मी संस्कृतीनुसार रात्री उशिरापर्यंत शानदार

ओली पार्टी होणे, चित्रपटातील चार नकली हिरो "असली" उत्साहात वावरणे, चित्रपटाचे जस जसे दोन चार रिळांचे चित्रीकरण होत जाताना त्याची बातमी करणे हे सगळेच एकाद्या "असली" चित्रपटासारखे! याला व्यावसायिकता म्हणायचे की "फोकस" वाटचाल म्हणायचे हा प्रश्नच आहे. यात एक चेहरा "असली"! तो म्हणजे अमजद खान! "शोले"चा जुलूमी, क्रूरकर्मा गब्बरसिंग. पडद्यावर केवढी दहशत होती त्याची! त्याच्या विकृत हास्यापासून विशिष्ट ढब असलेल्या बोलण्यापर्यंत सगळेच थरारक! तोच गब्बर "रामगढ के शोले" मध्ये हा एक धक्का होता आणि कुतुहलही वाढवत होता. तर चार "नकली" हिरो असे, किशोर भानुशाली (देव आनंद), विजय सक्सेना (अमिताभ बच्चन), आनंद कुमार(अनिल कपूर) व नवीन राठौड (गोविंदा)! हे सगळेच त्या काळात आणखीन काही चित्रपटात थोडेबहुत दिसले.

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

आता नक्कल करायची तर सगळ्याच पातळीवर करायला हवी याला प्रामाणिकपणा म्हणता येईल. "शोले"ने मुंबईत मिनर्व्हात तीन वर्ष दिवसा तीन खेळ आणि मग मॅटीनी शोला आणखीन दोन वर्ष असा एकूण पाच वर्ष मुक्काम केला (हे मुद्रित माध्यमापासून डिजिटल मिडियापर्यंत सारखं सारखं सांगितले जातेय. बातमी तीच, काळ बदलत राहिला.) त्याच मिनर्व्हात "रामगढ के शोले" पडद्यावर आला. फरक इतकाच, "शोले" सत्तर एम. एम. च्या विशाल पडदाभर होता, "रामगढ के शोले" पस्तीस एम. एम. म्हणजेच नेमका अर्धा. येथेच काय ते समजा! सिनेमा काय ते असाही समजतो!

ते काही असो. गोष्टीत गंमत होती. "शोले" जेथे संपतो तेथून "रामगढ के शोले" सुरु होतो. आपली शिक्षा भोगून गब्बरसिंग रामगढच्या जेलबाहेर येतो तोच त्याचे अपहरण हे चौघे करतात. हे चौघे घनिष्ट

जिवलग मित्र. चौघांचे चेहरे, वागणे, बोलणे हे "फिल्मी" कलावंतांसारखे! त्याचाच फायदा घेऊन त्यांनी मुंबईत येऊन एका निर्मात्याला पंचवीस लाखाला फसवून रामगढला पोबारा केलेला. आता तर गब्बरही त्यांच्या तावडीत. या सगळ्यातून जी धमाल उडते ते म्हणजेच हा चित्रपट! ("पोस्टर" वर "संपूर्ण" चित्रपटाची "लिंक" दिली आहे!) चित्रपटातील "जयवंती" नावाची ("नर्गिस" नामक एक नवी अभिनेत्री) रामगढमधील टॅक्सीवाली "असली" फिल्म दीवानी! चित्रपट कलाकारांना सतत फॅन लेटर लिहिणारी! सगळाच चित्रपट तद्दन फिल्मी. "शोले"चे एक जमून आलेले विडंबन! चित्रपट रसिकांच्या अशा मसालेदार मनोरंजक चित्रपटाकडून अपेक्षा त्या काय असणार? म्हणूनच हा चित्रपट चक्क व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी ठरला. "नकली चित्रपट असली यश" असे काहीसे झाले.

यशाने हुरळून जाऊन त्याच पठडीतील चित्रपट



बनवणे हा गुन्हा अजिबात नसतो. लेखक दिग्दर्शक अजित देवानी याने सुभाष घई निर्मित व मुकुल आनंद दिग्दर्शित "त्रिमूर्ती" (१९९५) ची नक्कल म्हणून "तीन मोती" या नावाच्या चित्रपटाचा त्याच पंचतारांकित हॉटेलमध्ये जंगी मुहूर्त केला. यातही एक खोच आहे. " त्रिमूर्ती "चा मुहूर्त संजय दत्त, शाहरुख खान व जॅकी श्रॉफ यांच्यावर झाला म्हणून त्यांच्याशी मिळते जुळते असे ज्युनियर शाहरुख खान, रशिद खान व शब्बीर

खान यांना घेऊन "तीन मोती"चे शूटिंग सुरु झाले देखिल. अशातच मूळ चित्रपटात संजय दत्तच्या जागी अनिल कपूर आला....!

असली नकलीच्या फिल्मी गोष्टी चित्रपटाच्या मुहूर्तापासूनच केवढ्या तरी! बरं! यांना कोणी "ड्युप्लीकेट" असेही म्हणते. चित्रपटात "ड्युप्लीकेट" म्हणजे ढिश्यूम ढिश्यूम मारहाण, घोडेस्वारी अशा थरारक दृश्यात कलाकाराच्या ऐवजी भाग घेणारे. डमी म्हणूनही प्रचलित. त्यांना "चेहरा" नाही. हे नकली अशासाठी म्हणायचे की ते एकाद्या लोकप्रिय कलाकाराचा चेहरा, चालण्या/बोलण्याची ढब घेत प्रत्यक्षात वावरणारे म्हणून पडद्यावरही संधी मिळालेले.

अशीच एक भन्नाट गोष्ट, राजू तोलानी निर्मित व एन. चंद्रा दिग्दर्शित "कुशान्त" या चित्रपटाच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील जंगी मुहूर्ताची. चित्रपटात

अनिल कपूरची दुहेरी भूमिका व उर्मिला मातोंडकर नायिका! आता चित्रपटाच्या मुहूर्ताला अनिल कपूरचा "लाईव्ह" डबल रोल कसा साकारणार? म्हणून काय झाले, फिल्मवाले अनेक गोष्टींवर मार्ग काढणारे. असली व नकली अनिल कपूर या दोघांना मुहूर्त दृश्यात असे काही दाखवले की, येथे दिग्दर्शक दिसतो असे म्हणावेच लागले!

"शोले" चे पन्नासावे वर्ष सतत कुठे कुठे अनेक गोष्टींतून साजरे होतेय. त्यात "रामगढ के शोले" ही आहे. नकली असला तरी असली ठरला. "शोले" च्या यशोगाथेत त्याचाही आपला एक रंग भरला. त्याला असली म्हणा वा नकली. तशा चित्रपटांच्या ट्रेण्डमधील तो विशेष उल्लेखनीय. "शोले" च्या खणखणीत यशावर जन्माला आलेला. आणि "रामगढ के शोले" हा असा एकच चित्रपट नव्हे (विडंबन म्हणायचे काय?) "बसंती टांगेवाली" पासून

बरेच! मुख्य प्रवाहात "शोले"चे स्थान, तेच "नकली" गोष्टीत "रामगढ के शोले" चे!

© दिलीप ठाकूर
(रविवार सकाळ, सप्तरंग पुरवणी, जून २०२५

♥



♥

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

लेख क्रमांक : १५

"शोले" एक न संपणारा विषय..

"शोले" च्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्तचा एक सुखद योग! चित्रपटातील वीरु अर्थात धर्मेंद्रला भेटायचे ठरवले. आज "धर्मेंद्र" वय वर्ष एकोणनव्वद. अधूनमधून त्याची तब्येत बिघडली असल्याच्या बातम्याही येतात. जुहू येथील त्याच्या सनी व्हिला या बंगल्यात शिरताच तळमजल्यावरच डाव्या बाजूस त्याचे निवासस्थान आहे. पहिल्या मजल्यावर सनी देओल राहतो.

धर्मेंद्रशी ही अगदी औपचारिक भेट होती. कॅमेऱ्या समोर सध्या आपण मुलाखत देत नाही असे तो अगदी शांतपणे म्हणाला. माझ्या कलेक्शनमधील शोलेची जाहिरात, बुकलेट, चित्रपटाचे व यशाच्या सोहळ्याचे फोटो त्याला एकेक करत दाखवत असतानाच त्याने म्हटलं, "तस्वीरे बोलती है... "

आपण चार पाच वेळा "शोले" पाहिलाय पण तोही त्या काळात! पण किमान पन्नास साठ वेळा "शोले" पाहिलेले चित्रपट रसिक मला असेच कुठे कुठे भेटलेत. "शोले" प्रदर्शित होताच सुरुवातीस थोडे नरम वातावरण होते. आम्हा सर्वांनाच प्रश्न पडला की

असे का होतेय? नंतर मात्र चित्रपटाची अशी काही जबरदस्त क्रेझ निर्माण झाली की सगळेच वातावरण बदलून गेले, बोलता बोलता धर्मेंद्रचे डोळे चमकतात. तो असेच काही बोलावा म्हणून मी शोलेबरोबरच दुलाल गुहा दिग्दर्शित "प्रतिज्ञा" या चित्रपटाचाही फोटो दाखवतो. यावर तो अधिकच खुलतो व सांगतो, "प्रतिज्ञा" तील भूमिका साकारताना खूपच मजा आली. "यमला पगला दीवाना.." गाण्याच्या शूटिंगच्या वेळेस मला नृत्याच्या स्टेप्स जमत नव्हत्या म्हणून मी मला जमेल असे नाचायचे ठरवले आणि ते पब्लिकला

प्रचंड आवडले. थिएटर्समध्ये पब्लिक या गाण्याला प्रचंड टाळ्या शिट्ट्यांनी दाद देतात असा पहिल्याच खेळापासून रिपोर्ट आला. शोलेतील "यह दोस्ती हम नहीं तोडेंगे..." गाण्याचे शूटिंगही असेच "एन्जॉय" केले तेही गाणे प्रेक्षकांनी उचलून घेतले. रसिकांचे असेच प्रेम आमची ताकद असते, धर्मेंद्र म्हणत असतानाच मी शोलेतील ठाकूर बलदेवसिंग, वीरु व जय यांचा एक फोटो दाखवत म्हणतो, तुम्ही ठाकूर बलदेवसिंग साकारण्यास इच्छुक होतात अशी कायमच चर्चा असते. यावर तो हसत हसत म्हणाला, मी असे एकदा गंमतीत म्हणालो आणि आता तेच खरे मानले जातेय. वीरुच्या भूमिकेत बरेच काही करता येण्यासारखे आहे....

अगदीच औपचारिक भेट असल्याने अशाच छोट्या छोट्या गोष्टींतून त्या झाल्या. महत्वाचा होता, " शोले" तोच मनात ठेवून या बंगल्याबाहेर पडलो!

मराठी असो वा हिंदी, इतकेच नव्हे तर आपल्या देशात अनेक प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मितीच्या यशोगाथा अनेक (आणि चित्रपट रसिकांनी नाकारलेल्या चित्रपटांच्याही गोष्टी अनेक).

त्यात एक शुक्रवार अगदी वेगळाच येतो आणि एक नवीन इतिहासाची ती सुरुवात असते!

१५ ऑगस्ट १९७५.... 'शोले' प्रदर्शित झाल्याचा दिवस आजही ठळकपणे आठवतोय...

गिरगावातील खोताची वाडीत राहिल्याने मिनर्व्हा थिएटर सवयीचे आणि 'शोले'ची जबरदस्त पूर्वप्रसिध्दी झाल्याने वातावरण 'शोले' मय झालेले. त्या काळात असे मोठे चित्रपट रिलीज व्हायच्या दिवशी थिएटर डेकोरेशन पाह्यला जायचं आम्हा फिल्म दीवान्यांना जबरा फॅड होते. प्रत्येक काळाची काही खास वैशिष्ट्य असतात, तसेच ते हेही. मिनर्व्हावरचे तर एका टोकापासून सुरु होणारे थिएटर

डेकोरेशन पाहावेच असे. त्यावरच्याही गब्बरसिंगची भीती वाटल्याचे आठवते. माझे ते शालेय वय होते. ॲडव्हान्स बुकिंगचा चार्ट आठभरचे सगळे शो हाऊस फुल्ल असणे स्वाभाविक होते, पण तिकीट दर "अप्पर स्टॉल" चार रुपये चाळीस पैसे आणि बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे असलेले पाहून माझ्यातील मध्यमवर्गीय मराठी माणसाला आश्चर्याचा धक्का बसला. तेव्हा गिरगावातील सेन्ट्रल थिएटरला "स्टॉल" एक रुपया पासष्ट पैसे (मॅटीनी शोला तेच तिकीट एक रुपया पाच पैसे... महत्वाचे म्हणजे खिशात मोजून तेवढेच पैसे असत).

मिनर्व्हाबाहेरील गर्दीत पिक्चरच्या "फर्स्ट डे फर्स्ट शो"च्या पब्लिक रिपोर्टबद्दल विलक्षण कुतूहल आणि उत्सुकता होती..... सुरुवातीला 'शोले' पडला पडला अशीच हवा होती. त्या काळातील चित्रपट समिक्षकेबद्दल विश्वासार्हता होती आणि त्यात तर

जवळपास सगळीकडे 'शोले 'वर टीका होती. हिंसक चित्रपट, लांबलेला सिनेमा, वगैरे वगैरे बरेच काही.

प्रत्यक्षात काय घडले हे सर्वज्ञात आहे. आजही राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात 'शोले' असतोच. सध्यातर त्याचे मिम्स, ॲनिमेशन **, विडंबन,** एआय रिमिक्स **यातूनही शोलेचा प्रवास सुरु आहे. एकपडदा चित्रपटगृह, दूरदर्शन, रंगीत दूरदर्शन, व्हिडिओ, डिव्हिडी, उपग्रह वाहिनी, त्रीमिती (थ्री डी), मोबाईल स्क्रीन, यू ट्यूब, ओटीटी अशी नवीन माध्यमासोबत व पुढील पिढीसह शोले चालतोय.**

मिनर्व्हामध्येच "शोले" बघणे त्या काळातील सामाजिक सांस्कृतिक गरज झाली होती संपूर्ण मुंबईत फक्त तेथेच हा चित्रपट सत्तर एमएमचा पडदा आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीमने होता. (न्यू एक्सलसियर व चेंबूरचे बसंत थिएटर येथेही सत्तर एमएमच होता पण केवळ सुरुवातीचे काही आठवडे)

गावाकडून मुंबईत येणाऱ्या पाहुण्यांना मिनर्व्हात शोले दाखवत, ही त्या काळातील एक सामाजिक कौटुंबिक प्रथा. मिनर्व्हात सीटसवर बसल्या बसल्या वेगळा फिल येई (अनेक शहरात एकाद्याच थिएटरमध्ये असा "सत्तर एमएम"चा होता आणि इतरत्र "पस्तीस एमएम" आणि "मोनो साऊंड सिस्टीम"चा होता हे जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांना आठवत असेलच).... पंधराव्या आठवड्यातही ॲडव्हान्स बुकिंगसाठी सकाळपासून रांग लावून एकदाचे तिकीट मिळवले.... सिनेमा

संपला तेव्हा मी सलिम जावेद यांची बंदिस्त पटकथा व संवाद, रमेश सिप्पीच्या दिग्दर्शन आणि एम.एस. शिंदे यांचे कल्पक, कौशल्यपूर्ण संकलन या गोष्टींनी विलक्षण भारावून गेलो होतो. चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे. त्याच्या दृष्टिकोनातून चित्रपट पाह्यला हवा. शोले च्या पोस्टर्सवर निर्माता व दिग्दर्शक यांच्याच नावांना अतिशय ठळक स्थान देताना त्यातून जणू तेच सुचवायचे होते.

"अंदाज" (१९७१) आणि "सीता और गीता" (१९७२) या हिट चित्रपटानंतरचा रमेश सिप्पीने "शोले"! जी. पी. सिप्पी पन्नासच्या दशकापासून चित्रपट निर्मिती क्षेत्रात असल्याने त्यांना व्यवसायाची नस चांगलीच माहित.

"शोले" जस जसा मुक्काम वाढवू लागला तस तशा अनेक गोष्टी समोर आल्या. डॅनी डेन्झोपा गब्बरसिंगची भूमिका साकारणार होता, अगदी

पहिल्या सिटींगलाही तो धर्मेंद्र, हेमा मालिनी, संजीवकुमार, अमिताभ बच्चन आणि जया भादुरीसोबत हजर होता. पण त्याच वेळेस तो नरेंद्र बेदी दिग्दर्शित "खोटे सिक्के" मध्ये अशीच भूमिका साकारत असल्याने आणि फिरोझ खान दिग्दर्शित 'धर्मात्मा' च्या शूटिंगसाठी अफगाणिस्तानला जायचे असल्याने त्याने 'शोले' नाकारला.... फिरोज खानने डॅनीचा हुशारीने "ब्रेन वॉश" केला. तीन नायक

असलेल्या चित्रपटात तुला वाव तो काय? "धर्मात्मा"त "हेमा" एका गाण्यात सहभाग व पहिल्यांदाच अफगाणिस्तानातील काबूल येथे चित्रीकरण आहे माझ्यासोबत चल! रणजीतलाही गब्बरसिंग ऑफर झाला. पण "डॅनीकडून लेखी आणा तो हा चित्रपट करत नाही..." रणजीतही नाही म्हटल्यावर अमजद खान आणि शोलेचा धाक वाढला. मिनर्व्हात दिवसा तीन खेळ याप्रमाणे ३१ ऑगस्ट १९७८ असा तीन वर्षे आणि मग मॅटीनीला शिफ्ट होऊन आणखीन दोन वर्षे चालला... आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान' (१९८०) आला. 'सहा कोटीचा सिनेमा' अशी 'शान'ची दणदणीत पब्लिसिटी झाली (पंचेचाळीस वर्षांपूर्वी मध्यमवर्गीय मराठी माणसाला मासिक एक हजार रुपये पगारही भारी वाटे. बघा, कुटुंबातील वडीलधारी मंडळीना विचारुन!) 'शाकाल'च्या खर्चिक सेट आणि ती भूमिका साकारलेल्या कुलभूषण खरबंदाच्या

महागड्या ड्रेसची भारी हवा होती. अमिताभ बच्चनने खतरनाक मगरीशी डमी न घेता फायटींग केली वगैरे वगैरे किती टीट बिट्स विचारु नका. पब्लिकला उत्सुकता होती, 'शाकाल' गब्बरसिंगपेक्षा जास्त डेंजरस ठरणार काय हे जाणून घेण्याची!

'शान' एकदम "पॉलिशड ॲक्शन सिनेमा", रमेश सिप्पीने याचे भान कुठेही सोडले नव्हते. पण पब्लिकने 'शोले 'च्या हॅन्गओव्हरमध्ये 'शान' पाहिला आणि अर्थातच "वो बात कुछ जमी नही"! त्यानंतरचा रमेश सिप्पींचा प्रवास एक वेगळा विषय. खरं तर रमेश सिप्पी 'शोले' ला मागे ठेवून पुढे चालला होता, पण समाजावर 'शोले 'चा पगडा होता. तो विसरला जाईल असे काही त्यांना अपेक्षित होते आणि नव्हतेही आणि हीच दिग्दर्शकाची मोठी कसोटी असते. (मोठे यश सतत पाठलाग करते ते हे असे.) 'शोले 'च्या अनेक रिमेक (आंधी तुफान, मेला, रामगोपाल वर्मा

की आग वगैरे) पडद्यावर आल्या त्या पडण्यासाठीच, त्यामुळे तर 'शोले ' जास्तच प्रभावी वाटला.

'जमाना दीवाना '(१९९५) ही रमेश सिप्पीच्या दर्जाचा नाही. या फिल्मच्या निमित्ताने रमेश सिप्पीची त्याच्या खार येथील ऑफिसमध्ये मुलाखतीचा योग आला आणि मी 'शोले' च्या हॅन्गओव्हरमध्ये असल्याने त्यावरच प्रश्न विचारायला सुरुवात केली. रमेश सिप्पीनेही सकारात्मक प्रतिसाद दिला. एक प्रश्न महत्वाचा केला, 'शोले ' पब्लिकला आवडतोय हे नेमके कधी लक्षात आले? यावरचे त्याचे उत्तर होते, काही दिवसांनी लक्षात आले की, एकाही प्रसंगाला वा

गाण्याला एकही प्रेक्षक चहा, सिगारेट अथवा "वॉशरूम" साठी बाहेर पडत नाही हे लक्षात आले, याचाच अर्थ सिनेमा प्रेक्षकांना खिळवून ठेवतोय...!! (इथे एक "आठवण" सांगण्यासारखी आहे. "शोले"च्या पहिल्या दौर बद्दल "पब्लिक" काहीही म्हणोत... मला आठवतंय..! एकदा माझ्या "मिनर्व्हा" थिएटरच्या इलाक्यात राहणाऱ्या एका बालमित्राने सांगितलेली, त्याची एक आठवण सांगितली होती!

त्याबद्दल प्रकर्षाने सांगायचे तर.. त्या काळात "शोले"ची तिकिटे "ब्लॅक" करणे, हा भयंकर "अनाधिकृत असा व्यवसाय" डोके वर काढू लागला होता. (पाच का वीस!) केवळ "पार्ट टाइम" कमाई म्हणून हा मस्त "जॉब" म्हणून स्वीकारलेल्यांमध्ये त्याचा तो एक परिचित होता.. जो त्याच्या समोरच्याच चाळीत राहायचा! असो! इथे गंमत म्हणजे तो.. त्यात "खोऱ्याने.." कमवत असे! त्यामुळेच, त्याचे अनेक

शेजारी आणि बालमित्रांना त्याने "शोले" चक्क फुकटात पहायला दिलेला. तोही चक्क पहिल्या आठवड्यातल्या "सोमवारीच!"! (तेव्हा पहिल्या "चार रांगांची" तिकीटे असत.) त्यांना अगदी पुढचा "रो" त्यातही "कॉर्नरची सीट" मिळाली होती. (भयंकर मामला!) "७० एम एम" चा तो "अर्धवर्तुळाकार भला मोठा पडदा"! जिथे ते बसले होते तिथून संपूर्ण पडदा त्यांच्या नजरेच्या आवाक्यात येताच नव्हता. भरीस भर म्हणून की काय.. समोरच धडधडता अनेक "डेसिबल फ्रेक्वेन्सी" असलेला "स्टिरीओफोनिक साऊंड!" कानावर अत्याचार न करेल तर नवलच! सर्व पात्रांचे "खांदे" तर अक्षरशः वाकडे दिसत होते. "पहिल्या रांगेत" तेही "कॉर्नरची सीट!" ही भयंकर शिक्षाच होती म्हणाना! "इंटरव्हल" पर्यंतचा वेळ कसाबसा काढला! मध्यंतरात "स्टॉल्स" जवळचेच "वॉशरूम" गाठलं! आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथे

एकमेकांचे परिचित असतानाही कुणीच कुणाशी बोलत नव्हतं! कारण प्रत्येक जण भव्यतेने भारावला असेलही पण सिनेमाबद्दल खूपच "कन्फ्युजड्" आणि "भांबावलेला"! एका माणसाने.. (तो कदाचित "वार्ताहर" असावा.) एकाला "बेसिनजवळ" विचारले.. "फिल्म कैसा लगा..?" तो चिडलाच ना राव! "चुपचाप देख.." इतकंच म्हणाला. असो.. नंतर या पुढच्या "चार रांगा" रद्द करण्यात आल्या होत्या हे नशीब!! हुश्श!

या तिकीट "ब्लॅक" करणाऱ्या तथाकथित "दादाचे" याच काळात "लग्न" झाले होते. (अंदाजे १९८१) मुंबई सेंट्रल इलाक्यातील "बी. आय. टी." चाळीं मधील रस्त्यावर दाखविला गेला होता. तेव्हा त्याने काय जाहीर केलं होतं माहित्येय?? "मला "मुलगा" झाला तर मी माझ्या "स्वखर्चाने" इथे आपल्या "बी. आय. टी. मधल्या पटांगणात.. मी

आपल्या सर्वांच्या आवडता सिनेमा "शोले" नक्कीच तुम्हां सर्वांना नक्कीच दाखवेन!" त्याच्या सुदैवाने त्याचा "नवस" पुरा झाला.. त्याने यावर काय करावं..? आपली "ताकद" पणाला लावून त्याने ती "३५ एम एम" ची "प्रिंट" कशी मिळेल?, तसेच ती कशी सादर करता येईल यावर ढोर मेहनत घेतली! मित्रांनो.. फुटपाथवर दाखवले जाणारे "सिनेमे" हे मूलतः "१६ एमएम" मध्ये दाखवले जातात, हे तुम्ही जाणताच!.. मात्र त्याने काय चक्रे फिरवली कुणास ठाऊक! परंतु त्याने, त्याचे म्हणणे पूर्ण केले! त्याने अक्षरशः "शोले" हा "सुपरहिट" चित्रपट चक्क त्यांना "फुटपाथ" वर सादर होणाऱ्या सिनेमाप्रमाणे दाखवला! तेही चक्क "३५ एम एम" मध्ये! त्यांच्या चाळीतल्या त्या अमुक "रोडवर"! हे आठवतंय! "फुटपाथवर" सादर होणाऱ्या नेहमीचा "१६ एम एम" हा पडदा तो काय?! त्याचप्रकारचे आणखी.. चार पडदे आणून ते तिथल्या

मुलांच्या मदतीनं शिवणकाम करत व्यवस्थित जोडून एक खास "नवा" मोठ्ठा "पडदा" बनविला होता! एका मोठ्या "ट्रकमधून" ती प्रदर्शनाची "सामुग्री" आलेली..! "३५ एम एम" चा मोठा "प्रोजेक्टर" ते सुद्धा भल्यामोठ्या "ट्रक" मधून येणं हे सर्वांसाठी एक "आश्चर्यच" होते! सिनेमा दाखवला.. लोकांनी अनेक ठिकाणी हवे तसे "वन्स मोअर" देत पाहिला..! "मिनर्व्हा" मध्ये तो भले "तीनेक" तासांचा असेल.. इथे हा सिनेमा चक्क "साडेचार - पाच तासांचा होता! असो..! "शोले" या सिनेमाची तिकिटे अनधिकृत रीत्या "ब्लॅक" करून, त्याने "मुंबई सेंट्रल" मधील एका उच्चभ्रू वसाहतीच्या मोठ्या "कॉम्प्लेक्स" मध्ये "अद्ययावत फ्लॅट्स" घेतला हे सुद्धा आश्चर्यच! त्याने "शोले"ची तिकिटे "ब्लॅक" करून कमाई केली होती, हे ऐकीव आहे! खरं खोटं देव जाणे! पण असेही मतप्रवाह होते, हेच सांगण्याचा माझा प्रयत्न आहे!)

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

रमेश सिप्पीचे हे उत्तर 'सिनेमाच्या अभ्यासाचा विषय आहे'. गोष्ट खूप छोटी वाटते, पण त्यात खूप काही दडलयं....!

कालांतराने 'शोले' थ्री डी अर्थात त्रिमीती तंत्रज्ञानातून आला, विशिष्ट पद्धतीचा चष्मा लावून पुन्हा एकदा 'शोले' पाहताना रमेश सिप्पीच्या दिग्दर्शनातील बारकावे इम्प्रेस करीत होते! तुम्हाला "छोटा चेतन" हा सिनेमा आठवतोय ना? बवाल मच गया था यार!

आता पुन्हा शोले प्रदर्शित करण्याची तयारी चाललीय. शोलेत त्यावेळी समाविष्ट नसलेली काही दृश्येदेखिल यावेळी पाह्यला मिळतील. विशेष उल्लेखनीय गोष्ट, यावेळी चित्रपटाचा शेवट (क्लायमॅक्स) वेगळा आहे! त्यामुळेच तीन तास १८ मिनिटाचा असलेला शोले आता तीन तास चोवीस मिनिटांचा असेल. त्यात चित्रपटाचा शेवट (अर्थात

क्लायमॅक्स) वेगळा असेल. मूळ शेवट काय होता? ठाकूर बलदेवसिंग (संजीवकुमार) गब्बरसिंगला (अमजद खान) तडपा तडपाके के मार देता है! खतम कर देता है! सेन्सॉरने या क्लायमॅक्सला आक्षेप घेतल्यावर चित्रपटाच्या शेवटी पोलीस गब्बरसिंगला अटक करतात असे दाखवण्यात आले (तत्कालिक समिक्षकांनी हा शेवट अगदीच पारंपरिक असे म्हटले. मात्र आणीबाणीत चित्रपट सेन्सॉर संमत करुन घेणे अडथळ्यांचे होते!)

चित्रपट माध्यम व व्यवसायात निर्मितीत मोठी संच अर्थात टीम. दिग्दर्शक, संगीतकार, छायाचित्रण कार अशांच्या सहाय्यकांचाही त्यात वाटा असतोच! ते खूपच मोठे युनीट असते. चित्रपट बनवणे हे पडदाभर दिसते तितके सोपे नाही..! मग तो कल्ट चित्रपट असो वा अगदीच सामान्य! या व्यवसायात येणाऱ्यांनी म्हणूनच चित्रपट कसा आकार घेतो हे समजून घ्यावे!

केवळ आर्थिक बळावर चित्रपट निर्माण होत नाहीत हा पहिला धडा समजून घ्या. "शोले" चित्रपटाच्या श्रेयनामावलीनुसार सांगायचे तर, रमेश सिप्पींचे सहाय्यक होते, खालीश लखनवी, शरद पालेकर, बालन, किशन, पिशन (यू ट्यूबवर शोले उपलब्ध आहे. श्रेयनामावली आवर्जून वाचा. अथवा मोठ्या पडद्यावर ती आता वाचायची संधी मिळेलच.)

तर छायाचित्रणकार व्दारका दिवेचा यांचे सहाय्यक होते, पी. आर. एल. रमण, एस. वसंत. सहाय्यकात राहुल देव बर्मन यांचे सहाय्यक होते, बासू, मनोहारी, मारुती राव! चित्रपटाचे टेरिफिक पार्श्वसंगीत ऐकण्यातही रोमांचकता आहे. शोलेच्या संवादाची ध्वनिमुद्रिका सुपर हिट ठरली तसेच त्याच्या पार्श्वसंगीताचीही "ध्वनिमुद्रीकेचीही" जोरदार विक्री झाली.

या चित्रपटातील कलाकारांना त्यांच्या कामा साठी किती मानधन मिळालं होतं याचीही चर्चा असते. धर्मेंद्रला १ लाख ५ हजार इतकं मानधन तर ठाकूर बलदेव सिंह भूमिकेसाठी संजीव कुमारला सर्वाधिक १ लाख २५ हजार इतकी रक्कम मिळाली. अमिताभ बच्चनला या दोघांपेक्षा कमी १ लाख इतकी रक्कम मिळाली . पन्नास वर्षापूर्वी ही रक्कम मोठीच होती! हेमा मालिनीला ७५ हजार इतकी रक्कम मिळाली. तर अमजद खानला ५० हजार रुपये मिळाले होते! जया बच्चन यांना सर्वात कमी ३५ हजार इतकं मानधन मिळालं. अमिताभने साकारलेली जयची भूमिका शत्रुघ्न सिन्हा साकारणार होता. परंतु, आपण रमेश सिप्पी यांना अमिताभ यांचं नाव सुचवलं. असे धर्मेंद्रने 'आपकी अदालत' या कार्यक्रमात एकदा सांगितलं.

मिनर्व्हात शोले पाहण्याच्या छोट्या छोट्या आठवणी अनेक!

वीरु (धर्मेंद्र) आणि जय (अमिताभ बच्चन) यांच्यात नाणेफेक करायचे ठरते. छापा की काटा! नाणे हवेत उडवले जाते आणि आपल्या जवळपासच ते कुठे तरी पडलयं असा मिनर्व्हातील १४९९ प्रेक्षकांतील प्रत्येकाला तसे वाटते. तसा फिल येई.

त्या दिवसात मिनर्व्हात 'शोले' अनुभवणारा प्रत्येक जण अशा अनेक दृश्यांचा थरार कसा होता हेच एकमेकांना सांगत असे! याचाच अर्थ, चित्रपटाच्या गोष्टीवर तासनतास बोलणारा भारतीय प्रेक्षक चित्रपटाच्या तांत्रिक गोष्टीने प्रभावित होत आता त्यावर बोलू लागला!

मित्रांनो.. "शोले" हा भारतातील पहिला "७० एम एम" नाहीय.. तर.. पांछी दिग्दर्शित १९६८ सालचा

'अराऊंड द वर्ल्ड ' हा आपल्याकडचा पहिला सत्तर एमएमचा चित्रपट असला.. तरी तो अपयशी ठरला!

याच सत्तर एमएमच्या तीन पूर्णांक चार चतुर्थांश पट पडद्यावर चित्रपट पाहण्याच्या युगात आपण आज म्हणजे २०२५ मध्ये आहोत!

आपल्या देशात "सोळा एमएम" (गल्ली चित्रपट, टूरिंग टॉकीज, तंबू थिएटर्स), "पस्तीस एमएम" (जुनी सिंगल स्क्रीन थिएटर्स) आणि "सत्तर एमएम"(मूळ इंग्रजी चित्रपटांची आणि काही वातानुकूलित थिएटर्स) या परंपरेपासून आपण आता बरेच पुढे चाललोय!

पस्तीस एमएमचा पडदादेखिल त्यापेक्षा आठ पूर्णांक तीन चतुर्थांश पट झाला आहे! आज देशातील अनेक लहान मोठ्या शहरांत "मल्टिप्लेक्स संस्कृती" रुजलीय आणि त्यातील आयमॅक्स "फॉरमॅट" या पठडीतील आहे. ही नवीन संस्कृती आपल्या देशात

येऊन चक्क दहा वर्षं झालीदेखिल. आणि त्यातील पहिला चित्रपट होता, 'धूम तीन' (२०१३). आणि तेव्हा आपल्या देशातील तेवीस चित्रपटगृहात तसा 'स्क्रीन' होता. आज दशकभरानंतर देशातील अनेक "मल्टिप्लेक्समध्ये आयमॅक्स कल्चर" आहे. जगातील पहिले "आयमॅक्स" थिएटर युरोपमधील "टोरॅन्टो" शहरांत १९७१ सालीच सुरु झाले. जगातील अनेक चित्रपटसृष्टीत आधुनिक तांत्रिक प्रगती आणि प्रभाव याचा विचार आणि स्वीकार झाला. म्हणूनच विदेशात सर्वप्रथम सत्तर एमएम, थ्री डी (त्रिमिती चित्रपट), मल्टिप्लेक्स, ओटीटी अशी नवीन माध्यमे आली आणि रुजली! आणि त्यानंतर आपल्या देशात त्यांचा हळूहळू उगम झाला. याचं एक कारण, आपल्या देशातील हिंदी असो अथवा मराठीसह अनेक प्रादेशिक भाषेतील चित्रपट असो, आपल्या प्रेक्षकांना 'चित्रपटात गोष्ट पाह्यला आवडते.

आता आपण एक प्रकारे "तांत्रिक" युगात आहोत. ऑनलाईन आयुष्यात आहोत.! आणि चित्रपटातील तांत्रिक प्रभाव आपण कधी स्वीकारला हे आपल्यालाच समजले नाही. आज अनेक चित्रपट आपण सहजपणे थ्रीडी स्वरुपात "एन्जॉय" केले! त्यालाही आपण सरावलोय.

पन्नास वर्ष पूर्ण होवूनही "शोले" च्या गोष्टी संपत नाहीत हेदेखील यशच! जगभरातील कोणत्याच भाषेतील चित्रपटाबाबत असे घडलेले नाही! ते भारतीय चित्रपटसृष्टीतील, चित्रपटाने घडवलेय. शोलेच्याच स्पर्धेत त्याच दिवशी प्रदर्शित झालेल्या "गरीबी हटाव " या चित्रपटाचे आज जराही अस्तित्व नाही. १९७३ साली सेन्सॉर संमत झालेला हा चित्रपट नेमका १५ ऑगस्ट १९७५ रोजीच पडद्यावर आला इतकेच! तो आता "यू ट्यूब" च्या माध्यमातून उपलब्ध झालाय, हीच जमेची बाजू! अन्यथा "हरी हरी!"

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र, १७ ऑगस्ट २०२५ वरुन साभार)
♥

लेख क्रमांक : १६

"मुघल ए आझम", "दीवार", "शोले" व "क्रांतीवीर" आणि बरेच काही! एकेका "डायलॉगलाच" टाळ्या आणि शिट्ट्या...!!

चित्रपट पाहता पाहता तो ऐकण्यातही भारतीय चित्रपट रसिकांना कायमच रस!

१९७५ च्या उत्तरार्धातील एक गोष्ट सांगतोय ती नक्की ऐका!

मित्रांनो! अनेक ठिकाणी एकाद्या सणासुदीला अथवा काहीही कारण नसतानाही "लाऊडस्पीकर" लागलाय वा मोठ्याच आवाजात "टेपरेकॉर्डर" लावलाय ही मोठ्ठी गोष्ट होती.. ते दिवस! चित्रपटाच्या "संवाद" (डायलॉग्ज) याचा.. एक खास "फॅन्स"चा जणू "क्लब" होता, म्हणाना! ते "डायलॉग्ज" तर काय!?

"इसलीये के.. लोहा लोहे को काटता है...!"

"यहा से पचास पचास कोस दूर.. गाव में.. जब बच्चा रोता है तो माँ उसे कहती हैं के बेटे सो जा .....सो जा नहीं तो गब्बरसिंग आ जाएगा ...!"

"देखो छमिया,जादा नखरे मत करो ! नही तो ये तेरी गोरी चमडी है नं? सारे बदन से खुरज खुरज कर उतार दूंगा, समझी?..

"बहुत याराना लगता है ...."

जसजसे डायलॉग पुढे जातात तसतशी ते ऐकायला गर्दी वाढत वाढत जाते! सगळे आजूबाजूचे वातावरण विसरुन हा प्रत्येक "डायलॉग" मनापासून ऐकतोय. बरं हे कालपरवाही त्याने ऐकलयं आणि उद्या परवा आणि त्यानंतरही ते हे धारदार संवाद ऐकणार आहेत...

एव्हाना तुमच्या लक्षात आले असेलच की रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५)चे हे जबरा डायलॉग आहेत. या चित्रपटाच्या खणखणीत यशात

अनेक लहान मोठ्या गोष्टींसह सलिम जावेद यांचे धारदार संवाद, ते सादर करण्यातील प्रत्येक व्यक्तीरेखेतील कलाकाराची पध्दत आणि खास करुन "थिएटर", तेही "मिनर्व्हा" मग काय!?"

थिएटरमधील "सत्तर एमएम"चा तो भव्य पडदा आणि "स्टिरिओफोनिक साऊंडचा" यांचा वाटा होता! आणि "लाऊडस्पीकर" अथवा "कॅसेट्स"वर!

एकेक "डायलॉग" ऐकताना "गब्बरसिंग" वगैरे एकंदर सगळेच डोळ्यासमोर येत असत!...पिक्चर असाही दिसतो, असाही आपल्यापर्यंत पोहचतो! हे नक्कीच! "पंढरपूर"च्या यात्रेदरम्यान.. त्या काळात "शोलेचे" डायलॉग तिथले लोक केवळ "लाऊडस्पिकर"वर लागलेला तो आवाज.. समोर बसून ऐकताहेत, हे मी डोळ्यांनी पाहिलेय!

"पिक्चर" पब्लिकला आवडला आणि मग त्याचे "डायलॉग" असे काही "सुपर हिट" ठरले की त्याची चक्क "तबकडी" प्रकाशित करण्यात आली. (आणि ती अक्षरशः गाजली.) त्याचीही खरंच "विक्रमी विक्री" झाली, हे विशेष! पिक्चर सुपर हिट झाले की त्याला कोणीच थांबवू शकत नाहीत ते हे असे!

हिंदी चित्रपटातील "डायलॉग" गाजण्याची परंपरा तशी खूपच मोठी! पण कालांतराने दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपट "हिंदीत" डब होऊन पडद्यावर आले तेव्हाही ते गाजू लागले...!

'पुष्पा'चा "झुकेगा नहीं साला..."! राजकारणा पासून "इव्हेन्टसपर्यंत" आणि नंतर "जाहिरातीपासून रिॲलिटी शोपर्यंत" सगळीकडे गाजला!

चित्रपट हे दृश्य माध्यम असले, "कॅमेरा" आपल्याला चित्रपट दाखवत असला तरी आपल्या देशात ते प्रामुख्याने संवाद माध्यम म्हणून जणू

विकसित होत गेले. चित्रपट पाहताना ते जास्त ऐकला जातो असे म्हणता येईल!

"नाटक" माध्यमातून चित्रपट माध्यमात असा प्रवास असल्याने सुरुवातीच्या काळातील अनेक चित्रपट जणू "नाटक" म्हणून चित्रीत केले आहे असे वाटतात. आणि त्या काळात संवादही लांबलचक असत. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तिरेखा बोलेल त्याप्रमाणे 'चित्रपटाची गोष्ट' प्रेक्षकांना समजेल अशी भावना होती आणि ती त्या काळाशी सुसंगत होती.

पूर्वी म्हणूनच अनेक कलाकारांचे संवाद रसिकांना आवडत, ते पाठ केले जात, ते ऐकण्यासाठी पुन्हा एकदा सिनेमा थिएटरची वारी केली जाई. राज कपूर, दिलीप कुमार आणि देव आनंद यांच्या दिसण्या बोलण्यावर त्यांचे चाहते फिदा होते. "सोहराब मोदी" यांचे केवळ संवाद ऐकण्यासाठी अगदी दृष्टीहीन प्रेक्षकही 'पुकार ' चित्रपट पाह्यला जात याची पूर्वी

नेहमीच चर्चा व्हायची. याबाबत कथा/दंतकथा प्रचलित आहेत.

के. असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम'

(१९६०) मधील संवादानाही रसिकांची अतिशय उत्तम दाद मिळाली.

एका प्रसंगात अकबर (पृथ्वीराज कपूर) सलिम (दिलीप कुमार) याला उद्देशून म्हणतो, "हम एक लाडले बेटे के बाप जरुर है, लेकिन अपने बेटे के धडकते दिल के लिए, हम हिंदुस्तान की तकदीर नहीं बदल सकते."

यावर सलिमही तितक्याच परखडपणे आपल्या पिताजीना सुनावतो, "तकदीरे बदल जाती है। जमाना बदल जाता है, मुल्लो की तारीख, इतिहास बदल जाता है, शहेनशहा बदल जाते हैं, मगर बदलती दुनिया में मुहब्बत जिसका दामन थाम लेती है वो इन्सान नहीं बदलता...." थिएटरमध्ये टाळ्यांचा कडकडाट व्हायचा!

यश चोप्रा दिग्दर्शित 'वक्त' (१९६५) मधील राजकुमारची व्यक्तिरेखा जोरदार संवादाने 'कडक'



ठरली. "चिनॉय सेठ, यह बच्चो के खेलने की चीज नहीं, हात कट जाए तो खून निकल आयेगा..." हा संवाद गाजला.

या जबरदस्त प्रतिसादामुळे काय झालं तर राजकुमार आपली व्यक्तिरेखा विसरुन फक्त आणि फक्त डायलॉगबाजीवर लक्ष देऊ लागला. आणि त्याला मग वाटू लागले की, प्रेक्षक चित्रपट पाह्यला नव्हे तर आपल्याला पडद्यावर पाह्यला तिकीट काढतात.... कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल पण 'बुलंदी' या चित्रपटातील त्याचा 'इरादा पैदा करो



"इरादा. इरादे से आसमान का चांद भी इन्सान की कदमो मे सजदा करता है.." हा जोरदार संवाद "इम्पिरियल" थिएटरच्या भिंतीवर लिहिला होता आणि तो वाचून तिकीट काढले जाई.

त्या काळात अशा संवाद लेखनावर विशेष लक्ष दिले जाई, याचे कारण म्हणजे पब्लिक कलाकाराच्या भावमुद्रेपेक्षा (एक्प्रेशन) त्याच्या बोलण्यावर जास्त लक्ष केंद्रित करीत. त्यांना तेच जास्त आवडे! विशेष म्हणजे फार पूर्वी आपल्याकडे थिएटरची "साऊंड सिस्टीम" म्हणावी तशी प्रगत नव्हती तरीही हे "डायलॉग" पब्लिक समरसून ऐकायचा आणि अनेक जण तर आवडत्या डायलॉगसाठी पुन्हा एकदा थिएटरची वारी करीत.

राज कपूर दिग्दर्शित "बॉबी" (१९७३) मधील "प्रेम नाम है मेरा... प्रेम चोप्रा!" हा डायलॉग असा काही गाजला की प्रेम चोप्राने आपल्या आत्मचरित्राचे

तेच नाव ठेवले आणि त्या नावाने मराठी रंगभूमीवर नाटकही आले!

मेहुलकुमार दिग्दर्शित "क्रातीवीर" चेही डायलॉग असेच प्रचंड टाळ्या व शिट्ट्यांनी डोक्यावर घेतले.

"ये मुसलमान का खून, ये हिंदू का खून....बता इसमें मुसलमान का कौनसा, हिंदू का कौनसा... बता..."

"आ गये मेरे मौत का तमाशा देखने.....!"

"उपरवाला भी उपर से देखता होगा तो उसे

शर्म आती होगी... सोचता होगा मै ने सबसे खुबसूरत चीज बनाई थी इन्सान!.... नीचे देखा तो सब कीडे बन गये है...कीडे..! "

"हम भले ही उपरवाले को अलग अलग नाम से पुकारते है...लेकिन हमारा धरम एक है, मजहब एक है.... इन्सानियत!"

"कुत्ते...कुत्ते की तरह जीने की आदत पड गयी है सबको...! "

"तुमसे तो वो वेश्या अच्छी होती है, जो बेचती जरुर है, मगर अपना जिस्म बेचती है....अपने देश की आत्मा को, अपने ईमान को नहीं बेचती..!

"क्रांतीवीर"!! चक्क एकतीस वर्ष पूर्ण झाली देखिल, तरी या जोरदार शोरधार संवादाचा आवाज कानात घुमतोय. अधूनमधून सोशल मिडियात त्याचे भाग व्हायरल होताहेत.

"क्रांतीवीर" वेगळ्याच सामाजिक वातावरण निर्माण झाला. ६ डिसेंबर १९९२ रोजीचे उत्तर प्रदेशातील अयोध्येतील बाबरी मशीदी प्रकरण, त्याची देशातील विविध भागात उमटलेली प्रतिक्रिया, हिंदू व मुसलमान यांच्यातील संघर्ष, जानेवारी १९९३ त मुंबईत झालेली जातीय दंगल, १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेले बारा साखळी "बॉम्बस्फोट", या सगळ्यातून सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम वातावरणात तणाव निर्माण झाला होता. आणि त्याची विविध माध्यमातून प्रतिक्रियाही उमटत होती. त्याचाच एक भाग म्हणून! नाना पाटेकरमध्येही एक आजूबाजूच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय

गोष्टींवर जळजळीत भाष्य करणारा जागरुक माणूस. "क्रांतिवीर" मधील "प्रताप नारायण टिळक" हा त्याला मोठाच प्लॅटफॉर्म मिळाला. "त्याने जणू अख्खा पिक्चर ताब्यात घेतला" आणि तो सुसाट वेगात बोलत सुटला.....!

याच चित्रपटात डॅनी डेन्झोपाचा एक डायलॉग आहे.. "हम तुम्हे ऐसे जलाऐंगे की तेरे चाहनेवालो को गंगा में बहाने के लिए तेरी राख भी नसीब नही होगी.."

ह्षिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' (१९७१) मधील संपूर्ण चित्रपटभरची राजेश खन्नाची अखंड प्रचंड बकबक म्हणजे मुक्त "डायलॉगबाजी" आहे. आणि त्यात जास्त गाजला!

"बाबू मोशाय, जिंदगी और मौत उपरवाले के हात मै है जहा पनाह, उसे ना आप बदल सकते हैं ना मे, हम सब तो रंगमंच की कठपुतलीया है जिनकी

डोर उपरवाले की उंगलियो में बंधी है, कौन कब कैसे उठेगा यह कोई नहीं बता सकता...." हा भावपूर्ण



संवाद 'आनंद' चित्रपटाचे सार आहे, ओळख आहे आणि राजेश खन्नाने तो आपल्यातील अभिनय गुणाचा प्रत्यय देत तो पडदाभर साकारला. राजेश खन्नाच्या निधनाचे वृत्त देताना प्रसार माध्यमात हा संवाद आवर्जून दिला गेला. हा संवाद एक प्रकारची राजेश खन्नाची जणू ओळख झाली होती. "मै मरने से पहले मरना नहीं चाहता, जिंदगी बडी होनी चाहिए लंबी नहीं.." असे 'आनंद 'मधले राजेश खन्नामय झालेले अनेक लहान मोठे संवाद गाजले.

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३) मधील अमिताभ बच्चनने प्राणला उद्देशून म्हटले...



"यह पुलीस स्टेशन है तुम्हारे बाप का घर नहीं.... " या संवादाने अमिताभला स्टार केले.

यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार' (१९७५) मधील विजय (अमिताभ बच्चन), त्याचा भाऊ "रवि" (शशी कपूर) आणि त्यांची आई (निरुपा रॉय) यांच्यातील 'डायलॉगबाजी' अतिशय नाट्यमय अशी आहे. अगदी छोट्या छोट्या संवादाचा प्रभाव कायम होता!

"मेरे पास मा है....! " हे इतक्या भावपूर्णरित्या व्यक्त होते की त्यातून संवादाची ताकद आणि महत्व



लक्षात येते. 'दीवार 'च्या डायलॉगची तबकडी प्रकाशित होणं स्वाभाविक होतेच.

"जाओ पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरे बाप को चोर कहा था, पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरी मां को गाली दे के नौकरी से निकाल दिया था, पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरे हाथ पर ये लिखा था ...ये ....उसके बाद मेरे भाई तुम जहाँ कहोंगे मै साईन कर दूंगा...." 'दीवार 'चा हा आणखी एक गाजलेला डायलॉग आणि 'दीवार 'ने निर्माण केलेल्या

वातावरणात 'शोले' पडद्यावर आला आणि नवीन पर्व सुरु झाले.

यश चोप्रा दिग्दर्शित 'त्रिशूल', मनमोहन देसाई दिग्दर्शित 'अमर अकबर ॲन्थनी', टीनू आनंद दिग्दर्शित 'शहेनशहा', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सागर' अशा अनेक चित्रपटांचे संवाद गाजले आपल्या देशात चित्रपट ऐकायलाही प्रेक्षकांना आवडत असते. त्याचा कालांतराने फिल्मवाल्यानाच विसर पडला. अधूनमधून 'सिंगम' सारख्या काही चित्रपटातून काही डायलॉग टाळ्या वसूल करत.

'केजीएफ २' ने तीच सुपर डायलॉगबाजी प्रेक्षकांसमोर आणली आणि टाळ्यांचा प्रतिसाद मिळू लागला. (ती हिंदीमध्ये "डब" केलेली असूनही!)
"अपने को इतिहास पे भरोसा नहीं है..."
"होता है कुछ और है तो लिखवाते कुछ और है..."
"कही सुनी बातें मत लिखना..."

"खुद अपनी आँखो देखी लिखना..."

"उसमें एक वजन होता है..."

"मैं हमेशा जंग टालने की कोशिश करता हूं,

"लेकिन जंग हुई तो जीतूंगा तो मैं ही..."

"कुछ लोग गुलाम बनके ही सही, सौ साल जीना चाहते हैं..."!

"लेकिन कुछ लोग एक दिन जिए तो सुल्तान की तरह जीना चाहते हैं..."

"केजीएफ खून से लिखी हुई कहानी है, स्यायी से नहीं बढेंगी..."

"अगर आगे बढानी हैं तो फिरसे गोली मांगेगी..."

....हिंदी चित्रपटात पुन्हा 'हुकमी डायलॉग' ऐकू आलेच तर ते हवेच आहेत. पण "ग्लोबल युगात" हिंदी चित्रपटाची पटकथा इंग्रजीत लिहिली जात असल्याने हिंदी डायलॉग लिहिणे जास्त कष्टाचे काम.

राजकुमारचे काही गाजलेले संवाद :

"जब राजेश्वर दोस्ती निभाता है तो अफसाने लिक्खे जाते है और जब दुश्मनी करता है तो तारीख बदल जाती है..! (चित्रपट 'सौदागर')

"न तलवार की धार से न गोलियों की बौछार से बंदा डरता है सिर्फ परवरदिगार से!.." (चित्रपट "तिरंगा"!) "हम अपने कदमों की आहट से हवा का रुख बदल देते है...!" (चित्रपट "बेताज बादशाह") .... असे खास राजकुमार शैलीचे डायलॉग ही त्याची ओळख झाली आणि राजकुमारसाठीच असे संवाद लिहिले जाऊ लागले तसेच राजकुमारची डायलॉग

बाजी पिक्चर हाऊसफुल्ल करु लागली! किती आठवणी सांगू?! ग्रेट! ग्रेट!

प्रभावी बोलणं हा अभिनयातील महत्वाचा भाग. ज्याला तो जमला अथवा साध्य झाला तो यशस्वी ठरला आणि त्यांचे काही संवाद गाजले. तर ज्याना शब्दाची ताकद समजली अथवा पेलली नाही अथवा वाक्य काय ते समजलेच नाही ते निष्प्रभ ठरले. महत्वाचे म्हणजे, रसिकांना कोण कसे बोलतयं हे चांगले समजत असतेच. ते एकाद्या संवादाला उगाच टाळ्या शिट्ट्या हंशा देत नाहीत.

हिंदी चित्रपटाच्या वाटचालीत संवाद लेखक खूप झाले. त्यात गुलजार, सलिम-जावेद (सलिम खान आणि जावेद अख्तर), कादर खान यांच्या संवादांचा जनसामान्यांवर जास्त प्रभाव पडला. यांनी अनेक चित्रपट ऐकण्यासारखेही केले. हिंदी चित्रपटातील काही गाजलेल्या डायलॉगची ही झलक!

"किसी बडी खुशी के इंतजार मे हम ये छोटी छोटी खुशियों के मौके खो देते है..." ('बावर्ची' या चित्रपटात राजेश खन्ना)

"हम जहां खडे होते हैं लाईन वही से शुरु होती है ('कालीया' मध्ये अमिताभ बच्चन).

"ये फुलो के साथ साथ दिल कब से बेचना शुरु कर दिया है.. " ('कश्मीर की कली' या चित्रपटात "प्राण"!)

म्हटलं ना चित्रपट हे दृश्य माध्यम असले तरी आपल्या देशात ते प्रामुख्याने संवादाचे माध्यम म्हणून रुजले आणि अगणित विशेष संवादाना, विशिष्ट संवाद शैलीला उत्तम लोकप्रियता मिळाली. अगदी काळ बदलला तरी डायलॉगबाजीची किमया कायमच राहून लाईक्स मिळू लागल्या.... "शोले" पन्नास वर्ष सेलिब्रेशन मुंबईत रिगल चित्रपटगृहात असो वा इटलीतील भव्य चित्रपटगृहात भारी प्रतिसाद त्याच्या

डायलॉगना मिळाला....टाळ्या, शिट्याच सांगतात, "कितने आदमी थे...!? "

© दिलीप ठाकूर
("रविवार राम प्रहर", २६ जुलै, २०२५ वरुन साभार)

♥

<u>लेख क्रमांक : १७</u>

<u>"शोले " प्रदर्शित झाल्याचा दिवस....</u>

"शुक्रवार १५ ऑगस्ट १९७५!"
असं म्हणताक्षणीच चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर हमखास येते, जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" प्रदर्शित झाल्याचा दिवस....!

तो दिवस म्हणजे.. माझे शालेय वय! तेव्हाच्या अभ्यासक्रमात १०+२+३ अशा नवीन शिक्षण पध्दतीनुसार मी दहावीची शालांत परीक्षा उत्तीर्ण

होऊन आता गिरगावातील "हिंद विद्यालय हायस्कूल" मध्ये अकरावीत होतो. ("वय अवघे पंधरा!") याच वर्षी २४ जानेवारी १९७५ रोजी गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" प्रदर्शित होवून वातावरणात बदल होत होता! मुंबईत मेन थिएटर "मिनर्व्हावर" कधीही पहावे तर "हाऊसफुल्ल" गर्दी! आजच्या "ग्लोबल युगातील" "डिजिटल" पिढीला कदाचित आश्चर्य वाटेल, त्या काळातील आम्हा चित्रपट रसिकांच्या ("फिल्म दीवाने") विशेष सवयी होत्या! नवीन चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या पहिल्याच दिवशी "मेन थिएटर" वर कुतूहल वा उत्सुकता म्हणून का होईना.. चक्कर मारुन थिएटर डेकोरेशन पाहणे, आगाऊ तिकीट विक्रीच्या चार्टवर आवर्जून नजर टाकणे, काळा बाजारातील (ब्लॅक मार्केटमधील) तिकीटांचा चढता दर ऐकणे.. (अर्थात कानोसा घेणे!), पण आम्हा

मध्यमवर्गीयांना याच ब्लॅक मार्केटमध्ये "पिक्चरचं तिकीट " घेणे तात्विकदृष्ट्या पटत नसे. खरं सांगायचं आम्हां मुलांना तर परवडत सुद्धा नसे! त्यातच असे तिकीट घेताना कोणी पाहिले तर याचा सामाजिक दबाव! ते दिवसच वेगळे होते!

"शोले" नावाचा एक जबरदस्त मोठा "सिनेमा" येतोय, हे केव्हाच लक्षात आलं होतं! तिथला "दीवार" सारखा "सुपरहिट" सिनेमा बाजूला करत हा "चित्रपट" येतोय, म्हणता.. आश्चर्य वाटणे स्वाभाविकच होते हो!

(आम्ही आगामी "चित्रपट" म्हणून "मिनर्व्हा" थिएटर मध्ये "शोले" ची लागलेली "पोस्टर्स" पाहून आमच्या वयोमानात असलेले जवळजवळ सर्वच जण अतिशय उल्हासित झालेलो होतो खरे! पण खरं सांगू! तिथे प्रदर्शित केलेले काही "फोटोज्" पाहता.. त्यामधून "दृगोचर" होणारी ती काहीशी "हिंसक"

किंवा "अती" आक्रमकता पाहून मनोमन खूपच धास्तावलेलो.. कारण "फिझुल" आहे, असे तुम्हाला "आत्ता" वाटतेय हो! पण आम्ही अक्षरश: "कन्फ्युजलेलो"! का?? आमच्या मनात हीच भिती होती.. "हा चित्रपट "केवळ प्रौढांसाठी".. असा तर नसेल ना? कारण आमचे "अवघे पंधरा वर्षे वयोमान" पाहता ते स्वाभाविकच होते! कारण? आम्हाला पालकांनी असा "केवळ प्रौढांसाठी" असलेला हिंसक सिनेमा पहायची परवानगीच दिली नसती.

तसे सत्तरच्या दशकाच्या पूर्वार्धातील ते दिवस होते. गिरगावात लहानाचा मोठा होत होत जाताना दक्षिण मुंबईतील कुलाब्यातील "स्ट्रॅन्ड" थिएटरपासून ताडदेवच्या "डायना" थिएटरपर्यंत पिक्चर पाहणे होत होते (त्याच "लाईव्ह" अनुभवावर कालांतराने मी "टॉकीजची गोष्ट" हे पुस्तक लिहिले होते बरं!)

अशातच ३० मे १९७५ रोजी प्रदर्शित झालेल्या "सतराम रोहरा" निर्मित "जय संतोषी माँ" ची लोकप्रियता प्रत्येक दिवसागणिक वाढतच. "खेतवाडी नाक्यावरच्या अलंकार चित्रपटगृहात" मॅटीनी शोला कायमच हाऊसफुल्ल गर्दी असे! महिलावर्ग तर या चित्रपटाने भरवूनच गेलेल्या! त्या आपली पादत्राणे चक्क "अलंकार" थिएटरबाहेरच काढून "भक्ति भावाने" आत प्रवेश करायच्या! महिलांनी दर शुक्रवारी करायचे असे "संतोषी माता" व्रत करणे सुरू केले होते. (लक्षात घ्या! कोकणातील समस्त मंडळी "शुक्रवारी" नित्यनेमाने "सामिष" आहार घेत असतात, हे आपण जाणताच! पण आता घरातली "स्त्री/महिला".. त्या दिवशी "कडक व्रत/उपवास" करतेय म्हणता, त्या दिवशी "आंबट" नसलेले भोजन घरचे सगळे आनंदाने खात असत! भक्तिभावाने "चणे आणि गुळ" हा प्रसाद म्हणून "प्राशन" करत

असत! घराजवळ नव्यानेच स्थापन झालेल्या "संतोषी मातेच्या" मंदिरात "दर्शनाला" जात असत! त्या काळात महिलांचे "भिशी" नामक "ग्रुप" असायचे! त्या महिलांचा "ग्रुप" हमखास या "चित्रपटाला" गर्दी करायचे!

अशातच मुंबईतील विद्‌युत खांब, बेस्ट बसची मागची बाजू, रेल्वेस्थानक येथे "शोले"ची पोस्टर्स दिसू लागली! मोक्याच्या ठिकाणी भव्य "होर्डींग्स" लागली. हे पाहण्यातही त्या काळातील माझ्यासारखे असंख्य "फिल्म दीवाने" विशेष रस घेत. "रेडिओच्या विविध भारतीवर" रविवारी पंधरा मिनिटाचा "शोले" चा रेडिओ कार्यक्रम लागे! एव्हाना गाण्याची "तबकडी" (एल. पी. रेकॉर्ड") बाजारात आली होती. "लाऊडस्पिकर" वाल्यांनी ती रेकॉर्ड.. "वाढदिवस, मुंज, साखरपुडा, लग्न.." अशी सगळीकडे वाजवली! मामला चांगलाच "गरम" झालेला!

...आणि या सगळ्यात कुतूहल होते ते, "शोले" चे "सत्तर एम.एम" असणे! "मिनर्व्हा" मधले ते नवे "स्क्रीन मेकिंग", त्याचे "अर्धवर्तुळाकार" असणे.. वगैरे वगैरे! भरीस भर म्हणून तो "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" असा उल्लेख असणे! त्या काळात चित्रपटविषयक माहिती पुरवणे, जिज्ञासा पूर्ण करणे यासाठी मराठीत एक "रसरंग" नावाचे मस्त साप्ताहिक असे! त्यातून समजले की अभिनेता ओम प्रकाश याचा भाऊ "पांछी" याने दिग्दर्शित केलेला "अराऊंड द वर्ल्ड " (दुनिया की सैर. १९६७) हा हिंदीतील पहिला सत्तर एम.एम चित्रपट होता!

घरी येत असलेल्या लोकसत्तात "ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात" जाहिरात आली, १५ ऑगस्टपासून "शोले"! त्याखाली "मिनर्व्हा" व "न्यू एक्सलसियर" थिएटरमध्ये सत्तर एम.एममध्ये... तर

गीता (वरळी) इत्यादी चित्रपटगृहात "पस्तीस एम.एम." हे कुतूहल वाढवणारे होते!

त्या काळातील जणू पध्दतीनुसार १५ ऑगस्ट रोजी आम्ही खोताची वाडीतील "फिल्म दीवाने" दुपारी दोनच्या सुमारास मिनर्व्हावर गेलो. मिनर्व्हावरचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचे "शोले" चे भव्य दिमाखदार (करायचे ते दणक्यात.. टाईप!) "डेकोरेशन" पाहून खरोखरच डोळे दिपले! आजही ते तसेच डोळ्यासमोर आहे! बरोब्बर मध्यभागी ठाकूर बलदेवसिंगच्या (संजीवकुमार) कैचीतील गब्बरसिंग (अमजद खान) हे विशेष लक्षवेधक! आगाऊ तिकीट विक्रीच्या चार्टवर संपूर्ण आठवड्याची तिकीटे संपल्याचे दिसले. तिकीट दर पाहून मात्र आश्चर्य वाटले. "अप्पर स्टॉल" चार रुपये चाळीस पैसे आणि बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे. आमच्या गिरगावातील सेन्ट्रल थिएटरला अथवा

रॉक्सी, इंपिरियल, सुपर तेव्हा "स्टॉल" एक रुपया पासष्ट पैसे अशा दरात पिक्चर पाह्यची सवय (खिशात तेवढेच असत. पाच दहा पैशांची नाणी खुळखुळत). तुलनेत "शोले" चे तिकीट दर फारच जास्त वाटले....

त्या काळातील मुद्रित माध्यमातील चित्रपट समीक्षकेबद्दल विश्वासार्हता असे. त्याचा हुकमी वाचकवर्ग होता. सगळ्यांनीच "शोले" ला चक्क झोडपले. अती हिंसाचारी चित्रपट, लांबी जास्त आहे, सूडकथेत नाविन्य नाही असाच सूर होता....!

पहिल्या आठवडय़ात "शोले" पडला पडला अशीच हवा होती. त्यानंतर तो असा काही उठला की माझ्या मते आजही तो सुरुच आहे! आज मिनर्व्हाची इमारत केव्हाच पाडलीय पण आजही तेथून जाताना गब्बरसिंगची डरकाळी ऐकू येते, कितने आदमी थे....

"न्यू एक्सलसियर" थिएटरमधून दोन आठवडय़ात "शोले" ची सत्तर एम.एमची प्रिन्ट अन्य

शहरात गेली. मुंबईत फक्त आणि फक्त मिनर्व्हात "शोले" सत्तर एम.एम होता आणि त्याची भव्यता व "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" अनुभवणे एक थरार अनुभव असे. त्या काळात गावाकडचे कुटुंबिय, परिचित सुट्टीत मुंबईत आपल्या नातेवाईकांकडे येत तेव्हा त्यांना गेट वे ऑफ इंडिया, मलबार हिल, राणीचा बाग, गिरगाव चौपाटी अशी अनेक स्थळे दाखवतानाच मिनर्व्हात "शोले" दाखवायची सामाजिक सांस्कृतिक परंपराच होती. एक चित्रपट समाज असा व्यापून टाकतो!

"शोले" आपल्या देशातील एक लोककथा झाला. "शोले" न पाहणारा माणूस मिळणे मुश्कील होते. "शोले" न आवडणारे अनेक भेटत. वादही घालत. पण मी "शोले" तील छोटे छोटे संदर्भ देत देत बाजी मारणार हे ठरलेलेच. चित्रपट अभ्यासक्रमात "शोले" महत्वाचा. त्याच्या जोरदार संवादाची

ध्वनिमुद्रिका व ध्वनिफीत प्रकाशित झाली आणि मला आठवतय रस्तोरस्ती ती ऐकण्यातही गर्दी होई.

"शोले" बद्दल अनेक गोष्टी, कथा, किस्से, दंतकथा प्रसिद्ध होत राहिल्यात. जगात असे याच एकमेव चित्रपटाबाबत असे घडले आहे. म्हणूनच "आपला चित्रपट" आपल्याला प्रिय.

....मी मिडियात आल्यावर नव्वदच्या दशकात "जमाना दीवाना" (१९९५) च्या निमित्ताने दिग्दर्शक "रमेश सिप्पी"च्या मुलाखतीचा मला योग आला. खार पश्चिमेला सिप्पी फिल्मचे ऑफिस होते. "लोकसत्ता" च्या रंगतरंग पुरवणीसाठी ही मुलाखत घेताना पहिलाच प्रश्न "शोले" वरच केला आणि मग बरीचशी मुलाखत "शोले" भोवतीच रंगली...

आज "शोले" पन्नासाव्या वर्षांत पदार्पण करीत असतानाही त्याबाबतची उत्सुकता अजिबात कमी झालेली नाही हे तर केवढे मोठे यश. "शोले" च्या

स्पर्धेत त्याच शुक्रवारी म्हणजे १५ ऑगस्ट १९७५ रोजी "गरीबी हटावो" नावाचा छोटा चित्रपट प्रदर्शित झाला. शालिमारला मॅटीनी शोला होता तो. तो चित्रपट कोणाला का बरे आठवेल? आणि "शोले" चा विसर पडणेही शक्य नाही... माझ्या पिढीतील हा सर्वाधिक लोकप्रिय चित्रपट आहे.

@ दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया १५ ऑगस्ट २०२४ वरुन साभार)

<u>लेख क्रमांक १८</u>

<u>हातातून गब्बरसिंग निसटला, रणजीत नाही हळहळला..?</u>

(अभिनेते "रणजीत"! (जन्म : १२ सप्टेंबर, १९४२) हे नाव भले आमच्या पिढीला माहीत असले तरी आत्ताच तरुण झालेल्या पिढीला, हे "अभिनेते" माहीत असतील, असे नाही! याच मानसिकतेतून केवळ "तरुण" पिढीतील "अभ्यासकांसाठी" त्यांची "बायोग्राफी" देतोय! ते अत्यंत व्यस्त असे "खलनायक आणि सहनायक" होते! या माहितीसह.. या लेखाची सुरुवात करतोय! आमचे सन्मा. जिव्हाळ्याचे मित्र असलेले "श्री. संजीवजी वेलणकर" यांची "रणजीत" विषयी लिहिलेली ही "पोस्ट" नक्कीच पाहूया! धन्यवाद!)

🌹

आज १२ सप्टेंबर ! आज ज्येष्ठ अभिनेते "रणजीत" यांचा वाढदिवस! ((जन्म.१२ सप्टेंबर १९४२ अमृतसर येथे!)

अभिनेता रणजीत यांचे खरे नाव "गोपाळ बेदी" असून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यासाठी नाव बदलले असल्याचे गुपित उलगडले. रणजीत हे नाव त्यांना बॉलिवूडमधील एका प्रसिद्ध अभिनेते सुनील दत्त यांनी दिले. ‘रेश्मा और शेरा’ या स्वत:च्या चित्रपटाच्या वेळी सुनिल दत्त यांनी "गोपाल बेदी" याचं नाव त्या चित्रपटातील कथेची पार्श्वभूमी विचारात घेऊन ‘रणजित’ असं ठेवलं.

रणजीत यांचे वडील द्वारकाप्रसाद हे जुन्या-पुराण्या मताचे आणि धार्मिक वृत्तीचे सद्गृहस्थ होते. त्यांची विद्युत उपकरणे बनवण्याची फॅक्टरी "दिल्ली" येथे होती व त्या व्यवसायात आपल्या मुलाने मदत करावी, अशी त्यांची इच्छा होती. चौघा बहीण-

भावंडांत मोठा असलेल्या रणजीत यांना खेळांमध्ये खूप गती होती. त्यामुळंच की काय, त्यांनी "नॅशनल डिफेन्स ॲलकॅडमी" ची प्रवेश परीक्षा आपल्या मित्राच्या नादाने दिली. रणजीत यांचे जेव्हा "एअरफोर्स कॅडेट" चं प्रशिक्षण चालू होतं तेव्हा ते प्रशिक्षण देणाऱ्या "अधिकाऱ्याच्या" मुलीच्या प्रेमातच पडले! आणि त्याचं हे "प्रशिक्षण" इथच थांबलं आणि रणजीत हे पुन्हा दिल्लीला गेले आणि तिथं त्यांनी एका "फुटबॉलच्या संघात" प्रवेश घेतला. दिल्लीत असताना रणजीत यांनी देव आनंद यांचा 'गाईड' आणि 'हम दोनो' हे चित्रपट किमान वीस ते पंचवीस वेळा पाहिले! देवसाहेबचा भक्त झालेल्या रणजीत यांनी "देव आनंद" यांच्या अभिनयाच्या सर्व लकबी आत्मसात तर केल्याच; पण त्या दोन्ही चित्रपटांतील संवाददेखील त्याला तोंडपाठ झाले आणि त्यामुळेच त्याला चित्रपटसृष्टी मोहित करू लागली! याच

सुमारास अमेरिकास्थित "रणबीर सिंग" नावाच्या गृहस्थांशी रणजीत यांचा परिचय झाला. रणबीरसिंग यांना हिंदी सिनेमात निर्माता म्हणून आपले बस्तान बसवायचे होते. त्यांनी स्वतःच्या 'जिंदगी की राहे' या चित्रपटात रणजीत यांना एक ट्रक-क्लिनरची भूमिका देऊ केली. ट्रकच्या चालकाच्या भूमिकेत होते अभिनेते जयंत. मात्र, हा चित्रपट घोषणेच्या पुढे सरकलाच नाही! तरीपण रणजीत यांचे व रणबीर सिंगचे संबंध अबाधित राहिले व मला मुंबई पाहायची आहे, असं सांगून वडिलांची परवानगी घेऊन त्यानं रणबीरसिंगांसमवेत मुंबई गाठली.

रणबीर सिंग ही बडी असामी असल्याने मुंबईच्या चित्रपटसृष्टीतील बरेचसे नामवंत कलाकार त्यांच्या माहितीचे होते! त्यामध्ये निर्माता दिग्दर्शक चेतन आनंद, सुनील दत्त, नर्गिस, राज कपूर यांचा समावेश होता. रणबीरसिंगांचा सहकारी, सहायक

अशा भूमिकेत हा रणजीत हे सतत त्याच्यासमवेत असल्याने या नामवंतांशी त्यांचाही परिचय झाला; पण कुणीही त्याला चित्रपटात घेण्याचं नावदेखील काढलं नाही. सकाळी उठून समुद्रावर सुनील दत्त यांच्यासमवेत पळायला जावं, सायंकाळी फिरोज खान, संजय या खान बंधूंसमवेत बॅडमिंटन खेळायला जावं आणि इतर वेळी रणबीर सिंगांच्या कार्यालयातील एका खोलीत मुक्काम टाकावा, असा दिनक्रम चालू होता! त्यातच एके दिवशी या इंडस्ट्रीत आपली काही डाळ शिजत नाही, हे उमगून येताच रणबीर सिंग आपला गाशा गुंडाळून मुंबई सोडून दिल्लीला आपल्या वडिलांच्या व्यवसायात सहभागी होऊन त्यांना मदत करायला गेले.

एक दिवस अचानक निर्माते-दिग्दर्शक मोहन सहगल यांनी आपल्या ‘सावन भादो’ या चित्रपटात रणजीत यांना एक भूमिका देऊ केली. मुहूर्ताचा शॉट

त्याच्यावर आणि चित्रपटाची नवीन नायिका रेखा गणेशन व नायक नवीन निश्चल या त्रयीवर घ्यायचा होता. रणजीत यांनी पूर्वतयारी केली, ती इतकी की, त्यांना स्वत:चे संवाद तर मुखोद्गत होतेच; पण रेखा, नवीन निश्चलचेही संवाद तोंडपाठ होते. सांगणे नको की, तो शॉट पहिल्याच टेकमध्ये ओके झाला. यावेळी त्याचे कलावंत म्हणून नाव "गोपाल बेदी" तथा गोली असेच होते. मात्र, यानंतर सुनील दत्त, निर्माते-दिग्दर्शक प्रकाश मेहरा हे रणजीत यांचे खास दोस्त बनले, ते इतके की, ‘हाथ की सफाई’ या चित्रपटानंतर त्यांनी रणजीत यांना आपल्या प्रत्येक चित्रपटात आवर्जून भूमिका दिली. रणजितने यांनी त्यांना कधीही नकार दिला नाही. त्या काळी रणजीत यांच्या हातात असलेल्या चित्रपटांची कामे इतकी होती की, त्याला दिवसातून पाच-पाच, सहा-सहा शिफटमध्ये कामे करावी लागत.) एका चित्रपटात बदमाश,

दुसर्यात दरोडेखोर तर तिसर्यातत पोलिस अशा भूमिकांचे चित्रीकरण तो एकाच दिवशी वेगवेगळ्या स्टुडिओत निरनिराळ्या सेटस्वर इमाने-इतबारे पार पाडीत असत.

प्रकाश मेहरा, मनमोहन देसाई, फिरोज खान या व अशा अन्य निर्मात्यांचा रणजीत हे खूप आवडता अभिनेते होते. ‘रेश्मा और शेरा’मधील राखीच्या पतीच्या भूमिकेनंतर तिने निर्माते - दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांच्या ‘शर्मिली’ या चित्रपटातील खलनायकाच्या भूमिकेसाठी राखीने निर्मात्याकडे रणजितच्या नावाची शिफारस केली. तो चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर रणजीत यांनी आपल्या कुटुंबातील सर्वांना तो चित्रपट पाहण्यासाठी नेले. मात्र, त्यात रणजित यांनी नायिकेवर केलेला बलात्काराचा प्रसंग पाहून सारी मंडळी त्याच्यावर खूप चिडली, रागावली व हे असं घाणेरडं पाहायलाच

आम्हाला बोलावलंस का? अशी आगपाखड केली. आमच्या कुटुंबातील माणूस बलात्कारी निघाला! आता आम्ही अमृतसरला कोणत्या तोंडानं जाऊ? असंही त्यांनी त्राग्यानं विचारायला कमी केलं नाही.

रणजित यांनी शंभरहून अधिक चित्रपटात भूमिका केल्या आहेत. त्यात 'दोस्त और दुश्मन', 'रामपूर का लक्ष्मण', 'खोटे सिक्के', 'व्हिक्टोरिया नं. २०३', 'आपकी कसम', 'हाथ की सफाई', 'धर्मात्मा', 'मुकद्दर का सिकंदर', 'अमर-अकबर-अँथनी', 'नसीब', 'धर्मवीर', 'सुहाग', 'शराबी', 'नमक हलाल', 'लावारिस', 'हिरो' या व अशा असंख्य यशस्वी चित्रपटांचा समावेश आहे.

रणजीत बॉलिवूडमधील लोकप्रिय खलनायक होते. ते रुपेरी पडद्यावर खलनायक साकारायचे पण खऱ्या आयुष्यात मुली त्यांना घाबरायच्या! मात्र त्यांच्यावर एका अभिनेत्रीचं खूप प्रेम होतं. रणजीत

यांच्या प्रेमात पडलेली अभिनेत्री म्हणजे "डिंपल कपाडिया"ची बहिण "सिंपल कपाडिया"! सिंपल कपाडिया रणजीतच्या प्रत्येक अदांवर फिदा होती. मग त्यांची हेअर स्टाईलपासून त्यांची बोलण्याची स्टाईल मात्र या प्रेमकथेत एक ट्विस्टही होता. सिंपल कपाडियाचे मेव्हणे म्हणजेच राजेश खन्ना यांना त्यांचं रिलेशन अजिबात आवडत नव्हतं. रणजीत यांनी १९८६ साली अलोका बेदी यांच्या सोबत लग्न केले होते. या दाम्पत्याला दिव्यांका आणि चिरंजीवी ही दोन मुलं आहेत. रणजित यांनी चित्रपटात खलनायकाच्या विविध भूमिका साकारल्या असल्या तरी खऱ्या आयुष्यात ते खूपच वेगळे आहेत. (चित्रपटात भले त्यांनी "खलनायक" साकारला परंतु मनाने "रणजीत" हे मनाने अतिशय मनमिळाऊ आणि सालस स्वभावाचे आहेत! हे कधी ठळकपणे जाणवले! "व्हिनस" म्युझिक कंपनीने जेव्हा "हिंदी"

चित्रपटातील बालगीतांचा "अल्बम" केला, त्याच्या "व्हिडिओ" चित्रकरणात.. काही "हटके" करूया! या मानसिकतेत चक्क हिंदी चित्रपटातील "व्हिलन" मंडळीना पाचारण केले होते.. यात चक्क "रणजीत", "कादर खान", "अनुपम खेर", "दलिप ताहिल", "गुलशन ग्रोवर" अशा अनेक "बॅड मॅन्स" होते. त्यांना बघताच.. शूटिंग साठी आलेली "बच्चे कंपनी" अतिशय घाबरलेली! मात्र त्या पैकी प्रत्येक "अभिनेत्यांनी" सर्व निरागस "बालकांना" आपलेपणाने जवळ घेऊन त्यांना "स्वतःतर्फे".. आणलेली चॉकलेट्स, मिठाई आणि भेटवस्तू प्रेमाने दिल्या तो क्षण खरंच मस्त होता! मस्त माहौल होता!) अनेक चित्रपटात त्यांना दारू पिताना दाखवण्यात आले आहे. पण खऱ्या आयुष्यात त्यांनी दारू, सिगारेटला कधी स्पर्श देखील केला नाही. एवढेच नव्हे तर ते शुद्ध शाकाहारी आहेत. हे महत्वाचे, नाही

का?

<u>© संजीव_वेलणकर पुणे</u> (९४२२३०१७३३)

🌹

आपण जर "नायक" किंवा "खलनायक" साकारण्याची "इच्छा" असणारे किंवा एकंदर "अभिनय" क्षेत्रातील व्यक्तींची मानसिकता पहिली.. आणि जवळपास प्रत्येक कलाकाराचे प्रगती पुस्तक पाहिले तर त्यात हुकलेल्या (नाकारलेल्या) भूमिकेचेही संदर्भ सापडतात. कधी ते आश्चर्य कारकही असतात. (दिग्दर्शक राज खोसला यांनी "मै तुलसी तेरी आंगन की" या चित्रपटासाठी राखी गुलजारचे नाव निश्चित केले असतानाच आपणास त्याच भूमिकेसाठी राज खोसला यांचा फोन आल्याने आश्चर्य वाटले. असे खुद्द आशा पारेख यांनी राज खोसला जन्मशताब्दीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात व्यासपीठावरुन सांगितले. खरं

तर आतापर्यंत ही गोष्ट कोणालाच फारशी माहित नव्हती.) अमूक अमूक चित्रपटातील तमूक भूमिके साठी अगोदर आपल्यालाच विचारले होते, पण तारखांच्या समस्तेमुळे (की अपेक्षित मानधन न मिळाल्याने, भूमिकेत फारसा दम न वाटल्याने) आपण ती भूमिका नाकारली असे अनेक कलाकार आपल्या मुलाखतीतून सांगतात आणि ही गोष्टदेखिल चित्रपटसृष्टीच्या संस्कृतीत रुजल्याचे दिसते. कोणी हातातून महत्वाची भूमिका गेली म्हणून हळहळते! तर कोणी ते फार मनावर घेत नाहीत.

जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५) तील क्रूरकर्मा "डाकू गब्बरसिंग" हा हिंदी झालेच पण भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील आजही गाजत असलेला खलनायक. अमिताभ बच्चनलाही दिग्दर्शक रामगोपाल वर्माने अतिशय हट्टाने केलेल्या "शोले"ची अतिशय स्वैर,

बोथट रिमेक केलेल्या "रामगोपाल वर्मा की आग" (२००७) या चित्रपटात मूळ चित्रपटातील "गब्बरसिंग" साकारायचा मोह झाला. अमिताभसारखा अष्टपैलू, चतुरस्र, कसलेला कलाकारही अमजद खानने अतिशय थंड डोक्याने नि प्रसंगी अतिशय प्रचंड हिंसक अशा गब्बरसिंगचा ठसा पूसू शकला नाही! अमिताभने सकारलेल्या या क्रूरकर्मा व्यक्तीरेखेचे नाव "बब्बन सिंग" होते! हीच "शोले" तील गब्बरसिंगची प्रचंड गाजलेली भूमिका आपल्या हातून निसटली याचे "रणजीतला" अजिबात दु:ख नाही!

रमेश सिप्पीने " शोले" साठी एकेक कलाकार निश्चित करताना आपल्याच दिग्दर्शनातील "सीता और गीता" (१९७२) मधील धर्मेंद्र, हेमा मालिनी व संजीवकुमार अगोदर निश्चित केले. मग अमिताभ बच्चन व जया बच्चनही निश्चित झाले. (या प्रत्येक

निवडीमागील गोष्ट वेगळी!) गब्बरसिंगच्या भूमिकेसाठी डॅनी डेन्झोपाची निवड झाली. बंगलोरजवळ रामगढ गावाचा सेट लावला जावू लागला. "शोले" च्या मुहूर्तासाठी ३ ऑक्टोबर १९७३ ही तारीख निश्चित झाली. तत्पूर्वीच रमेश सिप्पीने मुंबईत "शोले"तील कलाकारांसोबत एक बैठक केली. सिनेमाच्या जगात त्याला "स्टोरी सिटींग" म्हणतात!. त्याचा एक फोटोही काढला गेला (आणि गंमत बघा! कालांतराने सोशल मिडियाच्या युगात तोच फोटो मोठ्याच प्रमाणावर व्हायरल होतोय. आणि " शोले"त गब्बरसिंगच्या भूमिकेत डॅनी होता हे दिसतेय.!) आता डॅनीची निवड निश्चित झाली असतानाच अमजद खान कसा आला आणि त्यात रणजीतलाही कसे विचारले गेले? खुद्द रणजीत हीच गोष्ट खूपच रंगवून, खुलवून सांगतो. (त्याला बऱ्यापैकी मराठी बोलता येते, बरं का?)

रणजीतच्या म्हणण्यानुसार, त्याच वेळेस फिरोज खान "धर्मात्मा" या चित्रपटाच्या निर्मिती व दिग्दर्शनाची तयारी करत होता! त्याच्यासाठी हा अतिशय महत्वाकांक्षी चित्रपट! अफगाणिस्तानात चित्रीकरण होणारा पहिला हिंदी चित्रपट! नायक म्हणून राजेश खन्ना व खलनायक म्हणून आपण स्वतःच अशी आखणी केली. पण काही कारणास्तव राजेश खन्नाने नाही म्हटले आणि फिरोज खानच हिरो झाला! (या दोघांनी तत्पूर्वी कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटाच्या काळात "औरत" मध्ये एकत्र काम केले होते!) आपली नायिका म्हणून हेमा मालिनीचा होकार मिळवण्यात फिरोज खान यशस्वी ठरला. झीनत अमानने आढेवेढे घेतल्यावर फिरोज खानने रेखाची निवड केली. आता "झंगुरा" या भूमिकेसाठी तगडा खलनायक हवा! फिरोज खानला डॅनीच योग्य वाटला. पण डॅनीने तर "शोले" साठी

होकार दिलेला! फिरोज खान बोलण्यात चतुर. (उगाच आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात आघाडीच्या नायिका, अफगाणिस्तान, आखाती देशातील दूरवरची चित्रीकरण स्थळांवर चित्रीकरण यासाठी होकार मिळवण्यात यशस्वी ठरला नाही.) त्याने डॅनीला समजावले, शोलेत धर्मेंद्र, संजीवकुमार, अमिताभ असे तीन तीन नायक असल्यावर तुला वाव तो किती मिळणार? "धर्मात्मा"त जास्त वाव मिळेल. महत्वाचे म्हणजे "मेरी गलीयों मे लोगो की यारी बढ गयी.." गाण्यात हेमा मालिनीसोबत संधी आहे ("तू ही मेरा प्यार है, तू ही मेरी बंदगी.,." तोच रेश्माला अर्थात हेमाला उद्देशून म्हणतो) आणि आपण अफगाणिस्तानातील काबूलला चित्रीकरण करतोय! नवीन अनुभव मिळेल वगैरे वगैरे. डॅनीला हे सगळेच पटले आणि तो अफगाणिस्तानला निघालाही. आता "शोले"त गब्बरसिंग साकारणार कोण हा पटकथा

कार सलिम जावेद व दिग्दर्शक रमेश सिप्पी यांच्यापुढचा महत्वाचा प्रश्न. त्यानुसार शोध सुरु झाला...

डॅनी काबूलला "धर्मात्मा"च्या चित्रीकरणात कार्यरत असतानाच रणजीतचे तिकडचे शूटिंग संपले (त्याने "रिशी" ही भूमिका साकारलीय) आणि तो थेट बंगलोर येथे एस. रामनाथन दिग्दर्शित "डायल हन्ड्रेड" च्या चित्रीकरणासाठी आला! विनोद मेहरा, बिंदीया गोस्वामी इत्यादींसोबत चित्रीकरण करुन मुंबईत यायचे त्याने निश्चित केले. ("डायल हन्ड्रेड" या चित्रपटातील पहिलेच दृश्य रणजीतवर आहे.

सोबतचा विनोद मेहरा व रणजीतचा फोटो याच चित्रपटातील) रणजीत बंगलोरला आला आहे हे समजताच सिप्पी फिल्मकडून लगोलग त्याची भेट घेण्यात आली आणि त्याने गब्बरसिंगची भूमिका स्वीकारुन येथूनच त्याने रामगढला यावे असा प्रस्ताव ठेवला! काबूल दौऱ्यावर असतानाच डॅनीकडून "शोले" बद्दलच्या काही गोष्टी त्याला समजल्या होत्या. "गब्बरसिंग" अभिनेता "रणजीत" साठी ही खरंतर चांगली संधी होती! पण आपला मित्र डॅनीकडून आपण शोलेत भूमिका साकारत नाही हे लेखी लिहून आणले तरच आपण होकार देऊ अशी रणजीतने अट ठेवली! त्या काळात दूरवर संपर्क शक्य नव्हतेच. आणि डॅनी कधी परतणार याची माहिती नव्हती. (आपणास हे विचारले असता अमजद खान रामगढला पोहचला होता, पण त्याचे चित्रीकरण सुरु झाले नव्हते अशी रणजीतची आठवण!)

"शोले" माईलस्टोन चित्रपट ठरेल, गब्बरसिंग प्रचंड गाजेल असे चित्रपट निर्मितीच्या काळात कोणीच भविष्य केले नव्हतेच! चित्रपट पडद्यावर येताच तो "पडला पडला.. " अशीच चित्रपटसृष्टीत चर्चा होती हे रणजीत आठवणीने सांगतो. आपण ही भूमिका साकारली असती तर त्याचा आपल्याला बराच फायदा झाला असता, तेव्हा आपण उगाच संधी सोडली वगैरे आपणास कधीही वाटले नाही" आपण काम करत असताना काही चित्रपट वेळेच्या अडचणीमुळे करता येत नाहीत हे होतच असते अशी रणजीतची भावना आहे. असे काही अनुभव त्याच्याकडे आहेत!

दिलीपकुमारसोबत काम करण्याची रणजीतची संधी अशीच हुकली! एस. व्ही. राजेंद्र सिंग दिग्दर्शित "आग का दरिया" मध्ये रणजीतला अतिशय चांगली भूमिका मिळाली. चित्रपटात रेखा, पद्मिनी कोल्हापूरे इत्यादींच्याही भूमिका!. चेन्नईत (तेव्हाचे मद्रास!) चित्रीकरण सत्र ठरलेही. पण ते रद्दही झाले. मग पुन्हा एकदा ठरले आणि रद्दही झाले! रणजीत अन्य चित्रपटात कार्यरत होता! आता मुंबईत राह्यचे की चेन्नईत जायचे हा प्रश्न. मुंबईत राह्यचा निर्णय घेताना "आग का दरिया" सोडला. दिलीपकुमार सोबत काम करण्याची रणजीतची संधी हुकली! पण अशा गोष्टी होत असतात असे त्याचे मत. (हा चित्रपट पूर्ण होवूनही प्रदर्शित झाला नाही)

राज कपूरसोबत काम करण्याची रणजीतची संधी प्रत्यक्ष चित्रीकरण स्थळावर जावूनही हुकली. तो चित्रपट होता, "अब्दुल्ला!". संजय खान अभिनित,

निर्मित व दिग्दर्शित चित्रपट! संजय खानने रणजीतला करारबद्ध करताना सलग चौदा दिवस घेतले. बनारसला मोठे चित्रीकरण सत्र आयोजित केले गेले. रणजीत रस्त्यामार्गे बनारसला पोहचला. राज कपूरसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद होत होता! प्रत्यक्षात सेटवर संजय खान आपण व झीनत अमानवरील दृश्य चित्रीत करण्यात गुंतलेला. रणजीतला तीन चार दिवस काहीच काम नाही. संजय खानचा भाऊ समीरचाही हाच अनुभव! तोही कंटाळला आणि त्याने मुंबईत यायचे ठरवले. रणजीतला ते समजताच आपणही येतो असे त्याने समीरला सांगितले आणि दोघेही एकाच गाडीतून मुंबईला निघाले!

सत्तर ऐंशीच्या दशकात "या सेटवरुन त्या सेटवर.." अशी धावपळ आणि त्यात दोन तीन तास काम करणे असे रणजीतचे चालले होते. यातून काही

गंमतीशीर अनुभवही आले. चित्रपटाचे जग अशा अनेक छोट्या छोट्या गंमतीने भरलयं. शम्मी कपूर दिग्दर्शित "बंडलबाज" या चित्रपटासाठी रणजीतने दिलेल्या तारखांचा राजेश खन्नाच्या सेटवर येण्या जाण्याच्या लहरीपणाने वाया गेल्या. आता रणजीतची दृश्ये कशी चित्रीत करणार? यावर रणजीतनेच एक मार्ग काढला. "बंडलबाज" चे चित्रीकरण दादर पूर्वेकडील रणजीत स्टुडिओत होते तर त्याच वेळेस तेथूनच जवळ असलेल्या रुपतारा स्टुडिओत "कसम" च्या चित्रीकरणात रणजीत डाकू साकारत होता. रणजीतने शम्मी कपूरला सांगितले, "कसम"च्या सेटवर एक दृश्य झाल्यावर लायटींग होत असताना "बंडलबाज" च्या सेटवर येईन! पण शक्यतोवर क्लोजअप घेता येतील. कारण, ए. सलाम दिग्दर्शित "आखरी डाव" मध्ये डाकूची भूमिका असली तरी "बंडलबाज"मध्ये पोलीस इन्स्पेक्टर साकारायचाय!

रणजीतने अतिशय मोठ्याच प्रमाणावर चित्रपटातून काम केल्यावर दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि "कारनामा" व "गजब तमाशा" या दोन चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शन केले! त्यानंतर चित्रपटातून भूमिका करणे कमी कमी करत नेले. मधूनच "हाऊसफुल्ल फाईव्ह" मध्ये भूमिका केली तरी पुरेसे वाटते! रोज सकाळी लवकर उठून जुहू किनाऱ्यावर "मॉर्निंग वॉक" (पाऊस असल्यास बंगल्यात तळमजल्यावर!), डिजिटल मिडियात पाहण्यापेक्षा ऐकणे, बुध्दीबळ खेळणे अथवा बंगल्यातील बागेत फळे फुले यांवर लक्ष देणे, कुटुंबासाठी वेळ देणे, रात्री लवकरच अंथरुणावर पडणे असा दिनक्रम असतो! नवीन चित्रपटाच्या प्रीमियरला जात नाही. क्वचितच! तो एकाद्या फिल्मी पार्टीला जाणे झाले तरच.! (मद्यपान व मांसाहार तर करतच नाही.. तर पार्टीत जावून करायचे काय?)

वयाच्या ८४ व्या वर्षी आणखीन काय हवे? हुकलेल्या संधीचे सुख दु:ख तर नकोच! एक मस्त "आयुष्य" जगलेल्या.. तसेच केवळ "खलनायक" म्हणून आपली कारकीर्द घडवलेल्या "बॉलीवूड" मधील एका "सन्माननीय" अभिनेत्याची ही "दास्तान"! जय हो!

© दिलीप ठाकूर
(*रविवार सकाळ, सप्तरंग पुरवणी वरुन साभार!)
♥

लेख क्रमांक १९

दो शोले, मालेगाव के शोले, कानपूर के शोले आणि बरेच काही....

आपल्या चित्रपटसृष्टीचा एक अलिखित नियम आहे, सुपर ड्युपर हिट पिक्चर्सचा जणू आदर्श ठेवत त्यासारखचं कथासूत्र घेऊन वा नाव घेत चित्रपट निर्माण करायचा. आजच्या ग्लोबल युगातील

डिजिटल पिढीच्या भाषेत यशस्वी चित्रपटाला "फॉलो" करणे. आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले"ला (१९७५) खणखणीत यशाची मोहिनी पडली नसती तर त्यात नवलच!

"शोले"ची रिमेक बी. सुभाष दिग्दर्शित "आंधी तुफान" (१९८४) पासून रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "आग" (२००६) अशा अनेक चित्रपटांनी केली. ती अजिबात झेपली नाही हो! झेपण्यासारखे नव्हतेच! मूळ चित्रपटातील थरार त्याच्या नक्कलेत येईलच कसा? आणि अस्सल "शोले" अनेकदा अनुभवलाय, तर मग त्याची नक्कल कशाला कोण पाहिल? तरी तो मोह सुटणारा नाही. रामगोपाल वर्माने तर "शोले" हेच नाव ठरवले. रमेश सिप्पींनी आक्षेप घेतल्यावर त्याने "रामगोपाल वर्मा की आग" असे केले. अगदीच शेकोटी झाला हो हा चित्रपट! पहिल्याच शोला पुरता विझला. अमिताभ बच्चनची "गब्बरसिंग"

साकारायची हौस मौज पूर्ण झाली इतकेच! पण गब्बरसिंगचा धाक वा भीती तो दाखवू शकला नाही. रामूकडून अशी अजिबात अपेक्षा नव्हती. हा चित्रपट पडद्यावर आला तोच रामूची दिग्दर्शक म्हणून घसरण सुरु झाली. अमिताभने खौफनाक खलनायक साकारण्याचा हट्ट का बरे धरला हे चित्रपट विसरलो तरी समजले नाही.

चित्रपटाच्या नावात "शोले" हा ट्रेण्ड मजेशीर! सुखदेव दिग्दर्शित "दो शोले" (१९७७) या नावाचा एक चित्रपट आला तोच गेला! पोस्टरभर राजेंद्रकुमार व धर्मेंद्र होते तरी ते पाहुणे कलाकार आहेत हे अगदी स्पष्ट होते. पोस्टरभर त्यांना मोठे स्थान दिल्याचे मला आजही आठवतेय. इंपिरियल चित्रपटगृहात मॅटीनी शोला हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि दो शोले नावाचाही चित्रपट पडद्यावर आला हे माहित झाले इतकेच. अजित देवानी दिग्दर्शित "रामगढ के शोले"

(१९९१) एक भन्नाट कल्पना होती. गब्बरसिंग आपली शिक्षा पूर्ण करुन जेलबाहेर पडतो आणि त्याचे चार ड्युप्लीकेट अपहरण करतात अशी त्यात मजेशीर कल्पना. टाईमपास म्हणून हा पिक्चर "एन्जॉय" केला तर मस्त मनोरंजन. ते चार जण आहेत, विजय सक्सेना (अमिताभ बच्चनचा ड्युप्लीकेट), किशोर भानुशाली (देव आनंद), आनंद कुमार (अनिल कपूर) व नवीन राठोड (शत्रुघ्न सिन्हा)! गंमत म्हणजे, "शोले" प्रदर्शित झालेल्या "मिनर्व्हा" चित्रपटगृहातच "रामगढ के शोले" प्रदर्शित झाला आणि चक्क त्याचे जोरात स्वागत झाले. असे चित्रपट दोन तीन आठवड्यांचे आयुष्य घेऊन येणारे आणि मग छोट्या शहरातून आठवडा दोन आठवडे चालत चालत जाणारे. चित्रपटात धमाल येण्यासाठी मनमौजी, दिनेश हिंगू, राजेंद्रनाथ, ज्युनियर मेहमूद अशांचाही भरणा.

"मालेगाव के शोले" या चित्रपटाच्या यशाची

एका मराठी वृत्तपत्राने चक्क पहिल्याच पानावर दखल घेतली. आपल्या देशातील काही छोट्या शहरातदेखिल एक चित्रपटसृष्टी कार्यरत आहे. त्या चित्रपट निर्मितीत हौस मौज जास्त. आपल्या आर्थिक ऐपत, दृश्य माध्यमाची आपली समज यानुसार ते चित्रपट निर्मिती करीत असतात. मालेगावातील नासिर शेख याचा एक आदर्श व्हिडिओ पार्लर होता. त्याला लहानपणापासून चित्रकलेची आवड. आपल्या व्हिडिओ पार्लरमधून सुपरमॅन, रॅम्बो, ब्रुसली यांच्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेटना चांगलीच मागणी असल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर त्याला वाटले, आपल्याकडे कॅमेरा आहे, सिराजच्या नाट्य ग्रुपमध्ये हौशी कलाकार म्हणून त्याने काम केले. हा चित्रपट पन्नास हजार बजेटमध्ये निर्माण झाला (खरं तर ओव्हरबजेट) आणि त्याने चक्क दोन लाखांची कमाई केले. थेट चौपट फायदा की हो! या

चित्रपटातील गब्बरसिंग चक्क सायकलवरुन येतो (त्यात गैर काय?) यातील बसंतीचा गाजलेला डायलॉग! "सुनले गब्बर थप्पड मै मारुंगी!" महत्वाचे आहे ते, "मालेगाव के शोले"ने खान्देशातील ग्रामीण भागातील प्रेक्षकांचे मनसोक्त टाळ्या व शिट्टयांनी भरपेट मनोरंजन केले. त्या काळात एका व्हिडिओ थिएटरमध्ये फक्त पंचाहत्तर प्रेक्षक अशी अट होती. मात्र त्याहीपेक्षा जास्त प्रेक्षक त्यात खच्चून बसत. आणि एकदा का नकली का होईना ठाकूर, वीरु, जय, बसंती, गब्बरसिंग समोर आले रे आले की त्यात आपण रंगून जायचे. "शोले" असा अनेक प्रकारे अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचलाय. मग ते रामगढ के असो वा मालेगावचे!

"कानपूर के शोले" या नावाचा चित्रपट ही केवढी तरी आश्चर्याची गोष्ट! "शोले" हे जणू विनापरवाना वापरायचे हुकमी नाव! हा चित्रपट उत्तर

प्रदेशातील कानपूर शहरातील निर्मिती आहे. आणि या चित्रपटाची "कॉन्सेप्ट" स्थानिक गुन्हेगारीवर आधारित! असे चित्रपट निर्माण करणे सोपे वाटते. पण त्यालाही कल्पकता, मेहनत व खर्च असतो. बजेट तसे कमीच असते. कारण असे स्थानिक पातळीवरील चित्रपट दोन तीन शहरांपलिकडे जवळपासच्या खेड्यापाड्यातून प्रदर्शित होतात. या चित्रपटात मोहम्मद आलम, विनित सिन्हा, रिजवान, असलम, अजय त्रिपाठी व तब्बू खान यांच्या भूमिका आहेत. चित्रपट अर्थातच देमार घेमार याच संस्कृतीतील. पब्लिक ताली बजाव! (हाच धागा पकडून नंतर "खानदेश का शोले", "सिंधी शोले", अभिनेता सचिनची पेशकश असलेला, नकलाकार "माधव मोघे" अभिनित "छोले" आणि नकलाकार "जॉनी रावत" याचा "आगरी शोले" असे कित्येक सिनेमे, व्हिडिओ फिल्म्स आल्या होत्या!)

मुंबईत "शोले" १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला हे चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर येतेच. पुढच्याच शुक्रवारी म्हणजे २२ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद (निझाम) येथे, तर २९ ऑगस्ट रोजी गुजरात, राजस्थानमध्ये असा प्रदर्शित होत होत शहरांतून ग्रामीण भागात गेला हे आता सांगावेच लागत नाही. असे असूनदेखील १९५३ साली देखिल "शोले" नावाचा चित्रपट पडद्यावर आला होता हो!

१९५३ च्या "शोले"चे दिग्दर्शक बी. आर. चोप्रा हे आहेत. बी. आर. चोप्रा म्हणताच नया दौर , कानून, गुमराह, हमराज, साधना असे साठच्या दशका पासूनचे अनेक चित्रपट पटकन डोळ्यासमोर येणारच. त्यानंतरही त्यांनी दास्तान, धुन्द, पती पत्नी और वो, तवायफ, द बर्निंग ट्रेन असे विविध थीमचे चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या

सुरुवातीच्या काळात "शोले" चित्रपट दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटात अशोककुमार, बीना रॉय, पूर्णिमा इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाला धनीराम यांचे संगीत आहे. "पत्थर का मिला तकिया..", "बरखा की रुत है..", "एक परदेसी लूट गया पपीहा रे.." असे त्याचे कथासूत्र आहे.

"यू ट्यूबवर हा "शोले" उपलब्ध आहे! (चित्रपटाची "लिंक" दिलीय. "क्लीक" करून आस्वाद घ्या.) या चित्रपटाची सुरुवातच रुळांवर श्रेयनामावली पुढे सरकत राहते अशी आहे. ट्रेन वेगाने धावतेय आणि त्यावर त्याच वेगाने श्रेयनामावली आहे. ही कल्पनाच त्या काळात भन्नाट ठरली असावी! मात्र हा चित्रपट फारसा यशस्वी ठरला नाही! हे नक्की!

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" ची यशोगाथा चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण होवून देखिल संपलेली नाही. बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "शोले" या चित्रपटाशी त्याचे केवळ नामसाम्य! दोन्हीचा कथाआशय पूर्णपणे वेगळाच. पण १९५३ सालीदेखिल "शोले" नावाचा चित्रपट आपल्यासमोर आला होता हे ऐकताच त्या चित्रपटाबाबत कुतूहल निर्माण होते, उत्सुकता वाढते हे उल्लेखनीय आहे!

१९५३ च्या या शोले चित्रपटातील "ऐ दिल तू कहीं ले चल.." हे हेमंत कुमारने गायलेले गाणे लोकप्रिय झाले! याचे गीतकार कामील रशीद असून संगीत नरेश भट्टाचार्य यांचे आहे. या सिनेमाला चार गीतकार व दोन संगीतकार आहेत. गीतकार कामील रशीद, सरस्वती कुमार दीपक, साहीर लुधियानवी व मजरूह सुलतानपुरी आहेत. तर संगीतकार धनीराम व नरेश भट्टाचार्य आहेत!

आज देश-विदेशात "शोले" चे विविध प्रकारे जोरदार सेलिब्रेशन सुरु आहे. त्यात या १९५३च्याही "शोले" ची दखल हवीच! भारतीय चित्रपटसृष्टीवर फोकस टाकताना जी. पी. सिप्पी निर्मित "शोले" (१९७५) पूर्वीचा/नंतरचा चित्रपट अशी मांडणी केली जाते, त्यात १९५३चा "शोले" देखील सांगायलाच हवा! "शोले" आज पन्नास वर्षांनंतरही गाजतोय. आणि याच काळात शीर्षकात "शोले" असणारे असे आणखीन चित्रपट पडद्यावर आले. सुपरहिट चित्रपट पडद्यावरुन कधीच उतरत नाहीत. त्यांचे अस्तित्व असे कायमच दिसत असते..!

सिनेमाची दुनिया काही वेगळीच आहे हे फारसे कधी सांगावे लागत नाही. ते असे "दिसत" असते... अर्थात चित्रपटाच्या नावात "शोले" आले म्हणून फार काही साध्य होणार नव्हतेच. तशी अपेक्षाही नव्हती व क्षमताही नव्हतीच. फार फार तर

हे चित्रपट निर्माण करणाऱ्यांना काही आनंद झाला इतकेच... तेही नसे थोडके!

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र, ४ ऑगस्ट २०२५. वरुन साभार)

♥



लेख क्रमांक : २०

"फ्लॉप, फ्लॉप" म्हणता म्हणता "शोले" जो काही सुपर हिट झाला...

मित्रांनो! या लेखाच्या शीर्षकात मी प्रश्नचिन्ह दिलेले नाही, हे लक्षात घ्या! यातच बरेच काही येते....!

सुरुवातीलाच दोन परस्परविरोधी गोष्टी सांगतो! तुम्हाला गुरुदत्त दिग्दर्शित 'कागज के फूल' (१९५९).. आठवतोय? (जो भारतातील पहिला वहिला "सिनेमास्कोप" चित्रपट होता! खरं सांगायचे तर १९५९चा "कागज के फूल" हा चित्रपट अनेक कारणांमुळे फ्लॉप झाला! यात चित्रपट खूप लांब असणे, प्रेक्षकांना कथा न पटणे, आणि चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच प्रेक्षकांच्या मनात एक विशिष्ट प्रकारची अपेक्षा तयार असणे यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे! या चित्रपटाच्या तांत्रिक गुणवत्तेमुळे आणि कथेच्या नवीनतेमुळे तो त्याच्या काळाच्या खूप पुढे होता, पण प्रेक्षकांना तो स्वीकारणे कठीण वाटले. पडद्याआडून सांगायचे तर.. तो "चित्रपट" अमुक लोक, पत्रकार आणि समीक्षकांनी "नकारात्मक" दृष्टिकोनातून सिनेमाकडे पाहिल्याने त्याला "थंड" प्रतिसाद मिळाला. दुर्दैवाने जिनियस "गुरुदत" यांनी

वैफल्यग्रस्त" होत शेवटी चक्क "आत्महत्या" केली, हे वाचनात आल होते!)

"कागज के फूल" या चित्रपटाची सुरुवात आठवतेय? या चित्रपटातील दिग्दर्शक सुरेश सिन्हा (गुरुदत्त) एकटाच बसलाय. त्याला विलक्षण कुतूहल आहे की आपल्या आजच्या शुक्रवारी प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचा "पब्लिक रिपोर्ट" काय असेल?

तेवढ्यात एक खबरी धावत पळत येऊन सांगतो, अपनी पिक्चर "फ्लॉप" हो गई.... लोगोने पिक्चर को नाकारा....!

(या चित्रपटाची थीम "चित्रपटसृष्टी आणि नातेसंबंध" अशी आहे. इतरही अनेक घटक आहेत!)

आजच्या ग्लोबल युगातील चित्रपट रसिकांना कदाचित या दृश्याचा अर्थ लागणार नाही! त्यात आजच्या काळात चित्रपट कसा आहे, हे समजण्यापूर्वीच त्याने पहिल्याच दिवशी किती कोटीची कमाई केली याच्या "ब्रेकिंग न्यूज" सुरु होतात! "कॅलक्यूलेटर"पेक्षाही अधिक वेगाने ही कमाई मोजली जाते आणि.. त्याला मराठी चित्रपटही अपवाद नाही हो! पण नव्वदच्या दशकापर्यंत चित्रपटाच्या यशाचे परिणाम मोजण्याची वेगळी पध्दत होती. तेव्हा "मेन थिएटर"मधील "फर्स्ट डे फर्स्ट शो"चा पब्लिक सिनेमा पाहून बाहेर पडताना कशा पद्धतीने व्यक्त होतोय, आपसात काय बोलतोय, त्याचा चेहरा काय सांगतोय, त्याची देहबोली कशी आहे यातून उत्तर मिळे! आणि ते अगदी "करेक्ट" असे

वा ठरे! प्रत्येक व्यवसायातील यशापयशाचे काही सिंटम्स असतातच. तसेच हे होते आणि त्यावरूनच 'कागज के फूल' मधील खबरी व्यक्त होतो. दुर्दैवाने हा 'कागज के फूल 'ही तस्साच "फ्लॉप" ठरला. पूर्णतः.. "फ्लॉप" ठरला, हे "जिनियस गुरुदत्तचेच" नव्हे तर तत्कालीन "रसिकांसाठी" एक "धक्कादायक" असे प्रकरण होते" यात शंकाच नाही!

दुसरे उदाहरण म्हणजे, राज कपूर निर्मित, अभिनीत आणि दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर' (१९७०) चे! राज कपूरने दीर्घकाळ पाहिलेले हे रुपेरी स्वप्न होते! त्याचा हा महत्वाकांक्षी चित्रपट होता! आपला दोन मध्यंतरचा 'संगम' (१९६४) खणखणीत यशस्वी ठरल्याने राज कपूरने 'मेरा नाम जोकर 'ही असाच दोन मध्यंतरचा चित्रपट निर्माण केला! मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर "नोव्हेल्टी"मध्ये या चित्रपटासाठी तिकीट दरात वाढ करताना "अप्पर

स्टॉल" सात रुपये आणि बाल्कनी आठ रुपये असे वाढवले. (तुम्हाला कदाचित कल्पना नसेल पण १९७० साली मुंबईतील मध्यमवर्गीय मराठी माणसाला

मासिक तीनशे रुपये पगारही खूप मोठा वाटे! घरातील अथवा कुटुंबातील बुजुर्गाना विचारा!). या फिल्मचा "फर्स्ट डे फर्स्ट" शोचा पब्लिक बाहेर पडताना बेक्कार है, बोअर है, डिब्बा है, खास नही, पैसा फोकट! असे ओरडत ओरडत आले.... आता तुम्ही म्हणाल की अशाने काय होते? तर या

चित्रपटाचा सेकंड शोचा.. ब्लॅक मार्केटमधील दर कोसळतो! त्याला चांगला भाव मिळत नाही. रात्रीच्या शोला मुद्दल भावात तिकीट विकावे लागते. एव्हाना आपल्या चित्रपट व्यवसायाची "मक्का" नाझ थिएटर इमारतीत पब्लिक रिपोर्ट पोहचलेला असतो, पिक्चर "फ्लॉप"...! (हा "हॉट स्पॉट" म्हणजे, येथील सर्वच्या सर्व सहा सात मजले चित्रपट वितरकांची कार्यालये होती. तेथे प्रत्येक चित्रपटाची 'व्यावसायिक कुंडली' समजायची.) लगेचच दुसरा आठवडा सुरु होताना 'जोकर'वर कात्री लावली गेली आणि त्या चित्रपटाची "लांबी" कमी करुन तो चक्क एका मध्यंतरचा करण्यात आला आणि तिकीटाचे दरही मूळ पदावर म्हणजे एक आणि दोन रुपये असे करण्यात आले.....

त्या काळात मिडियात 'जोकर पडला की पाडला?' यावर बरेच लिहिले गेले. इतके की, एकाद्या हिट चित्रपटावर इतके लिहिले जात नसे. त्यातूनच या

चित्रपटाभोवती सहानुभूती निर्माण होत गेली आणि चित्रपटातील गाणी लोकप्रिय असल्याने आज पन्नास वर्षांनंतरही या चित्रपटाचे अस्तित्व कायम आहे.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) रिलीज झाला तेव्हा पहिले एक दोन आठवडे पडला!... पडला! अशीच हवा होती.! खरं तर या चित्रपटाचा थरार "मिनर्व्हा थिएटर" मध्ये अनुभवणं योग्य होते. याचे कारण म्हणजे मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील याच एकमेव थिएटरमध्ये हा चित्रपट "सत्तर एमएम आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीममध्ये" होता. वीरु आणि जयमधील नाणेफेकीच्या प्रसंगात आपल्या जवळच ते नाणे पडल्याचा "फिल" येई. तेथे संपूर्ण चित्रपट रोमांचित अनुभव देई. मी गिरगावात राहिल्याने याचा अनुभव अनेकदा घेतल्याने मला त्याची कल्पना आहे! हळूहळू हा चित्रपट असा आणि इतका "पीकअप" झाला की 'प्रेक्षकांनी तो बघता

बघता' या चित्रपटाची देशभर "क्रेझ"निर्माण झाली! आपल्या देशाची जणू एक "लोककथा" असे या चित्रपटाचे वर्णन होऊ लागले. "मिनर्व्हा" थिएटरबाहेरच्या "ब्लॅक मार्केट" वाल्यानी तर बक्कळ कमाई केल्याच्या बातम्या झाल्या! अप्पर स्टॉल "चार रुपये चाळीस पैसे" असलेले तिकीट "वीस" अथवा रविवारी "पंचवीस रुपये"! आणि बाल्कनी "पाच रुपये पन्नास पैसे असलेले" तिकीट "पंचवीस" आणि रविवारी "तीस रुपये" असे चढत्या भावात विकले गेले! त्यातूनच या काळाबाजार वाल्यानी थिएटरजवळच "हॉटेल" सुरु केले, गावी "बंगला" बांधला, एका बी. आय. टी. चाळीत केवळ "दहा बाय बाराच्या" खोलीत राहणाऱ्या एका तरुणाने चक्क "नवजीवन कॉलनी" या उच्चभ्रू वसाहतीमध्ये.. "तत्कालीन अद्ययावत असा फ्लॅट" विकत घेतला! तो "शोले"ची तिकिटे "ब्लॅक" करायचा म्हणे! मात्र हे खरं

की खोटं, परमेश्वरालाच माहित! असे किस्से, कथा, दंतकथा रंगल्या. आणि आम्ही ते साक्षात अनुभवले! हे विशेष!

आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षकांच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे एकदा का चित्रपट आवडला की तो डोक्यावर घ्यायचा, कायमचा डोक्यात ठेवायचा. 'शोले' ही त्यात आहे! आता एकादा चित्रपट पाडायचा म्हणजे काय?

आपला व्यावसायिक शत्रू असलेल्या सिनेमावाल्याच्या चित्रपटाची मेन थिएटरची बरीच तिकीटे आपण काढायची आणि मग आपल्या चमच्यांना तेथे पाठवून सिनेमा सुरू असतानाच हुर्यो उडवत राह्यचे. म्हणजे इतरही रसिकांना वाटणार हा चित्रपट वाईट्ट आहे. चित्रपट संपल्यावर बाहेर पडताना अर्वाच्य शिवीगाळ करायची! वातावरण गढूळ करायचं. कालांतराने असे आम्हां "कार्यरत"

वार्ताहर आणि पत्रकार यांच्या ठळकपणे ध्यानात आले होते. हे आमच्यापैकी जागृत अशा "वार्ताहर आणि पत्रकारांना" पूर्णपणे माहित होते.. हे "सत्य"! यासाठी बॅरोमिटर होते. तेथे काही जण हा उद्योग करीत. ज्याचा चित्रपट पाडायचा आहे, त्या चित्रपटाच्या थिएटरवरील ब्लॅक मार्केटवाल्याना 'आपलेसे करायचं'. फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच दर पाडायचा. जीवघेणी स्पर्धा म्हटल्यावर हे होणारच!

कधी एकाद्याला महत्वाची थिएटर्स मिळू द्यायची नाहीत, जमल्यास रिव्ह्यू मॅनेज करायचे, गाणी हिट होऊ नयेत यासाठी तबकडी अथवा ऑडियो कॅसेट मोठ्या प्रमाणात विकत घेऊन त्याचा नाश करायचा. असे अनेक प्रकार केले जातात.

एकदा तर सुधाकर बोकाडे निर्मित आणि विनय लाड दिग्दर्शित 'पटली रे पटली' हा मराठी चित्रपट रिलीज व्हायच्या दिवशीच त्याला उघडपणे

अपशकुन करण्यासाठी मूळ हिंदी चित्रपट ज्योती स्वरुप दिग्दर्शित 'पडोसन' पुन्हा एकदा प्रदर्शित केला. आता मार्केटमध्ये पुन्हा एकदा ओरिजिनल माल असताना ड्युप्लीकेट वस्तूला पसंती कशी मिळेल?

कालांतराने चित्रपट पाडण्याची प्रथा बदलली. आता सोशल मिडियात विरोधात पोस्ट वाढवत जायचं. विशेषतः काही पीआरओ हे काम करताहेत अशी चर्चा आहे. नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे तेच जाणोत. पण कार्पोरेट युगात एकमेकांविरुध्द ट्वीटर "वॉर" शक्य असते. एकाद्या चित्रपटाबाबत वातावरण गढूळ करणे, पब्लिक रिपोर्ट नरम आला तर तो 'कॅच' करणे असे हे उद्योग आहेत.

खरं तर चित्रपट पाह्यचा की नाही याचा 'पहिला आणि शेवटचा निर्णय' प्रेक्षकांच्या आवडीनिवडीवरच असतो. पण त्यांचा कल आणि कौल घडवणे अथवा बिघडवणे यात काही ट्रीक आहेत हे नक्की. जेथे दोन

बडे निर्माते अथवा दोन स्टुडिओत तीव्र स्पर्धा निर्माण झाली की 'चित्रपटाच्या पाडापाडी'चे अलिखीत नियम येतात. अहो, आपल्या व्यावसायिक शत्रूचा चित्रपट यशस्वी ठरला तर आपल्या चित्रपटाची गोची अथवा कोंडी होऊ शकते ना? प्रेक्षकांची टेस्ट बदलते, वातावरण बदलते, मिडियात त्या हिट चित्रपटावर फोकस असतो, सोशल मिडियात त्या चित्रपटावर कॉमेंट्स, लाईक्स असतात. मग आपल्या चित्रपटाचे काय? कधी कधी 'तुम भी चलो, हम भी चले, चलती रहे जिंदगी' असा समजूतदारपणाचा फंडा अवलंबला जातो. दोन अथवा तीन मोठ्या निर्मिती संस्था (ज्यांना आज 'स्टुडिओ' म्हणतात) आपल्या चित्रपट रिलीजमध्ये चार आठवड्यांचे अंतर ठेवून ॲडजेस्टमेंट करतात. तेवढे सकारात्मक असावे, खरं तर मला तरी पूर्वीच्या तुलनेत आजच्या ग्लोबल युगातील चित्रपटसृष्टीत समंजसता आणि

व्यावसायिकता जास्त दिसतेय. त्यातूनच 'चित्रपट पाडण्याची प्रथा' थोडी बाजूला झाली आहे .

आता फस्ट डे फर्स्ट शोलाच 'ट्यूबलाईट' अथवा 'ठग्ज ऑफ हिन्दुस्तान' हे पडद्यावर कंटाळा आणत असतातच अनेकांनी व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज पाठवणे सुरु केले.. डब्बा!... बोअर है!... नो सो गुड!..

आता शेवटचा प्रश्न, पाडलेल्या चित्रपटाचा आवाज जास्त येतो की पडलेल्या?

© दिलीप ठाकूर
(रविवार राम प्रहर ४ ऑगस्ट २०२४ वरुन साभार)

♥

लेख क्रमांक : २१

"हेड या टेल..."

"शीर्षक" वाचताच चित्रपट रसिकांच्या डोळ्यासमोर "शोले" मधील वीरु आणि जय यांच्यातील "नाणेफेकीचे प्रसंग" नक्कीच आले असणार! सलिम जावेद यांनी आपल्या पटकथेत या "हेड या टेल"चा अतिशय चतुराईने वापर करीत आपण रसिक प्रेक्षकांना अखेरीस छान चकमा दिला हेही आपण अनुभवतो! आजपर्यंत अनेक वेळा "शोले" पाहणारे फिल्म दीवाने अगणित! आणि त्या प्रत्येक वेळेस याच "हेड या टेल"ची रंगत नव्याने घेतली जातेय. "शोले"तील अनेक छोट्या छोट्या वैशिष्ट्यातील हीदेखील एक विशेष गोष्ट. रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (प्रदर्शित अर्थात १५ ऑगस्ट १९७५) च्या प्रदर्शनास "पन्नास वर्ष" पूर्ण होत आहेत,

त्यानिमित्त बरेच काही लिहिले/ बोलले/ सांगितले/ ऐकले जातेय. फोकस टाकला जातोय. अगदी "मिम्स" बनताहेत तसेच कल्पकतेने केलेले अडिच मिनिटाचे ॲनिमेशन सोशल मिडियात मोठ्याच प्रमाणावर व्हायरल होतेय. "शोले" ची पन्नाशी अशा अनेक गोष्टींसह साजरी होतेय. एकादा चित्रपट असा व इतका समाजमय होतो हेच कौतुकास्पद. "शोले" चे हेदेखील एक यशच!

"हेड या टेल!" ही नाणेफेक मिनर्व्हा चित्रपटगृहात सत्तर एमएमचा भव्य पडदा व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम यात पाहणे कमालीचे थ्रीलींगफुल्ल असे! ते नाणे जणू आपल्याच आसपास पडलयं असे वाटे. "शोले" फक्त पडद्यावरच राहिला नाही तर तो असा चित्रपटगृहातील अंधारातही सामावला. आपण प्रेक्षकांत मुरला. हेड या टेल हा अगदीच साधा प्रश्न राहिला नाही आणि त्या नाण्याची

वस्तुस्थिती समजल्यावर तर आश्चर्याचा धक्का बसतानाच मैत्रीतील घट्ट नातेही अधोरेखित होते!

हेड या टेल नाणेफेकीचा संबंध खेळाशी. क्रिकेटमधील नाणेफेक कायमच कुतूहलाची. कारण नाणेफेक जिंकल्यावर फलंदाजी घ्यायची की क्षेत्ररक्षण याचा घेतलेला निर्णय खेळ सुरु झाल्यावर समजतो की योग्य होता की नव्हता ते...! सिनेमात क्रिकेटचा डाव अनेकदा तरी आपण पाहत आलोय. त्यात आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "लगान", नीरज पांडे दिग्दर्शित "धोनी द अनटोल्ड स्टोरी", कबिर खान दिग्दर्शित "83" या चित्रपटातील क्रिकेट रंगतदार! अशा चित्रपटांतूनही नाणेफेकीचे प्रसंग दिसले. तो खेळाचा भाग म्हणून आले. "शोले" तील नाणेफेक भावनाप्रधान ठरली, म्हणून कायमच लक्षात राहिली! आपणही प्रत्यक्ष आयुष्यात कधी मित्रांमध्ये तर कधी स्वतःसाठी नाणेफेक करतो पण

आपल्याकडे छापा व काटा अशा दोन्ही बाजू असलेले व्यवहारातील नाणे असते!

चित्रपट व नाणे (वा नाणी) हा तसा खूपच रंगतदार विषय. फार पूर्वी म्हणजेच "हाऊसफुल्ल" गर्दीत "सिंगल स्क्रीन" थिएटर्समध्ये टाव्ळ्या आणि शिट्ट्यांनी पिक्चर "एन्जॉय" करण्याच्या युगात आवडते गाणे सुरु होताच पडद्यावर नाणी फेकली जात. हा दौलतजादा प्रेमातून यायचा. मा. भगवान दादा यांच्या "अलबेला"(१९५१) या चित्रपटातील

"भोली सुरत दिल के खोटे नाम बडे और दर्शन खोटे.." गाणे पडद्यावर सुरु होताच "इंपिरियल" चित्रपटगृहात पडद्यावर पैसे उडवले जात याचे किस्से गाजले! (याबद्दल एक आठवण सांगायची तर.. "मिनर्व्हा" मध्ये "शोले" दणक्यात सुरू असताना, "अलबेला" हा "रिपिट रन" म्हणून "मराठा मंदिर" ला लागलेला! एक तर हे केवळ "सिनेमा थिएटर" नव्हे, तर त्याला "पडद्यापुढे" मोठा स्टेज सुद्धा होता. तिथे "लाइव्ह कन्सर्ट्स" सुद्धा होत असत. त्यापुढे सुमारे चारेक रांगा होतील इतकी जागा मोकळी होती. "भोली सुरत दिल के..", "शाम ढले.." ही गाणी लागली रे लागली की या मोकळ्या जागेत तरुण मुले चक्क नाचत असत.. दौलतजादा केलेल्या नाण्यांचा जणू खच पडे!)

अनेक चित्रपट गीतांना असा जबरा प्रतिसाद मिळाला. "चांद" दिग्दर्शित "धर्मा" (१९७३) या

चित्रपटातील प्राण व बिंदू यांच्यावरील "राज की बात कहदू तो.." या कव्वालीच्या वेळेसही पडद्यावर पैसे उडवले जात तसे कृपया करु नये असे चक्क या चित्रपटाच्या जाहिरातीत म्हटले गेले. चित्रपट शौकिनांनी मनापासून पडद्यावर पैसे उडवणे हीदेखील एक चित्रपट प्रेक्षक संस्कृती. त्याला कोणी "चिल्लर गोष्ट" म्हणून हिणवू नये. तशा प्रेमातूनच आपल्या देशात चित्रपट रुजला, वाढला, फोफावला!

नाण्याचीच गोष्ट चाललीय म्हणून सांगायला हवे, पूर्वी अशी नाणी देवूनच थिएटरमध्ये पिक्चरचे तिकीट मिळायचे. आमच्या गिरगावातील सेन्ट्रल, इंपिरियल, स्वस्तिक या चित्रपटगृहात दिवसा तीन खेळाना स्टॉलचे तिकीट एक रुपया पासष्ट पैसे तर मॅटीनी शोला एक रुपया पाच पैसे असे होते. ताडदेवच्या डायना थिएटरमध्ये एका आठवड्यासाठी जुने चित्रपट प्रदर्शित होत आणि बॅकलॉग भरायची ती

उत्तम संधी होती. तेथे स्टॉलचे तिकीट पासष्ट पैसे होते म्हणजेच पाच पैसे, दहा पैसे, चार आणे (पावली), आठ आणे असेच पैसे द्यावे लागत. त्यातही थ्रील होते हो. खिशात तेवढेच पैसे असत. पाच पैसे उरले तर ते गाणे सुरु होताच पडद्यावर उडवण्यात आनंद मिळे... हेड या टेलचा "शोले"तील प्रसंग त्या काळात फिल्मी गप्पांत फार चर्चेचा होता आणि ते नाणेही वेगळेच होते. आठवत असेलच म्हणा. एकदा चक्क उभेही राहते. हीच कल्पना दिग्दर्शक डेव्हिड धवनने "दीवाना मस्ताना" (१९९७) मध्ये वापरली. अनिल कपूर व गोविंदा हे जुही चावलावर इम्प्रेशन मारताना नाणेफेक करताना तेही नाणे असेच उभे राहते... "शोले" तील नाणेफेकची सर येणे शक्य नव्हतेच. तुम्हालाही माहित्येय "शोले" सतत रिपीट रनला रिलीज होतो, आताही पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त १५ ऑगस्ट २०२५ रोजीही प्रदर्शित होतोय, पोस्टरवर

फक्त त्यातले नाणे दाखवले तरी ते "शोले" चेच पोस्टर आहे असे नक्कीच समजेल हे तुम्हालाही पटतेय ना? हेड या टेलचा "सिक्का" च भारी आहे. खरी नाणी नेहमीच चालतात म्हणा.

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया २८ मे २०२५ वरुन साभार)

♥

लेख क्रमांक : २२

"शोले" १९५३ सालीही पडद्यावर आला होता...

"शोले" असे म्हणेपर्यंत तो १९७५ सालचा चित्रपट! इतकेच नव्हे तर मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला हे चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर येतेच! शुक्रवारी, २२ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद (निझाम) येथे, तर २९ ऑगस्ट रोजी गुजरात, राजस्थानमध्ये असा प्रदर्शित होत होत शहरांतून ग्रामीण भागात गेला हे आता सांगावेच लागत नाही. असे असूनदेखील १९५३ सालीदेखिल "शोले" नावाचा चित्रपट पडद्यावर आला होता?

याचे उत्तर चक्क होय असेच आहे!

एकाच नावाचे दोन, कधी तीन देखिल चित्रपट पडद्यावर आले आहेत. एकाद्या चित्रपटाचे नाव पुन्हा

वापरले जावू नये म्हणून ते कायमस्वरुपी नोंदवावे लागते! अर्थात एकाच नावाचा चित्रपट पुन्हा येतो तेव्हा त्यात काही वर्षांचे अंतर असते, कधी भाषाच भिन्न असतात. थीमनुसार चित्रपटाचे नाव निश्चित करायचयं तर एकादे नाव पुन्हा एकदा निर्माता व दिग्दर्शक आपल्या कलाकृतीला देतो. आपल्या चित्रपटाचे नाव चित्रपट निर्मात्यांची संस्था "इम्पा" (इंडियन मोशन पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड) या संस्थेत ठराविक "फी" भरुन नोंदवावे लागते. तोही एक वेगळा विषय आहे. त्यात काही गंमती जंमतीही घडतात. (कुणीही उठतो एखादं "कॅची" नाव सिनेमासाठी "टायटल" म्हणून "रजिस्टर" करतो, असे कित्येकदा घडलंय आणि आमच्या वाचनात सुद्धा आलेय. (आणि यामागे चक्क एक धक्कादायक "रॅकेट" सुद्धा आहे, हे माझ्यासह अनेकांसाठी खरोखरच धक्कादायक! याबाबतीत दादा कोंडके तर ग्रेटच! असे ऐकण्यात आलेय त्यांनी

अनेक "शीर्षके" रजिस्टर केली होती! किंवा ती "रजिस्टर" व्हावी यासाठी अर्ज केले होते. (थेट लढा! तोही "फेस टू फेस!) आमच्या ऐकिवात आल्यानुसार त्यांची ती "शीर्षके" भन्नाट असत! ती अक्षरशः "डबल मिनिंग" वाली सुद्धा असत! (ती उदाहरणे देतानाही माझा हात थरथरतोय!) "LOVE DAY - दिवस प्रेमाचे", "रोज, मारलो, मेरी" (तीन मैत्रिणींची कहाणी)!, "दिया तेरे हाथ में" या आधी "अंधेरी रात में.." हे "सेन्सॉर बोर्डाने" अॅड करायला लावलेय बरं! "जलाकर राख कर दुंगा" या शब्दाआधी "पाप को.." हे "सेन्सॉरने" टाकायला लावले. "कलियुग की रामायण" या "शीर्षकात" बदल करून सेन्सॉरने ते "कलियुग और रामायण" असे करायला लावले हे तुम्ही जाणताच! किती उदाहरणे सांगू? काही सुपिक डोक्यातून जन्म घेतलेली "कॅची" असलेली "शीर्षके", चक्क अमुक रक्कम देऊन विकत घेतली जातात, हे कळल्यावर

मी तर थक्क झालेलो! ते तर माझ्यासाठी धक्कादायक होते! एक मित्र सांगत होता की.. हा सुद्धा सध्या एक "व्यवसाय" झालाय! (मला आठवतंय! "व्हिनस" कंपनीने त्यांचा तत्कालीन "तुमसा नहीं देखा" हे "शीर्षक" देण्याआधी, मधल्या "दलालांना" मेलेला उंदीर चिमट्यांनी उचलून फेकावा, तसे टाळून थेट "प्रकाश मेहरांना" अगदी थेट संपर्क केलेला! "व्हिनस फिल्म्स" ही त्यांच्याच "समूहातील" रजिस्टर्ड अशी कंपनी असल्याने.. यात "अर्थकारण" झालेच नाही! हे विशेष! पुढच्या बाबतीत अभ्यास म्हणून पहायचे तर... यात गंमत आहे या प्रकारातून अर्थकारण करण्याची इच्छा बाळगणाऱ्या अमुक लोकांनी... "ऑपरेशन सिंदूर", "पहलगाम डायरी", "नेपाळ डायरी", "आरक्षण" अशी अनेक "शीर्षके" ही "रजिस्ट्रेशन" साठी केव्हाच गेलीत! यात आपले मराठी लोक सुद्धा

मागे नाहीत हो! असं ऐकलेय की.. "काय सांगशील ज्ञानदा!?", "काय समजलीव!", "शिवाली.. हे खरंय का!" अशी अनेक "शीर्षके" चक्क "रजिस्ट्रेशन" साठी पाठवली गेलीत.. हे "सत्य" आहे!

१९५३ च्या त्रिभुवन प्रॉडक्शन्स निर्मित "शोले" चे दिग्दर्शक बी. आर. चोप्रा हे आहेत! बी. आर. चोप्रा म्हणताच नया दौर, कानून, गुमराह, हमराज असे साठच्या दशकापासूनचे अनेक चित्रपट पटकन डोळ्यासमोर येणारच. त्यानंतरही त्यांनी दास्तान, धुन्द, पती पत्नी और वो, तवायफ, द बर्निंग ट्रेन असे विविध थीमचे चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात "शोले" चित्रपट दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटात अशोककुमार, बीना रॉय, पूर्णिमा इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाला धनीराम यांचे संगीत आहे. पत्थर का मिला तकिया बरखा की रुत है, एक परदेसी लूट गया

पपीहा रे.. असे त्याचे कथासूत्र आहे!

"यू ट्यूबवर" हा "शोले" उपलब्ध आहे. (फोटोज् वर "लिंक्स" दिल्या आहेत.) या चित्रपटाची सुरुवातच रुळांवर श्रेयनामावली पुढे सरकत राहते अशी आहे. ट्रेन वेगाने धावतेय आणि त्यावर त्याच वेगाने श्रेय नामावली आहे. ही कल्पनाच त्या काळात भन्नाट ठरली असावी. हा चित्रपट यशस्वी ठरला नाही.

रमेश सिप्पी दिग्दर्शित " शोले" ची यशोगाथा चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण होवूनदेखिल संपलेली नाही. बी. आर. चोप्रा दिग्दर्शित " शोले" या चित्रपटाशी त्याचे केवळ नामसाम्य! दोन्हीचा कथाआशय पूर्णपणे वेगळाच. पण १९५३ सालीदेखिल "शोले" नावाचा चित्रपट आपल्यासमोर आला होता हे ऐकताच त्या चित्रपटाबाबत कुतूहल निर्माण होते, उत्सुकता वाढते हे उल्लेखनीय आहे.

आज देश विदेशात "शोले" चे विविध प्रकारे जोरदार सेलिब्रेशन सुरु आहे. त्यात या १९५३ च्याही "शोले"ची दखल हवीच. भारतीय चित्रपटसृष्टीवर फोकस टाकताना जी. पी. सिप्पी निर्मित "शोले" (१९७५) पूर्वीचा व नंतरचा चित्रपट अशी मांडणी केली जाते, त्यात १९५३ सालचा "शोले" देखील सांगायलाच हवा. होय ना? १९७५ साली "शोले" अफाट लोकप्रिय ठरल्यानंतर तर नावात शोले (सुखदेव दिग्दर्शित "दो शोले" वगैरै नावाचे चित्रपट.) आणि "शोले" च्या फसलेल्या रिमेक (रामगोपाल वर्मा की आग वगैरे) असे अनेक चित्रपट पडद्यावर आले व गेले. " शोले" चे मोठेपण मात्र कायम राहिले....आणि ते यापुढेही राहिलच.

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया १९ जून २०२५ वरुन साभार)

♥

<u>लेख क्रमांक : २३</u>

कथा कल्पना एकच, चित्रपट मात्र तीन, त्यात "शोले" देखिल...

दूरवरच्या एका डोंगरापलिकडच्या गावाला एका डाकूच्या टोळीने वेठीस धरलयं, गावातील गरीब शेतकऱ्यांनी अतिशय कष्ट व मेहनतीने पिकवलेले धान्य डाकूची टोळी गावात येवून लुटतेय. त्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात भीती आहे. गावकऱ्यांना जुलमी डाकूंनी अतिशय हैराण केलेय. बंदूकीच्या जोरावर या डाकूची दहशत वाढलीय. आणि अशातच शहरातून आलेला "नायक" (कधी दोन मित्र) या शेतकऱ्यांना विश्वासात घेतो. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतो. डाकूंना पळवून लावायचे धैर्य त्यांच्यात निर्माण करतो....

ही तशी सर्वसाधारण गोष्ट. एव्हाना तुमच्यासमोर सगळे "पिक्चर" स्पष्ट झाले असेल.

त्याचं काय आहे? पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वी इंग्लिश चित्रपटातील कथासूत्र (अथवा "प्लॉट") घेऊन हिंदी चित्रपट लिहिणे व दिग्दर्शित करणे असे अनेकदा होत असे. एकादा पटकथाकार व दिग्दर्शक त्यात मसालेदार मनोरंजक चित्रपटाचा भरपूर मीठ मसाला तिखट घालून ते वेगळ्या चवीचे व रंगतदार बनवत असे. तर कोणी "आपल्या डोक्याला ताप न देता" मूळ चित्रपटाची "कॉपी" टू "कॉपी" करत असे. त्यात अधेमधे एकाद्या गाण्याची फोडणी टाकत असे. त्या काळात विदेशी चित्रपट काही विशिष्ट चित्रपटगृहात प्रदर्शित होत (मुंबईत सांगायचे तर दक्षिण मुंबईतील रिगल, स्टर्लिंग, इरॉस, न्यू एक्सलसियर, न्यू एम्पायर, मध्य मुंबईतील माहिमचे श्री). आणि प्रचंड टाळ्या शिट्ट्यांनी हिंदी चित्रपट एन्जॉय करताना थिएटर डोक्यावर घेणारा पब्लिक इंग्लिश पिक्चरच्या वाटेला जात नसे. कधी कधी एकाच विदेशी चित्रपटावर

एकाच वेळेस दोन तीन हिंदी चित्रपट बनत असत. अर्थात, आपल्या चित्रपटात काय मांडतोय, काय शिजवतोय हे एकमेकांना माहित असण्याची शक्यता तशी कमी. आणि कोण कशाला अगोदरच सांगेल, अमूकतमूक विदेशी चित्रपटावरुन आपण चित्रपट बनवतोय. ते चित्रपट प्रदर्शित होत होत गेल्यावर त्यातले काही गोष्टींचे वा दृश्यांचे साम्य चित्र स्पष्ट करीत जात असे की अमूकतमूक विदेशी चित्रपटावर हे दोन, तीन चित्रपट बेतलेत. आणि ही गोष्ट अगोदर स्पष्ट झाली तरी प्रत्येकाला वाटतेच, आपण काही वेगळे बनवतोय. आपण जे पडद्यावर आणतोय ते चित्रपट रसिकांना नक्कीच आवडेल.

अकिरा कुरोसावा दिग्दर्शित "सेव्हन समुराई" (१९५४) व जॉन स्टर्जेस दिग्दर्शित "मॅग्निफिशन्ट सेव्हन" (१९६०) या पाश्चात्य देशातील गाजलेल्या चित्रपटातील कथासूत्रवरुन हिंदीत चक्क तीन

चित्रपटांचे १९७३ साली साधारण एकाच काळात मुहूर्त झाले. आणि मग ते आपापल्या गतीने/ पध्दतीने पूर्ण होवून पडद्यावर आले.

मध्यवर्ती कथासूत्र काय? क्रूरकर्मा डाकूच्या दहशतवादातून गावाला सोडवणे, गावकऱ्यांना आनंदी करणे. आता यात पटकथाकार व दिग्दर्शक यांचे कसब, कौशल, करामत व कसब की ते ही गोष्ट कशी खुलवतात.

निर्माता एन. डी. कोठारी व दिग्दर्शक नरेंद्र बेदी यांनी याच गोष्टीवर निर्माण केलेला "खोटे सिक्के" सर्वप्रथम प्रदर्शित झाला. या चित्रपटाला सेन्सॉरने फक्त प्रोढांसाठी असे प्रमाणपत्र दिले. हा चित्रपट २० फेब्रुवारी १९७४ रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. या चित्रपटात क्रूरकर्मा डाकू झांगा (अजित) याने आपल्या टोळीसह एका गावाला दहशतखाली ठेवलेले असते. अशातच शहरातून काही मित्र आपल्यातील याच

गावातील एका मित्रासोबत सहलीला येतात. त्यांचा सहलीचा मूड असतो. त्यात एक मित्र (सुधीर) चंट

असतो. गावातील युवतींशी फ्लर्ट करतो. अशातच एके दिवशी खौफनाक डाकू झांगा आपल्या टोळीसह या गावावर आक्रमण करतो. त्याच्या दडपशाहीला विरोध करणाऱ्यास ते बंदूकीच्या गोळीने खतम करतात. शहरातून सहलीला आलेले युवक हे क्रूर कृत्य पाहून ठरवतात आपण या डाकूंचा पूर्ण खातमा करुनच गाव सोडायचा. आणि मग हे युवक, त्यांनी गावकऱ्यांकडून मिळवलेले सहकार्य आणि झांगा व

त्याच्या टोळीचा केलेला बिमोड, म्हणजे या चित्रपटाचा क्लायमॅक्स आहे. चित्रपटात फिरोज खान, अजितसिंग देओल, रणजीत, सुधीर, पेंटल असे काही मित्राच्या भूमिकेत आहे. रणजीतच्या भेटी वा मुलाखतीचे योग मला येत असतात! या चित्रपटाचे आठवण म्हणून रणजीतने मला सांगितले, गुजरातमधील एका गावात जावून एक दीड महिन्याचे चित्रीकरण सत्र केले. ज्या मोठ्या घरात काही कलाकारांची राह्यची व्यवस्था केली होती, तेथे दूध विक्री होत होती. रणजीतने महिनाभर संपूर्ण युनिटला रबडी खायला दिली. त्याचे बिल झाले बारा हजार आणि रणजीतला या महिन्याचा मेहनताना मिळाला दहा हजार. पण आपण इतरांना आनंदी ठेवण्यात रस घेतला असे रणजीतचे म्हणणे.

तर मुंबईत चांदिवली स्टुडिओत या चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण केले.

दिग्दर्शक नरेंद्र बेदी हा राजेश खन्नाचा खास मित्र! या चित्रपटाची अगोदर त्यालाच ऑफर होती. त्या काळात तो प्रचंड बिझी असल्यानेच त्याच्या जागी फिरोज खान आला.. या चित्रपटात रेहाना सुल्तान ही "गांव की छोरी" आहे. या चित्रपटातील "जीवन मे तू डरना नही.." हे किशोरकुमारने गायलेले आयुष्याच्या तत्वज्ञानावरील गाणे लोकप्रिय ठरले. संगीत राहुल देव बर्मनचे आहे. पिक्चर देमार घेमार असा ढिश्यूम ढिश्यूम मारामारीवाला असल्यानेच गल्ली चित्रपटात मोठ्याच प्रमाणावर दाखवला गेला. मीदेखील असाच गल्लीतच एन्जॉय केला.

असाच एक चित्रपट जगदीश शर्मा निर्मित व शिबू मित्रा दिग्दर्शित "खून की किमत". हा चित्रपट मुंबईत ३ मे १९७४ रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. डाकू ठाकूरसिंग (रुपेशकुमार) व त्याच्या क्रूरकर्मा टोळीने दहशतीखाली असलेले गाव. त्या गावात शहरातून

एक युवक (महेंद्र संधु) येतो आणि गावकऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी होतो. एकरुप होतो. आणि



डाकूच्या तावडीतून गावाची सुटका करतो. चित्रपटात नीलम मेहरा ही नायिका आहे. हा चित्रपट बेतास बात मनोरंजन करतो. म्हणूनच त्याला रसिकांनी नाकारले.

एव्हाना चित्रपटाचे कथासूत्र तुमच्या चांगलेच लक्षात आले असेलच. पटकथाकार सलिम जावेद व दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी त्यात मनोरंजनाचा मसाला खच्चून भरला. मांडणीत फ्लॅशबॅकचा प्रभावी वापर केला. ठाकूर बलदेवसिंग व गब्बरसिंग यांच्या

तील सूडनाट्य, बसंती टांगेवाली, ती व वीरुचे प्रेम प्रकरण, वीरु व जयची मैत्रीची गोष्ट, मौसी, सूरमा भोपाली वगैरे अनेक छोट्या छोट्या व्यक्तीरेखा. मोठाच कॅनव्हास. निर्मितीचे वाढलेले बजेट. मिनर्व्हात सत्तर एमएमचा भव्य दिमाखदार पडदा व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असे जे काही रंगवले/मांडले की चित्रपट पाहताना प्रेक्षक त्यात गुंतत गुंतत जाईल. मिनर्व्हात शोले पाहणे रोमांचक अनुभव असे. मी गिरगावकर असल्यानेच मिनर्व्हात शोले एन्जॉय करु शकलो. सामर्थ्य आहे मांडणीत असे म्हणतात ते उगीच नाही!

"शोले" खणखणीत यशस्वी ठरल्यावर त्याची पुन्हा पुन्हा रिमेक येत राहिलीय. पण मुळात साधारण एकाच "स्टोरी लाईन" वर तीन चित्रपट अशा पध्दतीने पडद्यावर आले ही रंजक गोष्ट तुम्हाला सांगायलाच हवी. "शोले" पन्नाशीचे विविध शहरात सेलिब्रेशन होत

असतानाच अशा अनेक गोष्टींसह "शोले" ची दखल हवीच. "शोले" ही कधीच न संपणारी गोष्ट आहे हे उगाच म्हटलं जात नाही. एक खास चित्रपट आणि अगणित विषय (अथवा विषयांची मालिका) अशी ही उल्लेखनीय गोष्ट.

"खोटे सिक्के" हा चित्रपट फिल्म दीवाने सांगतील की माहित्येय! "खून की किमत" पडद्यावरुन उतरला तोच विस्मरणात गेला. एकाच थीमवरील तीन चित्रपटांच्या तीन तऱ्हा.

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया २२ जुलै २०२५ वरुन साभार)

♥



"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

<u>लेख क्रमांक : २४</u>

<u>*रमेश सिप्पीचे "न आलेले चित्रपट" ही मोठेच!*</u>

पडद्यावर आलेल्या चित्रपटांपेक्षा कधी कधी पडद्यावर न आलेले चित्रपट जास्त उत्सुकता वाढवतात.. त्यात ते चित्रपट दिग्दर्शक रमेश सिप्पीचे असतील तर?

आज देश विदेशात "शोले "ला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सगळीकडेच विविध दृष्टिकोनातून फोकस टाकला जात असताना तर ही गोष्ट खूपच उल्लेखनीय! बरं, रमेश सिप्पी एकादा छोटा चित्रपट दिग्दर्शित करुन स्वतःला थोडेसे रिलॅक्स करुयात अशा विचाराचा अजिबात नाही. "शोले" च्या खणखणीत यशानंतर रमेश सिप्पीनी एकादी हलकी फुलकी प्रेम कथा दिग्दर्शित करावी असे पटकथाकार सलिम जावेद यांनी सुचवल्याची चर्चा हवेत विरली.

रमेश सिप्पींनी "शान" पडद्यावर आणण्यात रस घेतला. "करायचं ते दणक्यात"!

रमेश सिप्पी दिग्दर्शित पडद्यावर न आलेले चित्रपट ऐंशीच्या दशकातील आहेत.

त्यात एका चित्रपटात श्रीदेवी व माधुरी दीक्षित होते. एव्हाना श्रीदेवी आणि माधुरी दीक्षित या दोघींचेही चाहते विचार करीत असतील की, या दोघी एकाच चित्रपटात एकत्र कधी बरे आल्या होत्या? काहींनी लगेचच गुगल केलेही असेल. झटपट माहितीचा हा स्रोत झाला आहे. पण नेमके उत्तर मिळेलच असे नाही. माधुरीच्या करियरच्या तर सुरुवातीला तर नाही ना? यासारखे वगैरे वगैरे प्रश्न मनात नक्कीच आले असतील. आणि ते यायलाच हवेत. तो चित्रपट होता 'जमीन' (१९८७) आणि दिग्दर्शक होता रमेश सिप्पी. या चित्रपटात विनोद खन्ना हीरो होता. आणि जुहूच्या एका पंचतारांकित

हॉटेलमध्ये या 'जमीन'चा शानदार पार्टीने मुहूर्त झाला होता. रात्री उशिरापर्यंत ही पार्टी रंगली. मल्होत्रा नावाचा कोणी निर्माता होता. रजनीश आश्रमातून चित्रपटसृष्टीत परतलेल्या विनोद खन्नाचे एव्हाना पुनरागमन मुरत होते. सुदैवाने त्याला बरेच नवीन चित्रपट मिळत होते. श्रीदेवी "टॉप फॉर्मात" होती. तिला "लेडी अमिताभ" असे कौतुकाने म्हटले जात होते. माधुरी मात्र तोपर्यंत यशासाठी झगडत होती. तिचे सुरुवातीचे चित्रपट "फ्लॉप" ठरल्याची गोष्ट आज

कालबाह्य झाली असली तरी ती वस्तुस्थिती आहे! तिच्यासाठी रमेश सिप्पीचा चित्रपट एक उत्तम पर्वणीच होती. 'सागर' (१९८५) नंतरचा चित्रपट म्हणून रमेश सिप्पी आता काय मांडणार याची उत्सुकता होती. मुहूर्तानंतर 'जमीन 'चे पहिले शूटिंग सत्र सुरु होणार तोच बातमी आली की, हा चित्रपट 'जमीनदोस्त' झाला, अर्थात बंद पडला, डब्यात गेला. असे अनेक लहान मोठे चित्रपट काही ना काही कारणास्तव डब्यात जातच असतात. तसाच हादेखील गेला असला तरी श्रीदेवी आणि माधुरी दीक्षित एकत्र येणे राहून गेले ना? पण त्या दोघी वेगळ्या पध्दतीने एकत्र आल्या याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल. तो चित्रपट होता, राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'पुकार' (२०००) या चित्रपटात अनिल कपूर, माधुरी दीक्षित आणि नम्रता शिरोडकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. माधुरीचे प्रभू देवासोबतचे 'के सरा सरा.. ' नृत्य गीत

याच चित्रपटातील आहे हे आठवलं असेलच! या चित्रपटात श्रीदेवी पाहुणी कलाकार म्हणून होती का असा प्रश्न एव्हाना तुमच्या मनात आला असेल. तर अजिबात नव्हती. या चित्रपटाचा निर्माता होता, बोनी कपूर. आता बोनी कपूरची बायको श्रीदेवी. म्हणजे ती एक प्रकारे या चित्रपटाची निर्माती नाही का? त्या निमित्ताने त्यांचा एका चित्रपटासाठी का होईना पण संबंध आला. पण त्यापेक्षा त्या एकाद्या चित्रपटात एकत्र आल्या असत्या, एकादे 'डोला रे डोला..' सारखे फक्कडबाज नृत्य गीत साकारले असते तर पिक्चर सुपर हिट ठरला असताच आणि दोघींचेही फॅन्स आणि फॉलोअर्स अधिकाधिक आनंदले असते ना? काही राहून गेलेल्या गोष्टी अशाही असतात....

रमेश सिप्पीचा असाच आणखीन एक विशेष उल्लेखनीय चित्रपट मुहूर्तालाच बंद पडला. त्याचे चित्रपटाचे नाव होते, "राम की गीता श्याम की सीता".

१९८९ सालची ही गोष्ट. विशेष उल्लेखनीय गोष्ट या चित्रपटात अमिताभ बच्चन व श्रीदेवी या दोघांचीही दुहेरी भूमिका होती. ही गोष्टच मुळी उत्सुकता वाढवणारी. अंधेरीतील नटराज स्टुडिओत या चित्रपटाचा मुहूर्त झाला आणि विशेष म्हणजे, या मुहूर्त दृश्यात अजय वढावकर देखिल होता. आपल्याला अतिशय मोठी संधी लाभल्याने तो विशेष आनंदात होता. पण या चित्रपटाची प्रगती या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या बातम्या येण्याइतपतच राहिली. रमेश सिप्पी यांनीच अमिताभ बच्चनला ॲक्शन हिरोची भूमिका देत "आलिशान" या नावाच्या चित्रपटाची केलेली घोषणा अशीच हवेत विरली.

अशा पध्दतीने अनेक चित्रपट घोषणा वा मुहूर्तापासून काही रिळांच्या चित्रीकरणापर्यंत बंद पडत असतातच. चित्रपट निर्मितीतील तीही एक महत्वाची गोष्ट. पण "शोले" वाल्या दिग्दर्शक रमेश

सिप्पीचे चित्रपट पडद्यावर येत नाहीत ही गोष्ट रंजक ठरते.

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया २२ ऑगस्ट २०२५)

♥



<u>लेख क्रमांक : २५</u>

<u>जोशीले... शोले बनवायचा व्यर्थ प्रयत्न</u>

सिनेमाच्या जगातील सर्वात भारी गोष्ट म्हणजे, सुपर हिट पिक्चरसारखाच पिक्चर आपणही बनवू

असे वाटणे.

आता याला तुम्ही प्रभावित होणे म्हणा, नक्कल म्हणा, अति आत्मविश्वास म्हणा वा रिमेक करणे म्हणा. सुपर हिट चित्रपटावरुन चित्रपट काढण्याची प्रेरणा घेऊन अनेक चित्रपट अनेक वर्ष पडद्यावर येताहेत.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (मुंबईत प्रदर्शित १९७५) च्या यशायासून अनेकांना वाटले आपणही "शोले" सारखाच जबरदस्त मसालेदार मनोरंजक चित्रपट पडद्यावर आणू. बी. सुभाष दिग्दर्शित "आंधी तुफान" पासून रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "आग" पर्यंत अनेक चित्रपट आले. त्यात सिबते हसन रिझवी दिग्दर्शित "जोशीले" (१९८९) नावाचाही एक चित्रपट होता. तो फारसा कोणाच्या लक्षातही नसेल कदाचित.

चित्रपटाची जोरदार घोषणा होताना त्याचा दिग्दर्शक शेखर कपूर होता व निर्माता सिबते हसन रिझवी होता. सनी देओल, अनिल कपूर, श्रीदेवी, मीनाक्षी

शेषाद्री अशी जबरदस्त स्टार कास्ट आणि खलनायकाच्या भूमिकेत राजेश विवेक. चित्रपटाची घोषणा करतानाच हा बिग बजेट शोले स्टाईलचा जबरदस्त ॲक्शनपट असेच म्हटले गेले. शेखर कपूर " मासूम " (१९८३) व "मिस्टर इंडिया" (१९८७) अशा दोन भिन्न पठडीतील चित्रपटांचा समिक्षक व रसिक प्रेक्षक यांची उत्तम दाद मिळाल्याने एकदम भन्नाट फॉर्मात होता. "मिस्टर इंडिया" निर्मितीवस्थेत असतानाच शेखर कपूरने "जोशीले" ची पूर्वतयारी सुरु केली. आणि त्यातही खास उल्लेखनीय गोष्ट "जोशीले" ची पटकथा जावेद अख्तर यांची होती. 'मिस्टर इंडिया" सलिम जावेद या जोडीने लिहिलेला शेवटचा चित्रपट. तो पडद्यावर येईपर्यंत ही जोडी वेगळी झाली (त्या काळात ही जोडी फुटली असेच म्हटले गेले). आणि सलिम खान व जावेद अख्तर हे स्वतंत्रपणे पटकथा व संवाद लेखन करु लागले..

असे जावेद अख्तर व दिग्दर्शक शेखर कपूर " जोशीले" साठी एकत्र आले म्हटल्यावर "बिग ब्रेकिंग न्यूज". एकूणच थाटमाट जणू "शोले"च बनवायला

चाललेत असा. पण सगळ्याच गोष्टी इतक्या सहज कशा घडतील? चित्रपटाचा जंगी मुहूर्त झाला तेव्हा चित्रपटाचे नाव "जोशीले जोशीले" असे फोर्सफुल्ल होते. सगळीकडे कव्हरेज येताना "पुन्हा शोले निर्माण होतोय" असाच सूर होता. अशी टामटूम करण्याची काही आवश्यकता होती काय? शेखर कपूरकडून अशी अजिबात अपेक्षा नव्हतीच. शोले एकदाच पडद्यावर येतो. तसा तो आला. सुरुवातीस नरम

वाटचाल असलेला शोले काही दिवसांतच असा काही चालायला, धावायला लागला की आज पन्नास वर्ष पूर्ण झाली तरीही त्याचा सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रावरील प्रभाव कायम आहे.

शेखर कपूरने शिवधनुष्य तर उचलले तोच निर्माते व वितरक गुलशन राय यांनी "जोशीले जोशीले" या नावालाच आक्षेप घेतला. कारण, त्यांनी निर्मिलेल्या यश चोप्रा दिग्दर्शित "जोशीला" (दिवाळी १९७३) या चित्रपटाचे नाव त्यांना कोणालाच द्यायचे नव्हते. "जोशीला" या नावाचे सर्वाधिकार आपणाकडे आहेत ही गुलशन राय यांची भावना. म्हणून चित्रपटाचे नाव "जोशीले" असे केले. शोलेसारखाच भव्य दिव्य चित्रपट काढायचा म्हणून प्रवीण भट्ट, को हंग चांग व दिलीप मुखर्जी असे तीन कॅमेरामन सज्ज झाले. उत्तर प्रदेशातील पहाडी भागात चित्रीकरण सुरु झाले. राजेश विवेक साकारत असलेला "योगी डाकू" हा

गब्बरसिंगसारखा खौफनाक, क्रूरकर्मा, हिंसक वृत्तीचा, अक्राळविक्राळ, जालीम असणार अशा बातम्या येवू लागल्या. उगाच असे वाटू लागले, "शोले" सारखाच जबरदस्त ॲक्शन पॅक्ड चित्रपट पडद्यावर येतोय. खरं तर शोले पडद्यावर येईपर्यंत तो असा भारी चित्रपट असेल, भारतीय चित्रपटसृष्टीतील माईलस्टोन ठरेल, जबरदस्त लोकप्रियतेमुळे तो जणू या देशाची लोककथा ठरेल असे अजिबात वाटले नव्हते! चित्रपटाचे व्यावसायिक यशापयश हे रसिक प्रेक्षकांच्या हाती असते. त्याचा विसर न व्हावा. अशातच चित्रपट अर्धाअधिक झाल्यावर शेखर कपूरने जोशीलेचे दिग्दर्शनच सोडले. एका बिग बजेट चित्रपटाला प्रचंड मोठा सांस्कृतिक धक्काच! एव्हाना सनी देओल, अनिल कपूर, श्रीदेवी व मीनाक्षी शेषाद्री हे अन्य चित्रपटात बिझी झाले. त्यांच्या पुन्हा तारखा मिळवून चित्रपट पूर्ण करणे आव्हानात्मक झाले.

आणि त्यातही आता दिग्दर्शन कोण बरे करणार? अगोदरच चित्रपट "ओव्हर बजेट" झालेला. त्यामुळेच पटकथेत फेरफार करणे आलेच. कसेही करुन चित्रपट पडद्यावर तर यायला हवा. निर्माते सिबते हसन रिझवी यांनीच ती जबाबदारी स्वीकारली. आणि जसे जसे शक्य होईल तसे चित्रीकरण करीत करीत एकदाचा "जोशीले" पूर्ण झाला आणि पडद्यावर येईपर्यंत तो "शोले" ची दहावी वगैरे "झेरॉक्स" झाला होता. मला आठवतय मुंबईतील मेन थिएटर अप्सरामध्ये तो पाहात असताना त्याच्यातील विस्कळीतपणा प्रकर्षाने जाणवत होता. आणि त्याहीपेक्षा दुर्दैव म्हणजे, शैतान योगी डाकू गब्बरसिंगच्या सावलीच्या आसपासही पोहचला नव्हता. तो नुसताच इकडून तिकडून ओरडत, हंसत, खिदळत होता. अशाने गब्बरसिंगसारखी दहशत कशी काय निर्माण होईल? हंसेच होईल ना?

गब्बरसिंग आपल्या पहिल्याच दृश्यापासून प्रेक्षकांवर जणू मानसिक दबाव टाके. आपली दहशत निर्माण करे. मोजक्याच शब्दात भीती निर्माण करे, "कितने आदमी थे...?"

"आंधी तुफान" काय, "जोशीले" काय आणि अगदी राजकुमार संतोषी दिग्दर्शित "चायना गेट" चित्रपट काय, "शोले"चा जबरदस्त प्रभाव पुसू देऊ शकत नव्हतेच! रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "रामगोपाल वर्मा की आग" हा चित्रपट तर अगदीच शेकोटी ठरला. रामूकडून अशी अजिबात अपेक्षा नव्हतीच. रामगोपाल वर्मा त्यानंतर आपला जुना फॉर्म मिळवू शकला नाही. का बरे त्याने केला शोलेच्या "रिमेक" चा अट्टाहास? असा प्रश्न पडला आणि त्याचे उत्तर त्यानेही कधीच दिले नाही. मूळ "शोले"चा प्रभाव पुसण्याचा प्रयत्न करु नका हो. शोले ठरवून जमून आलेला चित्रपट नाही तर तो जमून आलेला मनोरंजक

आलेला चित्रपट नाही तर तो जमून आलेला मनोरंजक चित्रपट आहे!

"शोले" ची धग आज पन्नास वर्षांनंतरही कायम आहे, कारण हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केले जाईल, चिक्कार टाळ्या व शिट्या मिळतील असा खच्चून तिखट मीठ मसाला हिंग जिरे लसूण त्यात होते. आणि त्यात आणखीन एक विशेष उल्लेखनीय गोष्ट, मुंबईत मिनर्व्हा चित्रपटगृहात "सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" असा अनुभवणे थरारक होते. आणि तेच निर्णायक ठरले. मिनर्व्हातील शोलचा रोमांचक अनुभव आणि अन्य चित्रपटगृहात शोले पाहणे यात बराच फरक होता. याचं कारण, मिनर्व्हातील सत्तर एमएमचा विशाल पडदा आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा इफेक्ट. घोडेस्वार असो, ट्रेनचा प्रसंग असो, वीरु व जय यांच्यातील नाणेफेक असो, मिनर्व्हात "शोले" काही

वेगळाच दिसे. म्हणून तर त्या काळात मुंबईभरचे चित्रपट रसिक आपल्या विभागातील चित्रपटगृहात शोले पाहिल्यावर पुन्हा एकदा शोले पाहण्यास मिनर्व्हात येत. अहो इतकेच नव्हे, त्या काळात गावाकडचा पाहुणा मुंबईत आल्यावर त्याला गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, मरीन ड्राईव्ह, मलबार हिल अशी प्रेक्षणीय स्थळे दाखवतानाच त्यांना मिनर्व्हात शोलेही दाखवत आणि ते पाहुणे गावी गेल्यावर पारावरच्या गप्पांत मुंबईत मिनर्व्हात शोले पाहून आलो याचा अनुभव रंगवून खुलवून सांगत. याला चित्रपटाचा सामाजिक प्रभाव म्हणतात....

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र १० ऑगस्ट २०२५)

♥

लेख क्रमांक : २६

शोले@ ५० वर्ष:
अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे,
बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे

तू (अथवा तुम्ही) शोले पाहिला तेव्हा मिनर्व्हात तिकीट दर किती होते?

आतापर्यंत सर्वाधिक वेळा मला केलेला प्रश्न. असा प्रश्न करणाऱ्यांत चित्रपट रसिक, आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीतील काही सिनेपत्रकार आणि ओटीटी युगातील काही फिल्मवाले असे मिलेजुले आहेत. मलाही हा प्रश्न आवडतो आणि मी त्यावर माहितीसह मनसोक्त मनमुराद उत्तर देतो. फ्लॅशबॅकमध्ये जाण्याची एक फिल्मी संधीच.

आज "मल्टीप्लेक्स" युगात चित्रपटाच्या खेळाच्या वेळेनुसार तिकीट दर असतात याची

आपणासही कल्पना आहे. सकाळी नऊचा खेळ कमी रुपयांत आणि मिडनाईट मॅटीनी शो महागड्या तिकीट दरात हे आपणास माहीत आहेच. पडद्यावरचा चित्रपट तोच पण वेळेनुसार त्याची किंमत बदलते असे आजचे युग. पूर्वी असे नव्हते असे अनेक बाबतीत प्रत्येक पिढी जुनी होत जाताना हमखास म्हणते त्यात ही देखील एक गोष्ट. सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहाच्या चलतीच्या युगात दिवसा तीन खेळ तिकीट दर फिक्स असत. आणि त्याच चित्रपटगृहात मॅटीनी शोला जुने चित्रपट प्रदर्शित होताना तिकीट दर उतरते असत. त्या काळातील आम्हा चित्रपट रसिकांच्या डोक्यात व खिशात हे समीकरण फिट्ट होते. नाझ चित्रपटगृहाचा अनुभव सांगतो. नासिर हुसेन दिग्दर्शित "यादों की बारात" असो! जे. ओम प्रकाश दिग्दर्शित "आप की कसम" असो, स्टॉल तिकीट दर दोन रुपये वीस रुपये (शोच्या

वेळेपूर्वी वीस मिनिटे अगोदर ही खिडकी उघडली जाई), अप्पर स्टॉल तीन रुपये तीस पैसे व बाल्कनी चार रुपये चाळीस पैसे असे तिकीट दर होते! (या तिकीटांची आगाऊ तिकीट विक्री होत असे. तिकीटे शिल्लक राहिलीच तर करंट बुकिंगची खिडकी उघडे). याच नाझ चित्रपटगृहात मॅटीनी शोला एका आठवड्यासाठी प्रदर्शित होणारे जुने चित्रपट पुढील पिढीसमोर उत्तम पर्वणी असत. याच नाझमध्ये मी मॅटीनी शोला विजय आनंद दिग्दर्शित "नौ दो ग्यारह"", सुबोध मुखर्जी दिग्दर्शित "जंगली", नरेंद्र बेदी दिग्दर्शित "बंधन" असे अनेक जुने चित्रपट एन्जॉय केले. म्युझिकल सुपरहिट चित्रपट हे त्या काळातील मोठेच वैशिष्ट्य. नाझला मॅटीनी शोला स्टॉल एक रुपया पासष्ट पैसे, अप्पर स्टॉल दोन रुपये वीस पैसे व बाल्कनी दोन रुपये पंचाहत्तर पैसे असे तिकीट दर असत. गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृहात, डॉ.

भडकमकर मार्गावरील "इंपिरियल" चित्रपटगृहात मॅटीनी शोला हेच दर स्टॉल एक रुपया पाच पैसे, अप्पर स्टॉल एक रुपया पासष्ट पैसे व बाल्कनी दोन रुपये वीस पैसे असे तिकीट दर होते. आज वयाची साठी अथवा पासष्टी ओलांडलेले चित्रपट रसिक एव्हाना नक्कीच फ्लॅशबॅकमध्ये गेले असतील. उपनगरात, अन्य शहरांत, ग्रामीण भागात यापेक्षाही कमी दरात चित्रपट एन्जॉय करता येई. तो खरा चित्रपटाचा सुवर्ण काळ होता. पडद्यावरच्या जगात हरवून हरखून जाता येई. भारी आवडलेला चित्रपट पडद्यावर ठेवून बाहेर पडले जात नव्हते.

.... आणि अशातच मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी "शोले" आला. मिनर्व्हा व न्यू एक्सलसियर चित्रपटगृहात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड अशा भव्य रुपात आणि मुंबईतील गीता, गणेश, शारदा, बादल, कलामंदिर, मिलन, बहार,

चंदन इत्यादी तसेच ठाणे शहरातील "आनंद" व "वंदना" चित्रपटगृह, कल्याणमधील "न्यू प्रकाश" इत्यादी चित्रपटगृहात पस्तीस एमएम अशा स्वरुपात जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" आणि त्याच शुक्रवारी शालिमार चित्रपटगृहात मॅटीनी शो व इतरत्र "गरीबी हटाव" हा चित्रपट प्रदर्शित झाला. "आर. के. मोठा" नावाचे दिग्दर्शक होते आणि या चित्रपटात राजवंश, रचना, नरेंद्रनाथ, पद्मा खन्ना, अनिता गुहा इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. म्हणजेच सामना एकतर्फी होता. या दोन्ही चित्रपटांच्या जाहिराती माझ्या कलेक्शनमध्ये आहेत. तोपर्यंत मुंबईत यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" (२४ जानेवारीला प्रदर्शित) रौप्य महोत्सवी आठवड्या नंतरची घौडदौड सुरु केली होती. मिनर्व्हावरुन मोती चित्रपटगृहात पुढचा प्रवास सुरु झाला होता (त्यानंतर तोच प्रवास लिबर्टीत मॅटीनी शोला शंभराव्या

आठवड्यापर्यंत चालला), जय संतोषी मा (३० मे रोजी प्रदर्शित) अलंकार मॅटीनी शो, एडवर्ड, किस्मत या चित्रपटगृहात हाऊसफुल्ल गर्दीत सुरु होता, के. एस.



सेतुमाधवन दिग्दर्शित "ज्युली" (१८ एप्रिल), फिरोज खान दिग्दर्शित "धर्मात्मा" व दादा कोंडके निर्मित व दिग्दर्शित "पांडू हवालदार" हे दोन्ही चित्रपट एकाच शुक्रवारी म्हणजेच ९ मे रोजी प्रदर्शित होवून लोकप्रिय ठरले होते. ("१९७५" चे "टॉप टेन"! "लिंक" पहा!)

१६ मे रोजी मुंबईत रवि टंडन दिग्दर्शित "खेल

१६ मे रोजी मुंबईत रवि टंडन दिग्दर्शित "खेल खेल मे" रिलीज झाला. असे करत करत आणखीन काही चित्रपट प्रदर्शित होत होत असतानाच "शोले" आला रे आला आणि पडला पडला असे म्हणता म्हणता असा काही सुपरहिट झाला की असं वाटतयं की तो आजही पडद्यावर सुरु आहे. मिनर्व्हाची इमारत केव्हाच पाडलीय पण आजही तेथून जाताना गब्बरसिंगची दहशत जाणवते. पिक्चर असा इतपत मुरायला हवा. याला पिक्चरची ताकद म्हणतात!

"शोले" साठी मिनर्व्हात स्टॉलच्या पहिल्या चार रांगा रिकाम्या असत. कारण तेथे बसून सत्तर एमएमच्या पडदाभरचा शोले पाहणे जिकरीचे होते. अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे व बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे असे तिकीट दर आज किरकोळ वाटतात. पन्नास वर्षांपूर्वी मात्र ते थोडे महाग वाटत. पिक्चर मोठा म्हणून तिकीट दर चढे हे समीकरण पटेल न पटेल पण होते हे खरे! त्या काळातील मध्यमवर्गीय व कनिष्ठ मध्यमवर्गीयांसाठी नक्कीच थोडे जास्त होते. आणि पिक्चर हिट झाल्यावर हेच तिकीट दर परवडण्यासारखे झाले. हिच तर आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती आहे.

"शोले" मिनर्व्हात हाऊसफुल्ल गर्दीत (या चित्रपटगृहाची प्रेक्षक संख्या १४९९ अशी भरपूर) पडदाभर पाहण्यात एक वेगळेच थ्रील होते. माझी आणि माझ्या अगोदरची पिढी याबाबत भाग्यवान!

चित्रपट मोठ्याच पडद्यावर पाह्यचा असतो हे त्या काळात सांगावे लागत नव्हते! तीच तर पध्दत होती. स्टिरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा परिणाम " शोले" ची रोमांचकता वाढवत होते. धडधड करीत जाणारी माल ट्रेन, गब्बरसिंग व टोळीची बेभान घोडेस्वारी, जय व वीरु यांच्यातील नाणेफेकीचा प्रसंग, राहुल देव बर्मनचे पार्श्वसंगीत, गब्बरसिंगचे विशिष्ट लयीत बोलणे हे सगळेच मिनर्व्हात एक रोमांचक अनुभव देई. तिकीटावर ते लिहिलेले कसे असेल? पण वाढत्या तिकीट दरात हे अनुभवता येई. आणि ते पुन्हा पुन्हा अनुभवण्यासाठीच मिनर्व्हात पुन्हा पुन्हा जाणारे, रांगेत उभे राहून तिकीट काढणारे फिल्म दीवाने अनेक. पुन्हा पुन्हा चित्रपट एन्जॉय करणारे आणि त्यावर मनापासून बोलणारे चित्रपट रसिक जास्त यश देत असतात. या प्रेक्षकांच्या बळावर चित्रपट ज्युबिली हिटचा प्रवास सहज करीत. मिनर्व्हात शोले दिवसा

तीन खेळ याप्रमाणे ३१ ऑगस्ट १९७८ पर्यंत मुक्कामाला होता आणि मग तेथेच मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आणखीन दोन वर्ष असा एकूण पाच वर्ष शोलेने प्रवास केला. त्या काळात गावाकडील नातेवाईक वा ओळखीचे मुंबईतील नातेवाईकांकडे आल्यावर त्यांना मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, मलबार हिल, शिवाजी पार्क याबरोबरच मिनर्व्हात "शोले" ही दाखवत अशी सामाजिक सांस्कृतिक स्थिती होते. "शोले" चे हे वेगळेच यश.

"शोले" च्या पन्नास वर्षांच्या खणखणीत वाटचालीत या चित्रपटावर इतकं नि असं सातत्याने लिहिले जातेय की हा कदाचित जागतिक पातळीवरील विक्रम ठरावा. त्यात त्याचे तेव्हाचे मिनर्व्हातील तिकीट दर हा कदाचित छोटी गोष्ट वाटेलही. पण तसे अजिबात नाही. याचे कारण,

सत्तरच्या दशकात सिंगल स्क्रीन थिएटर्समधील "स्टॉलचा पब्लिक" म्हणून पडदाभरचा चित्रपट पाहताना त्या काळातील तिकीट दर ही एक वेगळीच सवय होती. ऑनलाईनच्या आजच्या युगात त्यात काय एवढेसे असे वाटत असेलही. पण त्या काळातील हा तिकीट दराचा अनुभव काही वेगळाच. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील हाही एक रंगतदार फंडा.

© दिलीप ठाकूर
(रविवार राम प्रहर १० ऑगस्ट २०२५)
♥

लेख क्रमांक : २७

"शोले"@५० वर्ष... इस्रायलला "हिब्रू" भाषेतही प्रदर्शित झाला होता....

"शोले"च्या न संपणाऱ्या गोष्टी हेदेखील एक विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्य! "शोले" पडद्यावरचा व अवतीभवतीचा, किती गोष्टी सांगाव्यात याला काहीच "द एण्ड!" (शेवट) नाही.

आज विविध माध्यमांतून "शोले" चे खणखणीत यशस्वी पन्नासावे वर्ष गाजतेय!

मुंबईत "शोले" १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला, हे जगभरातील भारतीय चित्रपट रसिकांना पुन्हा वेगळे सांगावेच लागत नाही. मुंबईनंतर "शोले" टप्प्याटप्प्याने दिल्ली, पूर्व पंजाब, पश्चिम बंगाल, राजस्थान, गुजरात, मध्य भारत इत्यादी अनेक ठिकाणी प्रदर्शित होत होत गेला. तालुका पातळीवर आणि खेड्यापाड्यातून "शोले" पोहचायला काही

महिने लागले! तोपर्यंत रेडिओ विविध भारतीवरील "शोले" चे पंधरा मिनिटांचा रेडिओ प्रोग्राम, रेडिओ सिलोनवरील "बिनाका गीतमाला" मधील "मेहबूबा मेहबूबा.. ", "यह दोस्ती हम नहीं तोडेंगे.." या गाण्यांचे सोळा बुधवार स्थान!, मुद्रित माध्यमातून (दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके) यातून "शोले" वर सातत्याने लिहिले गेले या माध्यमांतून पोहचत होते. गावावरुन मुंबईत आलेल्या पाहुणे व नातेवाईक यांना खास करुन मिनर्व्हात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंडच्या अनुभवात "शोले" हमखास दाखवत आणि अशी मंडळी गावाला गेल्यावर पारावरच्या गप्पांत मुंबईत मिनर्व्हात शोले पाहून आलो याच्या रसभरित गोष्टी रंगवून खुलवून सांगत! असा "शोले" जगभरातील अनेक देशांतही पोहचला यात आश्चर्य ते काय?

काही वर्षांपूर्वी तर याच 'शोले'वर आधुनिक

तंत्रज्ञानाच्या वापराने "थ्री डी" संस्कार करून तो पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. आजही या चित्रपटाचा दबदबा कायम आहे. तर विदेशातही हा चित्रपट त्या काळात प्रदर्शित झाला. विदेशात आपल्याकडचे चित्रपट एक तर स्थानिक भाषा डब करुन रिलीज होतात अथवा "सबटायटल्स" देऊन ते पडद्यावर येतात! चित्रपट माध्यम व व्यवसाय यांची ती एक प्रकारची व्यावसायिक व्यवस्था आहे! आणि त्यामुळे एका भाषेतील सुपर हिट चित्रपट अन्यभाषिक प्रेक्षकांपर्यंत पोहचतात. आणि मग त्या चित्रपटाचे स्थानिक भाषेत पोस्टर प्रकाशित होते (गेल्या काही वर्षात चीनमध्ये असेच मोठे हिंदी चित्रपट प्रदर्शित झाले), इस्रायलमध्ये १९७८ साली 'शोले' स्थानिक 'हिब्रू' भाषेत प्रदर्शित झाला होता तेव्हाचे हे पोस्टर बघा. खूपच इंटरेस्टींग आहे ना? किती वेगळे वाटतेय ना? आपला चित्रपट जगभरातील अनेक देशांत

स्थायिक झालेले अनिवासी भारतीय जसे पाहतात तसेच तेथील स्थानिक चित्रपट रसिकही पाहतात

तात्पर्य, कलेला प्रांत, राज्य, देश, भाषा यांच्या अजिबात मर्यादा नसतात. आणि एका भाषेतील सुपर हिट चित्रपटाची अन्य भाषेत थोडी फार का असेना पण निश्चितपणे दखल घेतली जाते आणि तो लोकप्रिय चित्रपट मिडियातून दुरपर्यंत पोहचत असतोच. 'शोले ' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आजच्या ग्लोबल युगातील रसिकांनाही या चित्रपटाची महती समजते.

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

'शोले' असा कधी काळी हिब्रू भाषेत डब करुन रिलीज झाला होता हे अनेक वर्षांनी समजलं हेच विशेष आहे. आता विदेशातील चित्रपट रसिकांना "शोले" त काय दिसले असेल? सूडकथाच. "शोले" ची मूळे "सेव्हन समुराई" या विदेशी चित्रपटावर बेतला असल्याचे नेहमीच म्हटले गेले! (परंतु "शोले" मधील "शूटिंग" विषयी विस्ताराने बोलायचं झालं तर..! आज काही अमुक नव्या "गोष्टी" सामोऱ्या येऊ लागल्या आहेत! अनेकांनी "शोले" मधील चुका, "शोले" मधील अमुक वेगळे काही, असे अनेक "व्हिडिओज".. अक्षरशः "यू-ट्यूब" वर "पोस्ट" केले आहेत. अभ्यासकानी तेही पहावे, हे मात्र नक्की, असं मला वाटतं! "लिंक्स" पहा!)

या दोन चित्रपटांची तुलना का करावी? विदेशी चित्रपट रसिकांना "शोले" मध्ये ठाकूर बलदेव सिंग (संजीवकुमार) व गब्बरसिंग (अमजद खान) यांचा

उत्तम दर्जाचा अभिनय पहावासा वाटला असेल! रामगढ गाव जणू एक व्यक्तिरेखा म्हणून आपले अस्तित्व दाखवते! याचाच अर्थ "कला दिग्दर्शक राम येडेकर" यांना सगळे श्रेय! सलिम जावेद यांची अतिशय बंदिस्त व उत्कंठावर्धक पटकथा व प्रभावी संवाद आणि या सगळ्याचे रमेश सिप्पीने केलेले दिग्दर्शन! या गोष्टींना विदेशातील चित्रपट रसिकांची दाद मिळाली असेल...!

"शोले" असा अन्य भाषेत डब केल्याने अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचलाय हेदेखील वैशिष्ट्य! "शोले" ने असादेखील एक विक्रम केला आहे! "शोले" असे अनेक विक्रम करेल असे त्याच्या मुहूर्ताच्या वेळेस (३ ऑक्टोबर १९७३ रोजी) बंगलोर जवळील रामगढ गावाच्या सेटवर "शोले" चा मुहूर्त झाला!) कोणा ज्योतिषाने सांगितले असते तर त्याला पुरता वेड्यात काढले असते! जगभरातील कोणत्याही

भाषेतील चित्रपटाचे व्यावसायिक यशापयश कोणताही ज्योतिषी सांगू शकत नाहीत. आणि ते सांगू देखिल नये! ते फक्त आणि फक्त चित्रपट रसिकांच्या हाती असते... "शोले" समाजातील अगदी खालच्या माणसापर्यंत पोहचलेला चित्रपट आहे, "हिब्रू" व अन्य भाषेत डब केल्याने तो अन्यभाषिक प्रेक्षकांपर्यंतही पोहचला! तेच तर महत्वाचे असते! अन्यथा चित्रपट निर्मितीची संख्या वाढत असते आणि त्यातील अनेक चित्रपट पडद्यावरच राहतात. "शोले" जगभरातील चित्रपट रसिकांत मुरला.

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र वरून)

♥

लेख क्रमांक : २८

वक्त, शोले, जानी दुश्मन वगैरेचे मल्टी स्टार कास्ट पोस्टर.....

"पिक्चरचं पोस्टर" त्याच्या प्रसिध्दीतील महत्वाचा फंडा. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल माध्यमातूनही चित्रपट पोस्टरचा (त्याला आजच्या युगात डिझाईन म्हणतात!) प्रवास सुरु आहे. रस्त्यावरील विजेचे खांब, गल्लीच्या नाक्यावरील भिंत, बस स्थानक, रेल्वेस्थानक येथे पोस्टर दिसू लागले रे लागले की, नवीन चित्रपट प्रदर्शित होण्याची तयारी सुरु झाली याचाच जणू "सिग्नल"! पोस्टर हे प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचवण्याचे महत्वाचे माध्यम! ते प्रामुख्याने "थीम"नुसार असावे अशी अपेक्षा, कधी ते स्टारला महत्व देणारे असते. श्याम बेनेगल यांच्या अंकुर, भूमिका, मंडी , झुबेदा अशा चित्रपटांची पोस्टर

म्हणजे, येथे दिग्दर्शक दिसतो असे कौतुकाने म्हणतात वाटते!

तर निर्माता आणि दिग्दर्शक "राजकुमार कोहलीं"च्या चित्रपटाबाबत नेहमीच मी गंमतीने म्हणतो, त्यांच्या "मल्टी स्टार कास्ट" चित्रपटातील अनेक चेहरे मोहरे पोस्टरवर जेवढे मोठे तेवढेच पडद्यावर छोटे. अथवा पोस्टरवर जास्त फूटेज पण पडद्यावर अगदी जेमतेम! पण "मल्टी स्टार कास्ट" चित्रपट निर्मिती व दिग्दर्शकांची हौस मौज अखेरपर्यंत कायम होती.

खरं तर यश चोप्रा दिग्दर्शित व बी. आर. चोप्रा निर्मित 'वक्त' (१९६५) हा आपल्याकडचा पहिला "मल्टी स्टार कास्ट" चित्रपट असला तरी तो ट्रेण्ड रुजायला चक्क दहा वर्षे लागली! "वक्त" मध्ये बलराज साहनी, सुनील दत्त, राजकुमार, साधना, शशी कपूर, शर्मिला टागोर, अचला सचदेव अशी

जबरदस्त "स्टार कास्ट" आहे. एवढ्या मोठ्याच

प्रमाणावर एकाच चित्रपटात नामवंत कलाकार असतात तेव्हा त्यांना पटकथेत उत्तमरित्या गुंफणे व त्यांना दिग्दर्शकांने योग्य न्याय देणे कसोटीचे असते. यश चोप्रा त्यात यशस्वी ठरले. यश चोप्रा यांचा दिग्दर्शनीय कौशल्याचा उत्तम नमुना म्हणून "वक्त" या चित्रपटाचा खास उल्लेख होतो!

जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) खणखणीत यशस्वी ठरला आणि हिंदी चित्रपटसृष्टीला जणू एकाच चित्रपटात तीन चार

अथवा जमलंच तर पाच सहा नायक आणि नायिका यांना एकत्र आणण्याचा परवानाच मिळाला. "शोले"त धर्मेंद्र, संजीवकुमार, हेमा मालिनी, अमिताभ बच्चन, जया बच्चन व अमजद खान अशी मोठीच स्टार कास्ट! मिनर्व्हावर या सगळ्यांनाचा स्कोप देण्याइतपत जागा होती. मला आठवतय, मिनर्व्हावर बरोबर मध्यभागी ठाकूर बलदेव सिंग (संजीवकुमार) याने गब्बरसिंगला (अमजद खान) याच्या गळ्यात आपला ताकदवान हात टाकलाय हे दृश्य होते. एका बाजूस पिस्तूलधारी गब्बरसिग तर दुसऱ्या बाजूस "यह दोस्ती हम नहीं तोडेंगे.." गाण्यातील वीरु व जय (अर्थात धर्मेंद्र व अमिताभ बच्चन). होळी खेळतानाचे वीरु व बसंतीही (हेमा मालिनी) या थिएटर डेकोरेशनवर होते. "शोले"चे मिनर्व्हावरचे भव्य दिमाखदार डेकोरेशन हा देखील एक रंजक विषय! "शोले" सुपरहिट ठरताच मल्टी

स्टार कास्ट चित्रपटांचे युग आले. राजेश खन्नाचा स्वबळावर विश्वास (तो केवढा तरी आत्मकेंद्री) म्हणून त्याने बराच काळ, मल्टी स्टार कास्ट चित्रपटापासून दूर राहणे पसंत केले. अन्यथा त्याची घसरण लवकर थांबली असती. पण स्वभाव आडवा आला.

राजकुमार कोहलींच्या चित्रपटांची खासियत अर्थात मल्टी स्टार कास्ट चित्रपट. पटकथेनुसार ते अनेक कलाकारांना एकाच चित्रपटात एकाच तिकीटावर दाखवत की एकेक करत अनेक कलाकार उपलब्ध होत गेले म्हणून आपला चित्रपट मल्टी स्टार कास्ट बनवत हा एक वेगळाच प्रश्न!

त्यांचा एक बहुचर्चित म्हणजे, 'नागिन'(१९७६) सुनील दत्त, जितेंद्र, विनोद मेहरा, अनिल धवन, फिरोझ खान, संजय खान, कबिर बेदी, मुमताज, रेखा रिना रॉय, प्रेमा नारायण, योगिता बाली, नीलम मेहरा वगैरे वगैरे. जेवढे नायक तेवढ्याच नायिका हा नियम

आलाच वा हवाच! या चित्रपटात इच्छाधारी नागिण (रिना रॉय) आपल्या नागरुपी प्रियकराचा (जितेंद्र)



खातमा केलेल्या एकेकाचा 'चुन चुन के' बदला घेते! वेगळ्या भाषेत सांगायचे तर, अमिताभच्या सूडनायकाची ही भाकड आवृत्ती होती! अगदीच सुमार मनोरंजन!

आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सिनेमाने चक्क रौप्य महोत्सवी यश संपादले (मुंबईत "नोव्हेल्टी" थिएटर मध्ये!) आणि कोहलींना जणू यशाचा फॉर्म्युलाच सापडला. आणि त्यांनी अगदी तस्साच इतके नायक

म्हणूनच इतक्या नायिका असा 'जानी दुश्मन' (१९७९) काढला. आता ते मल्टी स्टार कास्ट चित्रपटांचे निर्माता व दिग्दर्शक अशी त्यांची ओळख झाली होती ना? त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांची खासियत तीच, एकाच तिकीटावर एकाच चित्रपटात अनेक कलाकार पाह्यला मिळतात. पण गोष्टीचे काय?

सुनील दत्त, संजीवकुमार, जितेंद्र, शत्रुघ्न सिन्हा, विनोद मेहरा, रेखा, रिना रॉय, बिंदीया गोस्वामी, योगिता बाली, सारिका, नीता मेहता, जयश्री टी. वगैरे वगैरे बरेच! अगदी या चित्रपटाच्या प्रीमियर अथवा पार्टीलाही असाच स्टारडम! मल्टी स्टार कास्ट चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळेस मेकअप रुम्स नक्कीच कमी पडल्या असतील. कारण तोपर्यंत "व्हॅनिटी व्हॅन" ही संकल्पना अस्तित्वात आली नव्हती.

या चित्रपटात गावात लग्नाची वरात येते आणि हमखास एक खून होतो अशी काही थीम होती.

सस्पेन्स होता. क्लायमॅक्सला उत्तर मिळते आणि आतापर्यंत संशयाची सुई उगाच दुसरीकडे फिरत ठेवली असे वाटते!

दोन्ही चित्रपटात गीत संगीत व नृत्य यांची जबरा रेलचेल! काही गाणी लोकप्रियही! बरं त्या काळात एकादा चित्रपट अठरा अथवा वीस रिळांचा असणे यात वावगे काहीच नव्हतं. इतके स्टार एकाच चित्रपटात म्हटल्यावर लांबी/रुंदी वाढणारच! आणि चित्रपटाची नसली तरी "पोस्टरची उंची" वाढे. या चित्रपटाचे मेन थिएटर "नाझ" येथे तर डेकोरेशनची उंची प्रचंड वाढल्याचे आजही आठवतेय!

या चित्रपटानेही अर्थात रौप्यमहोत्सवी यश संपादले आणि मग पब्लिकला जणू हमी पत्र मिळाले, राजकुमार कोहलींच्या चित्रपटात अनेक मोठे स्टार असणारच. प्रत्येक स्टारचे चाहते खुश होत. पण राजकुमार कोहली आपल्या नवीन चित्रपटावर काम

सुरु करताना ते अगोदर जमतील ते स्टार साईन करुन मग पटकथा रचत की आपल्या चित्रपटात बरेच स्टार आहेत हे लक्षात घेत पटकथा आणि संवाद लिहा अशी त्यांची आपल्या स्टोरी डिपार्टमेंटला खास सूचना आणि मग सवलत असे, हे त्यानंतर अनेक वर्षांनी याच 'जानी दुश्मन'च्या रिमेकच्या सेटवर शूटिंग कव्हरेजसाठी गेलो तेव्हाही समजले नाही. काही फिल्मी गोष्टी न समजलेल्या बरे असते.

जे काही असेल ते असो. त्यांचा आपला मार्ग वेगळा होता. यापेक्षा त्यांच्या चित्रपटात वेगळेपण नव्हते आणि आपले चित्रपट यशस्वी ठरताहेत म्हटल्यावर ते हुकमी एक्का का सोडतील? एक लक्षात घ्या, राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन वगळता त्या काळातील जवळपास सर्वच "टॉप" च्या स्टार्सनी त्यांच्या चित्रपटात भूमिका साकारल्यात.

अगदी स्मिता पाटीलनेही! (त्यांच्या 'बदले की

आग' या चित्रपटात ती आहे. "पोस्टर" वर "लिंक" दिलीय!)

आणि कोहलींच्या अशा चित्रपटांची पब्लिकलाही छान सवय लागली होती, असे मल्टी स्टार कास्ट पोस्टर दिसले की ते समजून जात, हा राजकुमार कोहलींचा चित्रपट आहे. (येथेही दिग्दर्शक दिसतो असे म्हणता येईल हवं तर!) "शोले" नंतरच्या रमेश सिप्पी दिग्दर्शित "शान" (१९८०) मध्ये सुनील दत्त, शशी कपूर, अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा, राखी,

परवीन बाबी, बिंदीया गोस्वामी, जॉनी वॉकर आणि कुलभूषण खरबंदा! अशी भली मोठी स्टार कास्ट! पण "शोले"ची सर आली नाही! आणि येणेही शक्य नव्हतेच! "शोले" साठीची "सलिम जावेद" जोडीची बंदिस्त पटकथा व जोरदार डायलॉगबाजी आणि "शान" साठीचे त्यांचे लेखन यात आश्चर्य वाटेल इतका फरक! सगळेच मल्टी स्टार कास्ट चित्रपट भारी कसे ठरतील? राजकुमार कोहली दिग्दर्शित "बदले की आग" फुसका बार नाही का ठरला? या चित्रपटात सुनील दत्त, धर्मेंद्र, जितेंद्र, रिना रॉय, स्मिता पाटील, सारिका, राजीव आनंद, अरमान कोहली, कादर खान, शक्ती कपूर व प्राण अशी जबरदस्त स्टार कास्ट म्हणून चित्रपटात रंग भरेल असे कसे हो होईल? मल्टी स्टार कास्ट चित्रपट हा हव्यास नसावा. ती गरज असावी. वक्त! त्यावरुनच सलिम जावेद यांनी नवीन मसाला घालून पेरुन लिहिलेला नासिर

हुसेन निर्मित व दिग्दर्शित "यादों की बारात"!



"शोले" (यावरुन फसलेल्या रिमेक केवढ्या तरी!), "जानी दुश्मन" हे त्या काळातील सुपरहिट मल्टी स्टार कास्ट चित्रपट. आजही त्यांचे अस्तित्व जाणवतेय तर मग आणखीन काय हवे?

व्यावसायिक चित्रपटाच्या जगात यशासारखी सुंदर गोष्ट दुसरी नाही, मग ती 'यशाची बाजू' अशी का ना असेना?

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान, शनिवार लेख साभार)

लेख क्रमांक : २९

मेला चित्रपटाची पंचवीशी
ना धड "कारवा", ना "शोले "

"रिमेक" हीदेखील एक चित्रपट निर्मिती तील रुळलेली गोष्ट. असंख्य उदाहरणे आहेत!

कोणाची रिमेक.. घोषणेपासूनच समजते! काहींची चित्रपट पडद्यावर पाहिल्यावर लक्षात येते! काहीजण आपण मूळ चित्रपटापासून प्रभावित होऊन आपला नवीन चित्रपट घडवला असे म्हणत रिमेकच्या मुद्द्यालाच बगल देण्याचा प्रयत्न करतात. तर कोणी विदेशातील एकाद्या चित्रपटाचा गाभा अथवा जर्म तेवढा घेतात आणि आपल्या शैलीतील चित्रपट बनवून "रिमेक"च्या आरोपातून आपली सुटका करुन घेतात. अमक्या तमक्या चित्रपटाची रिमेक एवढ्यावरच हे नसते.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले"(१९७५) ची "रिमेक" करण्याचा मोह अनेकांना का बरे झाला असा प्रश्न बी. सुभाष दिग्दर्शित "आंधी तुफान" (१९८३) पासून अनेक चित्रपट पाहताना झाला! गुणवत्ता! (याबाबत आजही, म्हणजेच "शोले" चे पन्नासावे वर्ष सुरु असतानाही उलटसुलट वाद आहेत) आणि लोकप्रियता (भारतीय चित्रपट सृष्टीच्या चौफेर वाटचालीत एकाद्या चित्रपटाचा पन्नासाव्या वर्षातील विशेष खेळ हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केला जातो हे "शोले" बद्दल घडल्याचे मी स्वतः काही दिवसांपूर्वीच "रिगल" चित्रपटगृहात अनुभवले). यात कायमच चर्चेत असलेल्या चित्रपटाला आपण गाठू शकत नाही याचे भान रिमेक करताना असू नये? असा "शोले" (जो पुन्हा होणे शक्यच नाही!) आणि नासिर हुसेन

दिग्दर्शित "कारवा" (१९७१) यांची युती अथवा आघाडी करुन आणखीन एक चित्रपट पडद्यावर येवू शकतो? दोन अथवा तीन चित्रपटातील गोष्टी

एकत्र करुन आणखीन एक चित्रपट निर्माण करण्याला काही फिल्मवाले मारामारी म्हणतात. कधी ती जमूनही जाते...!

पण धर्मेश दर्शन दिग्दर्शित "मेला" (मुंबईत रिलीज ७ जानेवारी २०००!) मध्ये ते जमले नाही हो! "कारवा" आणि "शोले" यांचा "मसाला

मिक्स" बिघडण्यास पंचवीस वर्ष पूर्ण झाली देखिल. विशेष उल्लेखनीय गोष्ट, चित्रपट निवडीबद्दल अतिशय चोखंदळ असलेल्या आमिर खानलाही या "मेला" चित्रपटात काम करावेसे का बरे वाटले? धर्मेश दर्शन दिग्दर्शित "राजा हिन्दुस्तानी" (१९९६) ज्युबिली हिट ठरला म्हणून त्याच दिग्दर्शकाच्या चित्रपटातून भूमिका साकारावी असा व्यावसायिक दृष्टिकोन की काय? ("राजा हिन्दुस्तानी" हा चित्रपट शशी कपूर व

नंदा यांची भूमिका असलेल्या "जब जब फुल खिले"ची रिमेक होता. रिमेक चित्रपटातील आमिर खान हादेखील एक फंडा!)

अर्धा "कारवा" आणि अर्धा "शोले" मिळून 'मेला' चित्रपट ही कल्पनाच कशी सुचली! हेच समजत नाही! "कारवा" हा एका गावातून दुसऱ्या

गावात जात असलेल्या नृत्याच्या कार्यक्रम मंडळींचा गीत संगीत व नृत्यमय प्रवास (ट्रॅव्हल सिनेमा!) आणि त्यात नाट्य, प्रेम, रहस्यरंजकता. तर 'शोले ' सूडकथा! त्यात मसालेदार मनोरंजक

चित्रपटासाठीचा सर्व प्रकारचा मसाला खचाखच भरलेला. ("शोले" इतकं जगभरातील कोणत्याच चित्रपट कलाकृतीवर लिहिलं, बोलले गेले नसेल!)

'मेला 'ची कथा सुनील दर्शनची! या दोन चित्रपटांचा मेळ घालण्याचा त्यात प्रयत्न. पटकथा लेखन नीरज वोरा, संजीव दुग्गल व धर्मेश दर्शन यांची! त्यात एक नवा आकार देण्याचा प्रयत्न. तर संवाद नीरज वोरा आणि धर्मेश दर्शनचे. हिंदीत "मेला" म्हणजेच मराठीत जत्रा आणि याच जत्रेच्या पाश्र्वभूमीवर "शोले" घडतो, असा मिलावट करण्याचा प्रयत्न म्हणजे "मेला" चित्रपट! दोन सर्वकालीन "सुपर हिट" चित्रपट एकात मिसळले तर यशाची हमी निश्चित असे वाटले असेल, तर त्यात आश्चर्य ते काय? सगळ्यानाच हिट पिक्चर बनवायचा असतो... पण त्याचे हुकमी माप वा

मेजरमेंट नाही. क्या समझे?

"मेला" चित्रपटाचे संगीतकार म्हणून "राजेश रोशन" यांना आधी करारबद्ध केले गेले होते. इतकेच नव्हे तर मुहूर्ताचे गाणे म्हणून "चोरी चोरी हम गोरीसे.." हे गाणे थाटामाटात रेकॉर्ड झाले! यानंतर "कमरियां लचके रे.." रेकॉर्ड झाले! नंतर.. धर्मेश दर्शन आणि राजेश रोशन यांच्यात काय बिनसले कुणास ठाऊक! यानंतर "अनू मलिक" यांच्याकडे संगीताची जबाबदारी देण्यात आली! त्यांनी सहा गाणी केली.

(माझ्या समवयस्क मित्राने सांगितल्या प्रमाणे "मेला" या चित्रपटातील गाण्याविषयी त्याच्याच शब्दात थेट सांगायचे तर.. या चित्रपटातील.. "धडकन में तुम.." या गाण्यात चक्क "प्रियकर" असलेला "आमिर खान" याने

जो "मुद्राभिनय" केलाय, तसा कोणत्याही "प्रियकराच्या" चेहऱ्यावर मी आजवर तरी पाहिलेला नाहीय! आणि अभिनेता "इम्रान हाश्मी" याला "सिनेमा प्रेमी" आणि "मिडिया' यांनी "किसिंग स्टार!" अशी उपमा दिलीय.. यात अजिबात तथ्य नाहीय! खरेतर "आमिर खान" एकूणच, त्याच्या प्रत्येक चित्रपटात "किसिंग" सारखे "सीन्स" यासाठी अतिशय "आग्रही" असतो! "OMG"! या बाबतीत उदाहरणे द्यायची तर.. "मेला" आणि "थ्री इडियट्स" नक्की पहा! "मेला" सिनेमात.. "किसिंग"चे दृश्य द्यायचे, यासाठी "टिना" (अर्थात.. "ट्विंकल खन्ना") हिने हरकत घेतली होती. ती चक्क "अपमानित" आणि त्या "अचानक शूट" होणाऱ्या "सीन" बद्दल खूपच नाखुश होती. ती त्या जबरदस्तीबद्दल चक्क रडली

सुद्धा होती, हे महत्त्वाचे! मुख्य म्हणजे हे सत्य आहे! थक्क व्हायला होतं! आणि हे "गॉसिप' नाहीय, हे जास्त वेदनादायक!)

धर्मेश दर्शन यांच्या हट्टापायी, संगीतकार "लेस्ली लुईस" यांच्याकडून "देखो २००० जमाना आ गया.." असे खास गाणे रेकॉर्ड करण्यात आले! (गायक : लेस्ली, हरिहरन) याच काळात एकीकडे "राजा हिंदुस्थानी" जबरदस्त "हिट" झाला म्हणता.. "दिग्दर्शक धर्मेश दर्शन" अक्षरशः "हम करे सो कायदा" टाईप.. "निर्मात्यांसाठी" डोईजड होऊ लागला, असल्याचे त्या कंपनीतील अनेकांनी सांगितले होते!

"मेला दिलोका.." या शीर्षक गीताचे वैशिष्ट्य हे की ते एकाच कॅमेऱ्याने एकाच "टेक" मध्ये शूट केल्याचे म्हणतात!

इथे खलनायक म्हणून आदित्य पांचोलीला विचारण्यात आले होते परंतु "वेशभूषा आणि केशरचना" यामुळे त्याने नम्रपणे नाकारले! शेवटी ती भूमिका फायटर "टिनु वर्माने" साकारली. या चित्रपटाचे "बजेट" जबरदस्त फुगत गेले होते. पार्श्वसंगीतचे बजेट तर कित्येक लाखांचे होते!

"शोले" म्हटल्यावर गब्बरसिंग आलाच! "मेला" चित्रपटात गुज्जर सिंग होता. ती भूमिका टीनू वर्माने साकारलीय. वीरु व जय हवेत, ते किशन प्यारे (आमिर खान) व शंकर साने (फैजल खान) झाले! शोलेमध्ये बसंती तर कारवातील कबिल्यात दोन नृत्य तारका (आशा पारेख व अरुणा इराणी) "मेला" मध्ये हे फिट्ट करताना रुपा सिंग (ट्विंकल खन्ना) आणि विशेष भूमिकेत

चंपाकली (खास भूमिकेत ऐश्वर्या राय!) "शोले"च्या या व्यक्तिरेखांना 'कारवा'च्या गोष्टीत बसवायची धडपड म्हणजेच 'मेला ' चित्रपट! प्रयत्न अवघड होता. म्हणूनच चित्रपटात रंगत आली नाही. "अयूब खान" ने राम सिंग साकारलाय. मनोरंजना साठी जॉनी लिव्हर (इन्स्पेक्टर पकौडा सिंग), नवनीत निशान (बुलबुल), तसेच कुलभूषण खरबंदा, असरानी, टिकू ताल्सानिया, अर्चना पुरणसिंग, तन्वी सिंग, विजू खोटे इत्यादी. चित्रपटातील दोन गाणी लोकप्रिय. "कमरिया लचके रे.. " (पार्श्वगायक अनुराधा पौडवाल, उदित नारायण, अभिजित भट्टाचार्य)! "मेला दिलो का.." (सोनू निगम, अलका याज्ञिक, रुपकुमार राठोड, हेमा सरदेसाई, शंकर महादेवन व जसपिंदर नरुला) ही गाणी समीरने लिहिली असून संगीत

"राजेश रोशन" आणि "अनू मलिक"चे आहे. हा चित्रपट पाहणे हे केवळ छायाचित्रणकार "राजन किणगी" यांच्यामुळे सुकर झाले. दोन वा तीन चित्रपटातील मध्यवर्ती कथासूत्रला एकत्र करण्याची कल्पना वाईट नाही. एक तर ती पेलायला हवी आणि दुसरे म्हणजे मूळ चित्रपटांचे अस्तित्व झाकता यायला हवे. तेच जर जमले नसले तर? खिचडी कच्चीच राहणार. आमटीत पाणी जास्त असणार.

२००० चा पहिलाच शुक्रवार चित्रपट रसिकांसाठी निराशाजनक ठरला! चित्रपटाचे नाव "मेला" पण या शब्दाचा मराठीत अर्थ पाहता.. तो चक्क "मेला"! तेही आमिर खान या चित्रपटात असताना ठरलाय.... या चित्रपटाला चक्क पंचवीस वर्ष पूर्ण झाली देखिल! मुंबईत मेन

थिएटर मेट्रोत फर्स्ट शोपासूनच पब्लिक रिपोर्ट नरम. मग काय होणार? चित्रपटाचे लोकप्रियता ओसरायला लागली. दोन गाणी मात्र उपग्रह वाहिन्यांवर दिसत राहिली... हा "मेला" एन्जॉय करायला पब्लिकची जत्रा भरली नाही!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया,
१० जानेवारी २०२५ वरुन साभार)

<u>लेख क्रमांक : ३०</u>

<u>..... आणि आठवली " शोले" च्या तिकीट विक्रीची लांबलचक रांग...</u>

चित्रपटाचे जग असो अथवा क्रिकेटचा खेळ असो, सतत काहीतरी घडत (कधी बिघडतही) असते आणि जुन्या आठवणीत (फ्लॅशबॅकमध्ये) जाण्याची छान संधी मिळते...

आज एकादा नवीन चित्रपट ऑनलाईन अर्थात तिसरा पडदा पध्दतीने रिलीज होणार या गोष्टीने माझे मन सत्तरच्या दशकात जातेच आणि तेव्हा 'जोशीला', 'शोले', 'प्रेम कहानी', 'मेहबूबा', 'अमर अकबर ॲन्थनी', "धर्मवीर", "लावारीस", 'मुकद्दर का सिकंदर', "शान" अशा अनेक बहुचर्चित चित्रपटाच्या आगमनाच्या वेळचे वातावरण आठवले.

आज "ऑनलाईन" अर्थात "ओटीटी" वर सिनेमा पाह्यचा तर सबक्रिप्शन घ्या असे म्हटले जाते.

पूर्वी काय असायचे?

सिनेमाचे व्यसनी, सिनेमाचे चाहते यांचे 'पहिले लक्ष्य' असे, अशा प्रचंड उत्सुकता वाढवलेल्या चित्रपटाचे मेन थिएटर कोणते आहे आणि त्यामागोमाग प्रश्न असे की, रिलीजची तारीख काय? आजच्या पिढीच्या मनात एव्हाना प्रश्न पडला असेल, हे मेन थिएटर म्हणजे काय? अगदी थोडक्यात उत्तर द्यायचे तर प्रत्येक मोठ्या शहरात अनेक आठवडे (कधी पंचवीस तर कधी पन्नास, तर कधी त्याहीपेक्षा जास्त) मुक्काम करणारे थिएटर म्हणजे मेन थिएटर. आपल्याकडे दक्षिण मुंबईतील थिएटर त्यासाठी ओळखली जात. अशा मेन थिएटरवर आगामी चित्रपटाची पोस्टर अथवा शो कार्ड अगोदर लागत आणि त्याची पक्की खबर सिनेमावेड्यांना लागली की मग 'एकच लक्ष' पहिला शुक्रवार कोणता?" सिनेमाची शुक्रवारची गोष्ट" ही एक रंजक कथा!

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

आजही प्रत्येक शुक्रवारी नवीन चित्रपट प्रदर्शित होतात (एखादा मोठा सण बुधवार गुरुवारी आला तर भाग वेगळा. त्या रजेचा फायदा उठवायची खेळी!), पूर्वी त्याच्या अगोदरच्या सोमवारी त्या चित्रपटाची आगाऊ तिकीट विक्रीची खिडकी उघडे..... ५ ऑगस्ट १९६० रोजी मराठा मंदिर चित्रपटगृहात के. असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम' प्रदर्शित होताना तत्पूर्वी सोमवारी आगाऊ तिकीट विक्रीला पहाटेपासूनच प्रचंड मोठी रांग लागली. नऊ वाजता खिडकी उघडेपर्यंत अप्पर स्टॉल आणि बाल्कनी या दोन्हीच्या रांगा केवढ्या तरी वाढतानाच लठ्ठालठ्ठी, पोलिसांचा लाठीमार वगैरे झालेच, पण एका प्रेक्षकावर चाकूहल्ला झाल्याचेही पूर्वीची पिढी आवर्जून सांगे. चित्रपटासाठीची रांग अशी अनेक गोष्टींसह चर्चेत!

या "ॲडव्हास बुकिंग" संस्कृतीत सातत्य आले ते राजेश खन्नाच्या क्रेझमध्ये. मिनर्व्हात 'दाग'ला,

अप्सरात 'अजनबी'ला, शालिमारला 'रोटी' साठी ही अशीच तौबा गर्दी! अमिताभच्या वाटेला हे सुख 'दीवार' (२४ जानेवारी १९७५) पासून आले. मिनर्व्हा थिएटरमध्ये अशीच जबरदस्त रांग लागली. तत्पूर्वी, इंपिरियलमध्ये 'जंजीर' (१९७३) तब्बल पन्नास आठवड्यांचा मुक्काम केला!



"जंजीर" च्या खणखणीत यशाने अमिताभला "ॲन्ग्री यंग मॅन" (सूडनायक) ही इमेज आणि त्याचा स्वतःचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला आणि मग ते 'दीवार'ला फळले. तात्पर्य, अशी ॲडव्हास बुकिंगला

गर्दी मोठ्या स्टारच्या सिनेमाना होई. शुक्रवारी फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट नरम आला तर हीच गर्दी मग पहिल्याच आठवड्यानंतर ओसरे. 'प्रेम कहानी'ची ड्रीमलॅन्डची, 'मेहबूबा'ची नॉव्हेल्टीची गर्दी अशीच वेगाने ओसरली आणि आठ दहा दिवसांनी करंट बुकिंगची खिडकी उघडली! त्या काळात ॲडव्हास बुकिंगसाठी दोन (अप्पर स्टॉल आणि बाल्कनी) आणि तशाच करंट बुकिंगसाठी दोन खिडक्या असत! तर पडद्यासमोरच्या मोजून पहिल्या तीन चार रांगा या स्टॉलच्या असत आणि त्याची खिडकी याच थिएटरमध्ये वेगळी असे. मेट्रो आणि नॉव्हेल्टीत मागे होती. ऑपेरा हाऊस थिएटरमध्ये दोन बाल्कनी, त्यातील वरची बाल्कनी म्हणजे स्टॉल. आणि सर्वच थिएटरमध्ये स्टॉल चे तिकीट ऐन वेळी मिळे. महत्वाचे म्हणजे खिडकी उडताच दहा मिनिटात ही स्टॉलची तिकीटे संपतही. एव्हाना तुम्हा

वाचकांतील वयाच्या साठीजवळ आलेल्याना आणि मूळ दक्षिण मुंबईकरांना हे सगळे डोळ्यासमोर आले असेलच. मूळचे अगणित गिरगावकर आज डोंबिवली, विरार, पनवेल येथे स्थायिक झालेत.

'शोले'च्या ॲडव्हास बुकिंगची अख्खी स्टोरीच वेगळी. मिनर्व्हातच तो सत्तर एमएम आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीममध्ये असल्याने वातावरण एकदमच तापले होते. १५ ऑगस्ट १९७५ रोजी सिनेमा रिलीज होण्यापूर्वी ११ ऑगस्टला मिनर्व्हावर 'रेकॉर्ड ब्रेक' लाईन होती. आणि तेव्हा वाढीव तिकीट दर होते. ते असे, अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे आणि बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे. आज हा चिल्लरचा भाव वाटतो. पण त्या काळात मध्यमवर्गीय कुटुंबात मासिक पाचशे वा सहाशे रुपये पगार प्रचंड आनंद आणि अभिमान देणारा होता.

'शोले'ची पहिल्या आठवड्याची तिकीटे कधी

'हाऊसफुल्ल' झाली हे कोणालाच समजले नाही (प्रत्येक चित्रपटासाठी ब्लॅक मार्केटवाले आपली अनेक पोरे, उजवे डावे हात अशा रांगेत उभे राहून बरीच तिकीटे काढतात अशी 'उघड हवा' होती.). 'शोले 'चा सुरुवातीचा पब्लिक रिपोर्ट नरम आला, तात्कालिक समिक्षकांनीही झोडपले. काही दिवस तर 'पडला पडला' अशीच हवा होती. पण हिंदी चित्रपटातच एक डायलॉग असतो ना, मारनेवालेसे बचानेवाला बडा होता है..... साधारण बारा चौदा दिवसांनी 'शोले' असा काही उठला की थिएटरवर कधीही जावे तर ॲडव्हास बुकिंगला प्रचंड मोठी रांग. मी स्वतः अशा रांगेतच उभा राहूनच 'शोले'चे तिकीट मिळवले आणि जपूनही ठेवले. मिनर्व्हात 'शोले' ३० सप्टेंबर १९७८ पर्यंत नियमित तीन खेळ होता आणि मग मॅटीनी शोला शिफ्ट करुन तो आणखीन दोन वर्षे, असा एकूण पाच वर्षे चालला! सर्वाधिक काळ

त्याची तिकीटे ॲडव्हास बुकिंगलाच संपली. 'हम किसीसे कम नही' ची नाझ थिएटरमध्ये पस्तीसाव्या आठवड्यापर्यंत हेच झाले! तुफान हिट चित्रपट ठरला तो. पण निर्माता आणि दिग्दर्शक नासिर हुसेन व ऋषि कपूर या जोडीच्या 'जमाने को दीखाना है' या चित्रपटाच्या "ॲडव्हास बुकिंग"ला प्रचंड मोठी रांग लागली पण पिक्चरमे दम नही असा रिपोर्ट फुटला आणि काही दिवसांनीच करंट बुकिंगच्या खिडकीवरही सामसूम झाली. आपल्या पब्लिकला सिनेमा आवडला रे आवडला की ते डोक्यावर घेतात/डोक्यात ठेवतात. पण आवडला नाही तर पहिल्या चार पाच दिवसानंतर ते फिरकत नाहीत. चित्रपट पडद्यावर राहतो. रिळे गोडाऊनमध्ये जात.

अमिताभ बच्चनच्या 'डॉन'च्या ॲडव्हास बुकिंगला गंगा आणि न्यू एक्सलसियर अशा दोन्ही ठिकाणी खचाखच रांग लागली पण 'दो और दो पाच',

'इमान धरम' यांच्याकडे पाठ फिरवायाला वेळ घेतला नाही. दोन्हीचे मेन थिएटर नॉव्हेल्टी होते!

एक महत्त्वाचे म्हणजे मी गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना ही सगळी माझ्या अवतीभवतीची थिएटर्स, म्हणून मला हे सगळे ज्ञात आहे. या माझ्या आठवणी आहेत. मी स्वतः 'त्रिशूल'च्या तिकीटासाठी ॲडव्हास बुकिंगला अप्सरा थिएटरवर मोठ्या रांगेत उभा राहिलोय. बरं, पर्यायही नव्हता. त्या काळात चित्रपटापर्यंत पोहचणे अशा रांगेतून सुरु होईल!

त्या काळात उपनगरातील थिएटरवर अशा प्रचंड वगैरे रांगा लागत नसत, पण पिक्चर काही दिवस हाऊसफुल्ल गर्दीत चाले, चार/पाच आठवड्यात उतरेही! ज्याला सिनेमा व्यवसायात "लाँग रन" म्हणतात तो मेन थिएटरला असे.

आता तुमचा प्रश्न असेल की या रांगा गेल्या कुठे आणि कशा?

अगदी नेमके नेमके सांगायचे तर १९८२ साली देशात रंगीत दूरदर्शन व व्हिडिओ आला, लगेचच व्हिडिओ थिएटर्स आली आणि या रांगेतील कनिष्ठ मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात कट ऑफ झाला. एखाद्या 'राम तेरी गंगा मैली'(मिनर्व्हा), 'तेजाब'(ड्रीमलॅन्ड), 'राम लखन' (मेट्रो) यांच्यासाठी अशीच रांग लागली इतकेच! १९९२ साली उपग्रह वाहिनीच्या आगमनाने ॲडव्हास बुकिंग संस्कृती एकदमच आटली!

पुढे मल्टीप्लेक्स युगात सिनेमा पाहणं ही नवश्रीमंत आणि उच्चभ्रू नवश्रीमंत वर्गाची चैन झाली. ते सिनेमाच्या तिकीटासाठी रांगेत उभे राहतील? मोबाईलवर बुकिंग सहज शक्य होऊ लागले. आणि आता तर ऑनलाईनवर चित्रपट पहा. भविष्यात चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृह ही गरज असेल का?

एकेकाळी चित्रपटाच्या ॲडव्हास बुकिंगसाठी लागणारी भली मोठी रांग इतिहासजमा झाली, पण त्याच रांगेत उभे राहून तिकीट काढलेल्या श्रमिक, कष्टकरी, स्वपाळु, आशावादी वर्गाने या देशात चित्रपट जगवला/वाढवला/जिवंत ठेवलाय.... " शोले"चे पन्नासावे वर्ष साजरे होत असताना ही गोष्ट सांगायलाच हवी.

© दिलीप ठाकूर
("नवशक्ती" शुक्रवार मध्यंतर वरून साभार)

♥

लेख क्रमांक : ३१

"मोनो साऊंड", "स्टीरिओफोनिक साऊंड" आणि आता "डॉल्बी डिजिटल" साऊंड...

चित्रपट या माध्यम व व्यवसायाची चौफेर वाटचाल बहुस्तरीय आहे. "सोळा एमएम"चा पडद्यावर चित्रपट पाहणे ते आज "मल्टीप्लेक्स"च्या अतिभव्य पडद्यावर चित्रपट एन्जॉय करणे असा हा बराच मोठा प्रवास आहे!

आपल्या देशातील पहिले मूकपटाचे सादरीकरण हे आजपासून बरोबर १२९ वर्षापूर्वी म्हणजे ७ जुलै १८९६ रोजी झाले. या दिवशी दक्षिण मुंबईच्या "फोर्ट" भागातील "एस्प्लनेड मॅन्शन" या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील "वॉटसन" हॉटेलमधे ऑगस्ते व लुई या ल्युनिअर बंधूंनी पॅरिसमध्ये त्यांच्या या चित्रपटाद्वारे चित्रपटसृष्टीत उत्सुकता निर्माण केल्यानंतर भारतात पहिल्यांदाच

चित्रपट दाखवला. "ल्युनिअर बंधू" हे फ्रेंच निर्माते होते. ल्युनिअर बंधूनी या कार्यक्रमाचे तिकीट रुपये १ ठेवले होते. टाइम्स ऑफ इंडियाने या कार्यक्रमाचा

उल्लेख “Miracle of the century” असा केला. या दिवशी The Sea Bath, Arrival of a Train, A Demolition, Ladies and Soldiers on Wheels and Leaving the Factory असे ६ चित्रपट दाखवण्यात आले! या चित्रपटाच्या कार्यक्रमाला जबरदस्त प्रतिसाद मिळाला आणि हे चित्रपट पुढे कलकत्ता आणि चेन्नई मध्ये दाखवण्यात आले. दुसरा

शो १४ जुलै १८९६ New venue, the Novelty Theatre, मुंबई येथे व तिसरा शो १५ ऑगस्ट १८९६ रोजी दाखवला गेला.

त्यानंतर अनेक वळणे घेत घेत चित्रपटाचा प्रवास सुरु आहे. मूकपटाकडून आपण बोलपटाकडे आलो. चित्रपट बोलू लागला. तेव्हा "मोनो साऊंड सिस्टीम" होती. चित्रपटगृहे अगदी साधीच होती. ती कशी होती हे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला पाह्यचे असेल तर दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील (पूर्वीचे नाव लॅमिन्टन रोड) "इंपिरियल चित्रपटगृह" जावून पहावे. (सर्वसामान्य लोक "दोन हत्ती टॉकीज" सुद्धा म्हणत असत.) आज ती वास्तू शांतपणे उभी आहे. इंग्रजांच्या काळात म्हणजे १९०५ साली ही वास्तू उभी राहिलीय. आज या वास्तूला तब्बल एकशेवीस वर्ष झाली आहेत. २०२० पर्यंत येथे चित्रपट प्रदर्शित होत. त्यानंतर तेथील खेळ

थांबलाय. येथे अगदी सुरुवातीच्या काळात विदेशातून आलेले "लघु मूकपट" दाखवले जात. तसेच

लघुनाटिका, जादूचे प्रयोग, संगीत असे कार्यक्रम शनिवार रविवार भरत. आपल्या देशात चित्रपट माध्यमाने व्यावसायिकदृष्ट्या प्रगती केली तस तशी या चित्रपटगृहानेही प्रगती केली. मुंबईप्रमाणेच देशात इतरत्रही चित्रपटगृह संस्कृती हळूहळू वाढत वाढत गेली. आपल्या देशातील पहिले वातानुकूलित चित्रपटगृह दक्षिण मुंबईतील "रिगल" हे आहे.

"सोळा एमएम" कडून "पस्तीस एमएम"कडे, कृष्ण धवल अर्थात "ब्लॅक अँड व्हाईट" चित्रपटाकडून रंगीत चित्रपटाकडे असा प्रवास सुरु असतानाच अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक गुरुदत्तने आपल्या देशातील पहिला "सिनेमास्कोप" चित्रपट "कागज के फूल" (१९५९) निर्माण केला. आपल्या देशातील पहिला सत्तर एमएमचा चित्रपट दिग्दर्शक पांछी यांचा "अराऊंड द वर्ल्ड" (१९६८) होता. त्याला यश प्राप्त झाले नाही त्याचेच पुढचे पाऊल जी. पी. सिप्पी निर्मित

व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५) ठरला. "सत्तर एमएमचा" अर्धवर्तुळाकार असा भव्य पडदा व "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" असा मिनर्व्हात "शोले" अनुभवणे रोमांचक ठरे! सत्तर एमएमचा "शोले" देशातील फक्त मोठ्याच शहरातून एकाद्याच चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. पुणे शहरात नटराज चित्रपटगृहात सत्तर एमएम होता!

अनेक ठिकाणी तो "पस्तीस एमएम" व "मोनो साऊंड सिस्टीम" असाच होता. याचेच पुढचे पाऊल "छोटा चेतन" (१९८६) हा त्रीमिती अर्थात "थ्री डी" चित्रपट आला. विशिष्ट चष्मा लावून पडद्यावर पाहताना पडद्यावरील गोष्टी जणू आपल्या समोरच येताहेत असाच त्यात रोमांचक फिल होता. चित्रपटाची तांत्रिक प्रगती अशी होत राहिली. अगदी मुंबईत वांद्र्यातील कला नगर भागात "ड्राईव्ह इन चित्रपटगृह" आले. आपल्या गाडीत बसून मनसोक्त

मनमुराद आनंद घेत चित्रपट पहा. आज देशात चेन्नई वगैरे मोजक्याच शहरात अशी ड्राईव्ह इन चित्रपटगृह आहेत.

राजश्री प्रॉडक्शन्स निर्मित व सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित "मैने प्यार किया" (१९८९) हा चित्रपट सिनेमास्कोप व फोर ट्रॅक स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा होता!

नवीन दशकाच्या सुरुवातीस "मल्टीप्लेक्स कल्चर" आले. ते रुजायला दहा पंधरा वर्ष लागली.

बरीचशी मल्टीप्लेक्स भव्य दिव्य दिमाखदार महागड्या मॉल मध्येच आहेत. चकाचक कॉम्प्लेक्स, महागडा पॉपकॉर्न, सुखासीन खुर्चीत बसून चित्रपट पाह्यचा! आधुनिक यंत्रसामुग्रीयुक्त ही मल्टीप्लेक्स खास करुन उच्चभ्रू व नवश्रीमंत वर्गासाठीच आहेत, ते गाडी घेऊन चित्रपट पाह्यला येताहेत हे अगदी स्पष्ट दिसतेय. आपल्या देशात चित्रपट हा व्यवसाय गरीब, तसेच मध्यमवर्गीय स्वप्नाळू, मेहनती वर्गाने जगवला, सांभाळला, पसरवला, सांभाळून घेतला. त्या कष्टकरी, कामगार वर्गाने प्रचंड टाळ्या व शिट्ट्यांनी चित्रपटांना डोक्यावर घेतले. त्याला "मल्टीप्लेक्स कल्चर" आपलं नाही असे वाटू लागले. मुंबईत वडाळा येथील "आयनॉक्स" मल्टीप्लेक्समध्ये "डोम चित्रपटगृह" सुरु झाले. विदेशातील ही भव्य मनोरंजनाची कल्पना आपल्याकडे आली. पण त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

"मल्टीप्लेक्स" वाढत वाढत जाताना एकिकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स मागे मागे पडत गेली. त्यातील अनेक बंदच झाली. पाडलीही गेली. मल्टीप्लेक्स कल्चरमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान येत गेले. कथाआशयापेक्षा तंत्रज्ञान मोठे ठरु लागले. चित्रपटात व्हीएफएक्स व एआय यांचा वापर वाढत गेला.

याच प्रगतीचे पुढचे पाऊल म्हणजे, आपल्या देशातील पहिले संपूर्ण "डॉल्बी डिजिटल चित्रपटगृह" पुण्यात खराडीमधील "सिटी प्राइड" मधे सुरु झाले.

हळूहळू देशातील मोठ्या शहरातील मल्टीप्लेक्समध्ये हे तंत्रज्ञान अनुभवायला नक्कीच मिळेल. डॉल्बी साऊंड, फोर के पिक्चर याचेच पुढचे पाऊल "डॉल्बी सिनेमा विथ डॉल्बी ॲटमॉस ऑन फोर-के लेझर प्रोजेक्टर" हे आहे. अशा सादरीकरणात गोष्टीपेक्षा अन्य गोष्टींना जास्त महत्व. म्हणजेच रंग, कॉन्ट्रास्ट आणि काळ्या रंगाच्या करामतीने आजूबाजूचे अदृश्य सत्तर स्पीकर्स असा अनुभव! रंग व प्रचंड आवाजाचे विश्व! विदेशातून हे कल्चर आपल्याकडे आले आहे हे

वेगळे सांगायलाच नको. (पूर्वी विदेशी चित्रपटातील कथा कल्पना येत. आता अत्याधुनिक तंत्रज्ञान येतेय.. आपल्या मूळ चित्रपट संस्कृतीपासून अगदीच वेगळे!) आपण मल्टीप्लेक्समध्ये बसलोय त्याच्या सर्व बाजूंनी, खालून वरून आजुबाजूला दृश्यं दाखवणारी चित्रपटगृहे जगात आहेत, तेच आता आपल्याकडेही येत आहे.

हे अत्याधुनिक तंत्रज्ञान पुण्यात आणि भारतात प्रथम आणण्याचं श्रेय जातं ते मराठी माणसालाच. अरविंद चाफळकर, प्रकाश चाफळकर आणि त्यांच्या मुलांना! विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे देशातील विविध शहरांतील चित्रपटगृहाचे मालक हा अनुभव घ्यायला येताहेत.

या अनुभवाचे विशेष म्हणजे संपूर्ण काळोखात आपण अवकाशात आहोत असा भास होतो. काळोख म्हणजे संपूर्ण अंधार! यात प्रत्येक इंच डॉल्बी

डिजिटलच्या स्पेसिफिकेशन्स नुसार, त्यांच्याच तंत्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बनवलाय!

प्रचंड मोठा विशिष्ठ आकाराचा स्क्रीन! तीनशे दहा प्रेक्षकांभोवती भिंतीच्या आत, कोणालाच न दिसणारे, सर्व बाजूंना बसवलेले धडधडणारे सुमारे सत्तर प्रचंड शक्तीशाली स्पीकर्स.. मागे प्रोजेक्शन रूममधे जगात या क्षणाला उपलब्ध असलेली दोन सर्वात अत्याधुनिक फोर के लेझर प्रोजेक्टर सिस्टीम.. यात टॉमक्रुझच्या टॉप गनमधील विमानाचा टेक ऑफ बघताना आपण अक्षरशः त्याच्या जवळून टेक ऑफ घेत आहोत असा फील येतो असा हा अनुभव घेणारे सांगतात! बॅटमॅन, ड्यून, द डार्केस्ट अवर, बार्बी, पुष्पा, अशा अनेक चित्रपटात हे तंत्रज्ञान वापरलं गेलंय! उपलब्ध माहितीनुसार हे तंत्रज्ञान जगभर फक्त २७७ चित्रपटगृहात आजवर वापरलं गेलं आहे. त्यातील अमेरिकेत १४३,युरोप मधे ६५,

मध्य पूर्व देशांत १४ चित्रपटगृह आहेत. पण आपल्या देशात थिएटरमधे ते तंत्रज्ञान उपलब्ध नसल्याने त्याचा आनंद घेता आला नव्हता! आता भारतातील पहिले पुण्यात खराडीच्या सिटी प्राइड मधे तो घेता येईल. डॉल्बी ॲटमॉस साऊंड कमाल आहे!

ज्या बाजूला दृश्य दिसतं तिकडूनच आवाज येतो.. आपल्या पुढून, मागून, डावीकडे, उजवीकडे. सर्व दिशांना आवाज ये जा करीत असतो! हे इतर थिएटरमधे १०.१ सिस्टीम मधे ऐकू येते, इथे एकूण सत्तर स्पीकरमधून! हा प्रचंड फरक थरकाप उडवणारा. दिसणारं चित्र लख्ख, लोभस आणि देखणे! अंधारातील दृश्यात सुद्धा!चित्रपटातील प्रत्येक फ्रेमचे रंग, कॉन्ट्रास्ट, ब्राइटनेस हवा तसा! या अत्याधुनिक थिएटरला डॉल्बी च्या मार्गदर्शनाखाली बनवायला सव्वा वर्ष लागलं यात आश्चर्य काहीच नाही.

योगायोग कसा ते बघा, "शोले" चे हे पन्नासावे वर्ष साजरे होत आहे! आणि पन्नास वर्षांपूर्वी मिनर्व्हात "शोले" एन्जॉय करताना त्याची "साऊंड सिस्टीम" कशी भारी आहे याचे विशेष कौतुक व्हायचे. आज आपण याबाबत बरेच पुढे आलो आहोत असेच म्हणायला हवे.

या सर्व तांत्रिक प्रगतीवर असं कोणी म्हणेल, फार पूर्वीची "एकपडदा" चित्रपटगृह अर्थात "सिंगल स्क्रीन थिएटर्स" तशी सर्वसाधारण असत! (शहरी भागातील काही वातानुकूलित वगळता!) मात्र चित्रपट भारी असत. अनेक चित्रपट डोक्यावर तसेच अनेक चित्रपट डोक्यात ठेवत, आवडलेले अनेक चित्रपट पुन्हा पुन्हा पाहत. आपल्याला आवडलेल्या चित्रपटाची महती पुढील पिढीला सांगत. आज मल्टीप्लेक्स युगात चित्रपटाने प्रचंड तांत्रिक प्रगती केली, पण "आपला वाटेल" असा चित्रपट आज खरंच

पाह्यला मिळतोय का? आज आपण अनेक चित्रपट पडद्यावरच ठेवून चित्रपटगृहाबाहेर पडतोय. त्याचे काय? आपण अत्याधुनिक तंत्रज्ञान अनुभवायला चित्रपटगृहात जायचं की कसदार कथा पटकथेवरील चित्रपट पाहण्यास तिकीट काढायचे हा मात्र प्रश्नच आहे.

© दिलीप ठाकूर
("नवराष्ट्र" रविवार लेख वरून साभार)

♥

<u>लेख क्रमांक : ३२</u>

<u>दिवाळी अंक लेख २०२२</u>
<u>'बाल्कनी साडेपाच का बीस बोलो.... '</u>

एक पाच जणांचे कुटुंब (पती, पत्नी आणि तीन मुले... सत्तरच्या दशकातील ही गोष्ट आहे हो) व्यवस्थित नटूनथटून आपल्या फियाट गाडीने मिनर्व्हा थिएटरवर रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) हा मल्टी स्टार कास्ट सत्तर एमएम व स्टीरीओफोनिक साऊंड सिस्टीमचा धमाकेदार चित्रपट पाह्यला येतात! थिएटरच्या कार पार्किंगमध्ये गाडी नेत असतानाच हाऊसफुल्ल गर्दीतून वाट काढत असतानाच 'तिकीट खिडकीवर' आपल्याला तिकीटे मिळणार नाहीत असे त्यांनी घरुन निघाल्यापासूनच गृहीत धरलयं असे कुटुंब प्रमुखाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतेय. त्यात काय विशेष अशा आविर्भावात गाडी पार्क करुन कुटुंबप्रमुख थेट त्याच

गर्दीत एका बाजूस उभ्या उभ्याच बोलत असलेल्या, जल्दी बोलो, "स्टॉल" का पंधरा रुपया, बाल्कनी "साडेपाच का बीस रुपया"! हा कुटुंबप्रमुख सहजपणे शंभर रुपयात पाच तिकीटे घेतो आणि आपली तिकीटे कन्फर्म झालीत असे मानतच निर्धास्त होतो....

पिक्चरच्या तिकीटांचा असा "काळाबाजार" ही एकेकाळची हुकमी बहुस्तरीय संस्कृती. ब्लॅकवाल्यानी तिकीट खिडकीवरुन बरीच तिकीटे घेतली आणि चढ्या भावात ती विकली अशी ही सरळ रेषेत जाणारी वाट अथवा गोष्ट नाहीच. त्याबाबतही अनेक लहान लहान गोष्टी, कथा, दंतकथा, किस्से वगैरे आहेतच. याला तुम्ही 'टॉकीजची गोष्ट' म्हणा अथवा पब्लिक संस्कृतीचा फंडा म्हणा, हा एक भन्नाट असा रिॲलिटी शो नक्कीच आहे!

ही संस्कृती पन्नासच्या दशकापासूनच सुरु

आहे असे म्हटले जाते आणि त्यात निश्चित तथ्य असावे. शोधक वृत्तीचा दिग्दर्शक विजय आनंदला 'काला बाजार' (प्रदर्शन ९ सप्टेंबर १९६०) ची कल्पना याच कल्चरवरुन सुचली. एकेकाळी तो धोबी तलावच्या मेट्रो थिएटरमध्ये हिंदी अथवा इंग्लिश चित्रपट पाह्यला येई तेव्हा त्याला थिएटरपासून थोडेसे दूरवर मेट्रोच्या तिकीटांचा काळाबाजार चालताना दिसे. ते पाहून त्याचे कुतूहल वाढले. अधिक शोध घेताना त्याला काही रंजक माहिती मिळाली. तो म्हणे, एकाद्या निर्मात्याकडून 'सुपारी' घेऊन दुसऱ्याचा पिक्चर सुरु असतानाच थिएटरमध्ये हुडआउट करायचे. याचा इतर पब्लिकवर दुष्परिणाम व्हायला हवा. त्याचे असे काही उपद्याप करणारे रॅकेट होते.. गोल्डी आनंदने या गोष्टी आवश्यक त्या प्रमाणात 'काला बाजार' पिक्चरमध्ये वापरल्या. देव आनंद त्यात गुन्हेगार नायक होता.

राज कपूर अभिनित, निर्मित व दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर' (१९७०) हा त्याचा विलक्षण महत्त्वाकांक्षी चित्रपट पडला की पाडला हा विषय या चित्रपटाला बावन्न वर्षे झाली तरी चर्चेत असतो, त्यात एक 'रिळ' हे या ब्लॅक मार्केटवाल्यानी जोकरची तिकीटे मुद्दाम स्वस्तात विकली आणि या पिक्चरमध्ये फारसा दम नाही असे नकारात्मक वातावरण निर्माण केले असे अगदी ठामपणे म्हटले जाते. ब्लॅक मार्केटमधील 'जोकरचे पतन' राज कपूरच्या व्यावसायिक शत्रूचे 'फिक्सिंग' अथवा सेटिंग होते असे तेव्हापासून आजतागायत कायमच रंगवून रंगवून सांगितले जाते.

ब्लॅक मार्केटमधील पिक्चर्सची तिकीटे हा असा बहुरंगी विषय आहे. याला हस्तकौशल्य म्हणायचे की शब्द चातुर्य हा मात्र प्रश्न आहे. काही असो, ब्लॅक मार्केटमध्ये चित्रपटाची तिकीटे बोलता बोलता

विकणे एक कलाच! अनेकदा तरी तोंडी तिकीटाचा चढता भाव असलेल्याच्या हातात तिकीटे नसत. आपण तिकीट हवे म्हटले की तो आडेवाटेला पाठवे. आमच्या गिरगावातील सेन्ट्रल थिएटर असेल तर ब्लॅकवाले गोरेगावकर लेनमध्ये उभे असत, नॉव्हेल्टी थिएटरमध्ये ते अनेकदा तरी कार पार्किंगमध्ये असत. अनेकदा तर अगदी थिएटरबाहेर उभे राहून भराभर तिकीटे विकत. शालिमार, रॉक्सी, अलंकार, ड्रीमलॅन्ड थिएटरबाहेर हे सर्रास दिसे. आम्हा मध्यमवर्गीय संस्कारात वाढलेल्याना उगाच भाबडा प्रश्न पडे, अशा सहजपणे ब्लॅकमध्ये तिकीटे विकली जाताहेत म्हणजे काय? कायदा आहे कुठे वगैरे प्रश्न पडत आणि त्यातूनच काही दंतकथा जन्माला येत. अधूनमधून पोलीसांची धाड पडल्याच्या बातम्या असत. गंमत म्हणजे, सुपर हिट पिक्चरची तिकीटे ब्लॅकमध्येही मिळत नाहीत असा अनुभव आला की अनेक जण

निराशही होत आणि आजच रेड कशाला पडली असा हुरहूर वाटणारा प्रश्न त्याना पडे. कधी म्हटले जाई की, पोलीस बायकांना त्रास देऊ शकत नाहीत म्हणून काही ब्लॅकवाले आपल्या सहा सात जणांच्या गॅन्गमध्ये एक दोन महिला ठेवत. अर्थात, यात रिॲलिटी किती व कोणती हे ब्लॅक मार्केटची जमातच सांगू शकली असती. पण प्रत्येक थिएटरवरचे ब्लॅकवाले हुकमी असत. ते आपला "इलाका" सांभाळत. इतरांच्या थिएटरमध्ये ते घुसखोरी करीत नसत. याला व्यावसायिक शिस्त अथवा एक प्रकारचा प्रामाणिकपणा म्हणायला हवा. या जमातीची संघटना अथवा सिंडिकेट नसावी. अन्यथा पब्लिकला हमखास आवडतील आणि अनेक आठवडे हाऊसफुल्ल गर्दीत चालतील असेच चित्रपट काढावेत अशीच मागणी त्यांनी केली असती.

ब्लॅकवाल्यांच्या खासियत अनेक!

सत्तरच्या दशकात शुक्रवारी रिलीज होत असलेल्या नवीन चित्रपटाची आगाऊ तिकीट विक्रीची खिडकी सोमवारी उघडताना अगदी सकाळपासूनच लागलेल्या रांगेत यांची मंडळी खूपच असत. पिक्चरची जेवढी हवा जास्त तेवढ्या जोरात पहिला अख्खा आठवडा तो पिक्चर हमखास हाऊसफुल्ल होणारच अशी हमी असे. त्यात पहिले तीन दिवस म्हणजे शुक्रवार, शनिवार व रविवार तिकीटाला जबरा मागणी असणार याची हमी. त्यातही 'दाग', 'प्रेम नगर', 'अमर अकबर अन्थनी', 'मुक्कदर का सिकंदर', 'मिस्टर नटवरलाल', 'हम किसीसे कम नही', 'कुर्बानी' या पिक्चरचा 'फर्स्ट डे फर्स्ट शो' पब्लिक रिपोर्ट सकारात्मक अथवा गरम आलाच तर शुक्रवारीच ब्लॅक मार्केटमध्ये सेकंड शोपासूनच चढा दर! पैसे कमवाईची उत्तम संधी. आणि जेव्हा 'एक महल हो सपनो का', 'शालिमार', 'रजपूत', 'कुदरत',

'लुटमार', 'तिसरी ऑख' या पिक्चर्सचे पब्लिक रिपोर्ट 'नरम' आले तेव्हा ब्लॅक मार्केटमध्येही रेट आपोआप उतरले अथवा पडले. पण अधिक नुकसान होऊ नये म्हणून मूळ भावात तिकीटे विकायची तयारी असे. काही पिक्चर्स असे आपटत की याच ब्लॅकवाल्याना आपल्या हातात राहिलेली तिकीटे चक्क फाडून टाकावी लागत. एफ. सी. मेहरा निर्मित व शम्मी कपूर दिग्दर्शित 'मनोरंजन' (१९७४) पिक्चरचा पब्लिक रिपोर्ट अतिशय निराशाजनक आल्याने काही ब्लॅकवाल्यानी 'लास्ट' शोला म्हणजेच रात्री नऊच्या शोला अतिशय रागाने खिशात ब्लेड नेऊन मिनर्व्हा थिएटरमधील काही सीटस फाटल्याची बातमी त्या काळात गाजली होती! याच मिनर्व्हाबाहेर 'शोले'च्या तिकीटाची अनेक आठवडे ब्लॅक मार्केटमध्ये विकून काहीनी आपल्या गावी बंगला बांधला, कोणी हॉटेल काढले. काही ब्लॅकवाले पिक्चर ज्युबिली हिटचीही

आपली एक पार्टी करत. कारण पिक्चरच्या यशाचा त्यांनाही फायदा झालेला असतो आणि तेही यशाचे वाटेकरी. खरं तर ही 'टॉकीजच्या गोष्टी'ला समांतर अशीच एक प्रकारची रोखठोक 'खुली' अर्थ व्यवस्था! थिएटरचा चालक, पिक्चरचा वितरक प्रत्येक तिकीटावरचा मनोरंजन कर, आणखीन काही कर भरतोय. आणि त्यात जावून जे पैसे राहतात. ती त्याची कमाई. (आज पिक्चर लागतोय तोच कोट्यावधीच्या कमाईचे आकडे येतात त्यातील करात किती जातात विचारा.) ब्लॅक मार्केटवाल्याला जणू एक प्रकारची करमाफी! पण त्यात धोके जास्त! पकडले जाऊ नये म्हणून फिल्डींग आणि हाती सापडलो तरी वांधे! दुसऱ्या बाजूने पाहिले तर यांचे चढे दर म्हणजे, पिक्चर सॉलिड हिट असल्याचा जणू हिरवा कंदील. आणि 'पिक्चर पाह्यला आलोय, हाऊसफुल्ल असला तरी ब्लॅकमध्ये तिकीट घेईन पण पिक्चर पाहूनच घरी

जाईन' असा निर्धार असलेल्या वर्गाची जणू ही चालती/फिरती/बोलती तिकीट खिडकी'! एक प्रकारे पिक्चरचे तिकीट मिळण्याचे हुकमी ठिकाण. तरी रवि टंडन दिग्दर्शित 'अपने रंग हजार' (संजीवकुमार व लीना चंदावरकर) याच्या तिकीटावरुन अप्सरा थिएटरचा बुकिंग क्लर्क आणि ब्लॅक मार्केटवाला यांचा वाद बाचाबाचीने असा काही विकापोला गेला की तो बुकिंग क्लर्क भांडत भांडत थिएटर्सबाहेर येताच त्याच्यावर चाकू हल्ला झाल्याची वृत्तपत्रात बातमी आली होती. फार पूर्वी म्हणे यात सिंडिकेट होते. आमच्या दक्षिण मुंबईतील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्सची तिकीटे भुलेश्वर भागात कुठे तरी चढ्या भावात मिळत! खरे काय नि खोटे काय, याची कल्पना नाही. मी स्वतः कधी याचा अनुभव घेतला नाही. मी कायमच पडद्यासमोरच्या पहिल्याच दोन चार रांगेतील "स्टॉल"चा हुकमी रसिक! कुठे एक

रुपया पासष्ट पैसे तर एअर कंडिशन थिएटर्सला हेच तिकीट दोन रुपये वीस पैसे. आणि खिशात तेवढेच पैसे! ब्लॅकमध्ये तिकीट घेण्याचा विचारच करु शकत नव्हतो. फक्त कान टवकारून आकडा ऐकायचो अथवा नाझला तिकीट मिळाले नाही तर अगदीच शेजारच्या स्वस्तिक अथवा इंपिरियलला जायचो.

ब्लॅक तिकीटवाले आणि फिल्मवाले यांचा काही अनोखा रिश्ता वगैरे?? हो अथवा नाही असे नेमके उत्तर नाही! एक वेगळाच किस्सा सांगतो, चित्रपती व्ही. शांताराम यांनी आपल्या 'शांतारामा' या आत्मचरित्रात एक अनुभव सांगितला आहे. आपल्या नवीन चित्रपटाला पब्लिक रिस्पॉन्स कसा आहे हे अनुभवण्यास गेले असता आपल्या चित्रपटाची तिकीटे ब्लॅकमध्ये चक्क स्वस्तात विकली जाताहेत हे दिसले. या गोष्टीचा त्यांनी ताबडतोब छडा लावण्यात यश मिळवले. हे सगळे वाचून मीही अचंबित झालो.

असो! ब्लॅक मार्केटमधील तिकीटे हा चित्रपटसृष्टीच्या एकूणच सिस्टीम आणि संस्कृतीचा एक भाग आहे. अनेक मराठी चित्रपटांच्याही बाबतीत हे घडलयं. (त्यांच्याही नशिबी हे सुख आले असेही कौतुकाने म्हणता येईल.) दादा कोंडके यांचा मनोरंजक चित्रपट म्हणजे ब्लॅक मार्केटमध्ये उत्साहाचे वातावरण. 'सोंगाड्या'पासूनच ही परंपरा सुरु झाली. आणि मग दादा कोंडके यांचा पिक्चर म्हणजे, नेहमीच गर्दीची भरती. आणि एकदा का डोक्यात आले की आज दादांचा पिक्चर पाहून मस्त एन्जॉय करायचे की ब्लॅक मार्केटमध्येही तिकीट काढून हौस मौज पूर्ण करण्याची अनेकांची मानसिक व आर्थिक तयारी असे. मुंबई, पुणे, कोल्हापूर तर झालेच पण तालुक्याच्या ठिकाणीही हे लोण पोहचले होते. किरण शांताराम निर्मित व सचिन पिळगांवकर दिग्दर्शित 'अशी ही बनवाबनवी', विजय कोंडके

निर्मित व दिग्दर्शित 'माहेरची साडी ' हे पिक्चर आपण ब्लॅकमध्ये तिकीट घेऊन पुन्हा पुन्हा एन्जॉय केले असे सांगणाराही एक हुकमी ऑडियन्स होता! असा हा रिपिट ऑडियन्स ब्लॅक मार्केटला जणू सपोर्ट सिस्टीम ठरणारा. राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांचे माझ्यासारखे फॅन्स त्यांचा पिक्चर एकदा पाहून समाधानी होत नसू.

© दिलीप ठाकूर
(दिवाळी अंक लेख २०२२ - वरून साभार)

♥



"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

<u>लेख क्रमांक : ३३</u>

<u>सेलिब्रेशन असावे ते "शोले" पन्नाशीचे....</u>

मिनर्व्हा चित्रपटगृह! दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावर (लॅमिन्टन रोड) किमान तीन पिढीतील चित्रपट रसिकांची अफाट गर्दी! ट्रॅफिक जाम झालाय! एकेक करत "शोले"तील कलाकार आपल्या प्रशस्त गाडीतून येताहेत. ते गाडीचा दरवाजा उघडण्यापूर्वीच जगभरातील मिडियाचे कॅमेरे आणि बूम त्यांच्यावर खिळलेत. प्रत्येकाला भावना अनावर झाल्या आहेत. फ्लॅशबॅकमध्ये जात त्यांना पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणीत जायचयं. अनेक प्रादेशिक भाषा व हिंदी, इंग्रजी वृत्तवाहिन्यांवर हे सगळेच उत्फूर्त कव्हरेज लाईव्ह दाखवताहेत. भरभरुन टीआरपी मिळतोय. मिनर्व्हावर प्रचंड मोठी सजावट केली आहे. लेझर शो सुरु आहे. आकर्षक असे

थिएटर डेकोरेशन आहे. गर्दीतील साठी पासष्टी ओलांडलेल्या चित्रपट रसिकांना कॅमेऱ्यासमोर बोलते केले जात आहे. या उत्साहात आज हयात नसलेल्या संजीवकुमार, अमजद खान, ए. के. हनगल, लीला मिश्रा, विजू खोटे, मॅकमोहन, जगदीप अशांचा अजिबात विसर पडलेला नाही. मिनर्व्हाच्या भव्य दिमाखदार पडद्यावर "सत्तर एमएम" व "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम"चा दबदबा कायम आहे. पडद्यावर संवाद सुरु होण्यापूर्वीच पब्लिकमधून डायलॉगबाजी सुरु होतेय, "कितने आदमी थे....! "

"शोले"चे पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताचे "सेलिब्रेशन" हे असे झाले असते तर....!? छातीठोकपणे सांगतो.. १९६० आणि त्याआधीची, इतकेच नव्हे तर पुढच्याही पिढीतील अनेक जण असे स्वप्न नक्कीच पाहत असतील, यात शंकाच नाही!



आज मी "मिनर्व्हा"वरुन जातो तेव्हा त्याची ती १४९९ अशी अफाट आसन क्षमता असलेली देखणी इमारत पूर्णपणे पाडलेली दिसते! अवतीभवती पत्रे लावलेत तरी मला "यह दोस्ती हम नहीं तोडेंगे.. " असा वीरु व जय यांच्या दोस्तीचा आनंद ऐकायला मिळतो....! "अब.. गोली खा..! " अशी गब्बरसिंगची दहशत तेथे जाणवते. यश, यश म्हणतात ना! ते हेच असते, नाही का?

सिप्पी फिल्मकडून म्हणा अथवा फिल्म हेरिटेज फाउंडेशनकडून म्हणा, " शोले"चे पन्नास वर्ष

पूर्णतेचे जंगी "सेलिब्रेशन" याच "मिनर्व्हा" चित्रपटगृहात दणक्यात साजरे झाले असते. जगभरातून हिंदी चित्रपट रसिक त्यासाठी नक्कीच आले असते! असे मला तरी मनोमन वाटते!

१५ ऑगस्ट १९७५ रोजी मुंबईत प्रदर्शित झालेला जी. पी.सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद (निझाम) येथे शुक्रवार २२ ऑगस्ट १९७५ रोजी आणि मग त्या काळातील पध्दतीनुसार टप्प्याटप्प्याने लहान मोठ्या शहरांपासून ग्रामीण भागातील चित्रपट रसिकांपर्यंत चित्रपट पोहचला. "शोले" न पाहणारा चित्रपट रसिक त्या काळात मिळणे महामुश्किल! "शोले" जणू या देशाची लोककथा झाला! पन्नास वर्ष पूर्ण निमित्ताने आता १५ ऑगस्ट २०२५ रोजी "आयनॉक्स मल्टीप्लेक्स"मध्ये पुन्हा.. अतिशय थाटात प्रदर्शित होतोय. आता त्यात

आणखीन काही दृश्ये समाविष्ट केली आहेत. चित्रपट निर्मितीत काही दृश्य चित्रपटात समाविष्ट करता येत नाहीत (लांबीचा विचार करावा लागतो. कधी सेन्सॉर काही दृश्य कापते. अशी अनेक कारणे असतात. तो विषयच वेगळा!) अशी अनेक दृश्य आता "शोले" मध्ये पाह्यला मिळणार या गोष्टीचे आतापर्यंत "हजार वेळा शोले पाहिलेला माणूस" ही याचं स्वागत करेल! पन्नास, शंभर वेळा "शोले" पाहणारे फिल्म दीवाने बरेच आहेत! ते आता आणखीन अनेकदा "शोले" अगदी "सहकुटुंब" नक्कीच एन्जॉय करतील! करतील. आवडलेला चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय करणे हेदेखील एक चित्रपट रसिकांचे वैशिष्ट्य! "शोले" सारखे चित्रपट ते अधोरेखित करतात!

"शोले" सुवर्णमहोत्सवी "शोले" च्या धडाकेबाज सेलिब्रेशनची सुरुवात कुलाब्यातील रिगल चित्रपट गृहातील एका विशेष खेळाने झाली. काही

महिन्यांपूर्वीचीच ही गोष्ट! पटकथाकार व संवाद लेखक "सलिम जावेद" यांच्यावरील माहितीपटाच्या निर्मितीच्या निमित्त "शोले"चा हा खास खेळ फिल्म हेरिटेज फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आला आणि शोच्या दोन अडीच तासापूर्वीच रिगलबाहेर "शोले" प्रेमींची लांबलचक रांग लागली! याच रांगेत मला संगीतकार "कौशल्य इनामदार" आपल्या मुलासह भेटले! आपण अनेकदा "शोले" अनुभवलाय. आज खास मुलाला दाखवायला घेऊन आलोय, ते मला भेटताक्षणीच म्हणाले. या खेळास "सलिम जावेद" यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

पडद्यावर सेन्सॉर प्रमाणपत्र दिसताच हाऊसफुल्ल गर्दीतील "शोले" प्रेमीनी प्रचंड टाळ्या शिट्ट्यांनी "रिगल" डोक्यावर घेतले! कदाचित अतिशयोक्ती वाटेल, हा आवाज कदाचित "गेट वे ऑफ इंडियातील फेरी बोटीत" पोहचला असेल. आणि मग प्रत्येक सुपर हिट डायलॉग पडद्यावर येण्यापूर्वीच पब्लिकमधून तोच डायलॉग बोलायला सुरुवात. "बहुत याराना लगता है.." असो वा "इसलिये के लोहा लोहे को काटता है.." असो, पब्लिक अगोदरच बोलू लागला!

काय भन्नाट अनुभव हो! असं वाटलं, पन्नास वर्षांपूर्वीचेच ते "मिनर्व्हा" तील दिवस, पब्लिकचा तसाच जोश! तेवढाच उत्फूर्त जल्लोष! महान कलाकृती कायमच महान असते! सुपर हिट पिक्चर कायमच सुपर हिट असते! भले मग, "शोले" मध्ये पाहण्यासारखे काय आहे? असा वर्षानुवर्ष तिरसट प्रश्न करणारे असोत! आपल्याकडील चित्रपट

रसिकांनी एकादा मसालेदार मनोरंजक चित्रपट डोक्यात व डोक्यावर घेतला की त्याला कोणीच खाली उतरून देवू शकत नाहीत! "यह पब्लिक है... " त्यांची आवडनिवड जास्त महत्वाची!

"शोले" सेलिब्रेशन जत्रेत, मग इटलीतील त्याचा प्रीमियर गाजला. तिकडेही हाऊसफुल्ल गर्दी! तोच थरार! तशीच रोमांचकता! मोठ्या पडद्यावर स्क्रीनिंग! आणि सोशल मिडियातून त्याच्या कव्हरेजला भरभरुन लाईक्स! सकारात्मक कॉमेंट्स! पन्नास वर्ष पूर्णतेबद्दल असा मुंबईत असा "प्रीमियर" का नाही असाही एक प्रश्न आहेच! पण आजच्या "ग्लोबल युगात" युरोपमधील "प्रीमियर" हा सर्वव्यापी ठरावा! आज जगभरातील अनेक देशांत आपले चित्रपट प्रदर्शित होताहेत. त्यानुसार विदेशात "शोले" पन्नास वर्ष पूर्णतेचा बहुचर्चित प्रीमियर!

मुंबईत " शोले" सेलिब्रेशनचा एक अनोखा

फंडा पाह्यला मिळाला. नरिमन पॉईंट येथील एनसीपीए या भव्य दिमाखदार सभागृहात पडद्यावर "शोले" ची काही दृश्य व गाण्यांचा काही भाग (पण आवाज नाही) आणि समोरच शंभर वादकांचा आधुनिक वाद्यांसह ताफा आणि त्यांचे "शोले" चे संगीत व पार्श्वसंगीत! एक भन्नाट अनुभव! भरपूर मेहनत घेऊन या सगळ्याचे आयोजन. खर्चिक गोष्ट! पण "शोले"ची शान त्यात दिसली. मुंबईत "शोले" सेलिब्रेशनचा एक अनोखा "यू ट्यूब"वर हे सगळेच पाह्यला मिळतेय! एकाद्या चित्रपटाची अशीही दखल घेतली जावू शकते. "शोले"तील गाणी मात्र त्या काळात चित्रपट सुपर हिट ठरल्यावर लोकप्रिय झाली! १९७५ साली संगीतकार राहुल देव बर्मनचे गुलजार दिग्दर्शित "आंधी" व "किनारा", रवि टंडन दिग्दर्शित "खेल खेल मे" या चित्रपटांचे संगीत जास्त लोकप्रिय होते. विशेषतः आंधीची गाणी आजही

तेवढीच श्रवणीय!

आता तर "शोले"तील नाणे! चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त एक विशेष उल्लेखनीय आठवण म्हणून असे नाणे प्रकाशित करणे ही कल्पनाच भन्नाट! चित्रपटात हे नाणे जणू एक व्यक्तिमत्व आहे. जय व वीरु यांच्या नात्यातील महत्वाची गोष्ट. मला आठवतय मिनर्व्हात "शोले" अनुभवताना नाणेफेकीच्या प्रसंगात हे नाणे जणू आपल्या आसपास पडलयं असा जबरदस्त फिल येई! "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" म्हणजे काय याचा तो अनुभव आणि याच नाण्यावरुन अनेक किस्से, गोष्टी, कथा, दंतकथा. त्यात त्या नाण्याच्या दोन्ही बाजू एकच हा ट्विस्ट गाजलेला.

"शोले" च्या पन्नास वर्ष पूर्णतेच्या सेलिब्रेशनच्या अशा एकेका गोष्टी या लोकप्रिय कलाकृतीचा प्रभाव अधोरेखित करताहेत. या गोष्टी

चित्रपट रसिकांचा उत्साह वाजवताहेत.

सध्या चित्रपटाच्या जगात विशेष काय चाललयं, या प्रश्नावर मी त्याच तत्परतेने उत्तर देतो, "शोले" चे पन्नास वर्ष पूर्णतेचे सेलिब्रेशन सुरु आहे, आजही, उद्याही व केव्हाही असे म्हणतो. "शोले" सह सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रांचाही पन्नास वर्षांचा बदलता प्रवास सुरु आहे. तोदेखील उल्लेखनीय.

"शोले" म्हणजे न संपणारी कथा, पटकथा व संवाद. यशाच्या गोष्टी कायमच कौतुकाच्या असतात. "शोले" ची तशीच तर आहे....

© दिलीप ठाकूर
(रविवार रामप्रहर "झूम" वरून साभार!)

♥

लेख क्रमांक : ३४

यश " शोले" चे आणि
दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे !!

गणित एकदम सोपे आहे! मिनर्व्हा चित्रपट गृहातील "शोले"चा पाच वर्षांचा खणखणीत मुक्काम आणि "दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे" अर्थात "डीडीएलजे"चा मराठा मंदिर चित्रपटगृहातील मॅटीनी शोचा तब्बल "एकोणतीस वर्षांपेक्षा" जास्त काळ सुरु असलेला प्रवास, यात पारडे कोणाचे जड?

प्रश्न एकदम सोप्पा! पण उत्तर?

"शोले" (मुंबईत प्रदर्शित १५ ऑगस्ट १९७५) च्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत असूनही त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम क्षेत्रातील प्रभाव आजही कायम आहे! "बातम्या" ते "मिम्स" असा या चित्रपटाचा प्रवास आहे. आजही एकाद्या लहान मोठ्या शहरांतील रिक्षावर शोलेची बसंती अथवा

गब्बरसिंगचे स्टीकर असते. हेदेखील यशच! शोलेने मिनर्व्हात दिवसा तीन खेळ याप्रमाणे ३१ ऑगस्ट १९७८ रोजीपर्यंत हाऊसफुल्ल गर्दीत प्रवास केला. त्यानंतर तेथेच "मॅटीनी शो"ला चित्रपट शिफ्ट केल्यावर तो आणखीन दोन वर्ष असा मिळून एकूण पाच वर्ष मुक्काम केला! "डीडीएलजे" मुंबईत "न्यू एक्सलसियर" चित्रपटगृहात २० ऑक्टोबर १९९५ रोजी प्रदर्शित झाला (तो दिवस दिवाळीचा पाडवा होता). तेथे पन्नास आठवड्यांचा मुक्काम केल्यावर तो "मराठा मंदिर" चित्रपटगृहात मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आजही, अगदी आजही मॅटीनी शोला सुरुच आहे!

चित्रपटाचे यश असे आकड्यात मोजायचे असते काय? निर्मितीचा खर्च इतका आणि कमाई इतकी असे सरळ रेषेत जाणारे ते गणित असते काय? त्यापलिकडे जात चित्रपट यशस्वी ठरतो.

काजोलने एकदा "डीडीएलजे"च्या निमित्ताने "एक्स"वर (अर्थात "ट्विटरवर") पोस्ट केली हे विशेषच! "करवा चौथ"चा संदर्भ देत या चित्रपटावर सोशल मिडियात काही पोस्ट झाल्या.

या दोन्ही चित्रपटांनी "मुद्रित माध्यम" ते "डिजिटल युग", "लॅण्डलाईन फोन" ते "मोबाईल फोन", "सिंगल स्क्रीन थिएटर्स" ते "मल्टीप्लेक्स", "ओटीटी", "लोकल ट्रेन" ते "मेट्रो" असा सर्वच स्तरावर प्रवास केला आहे. आणि हेदेखील एक लोकप्रिय चित्रपटाचे वैशिष्ट्य!

मी आवर्जून जवळपास प्रत्येक वर्षी १९ अथवा २० ऑक्टोबर रोजी या मराठा मंदिर चित्रपटगृहाला भेट देऊन डीडीएलजेचा 'आठवड्याचा वाढलेला आकडा तो किती बघूया!' असा मनोमन विचार करत नजर टाकतो. यावेळी ही संख्या आहे, १५११ वा आठवडा! अबब म्हणावा असाच हा विक्रमी मुक्काम! जगभरातील कोणत्याही भाषेतील चित्रपट असा इतकी वर्ष/इतके आठवडे चित्रपटगृहात मुक्काम करु शकत नाही. चित्रपटाच्या गुणवत्तेबद्दल अजिबात वाद नाही. कितीदाही पहावा झक्कास दिलखुलास, तजेलदार मनोरंजन आहे! बरं मराठा मंदिर चित्रपटगृहात तिकीट दर किती? तर ड्रेस सर्कल तीस रुपये आणि बाल्कनी चाळीस रुपये असे. सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या परंपरेतील आहेत. मल्टीप्लेक्स युगात चित्रपट पाहणे महाग झाले असताना तर हे तिकीट दर खिशाला परवडणारे (ऑनलाईन

तिकीट दर खिशाला परवडणारे (ऑनलाईन पेमेंटच्या तुलनेत स्वस्तच म्हणायचे.)

यश चोप्रा यांनी आपल्या दिग्दर्शनात जे भावनिकपण जपले (वक्त, इत्तेफाक, दाग, दीवार, मशाल, चांदनी, लम्हे यात ते अनेक दृश्यात आहे), रोमान्स खुलवला! गीत संगीत व नृत्याची बहार खुलवली, ते सगळे त्यांचा पुत्र आदित्य चोप्राने अतिशय आकर्षक पॅकेजमध्ये (काळ बदलला होता हो. 'मसाला मिक्स' हा शब्द मागे पडला) पहिल्याच दिग्दर्शनात ते खुलवून रंगवून पडदाभर साकारले. आणि ते नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धात सुसंगत होतेच. देशात जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था यांचे वारे रुजत होते. समाजात नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्ग वाढत होता. महाग तेच चांगले अशीच एक प्रकारची मानसिकता समाजात मुरत होती. राजश्री प्रॉडक्शन्स निर्मित व सूरजकुमार बडजात्या

दिग्दर्शित "हम आपके है कौन" (१९९४) ने वातावरण बदलण्यास सुरुवात केली होतीच. चित्रपट इतिहासातील हे टप्पे खूपच महत्वाचे. चित्रपटाचा अभ्यास करताना दखल घ्यावेत असेच.

"डीडीएलजे"च्या एक हजाराव्या आठवड्यात शाहरूख खान आणि काजोल मराठा मंदिर चित्रपटगृहात आवर्जून आले होते! आपल्याच चित्रपटाच्या यशाचा असा प्रवास त्यांनी असा येऊन एकदा पहावा हे विशेष उल्लेखनीय आहे! रसिकांच्या दोन पिढ्या ओलांडूनही हा चित्रपट आपले महत्त्व

टिकवून आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा ११२ वर्षांवर फोकस टाकताना शोले व डीडीएलजे पहिल्या पंचवीस चित्रपटात येतातच. डीडीएलजे हा नव्वदच्या दशकातील पिढीची भाषा बोलणारा हा चित्रपट आहे. या यशात बदलत्या समाज घटकाचे प्रतिबिंब निश्चित आहे. आणि ते असतेच. चित्रपट व समाज असाच जोडला गेला आहे.

खरं तर "डीडीएलजे" चित्रपटाचे यश कशात? राज मल्होत्रा (शाहरूख खान) आणि सिमरन सिंग (काजोल) यांच्यातील ही अगदी दिलखुलास, मिस्कील, मार्मिक, खेळकर, खोडकर अशी प्रसन्न प्रेमकथा आहे! इंग्लंडमधील देखणं आकर्षक शूटिंग आहे. झक्कास आऊटडोअर्स लोकेशन आहेत. आपण प्रत्यक्षात तेथे आहोत असेच वाटते. शोलेसाठी बंगलोरजवळील रामनगर येथे गावाचा सेट लावून त्याला रामगढ असे नाव दिले. पिक्चर हिट होताच हे

रामगढ पर्यटन स्थळ झाले. तर शोले'तील जेलचा सेट राजकमल कलामंदिर स्टुडिओत उभारला.

शोलेची गाणी आजही लोकप्रिय! चित्रपट झाला तेव्हा मात्र ती गाणी इतकी काही खास नाहीत असा मतप्रवाह होता. चित्रपट हिट झाल्यावर तीही गाजू लागली. पार्श्वसंगीत मात्र एकदम कडक. प्रत्येक प्रसंगावर राहुल देव बर्मनच्या प्रभावी पार्श्वसंगीताचा प्रत्यय येतोच. शोलेच्या संवादाची ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाली, तीदेखील लोकप्रिय. पार्श्वसंगीताची ध्वनिमुद्रिका आली त्यालाही भारी मागणी! "डीडीएलजे"ही संगीत सर्वकालीन सुपर हिट! "तुझे देखा तो मै जाना सनम.." (पार्श्वगायक कुमार शानू व लता मंगेशकर), "जरा सा झूम लू मै.." (आशा भोसले व अभिजित भट्टाचार्य), "मेरे ख्वाबो मे जो आये.." (लता मंगेशकर), "मेहंदी लगा के रखना.." (लता मंगेशकर व उदीत नारायण), "हो गया है तुजको जो

प्यार सजना.." (लता मंगेशकर व उदीत नारायण), "रुक जा ओ दिल दीवाने.." (उदीत नारायण) एक गाणे होतेय तोच दुसरं हवेसे वाटते! आणि यातलं कोणतेही गाणे आठवले वा गुणगुणले तरी डोळ्यासमोर पडद्यावरचे गाणे येते. आणखीन काय हवे? गाना हिट है तो पिक्चर भी सुपर हिट होना मंगता.

हिंदी चित्रपटसृष्टीच्या सर्वोत्कृष्ट दहा उत्तम पटकथा व तांत्रिकदृष्ट्या सकस चित्रपटात काय हवे? "गाना हिट है तो पिक्चर भी सुपर हिट होना!" शोले तर प्रेमकथांमध्ये "डीडीएलजे"ची "राज आणि सिमरन" यांच्या या प्रेमकथेचा समावेश होतोच! एक टप्पा राज कपूर दिग्दर्शित 'बॉबी' (१९७३) या मोकळ्या ढाकळ्या तरुण प्रेमपटाचा होता. तोही एकावन्न वर्षांनंतरही तारुण्यात. इतकेच नव्हे तर हिंदी चित्रपटसृष्टीच्या वाटचालीचा अभ्यास करताना

'शोले' पर्यंतचा चित्रपट, आणि 'शोले' ते 'डीडीएलजे असा एक स्थित्यंतरचा टप्पा आणि डीडीएलजे ते त्यानंतरचा काळ असा तो फोकस टाकायला हवा. चित्रपट अभ्यासक्रमात हेही महत्वाचे.

'शोले' असो वा 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' हे चित्रपट प्रदर्शित झाले तेव्हा ते असा बहुस्तरीय आणि अबब म्हणावा असा प्रवास करतील असे कोणीही भविष्य वर्तवले नव्हते. तरी बरं चित्रपटसृष्टीत ज्योतिषी खूप आहेत! श्रध्दा अंधश्रध्दा यांची रेलचेल भन्नाट आहे. चित्रपटाच्या जबरदस्त यशाने त्याची सगळीच समिकरणे बदलून टाकलीत, बदल ही तर केवढी तरी मोठी गोष्ट आणि तेच त्याचे वेगळेपण आहे आणि मोठेच यश आहे. सिनेमाच्या जगात तर यश म्हणजेच बरेच काही असते... शोले असो वा डीडीएलजे हे चित्रपट सिंगल स्किन, व्हिडिओ कॅसेट, व्हीसीआर, डीव्हीडी ते मल्टीप्लेक्स, मोबाईल स्क्रीन,

ओटीटी असा प्रवास सुरु आहे, चित्रपट समिक्षक ते सोशल मिडियातील ट्रोलर (कधी कधी नकोतच त्यांच्या त्या उलटसुलट प्रतिक्रिया) अशी प्रगती आहे. पंधरा ऑगस्टचा मुहूर्त साधून मोठा चित्रपट प्रदर्शित करण्याचा ट्रेण्ड 'शोले'ने तर दिवाळीत चकाचक चित्रपट प्रदर्शित करण्याचा ट्रेण्डही डीडीएलजेने आणला आणि त्यात शाहरुख खान 'मेन हीरो' राहिलाय...शाहरुखचे " फॅन्स " यात बेहद्द खुश!

एक सुपर हिट चित्रपट बरेच काही पेरत असतो, घडवत असतोच. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील हेही एक वैशिष्ट्य. जगभरातील मिडियातून शोले व डीडीएलजेच्या यशस्वी वाटचालीवर कधी ना कधी "फोकस" टाकावा लागला यात बरेच काही आले... आज शोले पन्नास वर्ष सेलिब्रेशन निमित्त आपल्याकडील अनेक यशस्वी चित्रपटांचा फ्लॅशबॅक समोर येत आहे. आजच्या

ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर अनेक जुने यशस्वी चित्रपट येताहेत. आणि त्यानिमित्त त्या अनेक जुन्या चित्रपटांची होत असलेली चर्चा आपल्या चित्रपटाचा चौफेर वैभवशाली इतिहासच समोर आणत आहेत!

माझा कौल "शोले"ला ! पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट असे त्याचे वर्णन करता येईल. पाच वा दहा वेळा जावू देत, किमान पन्नास शंभर वेळा शोले पाहणारे अनेक फिल्म दीवाने आहेत. डीडीएलजे देखील अनेकांनी अनेकदा एन्जा ॅय केलाय. पण सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रावर " शोले"चा भारी प्रवाह आहे....तोही कायम स्वरुपाचा!

© दिलीप ठाकूर
(रविवार रामप्रहर "झूम" वरून साभार!)

♥

<u>लेख क्रमांक : ३५</u>

सलिम जावेद "दुसरी बाजू " खरंच काही सांगते?

विजय आनंदचे दिग्दर्शन असे म्हणताक्षणीच "गाईड", "ज्वेल थीफ", "तिसरी मंझिल", "जॉनी मेरा नाम" असे अनेक चित्रपट एव्हाना डोळ्यासमोर आले असतील तर त्यात आश्चर्य ते काय? याच विजय आनंदने... देव आनंद, शशी कपूर अशी जबरदस्त स्टार कास्ट घेवून "एक दो तीन चार" या चित्रपटाचा जोरदार शोरदार मुहूर्त केला. १९७८ सालची ही गोष्ट. या चित्रपटाची पटकथा व संवाद लेखन सलिम जावेद

यांचे होते. याच्या पटकथेवर विजय आनंदचे दिग्दर्शन हा एक जबरदस्त योग आला....

बरेच दिवस या मुहूर्ताच्या बातम्या प्रसिद्ध होत राहिल्या. तेवढीच त्या चित्रपटाची प्रगती!

सलिम खान व जावेद अख्तर या यशस्वी पटकथा व संवाद लेखक जोडीच्या लघुपटाच्या निमित्ताने पटकन आठवले ते "एक दो तीन चार" या भव्य दिव्य चित्रपटाचा दिमाखदार मुहूर्त!

सलिम जावेद यांच्या यशस्वी वाटचालीत "दुसरी बाजू" देखिल आहे....!

सत्तरच्याच दशकातील असाच एक सॉलिड गाजलेला वाद!

एका गॉसिप्स मॅगझिनला दिलेल्या एका मुलाखतीत सलिम जावेद यांनी म्हटलं, आम्ही पटकथाच अशी बारीकसारीक तपशीलवार देतो की, दिग्दर्शकाला काम ते काय राहते? आम्ही आमच्या

पटकथेतील प्रत्येक व्यक्तीरेखीची तपशीलवार वैशिष्ट्य देतो, प्रत्येक प्रसंग कसा असेल हेही लिहितो वगैरे वगैरे. गॉसिप्स मॅगझिनमधली मुलाखत म्हणजे असेच काही असणार यात आश्चर्य नव्हतेच. मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांना हे अजिबात रुचले नाही. तसे ते स्पष्टवक्तेपणासाठी ख्यातनाम! त्यात पुन्हा मनमोहन देसाई यांनी सलिम जावेद यांच्या पटकथेवर फक्त "चाचा भतिजा" हा एकमेव तर प्रकाश मेहरा यांनी "जंजीर" व "हाथ की सफाई" हे दोनच चित्रपट दिग्दर्शित केले. त्या काळातील आघाडीच्या या दोन दिग्दर्शकांनी सलिम जावेदपेक्षा अन्य पटकथालेखकांना महत्व दिले. त्यांनी सलिम जावेदना सडेतोड उत्तर देताना म्हटले, "त्यांच्या पटकथेवर दिग्दर्शकाला फारसे काम नसते तर ए. सलाम दिग्दर्शित "आखरी डाव" आणि देश मुखर्जी दिग्दर्शित "इमान धरम" का पूर्णपणे अपयशी ठरले?

हे उत्तर मला आवडले कारण मी मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांचा चाहता! १९९१ साली एका दिवाळी अंकासाठी मनजींची आमच्या गिरगावातील खेतवाडीतील प्रताप निवासमधील घरी "अमिताभ बच्चन" या विषयावर मी मुलाखत घेतली तेव्हा या वादावर आमचे बोलणे झाले. अमिताभच्या साठीनिमित्त "रविवार लोकसत्ता"साठी जुहूच्या सुमित प्रिव्ह्यू थिएटरमधील कार्यालयात प्रकाश मेहरांची मुलाखत घेतली तेव्हाही या गाजलेल्या वादाची मी त्यांना आठवण करुन दिली!

सलिम जावेद यांच्या "दुसऱ्या बाजू" च्या गोष्टीही भारीच!

अपयश ही जगातील सर्वात अप्रिय गोष्ट. कोणालाही नको असलेली. सलिम जावेदनाही अर्थात नकोशी असलेली पण त्यांच्या प्रगती पुस्तकात ती आहे!

सिनेमाच्या जगात तर 'अपयश' हा शब्द प्रचलित नसता तर बरे झाले असते अशी जणू सार्वत्रिक भावना कायमच असते! यश हेच येथील सर्वात मोठे टॉनिक! सर्वात मोठे चलनी नाणे!

पण अपयश कोणाला चुकलयं? येथे शंभर टक्के यशाचे असे प्रगती पुस्तक कोणाचेही नाही. ते शक्यच नाही! कारण अनेक बाबतीत पब्लिक पसंतीचा थेट संबंध असतो! निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, गीतकार, संगीतकार, गायक यापासून अगदी चित्रपट वितरक, प्रदर्शक असे त्याला कोणीही अपवाद नाही. तोही एक चित्रपटसृष्टीतील खेळाचा एक रंजक व उत्सुकतापूर्ण भाग आहे. फ्लॉप चित्रपटाबाबत सुद्धा तसेच आहे. त्याच्या गोष्टी आणखीन भारी!

पटकथा आणि संवाद लेखक सलिम जावेद यांच्या एका चित्रपटाबाबत अगदी असेच घडलयं!

त्यांनी 'सौदा" नावाचा एक चित्रपट लिहिला होता, अशी फारशी कुठे नोंद नाही! आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला उठसूठ माहितीसाठी गुगलचा मोठाच आधार वाटतो, त्यातही सलिम जावेद यांच्या यशस्वी कर्तृत्वाच्या चित्रपट यादीत 'सौदा' या १९७४ च्या चित्रपटाचे नावच नाही! पण या चित्रपटाच्या अतिशय दुर्मिळ अशा पोस्टरवर मात्र कथा सलिम जावेद असे म्हटले आहे. या चित्रपटाचे निर्माते होते सी. एस. ओबेराॅय आणि दिग्दर्शक आहेत, सुदेश इस्सार. या चित्रपटात विनोद खन्ना, योगिता बाली, मदन पुरी, सुधीर, मुक्री, जानकीदास, पूर्णिमा आणि रणजित यांच्या प्रमुख भूमिका आहेत. इतर छोट्या छोट्या भूमिकेत रशिद खान, सी. एस. दुबे, श्याम अरोरा, लीना डिसोझा, उमा दत्त यांच्याही भूमिका आहेत. तर इंद्रजीतसिंग तुलसी यांच्या गीताना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे. हा

चित्रपट नेमका कधी आणि कुठे प्रदर्शित झाला हे फार फार तर विनोद खन्नाचे जबरा फॅन सांगतील!



असतात हो असे पंखे! (अरे हो! तो "यूट्यूब" वर उपलब्ध आहे! फोटोवर "क्लिक" करा!) त्या काळात खलनायकीकडून हीरोगिरीकडे वळताना विनोद खन्नाने लगाम, धमकी, मेम साब, खंजर असे बरेच छोटे छोटे चित्रपट स्वीकारत स्वतःला बिझी ठेवत ठेवत 'आपण आता हीरो आहोत!' हे अधोरेखित ठेवले होते. प्रत्येक क्षेत्राचे काही अलिखित नियम

असतात तसेच हे आहेत. येथील खेळी काही वेगळीच असते. आणि त्यात गंमत आहे.

पण हा चित्रपट सलिम जावेद यांनी लिहिला आहे हे दुर्लक्षित का राहिले अथवा मागे का पडले असावे? सलिम जावेद यांनी एकीकडे जंजीर, हाथ की सफाई, यादों की बारात, शोले, त्रिशूल, शान, क्रांती, डॉन, दोस्ताना, शक्ती असे अनेक सुपर हिट चित्रपट लिहिले आणि पटकथा व संवाद लेखकांना ग्लॅमर आणले, त्यांचे मूल्य वाढवले, त्यांना पोस्टरवर स्थान मिळवून दिले, तरीही त्यांच्या खात्यात काही फ्लॉप्स चित्रपटही आहेत. एस. एम. सागर दिग्दर्शित 'अधिकार' (१९७१. प्रमुख भूमिका अशोककुमार, नंदा, देब मुखर्जी, नाझिमा आणि प्राण!), ए. सलाम दिग्दर्शित 'आखरी डाव' (१९७५. जितेंद्र, सायरा बानू आणि डॅनी), प्रेमजी निर्मित आणि देश मुखर्जी दिग्दर्शित 'इमान धरम' (१९७७. शशी कपूर,

संजीवकुमार, अमिताभ बच्चन, रेखा, अमरीश पुरी, डॉ. श्रीराम लागू, प्रेम चोप्रा आणि हेलन), रमेश तलवार दिग्दर्शित 'जमाना' (१९८५. राजेश खन्ना, ऋषि कपूर, पूनम धिल्ला आणि रंजिता) या चित्रपटांना रसिकांनी नाकारले. 'इमान धरम'च्या अपयशाच्या वेळी तर सलिम जावेद यांची पटकथा आणि संवाद म्हणजे हमखास यशच अशा इमेजला जबर धक्का बसला होता. गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच काही ना काही लिहून आले.

राजेश खन्नाची दुहेरी भूमिका असलेल्या चक्क दोन चित्रपटांची पटकथा व संवाद सलिम जावेद यांचे होते पण राजेश खन्नाने त्यात बरेच फेरफार केल्याने सलिम जावेद यांनी आपले नाव मागे घेतल्याचे त्या काळात गॉसिप्स मॅगझिनमधून फार गाजले. "मस्तकलंदर" या चित्रपटाच्या निमित्ताने रविवार नवशक्तीसाठी सलिम खान यांची दीर्घ मुलाखत

घेतली तेव्हा त्यांनीही त्याबाबत मला सांगितले. ते चित्रपट होते, जम्बू दिग्दर्शित 'मेरे जीवन साथी' (१९७४ , यात नायिका होत्या तनुजा आणि मौशमी चटर्जी) आणि सतपाल दिग्दर्शित 'भोला भाला' (१९७९. यात नायिका होत्या रेखा आणि मौशमी चटर्जी) या दोन्ही चित्रपटांची राहुल देव बर्मनचे संगीत असलेली गाणी लोकप्रिय झाली. पण दोन्ही चित्रपट फ्लॉप ठरल्याने सलिम जावेद यांच्या खात्यात हे अपयश जमा झाले नाही. अन्यथा त्यांचे अपयशाचे पारडे थोडे जड झाले असते. तसे होऊ नये म्हणून 'सौदा 'ची आठवणही नको असावी.

ते काही असो सलिम जावेद लघुपटाचे स्वागत आहे. पटकथा कशी असावी/ लिहावी (निर्माता व दिग्दर्शकांकडे त्याचे महत्व कसे पटवून द्यावे), स्वतःचे मार्केटिंग कसे करावे यासाठी सलिम जावेद आयडॉल आहेत. तरी आता पुन्हा जरी ते एकत्र आले तरी

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल वातावरणात त्यांच्या पटकथेवर चित्रपट निर्माण करावा असे कोणत्या दिग्दर्शकाला मनोमन वाटेल हा प्रश्नच आहे? फरहान अख्तरला वाटेल का? त्याचा सलिम जावेद लिखित, मनोजकुमार दिग्दर्शित "क्रांती" चित्रपट जास्त आवडता आहे. खुद्द सलिम जावेद आपल्याचा एकाद्या चित्रपटाची रिमेक लिहिण्यात रस घेतील का? जावेद अख्तर यांनी "दीवार" वरुनच राहुल रवैल दिग्दर्शित "जीवन एक संघर्ष" लिहिला, सलिम खान यांनी "दीवार" वरुनच शशिलाल नायर दिग्दर्शित "फलक" लिहिला. सलिम जावेद यशस्वी व आदर्श पटकथा व संवाद लेखक निश्चित आहेत (की होते?) पण त्यांच्या कारकीर्दीची "दुसरी बाजू" (की "पडती बाजू" देखिल) पाह्यला हवी ना?

© दिलीप ठाकूर
(रविवार रामप्रहर "झूम" वरून साभार!)

लेख क्रमांक : ३६

शोले @५० वर्ष
"इटलीत पुन्हा दिमाखदार "प्रीमियर"!
आजही "शोले" सुरु आहे....

एकाद्या सर्वकालीन सुपरहिट चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत यानिमित्त त्याचा खास भव्य दिमाखदार प्रीमियर, तोदेखील विदेशात. काय भन्नाट योग आहे ना? जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले " चा तसा प्रीमियर होत आहे. तुम्हालाही माहित्येय मुंबईत "शोले" १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला, त्यास आता पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. मुंबईत मिनर्व्हा चित्रपटगृहात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा प्रदर्शित झालेल्या "शोले" खणखणीत यश प्राप्त केले. मिनर्व्हात दिवसा तीन खेळ याप्रमाणेच तीन वर्ष आणि मग मॅटीनी शोला चित्रपट शिफ्ट करुन

आणखीन दोन वर्ष असा एकूण पाच वर्ष मुक्काम केला.

‘शोले’च्या ५०व्या म्हणजे "सुवर्ण महोत्सवी" वर्धापनदिनानिमित्त २७ जून २०२५ रोजी "पिआझा मॅगिओर येथील खुल्या मैदानावर" याचे खास "स्क्रीनिंग" आयोजित करण्यात आले होते. या आवृत्तीत चित्रपटाचा "मूळ क्लायमॅक्स" आणि काही डिलीट केलेले सीन प्रथमच तिथल्या प्रेक्षकांना पाहता आले. खरंच ते भाग्यवान! "फिल्म हेरिटेज फाउंडेशन" आणि "सिप्पी फिल्म्स" यांनी एकत्र येऊन १९७५ मधील या क्लासिक चित्रपटाची ‘डायरेक्टर’ कट’ आवृत्ती सादर करण्यासाठी विशेष मेहनत घेतली होती, हे विशेष! आता गब्बर पुन्हा विचारणार 'कितने आदमी थे?' अनकट वर्जनसोबत रिरिलीज होणार 'शोले', तर क्लायमॅक्सला ठाकूर गब्बरला मारणार!

भारतातील ही कल्ट चित्रपट इटलीमध्ये 'इल

सिनेमा रिट्रोवाटो फेस्टिव्हल'मध्ये दाखवला गेला तसेच, या फिल्मची खास स्क्रीनिंग पिआझा मॅगिओर मध्ये करण्यात आली!

हे ठिकाण क्लासिक चित्रपटांच्या प्रदर्शना साठी प्रसिद्ध आहे. या अनकट व्हर्जनमध्ये ठाकूर गब्बर सिंहला मारतो, हे दाखवलं आहे. १९७५ साली चित्रपट सेन्सॉर बोर्डाच्या सूचनेनंतर हा सीन मूळ काढून टाकण्यात आला होता. त्यामुळे आता रि-रिलीज होणाऱ्या वर्जनमध्ये कधीही न पाहिलेले सीन

देखील समाविष्ट आहेत, जे १९७५ साली सीबीएफसीच्या सूचनेनुसार किंवा निर्मात्यांनी स्वतःहून चित्रपट प्रदर्शित करताना काढून टाकले होते.

फिल्म हेरिटेज फाउंडेशन आणि सिप्पी फिल्म्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त प्रकल्पाच्या रूपात या अनकट आवृत्तीचं प्रदर्शन करण्याचं उद्दिष्ट हा चित्रपट मूळ चित्रपट म्हणून सादर करणं. अमिताभ यांनी चित्रपटाच्या पुनर्प्रदर्शनाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. दुसरीकडे, धर्मेंद्र यांनी या चित्रपटाला जगातील आठवं आश्चर्य म्हटलं आहे.

अमिताभ बच्चन म्हणाले की, "त्यावेळी मला कल्पनाही नव्हती की, हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीसाठी एक मैलाचा दगड ठरेल. अपयशी ठरल्यापासून ते बॉक्स ऑफिसवरच्या विक्रमी कामगिरीपर्यंतचं नाट्यमय परिवर्तन आपल्या

सर्वांसाठी एक भावनिक रोलर-कोस्टर होतं... मला आशा आहे की, पन्नास वर्षांनंतरही हा चित्रपट जगभरातील आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीतील प्रेक्षकांना आकर्षित करेल."

धर्मेंद्र यांनी 'शोले' चित्रपटाला जगातील आठवं आश्चर्य म्हटलं. ते म्हणाले की, "हा चित्रपट अनकट आवृत्तीत प्रदर्शित होत आहे, हे ऐकून मला खूप आनंद झाला आणि मला खात्री आहे की, तो पन्नास वर्षांपूर्वी जेवढा यशस्वी झाला, तितकाच आताही यशस्वी होईल. सलीम-जावेदचे संवाद आणि रमेश सिप्पी यांचं दिग्दर्शन कोण विसरू शकेल? भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात 'शोले'मधली अनेक दृश्य नोंदवली गेली आहेत आणि प्रत्येक पात्र स्टार बनला आहे. पण चित्रपटाचा खरा नायक कोणी असेल तर ते, नाणं होतं... माझा आवडता सीन होता, टँक सीन, मंदिरातला हेमासोबतचा सीन आणि बरंच काही होतं,

पण मला वाटतं की, सर्वात पॉवरफुल सीन म्हणजे, जयचा मृत्यू, जो अजूनही माझ्या मनात कोरलेला आहे."

चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण होत असतानाही त्यातील कलाकार रोमांचित होत आहेत हे विशेष.

दक्षिण मध्य मुंबईतील मिनर्व्हा थिएटरची इमारत केव्हाच जमीनदोस्त झालीय, पण आजही तेथून जाताना मला कधी, वीरु आणि जय यांच्यातील नाणेफेकीला नाणे आपल्या जवळच कुठेतरी पडल्याचा भास होतो....

हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीचा वेध घेताना "शोले" पूर्वीचा आणि नंतरचा चित्रपट असा फोकस टाकला जातो.

"शोले " प्रदर्शनाचा दिवस मला आजही आठवतोय. माझे ते शालेय वय होते. त्या काळात दक्षिण मुंबईतील माझ्यासारख्या चित्रपट व्यसनींच्या

काही फिल्मी सवयी काही वेगळ्याच आणि भन्नाट होत्या. त्यात विशेष म्हणजे, 'फर्स्ट डे फर्स्ट शो'च्या वेळी मेन थिएटरवर फेरफटका मारायचा. तो कशासाठी? तर आजपासून प्रदर्शित होत असलेल्या पिक्चरचे डेकोरेशन कसे आहे (मिनर्व्हावर तर या टोकापासून त्या टोकापर्यंत डेकोरेशनला सॉलिड स्कोप! त्यात बरोबर मध्यभागी पिस्तूलधारी आणि खौफनाक नजर असलेला गब्बरसिंग आणि दुसरीकडे जिगरबाज ठाकूर बलदेव सिंगने गब्बरसिंगच्या गळ्यात हात घालून त्याला आपल्या जबरा कैचीत पकडलय), ॲडव्हास बुकिंगचा चार्ट पाहणे (बघतो तो काय? पहिल्या आठवड्याचे सर्वच्या सर्व शो हाऊसफुल्ल! पण तिकीट दर पाहून दचकलोच. अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे आणि बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे. आज हे किरकोळ वाटतात, तेव्हा मात्र महाग होते.) ब्लॅकमार्केटमधील

तिकीटाचा दर पाहणे. खरं तर ऐकणे. तेव्हा आम्हा मध्यमवर्गीयांना चढत्या दरात पिक्चर पाहणे परवडणारे नव्हतेच. आमच्या मध्यमवर्गीय संस्कारात ते शोभणारेही नव्हते. आणि कोणी ब्लॅकमार्केटमध्ये कोणी पाहिलं तर ही भीती. यावेळी बाल्कनीचे ब्लॅकमार्केटमधील तिकीट वीस रुपयात विकले जात होते आणि पिक्चरची पूर्वप्रसिध्दी दणदणीत असल्याने ब्लॅकमार्केटमधील तिकीटालाही मागणी होती... त्या दिवशी साधारण स्वरुपाचा पाऊस होता हे आठवतेय. 'शोले'च्या स्पर्धेत त्याच दिवशी 'गरीबी हटाव' नावाचा छोटा चित्रपट प्रदर्शित झाला त्याचे आज कुठेही नामोनिशाण नाही.

तात्कालिक समिक्षकांनी 'शोले'ला भारी झोडपल्याचे आठवतेय. त्यातच बातमी पसरली 'शोले' पडला, पडला, पडला....! दुसऱ्याच आठवड्यात 'शोले'ची घसरण सुरु झाली. पण हिंदी

चित्रपटातच डायलॉग असतो ना, मारनेवाले से बचाने वाला बडा होता है....! हेच 'शोले'बद्दल झालेच. पिक्चर असे काही पकडले गेले (हा पूर्वीचा फिल्मी शब्द!) की मिनर्व्हातच ३१ ऑगस्ट १९७८ पर्यंत दिवसा तीन खेळ याप्रमाणे यशस्वी घौडदौड केल्यावर तेथेच मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आणखीन दोन वर्षे असा एकूणच पाच वर्षे खणखणीत मुक्काम केला! 'शोले'शी सतराम रोहरा दिग्दर्शित 'जय संतोषी मा' (रिलीज ३० मे १९७५) ने स्पर्धा केल्याचे कायमच कौतुक होते. (गुगलवरची 'जय संतोषी मा'च्या रिलीजची १५ ऑगस्ट ७५ ही तारीख चुकीची आहे हे सहज जाता जाता), या दोन्ही पिक्चरची पठडी भिन्न. पण रसिकांनी दोघानाही स्वीकारले. त्या काळात बाहेरगावाहून मुंबईतील नातेवाईकांकडे आलेल्या पाहुण्यांना मिनर्व्हातच 'शोले' दाखवणे सामाजिक प्रथा होती. संपूर्ण मुंबईत फक्त आणि फक्त

मिनर्व्हातच 'शोले' सत्तर एमएम होता. इतरत्र पस्तीस एमएम होता. ('शोले'पूर्वी १९६७ साली पांछी दिग्दर्शित 'अराऊंड द वर्ल्ड' हा चित्रपट सत्तर एमएममध्ये आला होता. पण रसिकांनी तो नाकारला.)

'शोले'वर सातत्याने लिहिले/ बोलले/ सांगितले/ ऐकले/ वाचले/ विचारले सांगितले जाऊनही त्याला ओहोटी लागलेली नाही हेदेखील यशच. जगभरात असे याच एकमेव चित्रपट आहे आणि याचा मसालेदार मनोरंजक चित्रपटांच्या रसिकांना निश्चित अभिमान आहे. 'शोले'बद्दल अनेक गोष्टी/कथा/ किस्से/आठवणी इतकेच नव्हे तर दंतकथाही प्रचलित आहेत आणि त्यांचीही चलती असते!

अनेक कॉमेडी शोज, रियॅलिटी शोजमध्ये 'शोले'तील अनेक दृश्यांचे संदर्भ असतात. अनेकदा ते विनोदाने असतात.

अनेक जाहिरातीत 'शोले'चा गब्बर अथवा बसंती असते आणि ती जाहिराती लोकप्रिय होते.

प्रत्येक वर्षीच्या फ्रेन्डशीप दिवसाला 'यह दोस्ती हम नही तोडेंगे..' असतेच असते!

राजकारणातही अधूनमधून 'शोले'तील एकाद्या संवादाचा नेमका वापर होतोय. आणि त्यातून 'कळीचा मुद्दा ' स्पष्ट होतोय.

चित्रपटाला तब्बल पन्नास वर्षे होऊनही हे सगळेच आजचे वाटतेय. रसिकांच्या किमान तीन पिढ्या ओलांडूनही आज हे सगळेच उपयुक्त ठरतेय. यापेक्षा यश, यश , यश म्हणजे दुसरे काय असते?

'शोले' न पाहणारा रसिक सापडणे अवघड! मात्र 'शोले' न आवडलेले अनेक आहेत. आणि

अनेकदा तरी 'शोले' पुन्हा पुन्हा एन्जॉय करणारे अगणित आहेत.

'शोले' हा कधीही न संपणारा चित्रपट आहे, विषय आहे. जगाच्या पाठीवर असा चित्रपट एकादाच. जो कधीच पडद्यावरुन उतरला नाही. रसिकांच्या किमान चार पिढ्या ओलांडूनही त्याचे महत्व व अस्तित्व कायमच राहिलेय...शोलेचा पहिला प्रीमियर १४ ऑगस्ट १९७५ रोजी रात्री नऊ वाजता मिनर्व्हा चित्रपटगृहात पस्तीस एमएम प्रिन्टवर झाला. चित्रपट संपल्यावर त्याची सत्तर एमएमची प्रिन्ट मिनर्व्हात पोहचली. मूळ पस्तीस एमएमची प्रिन्ट लंडनवरुन सत्तर एमएम ब्लो अप करुन मुंबईत आली. विमानतळावरून कस्टमच्या नियमातून सुटून ती मिनर्व्हात यायला रात्रीचे बारा वाजते. त्यानंतर दिग्दर्शक रमेश सिप्पी, कॅमेरामन व्दारका दिवेचा आणि अगदी काही मोजक्याच जणांनी पहाटेपर्यंत

"शोले" पाहिला....!

तेव्हाचा हा प्रीमियर व आताचा प्रीमियर "शोले" चा एक मोठाच विशेष उल्लेखनीय प्रवास!

© दिलीप ठाकूर
("महाराष्ट्र दिनमान" वरून साभार!)

♥



♥

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

<u>लेख क्रमांक : ३७</u>

"शोले ऐसी फिल्म है, जो खतम होने का नामही नहीं लेती.."

आज आपण सोशल मिडियाच्या युगात वावरतोय आणि त्यात शोलेच्या विडंबनात्मक पोस्ट, मिम्स, एआय रिमिक्स यांचा भरपूर मारा दिसतो. जगभरातील अन्य कोणत्याच भाषेतील चित्रपटाच्या बाबतीत असे घडलेले नाही! वृत्तपत्रातील बातमी ते मिम्स असा शोलेचा न थांबत असलेला प्रवास यापुढेही नवीन तांत्रिक माध्यमातून सुरुच राहणार. हे यश कशात बरे मोजणार? "शोले" कोणत्या शहरात, गावात किती आठवडे चालला, किती कोटी कमावले यापलिकडे जावून हे यश आहे. पन्नास वर्षापूर्वी मुठीत घट्ट धरलेले सुट्टे पैसे तिकीट खिडकीतून आत टाकून त्याच वेगात मुठीत गर्द लाल वा हिरव्या पिवळ्या रंगातील तिकीट पकडून कधी एकदा खुर्चीवर जाऊन

बसतोय यापासून ऑनलाईन बुकिंगपर्यंत या चित्रपटाचा प्रवास सुरुच आहे.

या प्रवासाची सुरुवात खूपच रंजक, २ ऑक्टोबर! महात्मा गांधी जयंती! अहिंसेचे पुजारी असलेल्या महान नेत्याचा जन्मदिवस. याच दिवसाच्या मुहूर्तालाच भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील भरपूर हिंसा असलेल्या चित्रपटाचा मुहूर्त. हा तसा वेगळाच योगायोग! पण तसे २ ऑक्टोबर १९७३ रोजी घडत तर होते. बंगलोरजवळील रामनगर येथे खरेखुरे गाव वाटावे असे उभारण्यात आलेल्या रामगढ या गावाच्या सेटवर जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" या चित्रपटाच्या मुहूर्ताला चित्रपटातील सगळे कलाकार, तंत्रज्ञ व सिप्पी फिल्म या युनिटमधील कामगार असे सगळेच हजर होते. पटकथालेखक सलिम जावेद यांच्याकडून आलेल्या संवाद

लेखनानुसार चित्रीकरण सुरु होत होते. पण सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली आणि हा मुसळधार पाऊस थांबण्याचे नावच घेईना. काय करायचे? पहिल्याच दिवसाचे चित्रीकरण रद्द करण्यात आले. आणि दुसऱ्या दिवशी म्हणजेच ३ ऑक्टोबर १९७३ रोजी "शोले"च्या मुहूर्त दृश्या साठीची तयारी झाली. रमेश सिप्पींनी सायलेन्स....! कॅमेरा....!ॲक्शन! म्हटले. कॅमेऱ्यासमोर "क्लॅप" धरण्यात आली, कॅमेरा सुरु झाला आणि जय (अमिताभ बच्चन) ठाकूर बलदेवसिंगची (संजीवकुमार) विधवा सून (जया बच्चन) घरातील तिजोरीची चावी देते हे दृश्य चित्रीत होवू लागले....!

मुहूर्ताच्या दिवशीच चित्रपटाच्या यशापयशाची कुंडली लिहिलेली असते असे म्हणणारे म्हणतात, पण त्यात फारसे तथ्य वाटत नाही! अमूकतमूक गोष्टी असल्या तर चित्रपट हमखास यशस्वी ठरतो असे

काहीही गणित वा समीकरण नसते. दिग्दर्शक आपल्या शैली व क्षमतेनुसार चित्रपटाला आकार देत देत जातो. पटकथेनुसार तो चित्रीकरणाचे नियोजन करताना रामगढमथील बराचसा भाग, पनवेल उरण या परिसरातील जासई गावातील रेल्वेवरील थरारक प्रसंग, प्रचंड प्रमाणातील घौडदौड आणि चित्रपटातील जेलच्या दृश्यांसाठी "राजकमल कलामंदिर स्टुडिओ"तील सेट असे नियोजन होते. कला दिग्दर्शक राम येडेकर यांनी हे सगळेच नियोजनबध्दपणे उभारलेले.

एकेक चित्रीकरण सत्र पार पडत पडत चित्रपट तब्बल चार तास व सहा मिनिटांचा होतो. दिग्दर्शक रमेश सिप्पीला त्यात काहीच वावगं वाटत नाही. कारण प्रत्येक दृश्यावर अधिकाधिक मेहनत घेऊन ते परिणामकारक व्हावे याकडे विशेषत्वाने कल असणारा दिग्दर्शक म्हणून रमेश सिप्पीची विलक्षण

खासियत. तसे अनेक किस्से गाजलेले. त्यांचे दिग्दर्शक सहाय्यकही तपशीलवार काम करणारे, त्यात खालीश लखनवी, शरद पालेकर, बालन, किशन व भीषेन यांचा समावेश. प्रत्येक दृश्याची मांडणी (कंटीन्यूटी) यापासून प्रत्येक गोष्टीवर काटेकोर लक्ष (प्रत्येक दिग्दर्शकाच्या सहाय्यकांस चित्रीकरणाच्या आगेमागे बरेच काम असते.) संकलक एम.एस. शिंदे (माधव शिंदे) आता आपले कौशल्य, कसब, करामत दाखवायला सुरुवात करतात. त्यांच्या जोडीला या चित्रपटात स्टंट दृश्यात सहभागी असलेले जिम ॲलन असतात. आता चित्रपट तीन तास चोवीस मिनिटांचा होतो. एव्हाना "पॉलिडॉर" कंपनी चित्रपटाच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका प्रकाशित करते. संगीत शौकीनांना गाणी फारशी रुचत नाहीत. "स्टेशन से गाडी जब छूट जाती है तो एक दो तीन हो जाती है.." हे काय गाणे

आहे? गीतकार आनंद बक्षी यांची ही रचना "गद्य" आहे, राहुल देव बर्मन यांनी त्यांच्या लौकिकास साजेसे संगीत दिलेले नाही (याच दिवसात "आंधी" ची दिग्दर्शक गुलजार लिखित व राहुल देव बर्मनचे हळूवार संगीत असलेली प्रेम गीतांचा विलक्षण गोडवा विलक्षण लोकप्रिय होता.)

दरम्यान १९ जून १९७५ रोजी देशात "आणीबाणी" घोषित करण्यात आली. चित्रपट प्रमाणपत्राचे नियम कडक करण्यात आले. त्यात चित्रपटातील हिंसेवर नियंत्रण आले. सेन्सॉरने "शोले" च्या शेवटच्या दृश्यावर (क्लायमॅक्स) आक्षेप घेतला. ठाकूर बलदेवसिंग डाकू गब्बरसिंगवर (अमजद खान) लाथांनी हल्ला चढवत चढवत त्याचा खातमा करतो हा शेवट अमान्य केला! निवृत्त पोलीस इन्स्पेक्टर असे कृत्य करतो हे अयोग्य ठरेल असे

सेन्सॉरचे म्हणणे. त्यामुळे आता गब्बरसिंगला पोलीस अटक करतात असा शेवट दाखवण्यात आला.

चित्रपटाची रस्तोरस्ती पोस्टर्स व होर्डिंग्ज लागली. रेडिओ विविध भारतीवर शनिवारी दुपारी पावणेतीन वाजता पंधरा मिनिटांचा रेडिओ प्रोग्राम

सुरु झाला. "पस्तीस एमएम"मध्ये चित्रीत झालेली शोलेची प्रिन्ट "सत्तर एमएम"मध्ये "ब्लो अप" करण्यासाठी लंडनमधील "टेक्निकलर" कंपनी लॅबमध्ये पाठवली. ते तांत्रिक सोपस्कार होवून ती प्रिन्ट मुंबईत येईल यानुसार मुंबईत १५ ऑगस्ट रोजी चित्रपट प्रदर्शित करण्याचे ठरले. आणि त्यानुसार आदल्या रात्री मिनर्व्हात भव्य दिव्य दिमाखदार

प्रीमियरचे आयोजन करण्यात आले. तो संपताच सत्तर एमएमची प्रिन्ट मिनर्व्हावर पोहचली आणि आता रमेश सिप्पी आणि काही मोजक्याच जणांनी सत्तर एमएममध्ये शोले अनुभवला!

मुंबईत मिनर्व्हा, न्यू एक्सलसियर व बसंत थिएटर (चेंबूर) येथेच सत्तर एमएम व "स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" असा "शोले" होता. मिनर्व्हात "अप्पर स्टॉल" चार रुपये चाळीस पैसे व बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे अशा तिकीट दरात शोले प्रदर्शित झाला आणि सुरुवातीस पब्लिक रिपोर्ट नरम असलेला, तात्कालिक समिक्षकांना फारसा न रुचलेला शोले त्यानंतर असा काही यशस्वी ठरलाय की पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्याचे इटलीतील "बलोनिया", जयपूर अशा अनेक शहरात हाऊसफुल्ल गर्दीत भव्य प्रीमियर साजरे होत आहेत. आता "टोरॅन्टो" आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ("६

सप्टेंबर, २०२५" रोजी) १८०० आसन क्षमता असलेल्या "थॉमसन हॉल"मध्ये शोले (4K व्हर्जनमध्ये) दिमाखात दाखवला गेला! आता मूळ चित्रपटात सहभागी करता न आलेली काही दृश्य व ठाकूर

बलदेवसिंग गब्बरसिंगचा खातमा करतो अशा क्लायमॅक्सने रसिकांसमोर येतोय!

शोलेच्या चित्रीकरणाचे किस्से कधीच न संपणारे!

अमिताभ अधूनमधून आपली मुलगी "श्वेता" हिला गमतीत म्हणतो, शोलेमध्ये तुझीदेखिल भूमिका

आहे! (कारण शोलेच्या चित्रीकरण काळात जया गरोदर होती!).

बंगळूर येथील हॉटेलमध्येमध्ये मुक्काम करीत रामगढला चित्रीकरणासाठी जा ये होत असे! एकदा रस्त्यात गाडी बंद पडल्याने धर्मेंद्र व अमिताभ गडबडले. अशातच बघ्यांची झालेली गर्दी वाढत वाढत गेली! आता करायचे काय? अमिताभने शक्कल लढवून रिक्षा पकडली आणि ते दोघे रामगढला सेटवर पोहचले. चित्रीकरण काळात खाण्यापिण्याची भरपूर चंगळ होती. आणि सगळेच एकत्र जेवण करीत. तोपर्यंत "व्हॅनिटी व्हॅन"ची सोय आली नव्हती. सेटवर उभारलेल्या मेकअप रुम्स पुरेशा होत्या. सेटवरच युनिटच्या राहण्याची सोय करण्यात आली होती. कधी धर्मेंद्रही उघड्यावर अंथरुणावर मस्त झोपत असे. त्याने शोलेचे चित्रीकरण मस्त एन्जॉय केले. आजही तो या चित्रीकरण काळातील तंदुरी रोटीची

आठवण काढतो. पण त्यातूनच त्याचे वजन वाढत वाढत गेले. त्याकडे काहींनी लक्ष वेधले असता धर्मेंद्र एकदा तब्बल अठ्ठावीस मैल चालून रामगढला पोहचला.

हेमा मालिनी खरं तर बसंतीच्या भूमिकेत असं काय कराचयचं अशा विचारात होती. त्यात रमेश सिप्पीनी सांगितले, चित्रपटात पाच सहा दृश्य व एक गाणे आहे. आता एवढ्याश्या भूमिकेसाठी होकार तो काय द्यायचा असा विचार करत हेमाजींनी सुरुवातीस या ऑफरकडे दुर्लक्ष केले. पण एकदा रमेश सिप्पींशीच यावर हेमा मालिनी बोलत असतानाच तिची आई जया चक्रवर्ती यांनी ते ऐकलं आणि त्यानी हेमाजींना सांगितले, रमेश सिप्पीच्या "अंदाज" व "सीता और गीता" मध्ये तू काम केलेस. या व्यक्तीरेखांमध्ये विविधता होती. गीताच्या भूमिकेत पंख्यावर चढून तू काही साहसी दृश्य दिलीस.

"शोले"साठीही हो म्हण. आईचे ऐकून हेमाजींनी शोले स्वीकारला आणि सतत बकबक करणारी बसंती टांगेवाली अतिशय फर्मास साकारली.

रमेश सिप्पी यांनी अमिताभ बच्चनची निवड सलिम जावेद यांच्या शिफारशीनुसार केली. (ही निवड होईपर्यंत "जंजीर" प्रदर्शित झाला नव्हता. खूपच अगोदरपासून कलाकार निवड होत असते. मोठ्या चित्रपटाबाबत तर ते फारच महत्वाचे व बराच वेळ घेणारे). रमेश सिप्पी यांना हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "आनंद" मधील अमिताभचा संयत अभिनय व एस. रामनाथन दिग्दर्शित "बॉम्बे टू गोवा" मधील मारधाड दृश्ये आवडली होती. त्यावरुन



अमिताभची निवड झाली!

शोलेच्या पंचवीस वर्ष सेलिब्रेशनचा एक किस्सा सांगायलाच हवा, ए. के. हनगल यांनी आपल्या भाषणात एक योग्य भाष्य केले, "शोले ऐसी फिल्म है जो खतम होने का नाम ही नही लेती, कब इसका आखरी शो होगा मालूम नही....!"

"कौन बनेगा करोडपती"च्या खेळाच्या रंगात अमिताभ अधूनमधून शोलेच्या चित्रीकरणाच्या वेळच्या आठवणी रंगवून खुलवून सांगतात तेव्हा एकाच वेळेस किमान तीन पिढीतील प्रेक्षकांसमोर पुन्हा "शोले" येतो! अनेक माध्यमातून "शोले" सतत दिसत राहतोय. मुंबईत राजकमल कलामंदिर स्टुडिओत रात्रभर यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" चे चित्रीकरण करुन सकाळच्या विमानाने बंगळुरू (तेव्हाचे बेळगाव) गाठून शोलेच्या चित्रीकरणात भाग घेत असे व प्रवासात झोप घेत असे ही आठवण

अमिताभने याच खेळात सांगितली!

"शोले"चे किस्से कधीच न संपणारे!

"यू ट्यूब"वर शोलेच्या यशानंतरच्या १९७६ च्या एक भव्य दिमाखदार संगीत सोहळ्याची "क्लिप" पाह्यला मिळते. त्यातील राहुल देव बर्मन व अमजद खान यांच्यातील मजेशीर संवादाचा किस्सा पूर्वी मुद्रित माध्यमातून सतत प्रसिद्ध होई! आरडीला पाहून अमजद म्हणाला.. बहुत जान है रे इसके संगीत मे... ये बॉम्बेवासी है ना कौनसे चक्की का पिसा आटा खाते है रे...! यावर आर. डी. बर्मननी अमजदला विचारले गाशील का? यावर अमजदने म्हटलं, हम गाते तो ङकैती काहे करते बाबू...!

शोलेच्या संवादाच्या ध्वनिमुद्रीकाची विक्रमी विक्री झाली आणि कोणताही सण असो वा नसो ते लाऊडस्पीकरवर ऐकण्यास हमखास गर्दी होई. त्यातील रहीमचाचा (ए. के. हनगल) अतिशय उद्वेगाने

म्हणतात तेव्हा सगळी गर्दी स्तब्ध होई... "दुनिया का सबसे बडा बोझ क्या होता है? बाप के कंधो पर बेटे का जनाना....!"

शोलेने मुंबईत यशाचा इतिहास घडवला ते मिनर्व्हा चित्रपटगृहाची भव्य दिमाखदार इमारत आज पूर्णपणे पाडली आहे. सोशल मिडियात त्याच शोले प्रदर्शित झाल्याच्या दिवसांतील फोटो जास्त पाहिले जाताहेत, मिनर्व्हा परिसरात आजही ऐकायला मिळते, "अरे ओ सांबा.. कितना इनाम रखे है सरकार हम पर...."

© दिलीप ठाकूर
("सकाळ" सप्तरंग (फ्लॅशबॅक) वरून साभार!)
♥

<u>लेख क्रमांक : ३८</u>

"शोले" @ पन्नास वर्ष
पुन्हा वाजवा टाळ्या आणि शिट्ट्या..

एव्हाना तुम्हा चित्रपट रसिकांनाही चांगलेच माहित झालेय, पन्नास वर्ष पूर्ण होताहेत यानिमित्त जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" देशविदेशात अतिशय मोठ्याच प्रमाणावर पुन्हा प्रदर्शित होत आहे. आजपर्यंत अनेकदा तरी "शोले" अनुभवणारे या वृत्ताने अतिशय रोमांचित झाले आणि पुन्हा एकदा "शोले" पाह्यचाच असा त्यांनी निर्णय घेऊन झालादेखिल. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल पण आतापर्यंत किमान शंभर, सव्वाशे वेळा एकाग्र चित्ताने "शोले" पाहणारे आपल्या चित्रपट व क्रिकेटवेड्या देशात खूप आहेत! काही महिन्यांपूर्वीच "शोले"ची पन्नाशी व पटकथा संवाद लेखक सलिम जावेद यांच्या गोडधोड माहितीपटाच्या (डॉक्युमेंटरी)

निमित्ताने दक्षिण मुंबईतील रिगल चित्रपटगृहात "शोले" चा खास खेळ आयोजित करण्यात आला

असता मी गेलो तेव्हा मला असा एकशेएक वेळा "शोले" पाहणारा सत्तरीपार चित्रपट रसिक भेटला. "शोले"चे गारुड असे भन्नाट आहे. ते अनेक चित्रपट रसिकांत भिनलयं.

"शोले" चा प्रवास १५ ऑगस्ट १९७५ पासून जो सुरु आहे तो त्याच्या पन्नाशीतही तसाच सुरु आहे. याला म्हणतात अस्सल यश. पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट हीच आपल्या हिंदी

चित्रपटाची खरी ओळख आणि तीच "शोले" चे खणखणीत चौफेर यश अधोरेखित करीत आहे.

मुंबईतील " शोले"चे मुख्य चित्रपटगृह मिनर्व्हा हे आता वेगळे सांगायची गरज नाहीच. ते जगभरातील अनेक चित्रपट रसिकांना चांगलेच ज्ञात आहे. सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या युगात "शोले" पडद्यावर आला. मिनर्व्हात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा होता, ही त्याची वाढलेली ताकद होता. मोठीच सपोर्ट सिस्टीम होती. तशी भव्यता नसती तर कदाचित "शोले" अनेक ज्युबिली हिट चित्रपटांप्रमाणेच एक सुपरहिट चित्रपट म्हणून ओळखला जाण्याची शक्यता जास्त होती. जोरदार डायलॉगबाजीला उत्फूर्त टाळ्या व शिट्ट्या त्यात वाजणे सत्तर एमएम व उर्वरित चित्रपटगृहात पस्तीस एमएमलाही पडल्या.

एकपडदा चित्रपटगृहाच्या काळात पडद्यावर

आलेला "शोले" ऐंशीच्या दशकात व्हीडीओ (व्हीसीआर), व्हीडीओ थिएटर्स, नव्वदच्या दशकात मनोरंजन उपग्रह वाहिनीवर, त्यानंतर मल्टीप्लेक्स, त्यात तो आधुनिक तंत्रज्ञानाने त्रीमिती (थ्री डी) करण्यात आला, त्यानंतर मोबाईल स्क्रीन, डिजिटल असा प्रवास करतोय. रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या या काळात ओलांडल्या गेल्या. मुद्रित माध्यमापासून सोशल मिडियापर्यंत "शोले" वर सतत काहीना काही येते आहेच. म्हणून तर तो आता अतिशय थाटात पुन्हा प्रदर्शित करीत आहेत ही गोष्ट ट्रेडिंगवर होती. तात्पर्य, शोले मागे हटणारी कलाकृती नक्कीच नाही. (इतका काही तो ग्रेट ब्रिट सिनेमा नाही असे ओरडून सांगणारे बरेच असले तरी त्याचे मोठेपण नाकारता येणार नाही.)

प्रत्येक पिढीत कायमच एक कुतुहल असते, इतिहासात डोकावणे. त्या वृत्ती व मानसिकतेचा

"शोले" ला सतत फायदा होत राहिला. आजच्या डिजिटल पिढीसमोर जगभरातील अनेक देशांतील अनेक भाषेतील उत्तम कन्टेन आहे, त्यांना "शोले" एकदम भारी चित्रपट कदाचित वाटणार नाही. पण वर्षानुवर्ष ज्याची सतत चर्चा होते, त्या "शोले" त नेमके काय आहे या उत्सुकतेपोटी ते पन्नास वर्षानिमित्त पुन्हा मोठ्याच प्रमाणावर प्रदर्शित होत असलेला "शोले" नक्कीच पाहतात. आतापर्यंत मॅटीनी शो, रिपीट रन, गल्ली चित्रपट, दूरचित्रवाणी (अर्थात छोटा पडदा) यावर अनेकदा " शोले " येवूनही तो पुन्हा पाहिला जातोय हेदेखील एक यशच.

साठच्या दशकात जन्माला आलेल्या माझ्या पिढीला त्या दशकातील अनेक चित्रपट हे सत्तरच्या दशकात मॅटीनी शो, रिपीट रन, गल्ली चित्रपट, रविवार संध्याकाळी दूरदर्शन यावर पाह्यची संधी मिळाली. ते चित्रपट आजही क्लासिक म्हणूनच

ओळखले जातात. आवर्जून नावे सांगायची तर, चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित "झनक झनक पायल बाजे", "दो ऑखे बारह हाथ", "नवरंग", मेहबूब खान दिग्दर्शित "अंदाज" व "मदर इंडिया", गुरुदत्त दिग्दर्शित "प्यासा" , चेतन आनंद दिग्दर्शित "हकिकत", विजय आनंद दिग्दर्शित "गाईड", "ज्वेल थीफ", "तिसरी मंझिल", राज कपूर दिग्दर्शित "बरसात", "श्री ४२०", "संगम", "मेरा नाम जोकर", राज खोसला दिग्दर्शित "सी. आय. डी.", "वह कौन थी", बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "गुमराह", "हमराज", यश चोप्रा दिग्दर्शित "धूल का फूल", "इत्तेफाक", मनोजकुमार दिग्दर्शित "उपकार" हे चित्रपट माझ्या पिढीला सत्तरच्या दशकातील प्रसार माध्यमातील जुन्या चित्रपटावरील (त्यातील कलाकार व लोकप्रिय गीत संगीत) सदरातून माहित झाले. फ्लॅशबॅक, "घुंगट के पट खोल", "यादों की बारात", "कहा गये

वो लोग" अशा सदरातून जुने चित्रपट माहित होत राहिले आणि मग ते पाहण्याची जिज्ञासा वाढली. या चित्रपटांना आज पंचावन्न साठ वर्षे झालीत, तरी ते आजही पहावेसे वाटतात. "शोले" या परंपरेतील नसला तरी तो समाजातील तळागाळापर्यंत पोहचलेला चित्रपट आहे. आणि तेच त्या चित्रपटाचे अस्तित्व कायम ठेवून आहे...कालची व आजची पिढी पुन्हा प्रदर्शित होत असलेला " शोले " आता एकत्र पाहतील....

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया १० मे २०२५ वरुन साभार)
♥

लेख क्रमांक : ३९

<u>पुन्हा "हाऊसफुल्ल गर्दी"त "शोले" एन्जॉय करताना...</u>

स्थळ : रिगल चित्रपटगृह, कुलाबा

दिनांक : ३१ ऑगस्ट २००४

निमित्त : जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित " शोले " च्या विशेष खेळाचे फिल्म हेरिटेज फांउन्डेशनच्या वतीने आयोजन.

वेळ : सायंकाळी साडेपाच वाजता.

मी चार वाजताच रिगलवर पोहचतोय तोच मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. थिएटरवर "शोले" चे भव्य दिमाखदार डिझाईन. एका खेळासाठीही ही जय्यत तयारी हे विशेषच! तिकीटासाठी चक्क रांग लागली होती. (मुक्त प्रवेश होता, तरी रांगेत प्रवेश हे योग्य नियोजन!) एका क्षणात माझे मन शाळा कॉलेजच्या दिवसांत गेले देखिल. गिरगावात राहत असल्याने मिनर्व्हा थिएटर अगदीच जवळ आणि तेथे "शोले" चा पाच वर्ष मुक्काम असतानाच एक गोष्ट कायम होती. आगाऊ तिकीट विक्रीला कायमच रांग! पाच वर्ष मिनर्व्हात "शोले" चा मुक्काम) आणि त्या काळातील आम्ही फिल्म दीवाने थिएटरवचे डेकोरेशन आणि तिकीटासाठी रांग पाहण्यास आवर्जून थिएटरवर जात. त्या काळातील हा फंडा आज कदाचित हास्यास्पद वाटेलही...

रिगलच्या रांगेतील पहिल्याच रसिक प्रेक्षकाला

प्रेक्षकाला सहज विचारले, किती वाजल्यापासून उभा आहेस? त्याने सांगितले, दोन वाजल्यापासून आहे. मी ठाण्यात राहतो. माझे आडनाव पिटकर. ऐकून थक्क झालो. रांगेत नजर टाकतानाच संगीतकार कौशल्य इनामदार भेटले. ते म्हणाले, पुन्हा एकदा "शोले" चा अनुभव घ्यायला आलोय. मुलालाही बरोबर आणलयं! हे ऐकून सुखावलो. त्यांच्या शेजारचा अमहाराष्ट्रीयीन मला म्हणाला, आतापर्यंत एकशेदहा वेळा थिएटरमध्ये "शोले " पाहिला. आता पुन्हा एकदा पाहतोय. पुन्हा सुखावलो. हीच रांग सतत वाढत वाढत खूपच दूरवर पोहचली. सगळ्यांच्या चेहऱ्यावर "शोले" कधी पाहतोय याची प्रचंड उत्सुकता होती. अनेकांनी माझ्याप्रमाणे अनेकदा "शोले " एन्जॉय केलेला. तर आजच्याही डिजिटल पिढीतील चित्रपट रसिक रांगेत होते. रिगलच्या लॉबीत सलिम जावेद यांच्या "अॅन्ग्री यंग मॅन" या

माहितीपटाचा मोठाच कटआऊट! रसिकांच्या गर्दीने आत प्रवेश करतानाच आजचा खेळ डोक्यावर घेतला जाणार हे स्पष्ट जाणवले!



मागची पुढची मिळेल ती खुर्ची पटकावण्याची धडपड सुरु झाली. काहीजण बाल्कनीत गेले. अशातच सलिम खान व जावेद अख्तर यांचे एकेक करत थेट पडद्यासमोरच्या पहिल्याच रांगेपर्यंत आगमन होताना प्रचंड टाळ्या आणि शिट्ट्या. सर्वांनीच उभे राहून अभिवादन केले. दोघांनी औपचारिक भाषण केले. "थिएटरवरची रांग पाहून पिक्चर सुपर हिट होणार

असे मी सलिमजींना म्हणालो" हे जावेद अख्तरचे म्हणणे मला फार आवडले. सलिम खान लगेचच घरी निघाल्याचे तर जावेद अख्तर काही मिनिटांचा चित्रपट पाहून निघाल्याचे मध्यंतरात लॉबीतील मिडियाकडून समजले. "जोया अख्तर" मात्र शेवट पर्यंत थांबली.

....पडद्यावर " शोले" चे डिझाईन होतेच. आणि ते "पिक्चर एन्जॉय करण्याच्या मूडला" पूरक वातावरण निर्माण करीत असतानाच सेन्सॉर प्रमाणपत्र पडद्यावर येताच अतिशय उत्फूर्तपणे टाळ्या शिट्ट्या आरडाओरडा वगैरे. आणि मग पिक्चर संपेपर्यंत असाच जल्लोष, असाच भारी रिस्पॉन्स! "कितने आदमी थे..", "तेरा क्या होगा कालीया..", "जो डर गया समझो मर गया..", "बहुत याराना लगता है.." अशा प्रत्येक "डायलॉग"वर धमाल रिस्पॉन्स. किचाट म्हणा ना! एकजण पडद्यासमोर

येवून नाचला. "शोले" पुन्हा पुन्हा पाहतानाही तीच उर्जा, तोच रिस्पॉन्स असे का हा खरं तर "हिंदी चित्रपट यशाच्या अभ्यासाचा विषय" आहे. आपल्या देशात हिंदी चित्रपट पाहणे म्हणजे जणू "सेलिब्रेशन" असते. डोक्यावर कसलाही तात्विकतेचा भार न घेता, डोक्याला शॉट न देता पडद्यावरच्या गोष्टीत, संवादात हरखून हरवून जाणे एवढेच पब्लिकला माहित्येय. अनेकदा तर पडद्यावर डायलॉग येण्यापूर्वीच काही फिल्म दीवाने डायलॉग बोलत हा अनुभव मिनर्व्हातही येई आणि ती गोष्ट आजही कायम आहे.

"शोले"चे गारुड कायम आहे हे अनुभवलं. हा चित्रपट फार ग्रेट कलाकृती आहे की नाही हे माहित नाही. पण हा पिक्चर या देशाची लोककथा आहे. त्याच उत्साहात पब्लिक थिएटरबाहेर पडले!

"जमाना दीवाना" (१९९५) च्या निमित्ताने खार पश्चिमेकडील सिप्पी फिल्मच्या कार्यालयात दिग्दर्शक

रमेश सिप्पी यांची लोकसत्ताच्या रंगतरंग पुरवणीसाठी मी मुलाखत घेताना "शोले" वरच माझे प्रश्न झाले आणि "जमाना दीवाना" चक्क विसरुन गेलो!



"शोले" सोबतचा माझा यशस्वी प्रवास हा शालेय वयातील "चित्रपट प्रेक्षक" यापासून ते आज मुद्रित माध्यम, वृत्त वाहिन्या आणि डिजिटल मिडिया असा तीनही माध्यमातून मी वावरतोय असा आहे. खूपच मोठा व वळणावळणाचा आहे. यात "शोले" कायमच नजरेत आहे.

मिनर्व्हात "शोले" च्या मध्यंतरला बाहेर येऊन (त्या काळात तशी सोय होती) रस्त्यावरचा दहा पैशाचा वडापाव घेतला, यावेळी पाण्याची बाटली वीस रुपये असल्याचे समजताच मी पुन्हा खुर्चीवर जाऊन बसलो! मी मिडियात आहे, मला "सॅण्डविच" अथवा "पॉपकॉर्न" फुकट मिळेल का असे विचारणे योग्य वाटले नाही. "शोले" एक चित्रपट रसिक म्हणून एन्जॉय करणे मला जास्त आनंददायक. तर समिक्षक म्हणून "शोले"त मला अनेक दोष आढळतील. मग मी आम जनतेसोबत तो एन्जॉय कसा करणार? "मी जनसामान्य प्रेक्षकांचा प्रतिनिधी" म्हणून चित्रपट एन्जॉय करताना त्यातच मिसळून जायला हवे. मी कोणी वेगळा आहे अशी भावना नसावी. "शोले" चा पन्नासाव्या वर्षांत पदार्पण करणारा प्रवास हेच सांगतो.

....आणखीन एकदाच काय अनेकदा मी

"शोले" एन्जॉय करु शकतो. आपल्या देशात चित्रपट अशाच रिपीट रन म्हणजेच पुन्हा पुन्हा चित्रपट पहावासा वाटतो वा वाटला या वृत्तीनेही जगवला आहे. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती भन्नाट आहे. मसालेदार मनोरंजक चित्रपट ते फारच गंभीरपणे एन्जॉय करतात...

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया १ सप्टेंबर २०२४)

♥

<u>लेख क्रमांक : ४०</u>

शोले @५० वर्ष
उत्साहाला सलाम!..

पिक्चरचं वेड काय काय घडवून आणेल काहीच सांगता येत नाही बघा. चित्रपट वा त्यातील कलाकार, त्याचे दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार,

पार्श्वगायक यांचे निस्सीम भक्त वेडात काय काय अफाट काम करतील, हे सांगता येणार नाही...

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, पण जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१५ ऑगस्ट १९७५) प्रदर्शित झाल्यापासून आजपर्यंत किमान शंभर वेळा पाहिलेले "शोले" दीवाने देशभरात अनेक. वयाच्या पंधराव्या वर्षी पहिल्यांदा "शोले" पाहिला. मुंबईतील चित्रपट रसिकांनी मिनर्व्हा चित्रपटगृहात सत्तर एमएमचा पडदा व "स्टीरिओ फोनिक साऊंड सिस्टीम" असा अनुभवला. (मिनर्व्हात "शोले" पाहणे नव्हते तर अनुभवणे होते!) आणि त्यानंतर चित्रपटगृहातच अनेकदा, मग ऐंशीच्या दशकात घरी "व्हीसीआर"वर व्हिडिओ कॅसेटवर!

(मला आठवतंय! "शोले" ची "व्हिडिओ कॅसेट" ही दोन भागात होती! अशीच गोष्ट.. "मुघल ए

आझम" आणि "संगम" याबाबतीत सुद्धा अनुभवले आहे.) तर सर्वात आधी "शोले" ची "व्हिडिओ टेप" जी दोन भागात होती ती कुणा कंपनीची दुबई मार्गे आली होती, असे ऐकलेय!) मग कधी रिपीट रनला प्रदर्शित झाल्यावर, नव्वदच्या दशकात मनोरंजन

उपग्रह वाहिनीवर, मग "यू ट्यूब"वर अशी माध्यमे बदलत असताना, त्यानुसार पुन्हा पुन्हा "शोले" पाहणारे फिल्म दीवाने अनेक! काही वर्षांपूर्वी याच "शोले" आधुनिक तंत्रज्ञानाने संस्कार करुन तो त्रीमिती चित्रपट (अर्थात थ्री डी) करण्यात आला तेव्हाही अनेकांनी तो पाहिला. अगदी मीदेखील.

"शोले" हा कधीच न संपणारा विषय!

"शोले" पन्नास वर्ष सेलिब्रेशन सध्या सुरु आहे. त्यात काही वेगळ्या भन्नाट कल्पनाही दिसताहेत. अशीच एक कल्पना मास्टरो (संगीत संयोजक) कांचा रणजीत बाबुजी यांनाही सुचली. ते संगीतकार राहुल देव बर्मनचे जबरदस्त फॅन (इतके की, त्यांनी पंचम या नावावरुन आपल्या नातीचे नाव "पंचमी" असे ठेवले. असे चित्रपट संगीत दीवाने ही तर आपल्या देशातील चित्रपट रसिक संस्कृतीची खासियत) त्यांनी भव्य दिमाखदार पडद्यावर " शोले"ची श्रेयनामावली, गाणी व काही महत्वाचे दृश्य सादर करतानाच त्यासमोर शंभर वादकांचा ताफा संगीत संयोजन करतोय अशा वेगळ्या शोचे आयोजन केले आणि त्याला हाऊसफुल्ल गर्दीचा प्रतिसाद मिळाला.

(पंचमदा यांच्या ताफ्यात "बासूदा, मनोहारीदा, बबलूदा" या "संगीत संयोजकांसह" राज सोडा,

किशोर सोडा यांसह "नितीन शंकर, कांचा, भानूदा, इंदोरकर" अशी सुमारे पन्नासहून जास्त "जिनियस" रत्ने होती! "शोले" चित्रपटाचे "पार्श्वसंगीत" तर.. संगीताचा "अभ्यास" करणाऱ्यांसाठी एक अनमोल ठेवा आहे! यात शंकाच नाही! सोबतच्या फोटोवर "क्लीक" करून आपल्या "स्मार्ट टीव्हीवर" नक्कीच आनंद घ्या! आमची "पिढी" या "शोले" नामक चित्रपटामुळे का? आणि कशी नादावली, ते कळेल! त्यांनी सादर केलेले "शोले" चित्रपटाचे हे "शीर्षक" गीत नक्की ऐका! अंगावर काटा येईल असे परिणाम कारक आहे ते! नक्की अनुभवा, ही विनंती!)

"शोले" ची क्रेझ आजही कायम आहे हेच अधोरेखित होतेय! नरिमन पॉईंट येथील एनसीपीए सभागृहात याचे दोन दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. बरेच दिवस या संगीत संयोजनाची रिहर्सल घेण्यात आली. आणि मग ते प्रत्यक्षात स्टेजवर सादर करण्यात आले. पडद्यावर "शोले" आणि समोर संगीत या

विशेष खेळास पटकथाकार "जावेद अख्तर" हजर होते. त्यांनीही हे एन्जॉय केले. देशातील विविध शहरांतून हा शो आयोजित केल्यास सगळीकडेच त्याला भारी रिस्पॉन्स निश्चित. "शोले"चे गीत संगीत व डायलॉग सर्वकालीन सुपरहिट आहेतच. त्याचा हा वेगळा अनुभव. चित्रपटाचे म्हणा वा मनोरंजनाचे जग हे असे अनेक बाबतीत बदलतयं.

"शोले" आजच्या ग्लोबल युगातील "डिजिटल" भाषेत सांगायचे तर, एक उत्तम पॅकेज मनोरंजक चित्रपट. त्यात गीत, संगीत, नृत्य, पार्श्वसंगीत या

सगळ्याचा सहभाग. विशेषत: मिनर्व्हात "शोले" पाहण्यात वेगळाच रोमांचक अनुभव असे. मी गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा झालो, त्यात मिनर्व्हात "शोले" एन्जॉय करण्याचा योग आला.

तुम्हाला एक सांगू? "मिनर्व्हा"ची तिकिटांची भलीमोठी "रांग" पाहून आपल्यासारखे सगळेच मध्यमवर्गीय लोक मनोमन धास्तावायचे! "निराश" व्हायचे! सगळेच "ब्लॅकमध्ये" तिकिटे घेऊन "शोले" बघतील असे नव्हते! चौपट रक्कम का द्यायची? या मध्यमवर्गीय मानसिकतेने ते लोक तिकडून निराशेने परतताना.. आसपासच्या "सिनेमा थिएटरला" केवळ एक चांगले "ऑप्शन" म्हणून एखादा.. दुसराच "सिनेमा" पाहून आनंद मानायचे..! "जा रहे थे जापान, पहुंच गये चीन समझ गये ना!" हीच मानसिकता असायची, म्हणा ना! १९७५/७६ या काळात त्यांच्यासाठी.. "जय संतोषी माँ", "धर्मात्मा",

"दीवार", "चोरी मेरा काम", "चुपके चुपके", "जख्मी", "प्रतिज्ञा", "संन्यासी", "खेल खेल में", "ज्युली", "जंजीर", "दो अंजाने" इतकेच नव्हे तर मराठा मंदिरचा "रिपिट" रनवाला "अलबेला" होताच! की! (यात "निळ्या" अक्षरातील "मजकूर" या चक्क त्या त्या "संपूर्ण सिनेमाच्या" अशा "लिंक्स" आहेत! इच्छुकांनी त्यावर केवळ "क्लिक" करून आपल्या "स्मार्ट टीव्हीवर" अवश्य आस्वाद घ्या!)

मिनर्व्हात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम असा असल्यानेच वेगळाच फिल येई. प्रत्येक म्युझिक पीस भन्नाट वाटे. (त्यात दिग्दर्शक व संगीत दिग्दर्शक दिसे!). उगाच चित्रपट लोकप्रिय होत नाहीत. त्यात रसिकांना गुंतवून ठेवणारे असं काही असावेच लागते. काळ कितीही पुढे सरकला तरी ते आठवणीत राहते. पुढील अनेक पिढ्यात जात असते.

आपण फ्लॅशबॅकमध्ये डोकावल्यास लक्षात

येईल की, मूकपटाकडून बोलपटाकडे आपण आल्यावर त्यात संवाद, गीत संगीत या गोष्टीही आल्या. ध्वनिमुद्रण ही गोष्ट येण्यापूर्वी काही चित्रपटात कलाकार गाणे गात असताना आसपास काही वादक असत. चित्रपट माध्यम व व्यवसाय यांनी सतत कात टाकत टाकत बरीच प्रगती केली आहे. त्यात अनेकांची बुध्दिमत्ता व श्रम आहेत. चित्रपट हे टीम वर्क आहे. दिग्दर्शक त्याचा कर्णधार असतो. या वाटचालीत चांगले; उत्तम, दर्जेदार चित्रपट पडद्यावर आले तसेच सामान्य, कंटाळवाणे, सुमार असेही चित्रपट येत राहिले. सर्वच देशातील चित्रपट संस्कृतीत हेच चाललयं. त्यात आपल्या देशातील जणू "लोककथा" ठरलेला असा "शोले" देखिल आहे. त्याच्या प्रदर्शनाचे हे पन्नासावे वर्ष सुरु असतानाच इटलीत याच आठवडय़ात "शोले" पुन्हा प्रदर्शित झाला आहे. दर्जेदार चित्रपट आजच्या ग्लोबल युगात

जगभरातील अनेक प्रेक्षकांपर्यंत पोहचत असतोच....

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया. २२ जून २०२५ वरुन साभार)

♥

<u>लेख क्रमांक : ४१</u>

<u>*"शोले" आता तीन तास चोवीस मिनिटांचा*</u>

तुम्हालाही आता माहित झाले असेल, जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" पुन्हा एकदा १५ ऑगस्ट २०२५ रोजी देश विदेशात अतिशय थाटात प्रदर्शित होत आहे... अर्थात या चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत यानिमित्त सध्या या वाटचालीचे विविध शहरातून सेलिब्रेशन सुरु आहेच. इटलीतील बलोनियामधील शोलेच्या भव्य दिमाखदार प्रिमियरला जवळपास अडीच हजार प्रेक्षक होते. त्यात साठ टक्के इटालियन प्रेक्षक होते. तात्पर्य, पन्नास वर्षांत शोले जगभरातील अनेक देशांत

चित्रपट रसिकांत पोहचला. ते होत असतानाच त्याच्याबद्दल जाणून घेणे, शोलेच्या निर्मितीची प्रक्रिया, पडद्यामागील अनेक गोष्टी, किस्से, कथा, दंतकथा जाणून घेण्याची वाढती उत्सुकता, त्याच्या खणखणीत यशाची आकडेवारी, मिनर्व्हा चित्रपट गृहातील सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा रोमांचक अनुभव घेतलेली माझी भाग्यवान पिढी, मिनर्व्हातील अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे व बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे तिकीट (पन्नास वर्षांपूर्वी ते फार महाग वाटत असे), अशा अनेक गोष्टींसह शोले कायमच चर्चेत.

शोलेत त्यावेळी समाविष्ट नसलेली काही दृश्ये देखिल यावेळी पाह्यला मिळतील. विशेष उल्लेखनीय गोष्ट, यावेळी चित्रपटाचा शेवट (क्लायमॅक्स) वेगळा आहे. त्यामुळेच तीन तास १८ मिमनिटाचा असलेला शोले आता तीन तास चोवीस मिनिटांचा असेल. त्यात

चित्रपटाचा शेवट (अर्थात क्लायमॅक्स) वेगळा असेल. मूळ शेवट काय होता? ठाकूर बलदेवसिंग (संजीवकुमार) गब्बरसिंगला (अमजद खान) तडपातडपा के मार देता है! खतम कर देता है! सेन्सॉरने या क्लायमॅक्सला आक्षेप घेतल्यावर चित्रपटाच्या शेवटी पोलीस गब्बरसिंगला अटक करतात असे दाखवण्यात आले (तात्कालिक समिक्षकांनी हा शेवट अगदीच पारंपरिक असे म्हटले. मात्र आणीबाणीत चित्रपट "सेन्सॉर" संमत करुन घेणे अडथळ्यांचे होते.)

चित्रपट माध्यम व व्यवसायात निर्मितीत मोठी संच अर्थात टीम दिग्दर्शक, संगीतकार, छायाचित्रणकार अशांच्या सहाय्यकांचाही त्यात वाटा असतोच. ते खूपच मोठे युनीट असते. चित्रपट बनवणे हे पडदाभर दिसते तितके सोपे नाही.. मग तो कल्ट चित्रपट असो वा अगदीच सामान्य. या व्यवसायात

येणाऱ्यांनी म्हणूनच चित्रपट कसा आकार घेतो हे समजून घ्यावे. केवळ आर्थिक बळावर चित्रपट निर्माण होत नाहीत हा पहिला धडा समजून घ्या. शोले चित्रपटाच्या श्रेयनामावलीनुसार सांगायचे तर, रमेश सिप्पींचे सहाय्यक होते, खालीश लखनवी, शरद पालेकर, बालन, किशन, पिशन ("यू ट्यूबवर" शोले उपलब्ध आहे. श्रेयनामावली आवर्जून वाचा. अथवा मोठ्या पडद्यावर ती आता वाचायची संधी मिळेलच.)

तर छायाचित्रणकार व्दारका दिवेचा यांचे सहाय्यक होते, पी. आर. एल. रमण, एस. वसंत. शोले पस्तीस एमएममध्ये चित्रीत करुन मग ती प्रिन्ट इंग्लंडला पाठवून सत्तर एमएममध्ये ब्लो अप करण्यात आली. मुंबईत मिनर्व्हा, न्यू एक्सलसियर व बसंत थिएटर (चेंबूर) येथे ती होती. मिनर्व्हात ३१ ऑगस्ट १९७८ पर्यंत दिवसा तीन खेळ याप्रमाणेच

हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असलेला शोले मिनर्व्हातच मॅटीनी शोला शिफ्ट करण्यात आल्यावर आणखीन दोन वर्षे असा एकूण पाच वर्षे मुक्काम केला. सहाय्यकात राहुल देव बर्मन यांचे सहाय्यक होते, बासू, मनोहारी, मारुती राव. चित्रपटाचे टेरिफिक पार्श्वसंगीत ऐकण्यातही रोमांचकता आहे. शोलेच्या संवादाची ध्वनिमुद्रिका सुपर हिट ठरली तसेच त्याच्या पार्श्वसंगीताचीही ध्वनिमुद्रीकेचीही जोरदार विक्री झाली.

आता शोलेच्या लांबीवर फोकस टाकताना अशाच काही लांबलचक चित्रपटांची नावे सांगायलाच हवीत.

"ॲनिमल": तीन तास एकवीस मिनिटे म्हणजेच एकशेएक्याण्णव मिनिटे

"डंकी" : १६२ मिनिटे

"सालार" : १७५ मिनिटे

"जोधा अकबर" : दोनशे चौदा मिनिटे

"लगान" : दोनशे चोवीस मिनिटे

"व्हॉट्स युवर राशी!" : दोनशे अकरा मिनिटे

"स्वदेश" : दोनशेदहा मिनिटे

पहिला दोन मध्यंतरचा चित्रपट "संगम": दोनशे अडतीस मिनिटे! (शोची वेळ मेन थिएटर "अप्सरा" : अकरा, साडेतीन आणि रात्री आठ! लांबी जास्त म्हणून दिवसा चारऐवजी तीन शो.) संगमला उत्तम व्यावसायिक यश मिळाले. पण रिपीट रनला त्याची काही दृश्य कमी करुन तो एका मध्यंतरचा करुन प्रदर्शित करण्यात आला. "मेरा नाम जोकर" पहिल्या ट्रायलला या चित्रपटाची लांबी ४ तास ४३ मिनिटे (दोन मध्यंतर) चित्रपट प्रदर्शित करताना तो ४ तास ९ मिनिटे अर्थात दोनशे एकोणपन्नास मिनिटे (दोन मध्यंतर!) अशा अवधीने पडद्यावर आला. पण "फर्स्ट डे फर्स्ट" शोपासूनच तो पडला पडला, बोअर है अशी

जोरदार आवई उठली आणि मग त्याची लांबी कमी करुन ती १७८ मिनिटे (एक मध्यंतर) अशी करण्यात आली. "यू ट्यूब"वर आधी मूळ दोन मध्यंतरचा म्हणजेच ४ तास ९ मिनिटे लांबीचा चित्रपट उपलब्ध होता! "हम आपके है कौन" दोनशे सहा मिनिटे (मुंबईत लिबर्टी चित्रपटगृहात "हम आपके.." प्रदर्शित होत असतानाच चक्क "दोन मध्यंतर" होती. पण आठवडाभरात काही दृश्य कमी करुन तो एका मध्यंतरचा करण्यात आला. ते पाऊल वेळीच उचलले हे कौतुकास्पद.) सुभाष घई दिग्दर्शित "सौदागर" ही तब्बल दोनशे तेरा मिनिटे!



जे. पी. दत्ता दिग्दर्शित "एलओसी कारगिल" ची लांबी तब्बल दोनशे पंचावन्न मिनिटे!

"गॅन्स ऑफ वासेपूर" तीनशे नऊ मिनिटांचा! "बाहुबली" आणि दुसरा "बाहुबली" मिळून तब्बल तीनशे सतरा मिनिटे! "आर आर आर" ची लांबी एकशे एकोणनव्वद मिनिटे!

यातून एक गोष्ट स्पष्ट होतेय, जास्त लांबीच्या चित्रपटांचाही "सिंगल स्क्रीन थिएटर्स" ते "मल्टिप्लेक्स" चित्रपट असा यशस्वी प्रवास सुरु आहे. म्हणजेच आजच्या पिढीतील चित्रपट रसिकांनाही

तीन सव्वातीन तासाचे पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपट एन्जॉय करण्यात रस आहे. पुष्पा व पुष्पा २ हे खणखणीत यशस्वी चित्रपटही असेच लांबलचक होते. पब्लिकने टाळ्या व शिट्ट्यांनी ते एन्जॉय केले.

"शोले" पुन्हा प्रदर्शित होत असताना त्याला नक्कीच सकारात्मक वातावरण आहे. पन्नास वर्षाचा हिंदी चित्रपटाचा प्रवास "शोले" ते "शोले" असा देखील नक्कीच आहे. चित्रपटाचा अभ्यास करताना अशा यशोगाथादेखिल महत्वाच्या. प्रेक्षकांनी पडद्यावरील विश्वात अधिकाधिक वेळ रमण्यात आनंद मानला आहे....

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान (शनिवार लेख) वरुन साभार)

♥

<u>लेख क्रमांक : ४२</u>

<u>*बच गया साला.....*</u>

फोटो पाहताक्षणीच चित्रपट रसिकांच्या किमान तीन चार पिढ्यांच्या डोळ्यासमोर रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" मधील क्रूरकर्मा गब्बरसिंगचे (अमजद खान) चे अतिशय विकृत गडगडाटी हास्य, जालीम नजर आणि प्रचंड खुनशी बोलणे आठवले असेल.... "कितने आदमी थे..!" हे गब्बर विचारतो आणि मग जो त्याचा पिस्तूल घेऊन पडदाभरचा

दहशतवाद सुरु होतो तो मिनर्व्हाच्या भव्य सत्तर एमएमचा पडदा व स्टीरिओफोनिक साऊंड यात विलक्षण अक्राळविक्राळ वाटे. पन्नास वर्षांपूर्वी मिनर्व्हात हाऊसफुल्ल गर्दीत शोले पाहणाऱ्या चित्रपट रसिकांतील मीदेखील आहे... गब्बरसिंग तीन गोळ्या हवेत उडवतो आणि चित्कारतो, इस पिस्तूल मे तीन जिंदगी...तीन मौत बंद है... देखते है किससे क्या मिलता है, असे म्हणत तो एकेक करत त्या तिघांच्या कानावर पिस्तूल रोखतो, पहिल्याच्या कानावर पिस्तूल रोखतो, चाप दाबतो, पण त्यात गोळी नसते, ते पाहून गब्बरसिंग म्हणतो, बच गया साला...

एव्हाना तो सगळाच थरारक प्रसंग तुमच्या डोळ्यासमोर आला असेलच. त्या तिघांतील एक कालीया म्हणजे विजू खोटे तर जो पहिलाच असतो त्याचे नाव मेजर आनंद!

(वरील फोटोतील हे तिघे म्हणजे अनुक्रमे.. "विजू खोटे, बिहारी आणि मेजर आनंद"!)

चेहरा ओळखीचा पण नाव माहित नाही असे अनेक कलाकारांबाबत घडते. असे अगदीच छोट्या छोट्या भूमिका साकारत असलेले अनेक चेहरे आपण रुपेरी पडद्यावर पाहतो. आणि मग कधीतरी त्याचे नाव माहित होते. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर गुगल सर्च ही एक मोठीच गोष्ट आहे. पण त्यात सगळीच नावे व माहिती मिळेलच असे नाही.

"शोले" च्या अफाट खणखणीत यशाने अनेक

कलाकारांना स्टारडम दिला. "मॅकमोहन" त्यातलाच! तो चित्रपटसृष्टीत साठच्या दशकाच्या उत्तरार्धात आला पण सांभाने त्याला ओळख दिली. मेजर आनंदचा चेहरा मनात/ डोक्यात फिट्ट बसला पण नाव समजत नव्हते. अखेर ते हिंदी चित्रपटसृष्टीतूनच मिळाले.

त्याचे खरे नाव "अमरजितसिंह आनंद". जन्म १० ऑगस्ट १९४१ रोजीचा उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्य़ातील पडरौना या गावातील. गोरखपूर येथील डीएवी शाळेत शिक्षण घेत असताना त्याला शाळेतील सांस्कृतिक गोष्टीत रस होता आणि तो फूटबॉलदेखिल उत्तम खेळायचा. उच्च शिक्षण त्याने प्रथम गोरखपूर विद्यापीठात आणि मग अलिगढ मुस्लिम विद्यापीठात घेतले. त्याने सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. १९६८ ला तो भारतीय सैन्य दलात सामिल झाला आणि त्याची बंगलोर येथे पोस्टिंग झाली आणि आता

तो "मेजर आनंद" झाला. बंगलोरजवळ फिरोज खान, संजय खान यांचा स्टड फार्म होता. ते तेथे

गेल्यावर सैन्य दलाला भेट देत. अशाच एका भेटीत मेजर आनंदने संजय खानला सांगितले, मला चित्रपट काम करण्यास आवडेल. प्रत्यक्षात ते किती व कसे अवघड आहे हे संजय खानने त्याला व्यवस्थित समजावून सांगितले. पण "पिक्चरचं येड" असलेला कधी शांत बसतो काय? मेजर आनंद लहानपणापासून सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये टाळ्या शिट्ट्यांनी चित्रपट एन्जॉय करीत असे. राजेश खन्नाचा

तो विलक्षण चाहता! सिनेमाचे वेड स्वस्थ बसू देत नसल्याने तो खरोखरच मुंबईत आला व संजय खानच्या जुहूच्या बंगल्यावर पोहचला. संजय खान तेव्हा "चांदी सोना" या चित्रपटाच्या निर्मिती व दिग्दर्शनाची तयारी करत होता. मेजर आनंदला करारबद्ध करत त्याचा हुरुप वाढवला. (हा चित्रपट १९७७ साली मुंबईत प्रदर्शित झाला). मेजर आनंद आता मुंबईच्या चित्रपटसृष्टीतील अनेक निर्माता व दिग्दर्शकांना भेटू लागला. अनेक ठिकाणी त्याला "मिलते रहो " असे फिल्मी आश्वासन मिळाले तर कुठे छोटे छोटे रोल मिळालेही. त्या काळात अशा धडपड्या अर्थात स्ट्रगलर नवीन कलाकारांनी दोन चार वृत्तपत्र वा साप्ताहिकात आपले एकादे छायाचित्र व थोडक्यात माहिती प्रसिद्ध करुन आणणे खूप महत्वाचे मानले जाई. चित्रपटविषयक साप्ताहिकात

तशी प्रसिद्धीही मिळत असे. गोष्ट खूपच छोटी वाटते, पण खूपच महत्वाची आहे.

मेजर आनंदचा प्रदर्शित झालेला पहिला चित्रपट होता, रामसे बंधुंचा हॉररपट "अंधेरा"! तो मुंबईत १ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटात चक्क सात खलनायक होते. त्यात एक

मेजर आनंद होता. त्याच दिवशी उत्तर भारतात त्याची अशीच छोटी भूमिका असलेला "मेरा वचन गीता की कसम" प्रदर्शित झाला. तर तुम्हालाही माहित्येय १५ ऑगस्ट १९७५ रोजी मुंबईत "शोले" पडद्यावर आला

तो आजही सुरुच आहे. या यशाने मेजर आनंद देश विदेशातील अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचत राहिला. पण चित्रपट धो धो चालत असला तरी त्यातील कामाचे पैसे मात्र एकदाच मिळालेले असतात. मेजर आनंदला आणखीन चित्रपट मिळत जाताना अर्थकारण अवघड जात होते. "त्रिमूर्ती" (जुना), "कलाबाज", "देवता", "भयानक", "जख्मी इन्सान", "अब्दुल्ला" (हा संजय खानचाच चित्रपट), "डायल 100", "हमसे है जमाना", "पहरेदार", "कानून मेरी मुठ्ठी मे", "इतनी जल्दी क्या है", "आखरी बाझी" वगैरे वगैरे अनेक चित्रपटातून लहान मोठ्या भूमिका साकारत साकारत वाटचाल केली. काही भूमिकांना तर चेहराही नव्हता. अगदी राजेश खन्नाची भूमिका असलेल्या शक्ती सामंता दिग्दर्शित "आवाज" या चित्रपटातही काम केले. पण दुर्दैव असे की राजेश खन्नासोबतच्या दृश्यात संधी मिळाली

नाही. मालिकांच्या काळात त्याने "और ढोल बजने लगा" या मालिकेत काम केले. या एकूणच प्रवासात त्याने "ज्युली" नावाच्या युवतीशी लग्न केले. मग सात बंगला येथे भाड्याच्या घरात संसार थाटला. सीमा व दिशा अशा दोन मुलीही झाल्या. पण म्हणावा तसा पैसा हाती येत नव्हता. कुतरओढ होत होती. कालांतराने चित्रपटात कामे मिळणेही अवघड होत गेले. एके दिवशी त्याने निर्णय घेतला, चित्रपटसृष्टी सोडून तो इस्टेट एजंट झाला आणि काही वर्षातच सात बंगल्यातील त्याच इमारतीत स्वत:च्या मालकीचे घर घेतले. चित्रपटसृष्टीतील हेदेखील एक वास्तव! कालांतराने ३ सप्टेंबर २०२० रोजी त्याचे निधन झाले! ("रामसे" बंधूंचे "हॉरर" सिनेमे! "प्ले-लिस्ट"!)

"शोले" पुन्हा पुन्हा अनेकदा पाहत असलेल्या प्रत्येकाने लेखासोबतचा फोटो पाहताक्षणीच त्याना आठवले असणारच हाच तो घाबरत घाबरत

गब्बरसिंगची खूनशी नजर चुकवण्याचा व्यर्थ प्रयत्न करणारा...आपण आपल्या नजरेत तो आणि त्याचा तो थरथर घाबरलेला चेहरा आणि त्यातच हसण्याची व्यर्थ धडपड राहिलीय!

© दिलीप ठाकूर

♥

लेख क्रमांक : ४३

"आठवणी रस्त्यावरच्या पिक्चरच्या!"

मित्रांनो, आपण "शोले" हा चित्रपट मुंबईत "मिनर्व्हा" सह इतर थिएटरमध्ये लागलेला पहिला. संपूर्ण भारतात तसेच परदेशात दाखवला! तो नंतर "यूट्यूब" वर सुद्धा आला, "ओटीटी" वर आला पण "मुंबई"त तो "रस्त्यावर" सुद्धा दाखविला गेला हे पटतंय!? येस! तो मुंबई सेंट्रल इलाक्यातील "बी. आय. टी." चाळींमधील रस्त्यावर चक्क दाखविला गेला होता. तिथे राहणाऱ्या पंचविशीतल्या एका तरुणाचे याच काळात "लग्न" झाले होते. (अंदाजे १९८१ वगैरे) तेव्हा त्याने काय जाहीर केलं होतं माहित्येय?? "मला "मुलगा" झाला तर मी माझ्या "स्वखर्चाने" इथे आपल्या "बी. आय. टी. मधल्या पटांगणात.. आपल्या सर्वांचा आवडता सिनेमा "शोले" नक्कीच तुम्हां सर्वांना दाखवेन!" त्याच्या सुदैवाने त्याचा "नवस"

पुरा झाला.. त्याने यावर काय करावं..? आपली "ताकद" पणाला लावून त्याने "शोले" ची "३५ एम एम" ची "प्रिंट" कशी मिळेल? तसेच ती कशी सादर करता येईल? यावर ढोर मेहनत घेतली! मित्रांनो.. तुम्हाला माहितच आहे.. फुटपाथवर दाखवले जाणारे "सिनेमे" हे मूलतः "१६ एमएम" मधलेच असतात. तो "टिपीकल" असा "प्रोजेक्टर" असतो. तेव्हा कामाठीपुरा वगैरे भागात "रस्त्यावर पिक्चर" दाखवणाऱ्या अनेक संस्था होत्या. त्यांच्याकडे "सोळा एम. एम." रिळाचे भांडार असायचे. मात्र त्याच्याकडे "३५ एम एम" प्रोजेक्टर असणे शक्यच नव्हतं. मग तिथला ओळखीचा "वितरक" आणि या साहेबांनी काय चक्रे फिरवली कुणास ठाऊक! परंतु त्याने, त्याचे म्हणणे पूर्ण केले! त्याने "शोले" हा "सुपरहिट" चित्रपट चक्क त्यांना "मोकळ्या पटांगणात, रस्त्यावर" सादर होणाऱ्या सिनेमाप्रमाणे दाखवला!

तेही चक्क "३५ एम एम" मध्ये! त्यांच्या चाळीतल्या त्या अमुक "रोडवर"! "फुटपाथवर" सादर होणाऱ्या नेहमीचा "१६ एम एम" हा पडदा तो काय?! त्याचप्रकारचे आणखी.. तीन पडदे आणून ते तिथल्या मुलांच्या मदतीनं शिवणकाम करत व्यवस्थित जोडून एक खास "नवा" मोठ्ठा "पडदा" बनविला होता! एका मोठ्या "ट्रकमधून" ती प्रदर्शनाची "सामुग्री" आलेली..! "३५ एम एम" चा मोठा "प्रोजेक्टर" ते सुद्धा भल्यामोठ्या "ट्रक" मधून येणं हे सर्वांसाठी एक "आश्चर्यच" होते! सिनेमा दाखवला..! लोकांनी अनेक ठिकाणी हवे तसे "वन्स मोअर" देत पाहिला..! "मिनर्व्हा" मध्ये तो भले "तीनेक" तासांचा असेल.. इथे हा सिनेमा चक्क "साडेचार - पाच तासांचा होता! असो..! तो "शोले"ची तिकिटे "ब्लॅक" करायचा म्हणे! हे खरं की खोटं, हे मात्र माहित नाही! पण यामुळे एक झालं! मला "रस्त्यावर दाखविल्या जाणाऱ्या

चित्रपटांची" प्रकर्षाने आठवण आली. आणि मन जवळ जवळ पन्नासेक वर्षे भूतकाळात गेलं. आत्ता वयाच्या साठी/पासष्टीत असणाऱ्यांना तर हे पूर्णपणे माहित आहेच. ते दिवस वेगळे होते. "सार्वजनिक सत्यनारायण पूजा" असो, की "गणेशोत्सव", किंवा "नवरात्री"! तर! हे सगळे उत्सव रस्त्यावर लावलेल्या "पडद्यावरील" सिनेमांशिवाय जणू पूर्ण होतच नसत! (लोक तेव्हा "गरबा" खेळत नसत, त्याऐवजी ते सहकुटुंब "मुंबादेवी" किंवा "महालक्ष्मी"चे दर्शन घेण्यासाठी जात असत! मुंबईत "गरबा" पहिल्यांदा आणला तो संगीतकार "बाबला" आणि "मुसा पाईक" यांनी!) "बाबलाच्या" धमाकेदार.. "बाबला डिस्को दांडिया" या "एल. पी." वर प्रदर्शित झालेल्या रेकॉर्डने "इतिहास" घडवला. त्याने "हिंदी चित्रपटातील" सुपरहिट गाणी गुंफून एक मस्त "आविष्कार" सादर केला होता. "लाऊडस्पिकर

वाल्यांनी" तो वाजवला आणि गाजवला. मुंबईतल्या प्रत्येक विभागात "गुजराती" मंडळी होतीच.. त्यांनी तो अक्षरश: गाजवला! असो! हा विषय वेगळा! "रस्त्यावरच्या सिनेमाबद्दल सांगायचं तर.. संध्याकाळी "पाच" वाजले की मैदानात मोक्याच्या ठिकाणी चादरी, पथारी, गोणपाट; कालचा पेपर कागद पसरून जागा अडवल्या जात असत. मुले मग आपापल्या पथारीवर मांड ठोकून "बैठे खेळ" किंवा "अभ्यास" सुद्धा करत असत. रात्र होताच बायका येत असत. बायकांसाठी पुढे खास व्यवस्था केलेली असे. बहुदा त्यांना प्रोजेक्टरच्या बाजूला बसवले जाई. त्यांच्यामागे पुरुष मंडळी, ज्येष्ठ नागरिक बसत. आम्ही बिनधास्त उलट्या बाजूला बसून अनेक सिनेमे एन्जॉय केले आहेत. मराठी सिनेमातल्या नायिका "कासोट्याच्या" साड्या नेसल्या असल्या तरी उलट्या बाजूने त्या नायिका "गुजराती" स्टाईलने साड्या

नेसल्या आहेत असे वाटे. उलट्या बाजूला बसल्यामुळे हिंदी पिक्चरमधली "फायटिंग" करणारे सगळेच "डावखुरे" वाटायचे, ही गंमतच! तिथे असलेला "लाऊडस्पिकर"वाला.. प्रोजेक्टरच्या स्पीकरला "माईक" लावायचा व तो आवाज मोठ्या "स्पीकर" वर दणदणीत वाजायचा. जर कॉलनीमध्ये विविध सोसायटीचे विविध सिनेमे असतील तर त्यांच्यात चढाओढ असे. खेतवाडीतल्या प्रत्येक गल्लीत वेगवेगळे सिनेमे असत हे आम्ही बच्चेकंपनीने प्रत्यक्ष अनुभवले आहे! एक ते चौदा गल्लीत. सकाळी सायकल घेऊन जात, प्रत्येक गल्लीतील "बोर्ड" पाहून कोणता सिनेमा असेल याची कागदवर नोंद केली जायची! आणि संध्याकाळी मित्रमंडळींची जणू "उच्चस्तरीय" बैठक होत असे. आमच्यातले थोडे मोठे असलेले, सर्वांनी आज रात्री कुठला सिनेमा बघायला जायचं ते ठरवत असत.

रस्त्यावरील "प्रोजेक्टर" वरचा "सिनेमा" बघणं आमच्या पिढीने चांगलंच एन्जॉय केलंय. मोकळं मैदान! त्यात मच्छर, माशा, विचित्र वास असूनही लोक सिनेमा एन्जॉय करायचे, हे विशेष! अचानक एखादा उंदीर आणखी काही हाऊसफुल्ल गर्दीत घुसला की पळापळ व्हायची. कधी भटके कुत्रेही घुसायचे! बाप रे! कधी कधी "प्रोजेक्टर" अती गरम झालाच तर फिल्म जळायची. मग सक्तीचा "इंटरव्हल"! सिनेमातल्या प्रत्येक चांगल्या "डायलॉग"ला, "फायटिंगला", "गाण्याला" जबरदस्त टाळ्या आणि शिट्ट्या मिळायच्या! "वन्समोअर" मिळाला की पिक्चर जागच्या जागी "स्टॉप"! मग रीळ रिवाइंड करायचे. तेव्हा होणाऱ्या "विचित्र" आवाजाची गंमत वाटे!

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला गल्ली क्रिकेट माहित असेल, कारण आजही

शहरातील लहान मोठ्या गल्लीत, मैदानावर रबरी वा टेनिस चेंडूवरील क्रिकेट खेळले जाते. आजूबाजूच्या घराच्या काचा फुटतात. आरडाओरड सुरु असते. रात्रीच्या क्रिकेट सामन्यांचेही आयोजन होतेय. मात्र "गल्ली चित्रपट" राहिलाय, आठवणीपुरता. एक भन्नाट व भारी संस्कृती होती हो!

आज आपल्या वयाची पन्नाशी, साठी ओलांडलेल्यांना फ्लॅशबॅकमध्ये जात आठवत असेल साठ सत्तरच्या दशकात मुंबई, ठाणे, डोंबिवलीतील श्रीगणेशोत्सवातील हुकमी मनोरंजन म्हणजे गल्ली चित्रपट. कुठे ताडपत्रीवर बसून तर कुठे खुर्चीची व्यवस्था. वा घरचीच खुर्ची वा टेबल घ्यायचे.

श्रीगणेशोत्सव मंडळाच्या मंडपात वा बाहेर

श्रीगणेशोत्सव मंडळाच्या मंडपात वा बाहेर रस्त्यावर, मैदानावर मधोमध सोळा एमएमचा पडदा लावून "पिक्चर" दाखवला जाई. काही ठिकाणी ...



प्रोजेक्शनच्या बाजूला महिला प्रेक्षक तर पडद्याच्या पलिकडे ("उलट्या बाजूला") पुरुष प्रेक्षक! गंमत म्हणजे तिकडे चित्र उलटे दिसे तरी कोणाचीच हरकत नसे! पिक्चर एन्जॉय करायला मिळतोय ना, बस्स! मन भरुन आनंद होई. पलिकडून दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद हे डावरे दिसले तरी त्यांची अदाकारी उजवी असे. अमिताभ बच्चन उजव्या हाताने ढिश्यूम ढिश्यूम करताना दिसे. पब्लिक चिक्कार असे. आणि टाळ्या शिट्ट्या हंशा हमखास असे. ती संस्कृतीच मोकळी ढाकळी व वेगळी होती. अनेक ठिकाणी पडद्याच्या पलिकडचा प्रेक्षकांवर छत

नसल्यास पावसाचा व्यत्यय आल्यावर हिरमोड होई. तरी पडद्यावरुन लक्ष हटत नसे. याचं कारण, चित्रपट पाहण्यातील मनमुराद मनसोक्त आनंद हा असे. काही ठिकाणी पडद्याबाहेर दृश्य जाई. तरी विनातक्रार चित्रपट पाहणे सुरु राही. कुठे चाळीतील गॅलरीतून, ओटीवर, पायरीवर बसून पिक्चर एन्जॉय केले जात. रात्रीची आरती झाल्यावर दहानंतर हे पिक्चर सुरु होत आणि एकपर्यंत संपत. एका अधिकृत मध्यंतरसह आणखीन दोन अनधिकृत मध्यंतर असत. कारण एक रिळ संपल्यावर दुसरे लावावे लागे. प्रोजेक्शनवाला दिवसभरात कुठे भेटलाच तर त्याच्याकडून आज कोणत्या गल्लीत कोणता पिक्चर आहे हे हमखास विचारले जाई. सत्तरच्या दशकात साधारण अडिचशे, तिनशे रुपयांत गल्लीतील एका चित्रपटाचे आयोजन होत असे. (पन्नास वर्षापूर्वी ही रक्कम खूपच मोठी होती.

पालकांना विचारुन बघा.) वर्गणी देताना काही चित्रपटप्रेमी फुकाचा सल्ला देत, "दादा कोंडकें"चे पिक्चर दाखवा, खूप जुन्या पिढीतील व पठडीतील चित्रपट रसिक सांगे, "झनक झनक पायल बाजे", "नवरंग" असे म्युझिकल सुपरहिट चित्रपट दाखवा. अर्थात मतस्वातंत्र्य असल्याने ते वापरायला हवेच. काही श्रीगणेशोत्सवात मंडळे स्मरणिकेत कार्यक्रमात स्थानिक कार्यक्रम, वाद्यवृंद, नाटक यासह चित्रपटाच्या तारखा दिल्या जात. अनंत चतुर्थीच्या आदल्या संध्याकाळी महाआरती असल्यानेच त्या दिवशी हमखास एक चित्रपट दाखवणे निश्चित असे. कारण, आरतीला उशीर झाला तरी चित्रपटासाठीच्या पूर्वतयारीला फारसा वेळ लागत नसे. आणि रात्री उशीरा पिक्चर संपल्यावर काही स्वयंसेवक मंडपातच झोपत. आपली चाळ वा गल्ली सोडून इतरत्र पिक्चर एन्जॉय करायला गेलेले इतक्या रात्रीही पाहिलेल्या

पिक्चरवर गप्पा करत करत घरी येत, बरेचजण ओटीवर झोपत. दुसऱ्या दिवशी वाडीच्या नाक्यावर, मंडपात कोपऱ्यात रात्री एन्जॉय केलेल्या नि आजच्या रात्रीच्या वाद्यवृंद वा नाटकावर चर्चा होई. दहा दिवसाच्या श्रीगणेशोत्सवात जवळपास प्रत्येक मंडळात दोन हिंदी व एक मराठी चित्रपट असे दाखवले जात. कुठे फक्त आणि फक्त मराठी चित्रपट दाखवत.

मी गिरगावातील खोताची वाडीत लहानपणा पासून ही गल्ली चित्रपट संस्कृती अनुभवत मोठा झालो. ते दिवसच वेगळे होते. शेजारच्या आंबेवाडीत हमखास आर. के. फिल्म बॅनरचा म्युझिकल सुपरहिट चित्रपट पाह्यला मिळत असे. "बरसात", "श्री ४२०", "जिस देश मे गंगा बहती है" मी तेथेच पाहिले. हे तर काहीच नाही! मंडळाचे काही बुजुर्ग "वर्गणीदार, आश्रयदाते" जुन्या सिनेमाबद्दल आग्रह धरत असत..!

"थांब लक्ष्मी कुंकू लावते", "रामराम पाहुन्ह", "एक दोन तीन", "अपराध", "श्यामची आई" अशा अनेक सिनेमांसाठी ते आग्रही असत! मुंबई सेंट्रलच्या "बी. आय. टी. चाळीत.. गणेशोत्सवासाठी अगदी आपलेपणाने वर्गणी देणाऱ्या "कोकणी ख्रिश्चन" बांधवांनी तर "अमुचे नशीब" दाखवा असा आग्रह केलेला! त्यातली भाषा "गोव्याची" पण आश्चर्य म्हणजे तो विनोदी सिनेमा सगळ्यांनीच एन्जॉय केला, बरं!

कुडाळेश्वर वाडीत (पेंडसे वाडीही म्हणतात) "तेरे घर के सामने", रामचंद्र बिल्डिंगमध्ये एका वर्षी "जीने की राह", पुढच्याच वर्षी "वारीस", मग एका वर्षी "खिलौना" पाहिला (याच बिल्डिंगमध्ये जितेंद्र लहानाचा मोठा झाला याचे ज्ञान होते, तोच आपल्या या चाळीसाठी दरवर्षी एक चित्रपट भेट देतो हे देखील समजले.) त्या काळात गिरगावातील जवळपास प्रत्येक श्रीगणेशोत्सवात दहा दिवसात तीन चित्रपट

दाखवतच. आणि आज सदाशिव लेनमध्ये "मेरा गाव मेरा देश" पाह्यचा की अमृत वाडीत "गाईड" याचा निर्णय घ्यावा लागे. माझ्यासारखे फिल्म दीवाने अशा पध्दतीनुसार जुने चित्रपट पाहून आपला "बॅकलॉग" भरुन काढत. "वाट चुकलेले नवरे", "एक गाव बारा भानगडी", "वारणेचा वाघ" असे अनेक मराठी चित्रपट मी गिरगावातील गल्लीत पाहिलेत. आणि एकदा का पडद्यावर चित्रपट सुरु झाला तरी सकाळी लवकर उठून अभ्यास करुन शाळेत (कालांतराने महाविद्यालयात) जायचेय याचे भान असे. कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये वा अड्ड्यावरही गल्लीत पाहिलेल्या "वक्त" अथवा "जब जब फुल खिले" अशा एकाद्या चित्रपटावर चर्चा रंगत असे. एक दोनदा एन्जॉय केलेले "आराधना", "दो रास्ते", "कटी पतंग", "दुश्मन", "आन मिलो सजना" असे राजेश खन्नाचे सुपरहिट चित्रपट आणखीन एकदा श्रीगणेशोत्सवात

एन्जॉय केले. त्यातच राजेश खन्ना मुळचा आमच्या गिरगावातील ठाकूरव्दार नाक्यावरील "सरस्वती निवास"चा रहिवाशी. त्यामुळेच गिरगावातील प्रत्येक गल्लीत त्याचा एक पिक्चर दाखवायचाच असा अलिखित नियम होता. प्रेम प्रेम म्हणतात.. ते हेच असते!

दक्षिण मुंबईतील लहानाचे मोठे झालेले असे माझ्या पिढीतील विजय पाटकर, जयवंत वाडकर, दीपक शिर्के अशा अनेक कलाकारांनी (तसेच आमचा बालमित्र कै. प्रदीप पटवर्धन, जो आज हयात नाही!) आपल्या लहानपणी असा गल्ली चित्रपटाचा छान अनुभव घेतलाय. तेही आपल्या मुलाखतीत गल्ली चित्रपटावर भरभरुन बोलतात.

आपल्या देशात १९८२ साली रंगीत "दूरदर्शन" व "व्हिडिओ" यांचे आगमन झाले आणि गल्ली चित्रपट संस्कृतीत आता बदल होत होत गेला! पडद्याची जागा

"व्हीसीआर"ने घेतली. एका दिवसाचे दहा रुपये भाडे अशा पध्दतीनुसार चित्रपटाची कॅसेट हाती आली. वातावरण बदलले. आजच प्रदर्शित झालेल्या नवीन चित्रपटाची कशी कोण जाणे पण संध्याकाळपर्यंत कॅसेट उपलब्ध होवू लागली (ती चोरट्या मार्गाने येते म्हटले गेले पण चित्रपटसृष्टीने त्यावर काही कठोर कारवाई वा उपाययोजना केली का? फक्त चर्चा होत राहिली. १९८६ मध्ये "पायरसी" विरुद्ध संपूर्ण इंडस्ट्री "स्ट्राईक" वर जात "मोर्चा" काढलेला, हे वगळता, कोणतीच कठोर कारवाई झाली नाहीय!)

व्हिडिओ कॅसेट युगात मिथुन चक्रवर्तीच्या डिस्को डान्स व देमार घेमार मसालेदार मनोरंजक चित्रपटांना भारी मागणी व्हायची. कोणत्या हीरोचे मार्केट कुठे असेल काही सांगता येत नाही. एका रात्रीत मिथुनचे तीन पिक्चर व्हिडिओवर एन्जॉय केले जावू लागले आणि गल्ली चित्रपट संस्कृती "पडद्याआड" गेली....प्रत्येक श्वास गल्ली चित्रपटाची हमखास आठवण येतेच. त्या काळात वर्षभरात काही ना काही कारणास्तव गल्लीत चित्रपट असत. एकाद्या चाळीत आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त एखादा मराठी चित्रपट दाखवला जाई. आपल्या देशातील चित्रपट संस्कृती अशी बहुस्तरीय आहे. जगावेगळी नक्कीच आहे. काळासोबत त्यात बदल होत गेलेत इतकेच. गल्ली चित्रपट संस्कृतीवरही एकाद्या लघुपटाची निर्मिती व्हायला हवी. तुम्ही आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "स्वदेस" (२००४)

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर

चित्रपटात ग्रामीण भागातील गल्ली चित्रपटाचे एक बोलके दृश्य नक्कीच पाहिले असणार. ती एक प्रकारची ठेवच आहे जणू! जगभरातील चित्रपट जगतातील हा वेगळाच प्रकार!

सिनेमातील जवळ प्रत्येक विनोदवीरांच्या करामतींना जबरा दाद मिळे. मित्र एखादा "लव्ह सीन" आलाच तर डांबरट मुलं हमखास "अरे सोड सोड..!" असे चित्कारायची! काही गणपती मंडळांना वर्गणीदारांकडून तसेच श्रीमंत आश्रयदात्यांकडून सिनेमाची "स्पॉन्सरशिप" मिळे! खूप आठवणी!

रस्त्यावर दाखवल्या गेलेल्या सिनेमाच्या नंतर आले "व्ही.सी.आर."! तो भाड्याने आणून एका रात्रीत "तीन तीन" पिक्चर्स, तेही सलगपणे पाहण्याचे फॅड आलेले! नवीन "रिलीज" झालेल्या "सिनेमांची" कॅसेट आणणे ही तर "ऐट" दाखवण्याची गोष्ट होती. काहीही म्हणा! "रस्त्यावर दाखवलेल्या गेलेल्या"

सिनेमाची सर आजच्या "मल्टिप्लेक्स" मध्ये पाहिलेल्या सिनेमाना कधीच येणार नाही! आणि रस्त्यावर पिक्चर बघता बघता घरून मिळालेल्या खाऊच्या पैशांतून घेतलेले "चणे शेंगदाणे" यांची सर "मल्टिप्लेक्स" च्या मध्यंतरात "बर्गर", "फ्रेंच फ्राईज" किंवा "पॉपकॉर्नला" तर कधीच येणार नाही! खरंच.. ते दिवस पुन्हा कधीच येणार नाहीत, हेच खरे!

गेले ते दिन गेले, हेच खरं!

© दिलीप ठाकूर

♥

♥ विशेष आभार ♥

"ई बुक" संरचना : डॉ. अनंत पावसकर

ज्येष्ठ लेखक : सन्मा. श्री. धनंजय कुलकर्णीजी (खास लेख : पृष्ठ : १६८)

♥

"शोले".. आणि बरंच काही - लेखक : दिलीप ठाकूर